VOLUME 5 ISSUE 8 August 2020

*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**

**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra**

# *MODLIB*

## *E-Bulletin of Library and Information Centre*




**Published by** : Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous) , Shivajinagar, Pune-05.

**Editor** : Dr. Shantashree Sengupta, Librarian.

**Editorial Assistant** : Mrs. Sarika Sable

**Website** : http://www.mcasclib.com/

# Table of Contents


| Sr. No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 1 | **Special Visit-**<br>*Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir, Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam and Principal Dr. R.S.Zunjarrao Sir with Honorable Governor of Maharashtra Shri. Bhagat Singh Koshyariji* | 4 |
| 2 | **Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir and Prof. Dr. Nivedita G. Ekbote invited as Resource Person** | 5 |
| 3 | **Work of Appreciation– *Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam*** | 6-7 |
| 4 | **Work of Appreciation– *Prof. Dr.Nandkishore R. Ekbote Sir and students of P.E.Society's MCASC, Pune-5*** | 8 |
| 5 | **'मन बनू दे मशाल'- *Marathi Poem by Principal Dr. R.S.Zunjarrao Sir*** | 9 |
| 6 | **'मानवता हाच धर्म'- *Video Recitation of Marathi Poem*<br>*-By Principal Dr. R.S.Zunjarrao Sir, Singer and Lyricist.*** | 10 |
| 7 | **E-Book Publication**<br>***-'साहिर लुधियानवी : वेदनेला शब्दरूप देणारा जादूगार'***<br>***- Author– Prof. Sameer Nerlekar, Department of Animation*** | 11 |
| 8 | **'मी बाप्पा बोलतोय- Short Film'**<br>***- Voice over of Ganpati Bappa and Dialogues written by Prof. Sameer Nerlekar, Department of Animation*** | 12 |
| 9 | **Independence Day 15th August 2020 Celebrations** | |
| | ***- Flag hoisting and Tree Plantation*** | 13-14 |
| | ***- जय जय भारत देशा- Online Program organised by Dr. Vaishali Aher*** | 15 |
| | ***- 'Memories of Martyrs' - Online Program organised by NSS Volunteers*** | 16 |
| 10 | **Events conducted by NSS** | |
| | ***- Organ Donation Day (13th August 2020)*** | 18 |
| | ***- National Sports Day (29th August 2020)*** | 19 |
| 11 | **Events conducted in Library and Information Centre** | |
| | ***- Sadbhavna Diwas*** | 20 |
| 12 | **Activities conducted by Modern Media Station** | 22 |
| | ***- मॉडर्न व्याख्यानमला २०२०*** | |

# Table of Contents


| Sr. No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 13 | **Webinars/Online Meeting/Guest Lectures organised during August 2020** | |
| | ***- Astrobiology Research and Career opportunities in Biotechnology in UK (Ph.D, Postdoc, Royal Society Fellowships, Rhodes, Commonwealth etc.)" organised by Department of Biotechnology*** | 24 |
| | ***- Parent-Teachers Online Meeting of M.Sc-II Zoology Students*** | 25-26 |
| | ***- Online Orientation on Creative Commons License (CC License) for Open Educational Resources (Licensing of E-contents developed by Teachers)- organised by IQAC and Library and Information Centre*** | 27 |
| | ***- Guest lecture on Mental Health amidst COVID-19 Pandemic- organised by Department of Psychology*** | 28 |
| | ***-Webinar on 'Traffic Rules for the Cargo Movement in Neurons'*** | 29 |
| | ***- 'आत्मनिर्भरतेनी संकटावर मात करा'- organised by Value Education Committee*** | 30 |
| 14 | **Activity based on ''*Best out of Waste*'' under the subject Production and Operations Management—Department of BBA (IB)** | 31 |
| 15 | ***मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ आयोजित 'आधुनिक मराठी कविता स्वरूप आणि वाटचाल'*** | 32-33 |
| 16 | **Faculty Member invited as Resource Person** | |
| | ***- Prof.Dr.Prerna Ubale, Head, Department of Hindi*** | 35 |
| 17 | **Modern Alumni Achievement** | |
| | ***- Shri. Girish Desai*** | 36 |
| 18 | **New Arrivals during August 2020** | 37 |
| 19 | **Newspaper Clippings** | |
| | *- Education* | 39-158 |
| | *- Achievements* | 159-164 |
| | *- Contribution of Institutions towards the Society* | 165-166 |
| | *- Miscellaneous* | 167 |
| 20 | **Upcoming Events** | 168 |

# *Special Visit*

**Hon'ble Prof. Dr. Gajanan R. Ekbote Sir (Chairman, P. E. Society, Pune), Hon'ble Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote (Joint Secretary, P. E. Society and Chairperson CDC, MCASC, Pune-5) and Hon'ble Prof. Dr. R. S. Zunjarrao (Principal, MCASC, Pune-5) met Hon'ble Shri. Bhagat Singh Koshyariji, Governor, Maharashtra State on 17th August 2020 and invited him for the function to be held after lockdown is over. It was wonderful interaction legendary personality. In a true sense "Great Bhet" (ग्रेट भेट) at Rajbhavan, Pune.**

**Hearty Congratulations....!**










# *Prof.Dr.Gajanan R. Ekbote Sir, Chairman, Progressive Education Society and Prof. Dr. Nivedita G. Ekbote , Deputy Secretary, P.E.Society invited as Resource Person*

**National Education Policy is the buzzword now!**

*Progressive Education Society's* Modern Law College conducted a webinar on ***'Implementation of New Education Policy 2020, it's Issues and Challenges'*** on 17th August 2020.

Ex-Principal of BMCC, Pune, Prof. Dr. Aniruddha Deshpande ; Progressive Education Society's Chairman Prof. Dr. Gajanan Ekbote, and Prof. Dr. Nivedita Ekbote, Deputy Secretary, P. E. Society presented aspects of New Education Policy 2020, Digitization, Technology, Multi Disciplinary Approach and much more.










## *Work of Appreciation– Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam*

**शहरी गरीब योजनेतील रुग्णांना संपूर्ण उपचार मिळणार मोफत**

**महिला व बाल कल्याण समितीच्या बैठकीत मंजुरी; हजारो नागरिकांना लाभ होणार**

पुणे: पुणे महानगर पालिकेच्या शहरी गरीब योजनेस पात्र असलेल्या नागरिकांना व त्यांच्या कुटूबियांना कोणतीही मर्यादा न राखता सदर योजनेचा अमर्यादित लाभ मिळणार आहे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी होईपर्यंत गरजू नागरिकांना सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळावा, यासाठीचा ठराव पुणे महानगर पालिकेच्या आज झालेल्या महिला बाल कल्याण समितीच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. ***महिला बाल कल्याण समितीच्या अध्यक्षा नगरसेविका प्रा.सौ. ज्योत्स्ना एकबोटे*** यांनी मांडला होता.

पुणे शहरामध्ये राहणाऱ्या गोर-गरीब, गरजू व दारिद्र्यरेषेखालील नागरिकांकरिता पुणे महानगर पालिकेमार्फत शहरी गरीब योजना राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत शहरातील नागरिकांना एका आर्थिक वर्षामध्ये रुपये एक लाखापर्यंत आरोग्यसेवा पुरविण्यात येते. मात्र, सध्या संपूर्ण जगामध्ये कोरोना विषाणू संसर्गामुळे महामारी पसरली असून, आपल्या राज्यात व पर्यायाने पुणे शहरात अनेक नागरिकांना या विषाणूचा संसर्ग झाला आहे. त्यामध्ये गोरगरीब नागरिकांची संख्या जास्त असल्याचे निदर्शनास येते आहे. त्यातून कोरोनावरील उपचारांचा खर्च काही लाखांमध्ये होत असल्याने या लोकांना एक लाखापूढील खर्च स्वतः करावा लागतो. जे करणे त्यांना शक्य नाही. त्यामुळे सध्या या नागरिकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता कोरोना विषाणूने आजारी असलेल्या व पुणे महानगर पालिकेच्या शहरी गरीब योजनेस पात्र असलेल्या नागरिकांना व त्यांच्या कुटूबियांना कोणतीही मर्यादा न राखता सदर योजनेचा अमर्यादित लाभ देण्यात यावा, असे प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी मांडले. त्यावर सहमती दर्शवत महिला व बाल कल्याण समितीच्या उपाध्यक्षा नगरसेविका डॉ. श्रध्दा प्रभुणे, सदस्य नगरसेविका सौ. स्वप्नाली सायकर, सौ. मंगला मंत्री, सौ. मनिषा लडकत, सौ. नीता दांगट यांच्यासह सर्व उपस्थित सदस्यांनी पाठिंबा दिला.



# *Work of Appreciation– Prof. Mrs. Jyotsna G. Ekbote Madam*

## मनपा अंशदायी स्वास्थ्य सहायता योजना

# वृक्ष प्राधिकरण समिति के सदस्यों को भी मिलेगा लाभ

नवभारत संवाददाता

**पुणे.** पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन के सदस्यों के लिए पुणे म्युनिसिपल कॉरपोरेशन की ओर से अंशदायी स्वास्थ्य सहायता आरोग्य योजना लागू की गई है. यह स्वास्थ्य योजना शिक्षा बोर्ड के सदस्यों के लिए भी लागू होती है. इसी तर्ज पर अब यह योजना वृक्ष प्राधिकरण समिति के सदस्यों के लिए भी लागू की जाएगी. इससे सम्बंधित प्रस्ताव को हाल ही में महिला एवं बालकल्याण समिति ने मंजूरी दी है. ऐसी जानकारी समिति की अध्यक्ष ज्योत्स्ना एकबोटे ने दी.

### सदस्यों के स्वास्थ्य का ख्याल

महिला एवं बालकल्याण समिति के प्रस्ताव के अनुसार नगरसेवकों के लिए मनपा द्वारा अंशदायी स्वास्थ्य सहायता योजना लागू की गई है. ताकि उनका स्वास्थ्य अच्छा रहे व उन्हें कम दामों में उपचार मिलें. इसी तर्ज पर शिक्षा विभाग के कर्मी साथ ही पीएमपी के कर्मियों को भी इस योजना का लाभ दिया जाता है. इसी तर्ज पर अब यह योजना वृक्ष प्राधिकरण समिति के सदस्यों के लिए भी लागू की जाएगी. इससे सम्बंधित प्रस्ताव को हाल ही में महिला एवं बालकल्याण समिति ने मंजूरी दी है. ऐसी जानकारी समिति की अध्यक्ष ज्योत्स्ना एकबोटे ने दी.

## सामना

# 'शहरी गरीब' रुग्णांवर मोफत उपचार

पुणे, दि. १४ (प्रतिनिधी) - पुणे महापालिकेच्या शहरी गरीब योजनेस पात्र असलेल्या नागरिकांना व त्यांच्या कुटुंबीयांना कोणतीही मर्यादा न राखता सदर योजनेचा अमर्यादित लाभ मिळणार आहे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी होईपर्यंत गरजू नागरिकांना सदर योजनेचा जास्तीत जास्त लाभ मिळावा, यासाठीचा ठराव महिला बालकल्याण समितीच्या बैठकीत मंजूर करण्यात आला.



### महापालिकेच्या महिला व बालकल्याण समितीची मंजुरी

शहरामध्ये राहणाऱ्या गोरगरीब, गरजू व दारिद्र्यरेषेखालील नागरिकांकरिता पालिकेमार्फत शहरी गरीब योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत शहरातील नागरिकांना एका आर्थिक वर्षामध्ये रुपये एक लाखापर्यंत आरोग्य सेवा पुरविण्यात येते. मात्र, सध्या संपूर्ण जगामध्ये कोरोना विषाणू संसर्गामुळे महामारी पसरली असून, आपल्या राज्यात व पर्यायाने पुणे शहरात अनेक नागरिकांना या विषाणूचा संसर्ग झाला आहे. त्यामध्ये गोरगरीब नागरिकांची संख्या जास्त असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यातून कोरोनावरील उपचारांचा खर्च काही लाखांमध्ये होत असल्याने या लोकांना एक लाखापुढील खर्च स्वतः करावा लागतो.

जे करणे त्यांना शक्य नाही. त्यामुळे सध्या या नागरिकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता कोरोना विषाणूने आजारी असलेल्या या पुणे महपालिकेच्या शहरी गरीब योजनेस पात्र असलेल्या नागरिकांना व त्यांच्या कुटुंबीयांना कोणतीही मर्यादा न राखता सदर योजनेचा अमर्यादित लाभ देण्यात यावा, असा प्रस्ताव प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी मांडला. तो एकमताने मंजूर करण्यात आला.

## शहरी गरीब स्वास्थ्य योजना

# नागरिकों को आय की सीमा नहीं!

नवभारत न्यूज नेटवर्क

**पुणे.** कोरोना वायरस वर्तमान में दुनिया भर में फैल रहा है और हमारे राज्य और पुणे शहर में कई लोग वायरस से संक्रमित हो गए हैं. इसके चलते मनपा की महिला और बाल कल्याण समिति में गुरुवार (13) को एक प्रस्ताव पारित किया गया. जिसके अनुसार पुणे मनपा की शहरी गरीब योजना के लिए पात्र नागरिकों और उनके परिवारों को योजना का असीमित लाभ दिया जाना चाहिए. उसके लिए आय की कोई सीमा नहीं रखी जाएगी. ऐसी जानकारी समिति की अध्यक्ष ज्योत्स्ना एकबोटे ने दी.

### महिला एवं बाल कल्याण समिति ने दी मंजूरी



पुणे शहर में रहने वाले गरीब, जरूरतमंद और गरीबी रेखा से नीचे के नागरिकों के लिए पुणे महापालिका द्वारा शहरी गरीब योजना लागू की गई है. इस योजना के तहत, शहर के नागरिकों को एक वित्तीय वर्ष में 1 लाख रुपये तक की स्वास्थ्य सेवाएं प्रदान की जाती हैं. वर्तमान में, दुनिया भर में कोरोना वायरस की एक महामारी है और हमारे राज्य और पुणे शहर में कई लोग इस वायरस से संक्रमित हैं.

### कोरोना संकट काल में मनपा का बड़ा फैसला

यह दर्शाता है कि गरीब नागरिकों की संख्या अधिक है. ऐसी स्थिति में, पुणे शहर में रहने वाले गरीब और जरूरतमंद नागरिकों को पुणे मनपा की शहरी गरीब योजना का अधिकतम लाभ उठाने में सक्षम होना चाहिए. समिति के अध्यक्ष ज्योत्स्ना एकबोटे द्वारा एक प्रस्ताव पारित किया गया. बैठक में सर्वसम्मति से प्रस्ताव पारित किया गया. इस अवसर पर समिति की उपाध्यक्ष श्रद्धा प्रभुणे, सदस्य सायली सायकर, मंगला मंत्री, मनीषा लड़कत, नीता दांगट आदी उपस्थित थे.

## Work of Appreciation

Letter of Appreciation is given by Group Captain Ajay Rathi, Chief Operations Officer to Dr.Nandkishore Ramakant Ekbote and Progressive Education Society for sending Rakhis during Rakshabandhan to Air Warriors posted in Ladakh Region.

ग्रुप कैप्टन अजय राठी
मुख्य संक्रिया अधिकरी
*Group Captain Ajay Rathi*
*Chief Operations Officer*
*Tele: 01982-260500 Extn: 7300*
*Mob: 9599665948, 9464167640*
*Fax: 01982-260509*
*E-mail: rathicomplex@gmail.com*

21 विंग, वायु सेना
मार्फत: 56 ए पी ओ
पिन: 936821
*21 Wing, AF*
*C/O 56 APO*
*PIN: 936821*

**Dr Nandkishore Ramakant Ekbote**
**Civil Engineer Ph. D (Endology)**
**1170/33 Revenue Colony**
**Near Punya Ganesh Mandir**
**Shivaji Nagar Pune**

Dear Doctor and Students,

1. It was so thoughtful of the students of Bhartiya Sanrakshan Sanstha and Progressive Education Society to have sent the Rakhis, for the Air Warriors posted in the Ladakh region. It was not only Rakhis but your love and true care for the soldiers of this country.

2. It is gestures like these that encourage soldiers in keeping the fervour of serving the nation and the countrymen, burning in them. On behalf of all the soldiers, I thank you for having us in your thoughts on this solemn occasion of Raksha Bandhan.

3. I would like to take this opportunity to wish you and the esteemed institution all the very best for all your future endeavours.

Warm Regards

Ajay

(Ajay Rathi)
Gp Capt
COO
21 Wg AF

# *Poetry by Principal Dr. Rajendra S. Zunjarrao*

मॉडर्न महाविद्यालयाचे **प्राचार्य डॉ. राजेंद्र एस. झुंजारराव सर** यांच्या अष्टपैलू व्यक्तित्वापैकी एक वैशिष्ट्यपूर्ण पैलू म्हणजे ते एक संवेदनशील कवी आहेत. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्त त्यांची ही कविता निश्चितच मनाला उभारी देणारी ठरेल.










# Poetry by Principal Dr. R. S. Zunjarrao

Video Recitation of Song written and sung by Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir was released on 22nd August 2020. The title of the motivational and inspiring song is 'मानवता हाच धर्म'. Technical support for the song was given by Prof. Sameer Nerlekar, Department of Animation, MCASC, Pune-5.























# E-Book Publication by Prof. Sameer Nerlekar

***Prof. Sameer Nerlekar***, Department of Animation, Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 self - published his e-book ***'साहिर लुधियानवी : वेदनेला शब्दरूप देणारा जादूगार'*** in **KINDLE Edition** on https://www.amazon.in/ . Heartiest Congratulations Sir !!!











# मी बाप्पा बोलतोय : Short Film

## (Voice Over of Ganpati Bappa and Dialogues written by Prof. Sameer Nerlekar)

On the occasion of Ganesh Chaturthi, ***Prof. Sameer Nerlekar***, Department of Animation, Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 did Voice Over of Lord Shri Ganesha (Ganpati Bappa) in the Short Film ***'मी बाप्पा बोलतोय'*** released by Bhavesh Productions on 16th August 2020. Prof. S. Nerlekar is also the Dialogue Writer of the Short Film. Heartiest Congratulations Sir. !!!

The Short Film is available on YouTube : https://youtu.be/cHp3jn3vUaI























# Independence Day 15th August 2020 Celebrations




The Independence Day 2020 was celebrated in *Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 on 15th August 2020 by following all the Government Resolutions and Circulars released by Government of Maharashtra, Director of Higher Education, Joint Director of Higher Education, Pune and Savitribai Phule Pune University, Pune in the COVID-19 pandemic situation.

Principal Dr. R. S. Zunjarrao did the flag hoisting. The faculty members who were present for the flag hoisting followed physical distancing and all the safety measures to be taken in COVID-19. The Independence Day event was live streamed on Modern College Official YouTube Channel through Modern Media Station. Along with all the respectable members of Progressive Education Society, Pune-5, the teaching and non-teaching faculty members and students attended the event through YouTube.

The YouTube Link for the Independence Day 2020 : https://youtu.be/ktFp4ElqyxI













# Independence Day 15th August 2020 Celebrations




***Tree plantation*** in college campus was done on the occasion of Independence day 15thAugust 2020, by the hands of Shri. Datta Shelar, House-keeping Staff . Principal Dr. R.S.Zunjarrao, Vice Principal Prof. S.S.Deshmukh, Vice Principal Dr.A.S.Oke, Vice Principal Dr. A.V.Kamble, Vice Principal Prof. S.R.Choudhari, Prof. S.S.Thengadi, College NSS Officer Prof.Dr.Prabhakar S. Varade, Prof.S.J.Karekar, Shri.I.S.Parde, Shri.R.N.Yemul and Shri.P.S.Sable were present during the tree plantation.






# जय जय भारत देशा – १५ ऑगस्ट २०२०











स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित मॉडर्न महाविद्यालयाचा ***'जय जय भारत देशा'*** ऑनलाईन कार्यक्रम जल्लोषात साजरा. मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर, पुणे, ०५ चा यावर्षीचा ७४ वा स्वातंत्र्यदिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व विद्यार्थिवर्ग, शिक्षकवृंद आणि इतर मान्यवरांनी आपापल्या घरी सुरक्षित राहून 'जय जय भारत देशा' नामक स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाला ऑनलाईन गुगल मीटद्वारे हजेरी लावली. या कार्यक्रमाचे उदघाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र झुंजारराव यांच्या शुभ हस्ते झाले. त्यांच्या भाषणाद्वारे त्यांनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत विद्यार्थ्यांना त्यांच्या भावीजीवनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

सर्व शाखांचे अभ्यासक्रम,सांस्कृतिक कार्यक्रम तसेच महाविद्यालयाच्या वेबसाईटवरून होणारी सर्व औपचारिक कामे ऑनलाईन पद्धतीने यशस्वीरित्या पार पाडण्यात मॉडर्न महाविद्यालय संपूर्ण पुणे शहरातून अग्रेसर असल्याचे यावेळी नमूद केले.


या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.वैशाली आहेर यांनी केले. कला शाखेचा विद्यार्थी बाळकृष्ण डांगे याने गणेशवंदना सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. महाविद्यालयातील सर्वच शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन देशभक्तीपर कविता‌वाचन गीते,वक्तृत्व,कथाकथन अशा विविध कला सादर केल्या. उपप्राचार्या डॉ.अमृता ओक यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले व त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या शेवटी ऋतुजा शिंदे या विद्यार्थिनीने देशभक्तीपर विविध गीतांची संगीत मैफिल सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमांत सौ.सुजाता गांगुर्डे,श्री.सचिन पाटील,सौ.सुनीता निघोट तसेच इतर शिक्षक उपस्थित होते. दुपारी दोन ते चार या वेळेत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी गौरव मालक याने केले. डॉ. वैशाली आहेर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.


# Program on "Memories of Martyrs" by NSS Volunteers


On 15 August 2020, NSS Volunteers of Modern College of Arts, Science and Commerce arranged the program for Independence Day through Online Mode on Google Meet the whole program was arranged in a systematic manner. The name of the program was ***'Memories of Martyrs'.*** Many students actively participated in this program. Prof. Sharad Chaudhari, Vice Principal and Head, Department of Electronic Science was the Guest of this Program.


The event began with National Anthem. Prof. Sharad Chaudhari gave valuable and inspirational speech to our volunteers. Goraksha Gurav (NSS Volunteer) gave wonderful and inspirational speech on Chandrashekhar Azad. Ishwari Kamble and Vaishanavi Surve presented the video on 'Tribute To India'. A game was arranged by NSS Volunteers Ishwari Kamble and Vaishnavi Surve. Volunteer Diksha Jadhav recited the wonderful poem on 'Women in Defense'. One more video was presented on 'Memories of Martyrs' by Volunteer Tanaya Mondhe and Dhiraj Raut. This video was related to 'History of Our Country.'

The major attraction of this program was the online play 'Azadi ke Dewane' performed by NSS Volunteers. The moral of this play was very useful and inspirational for today's youth. The hosting of the whole program was done by Juhi Pandit. The program was carried out under the guidance of Honorable Principle of MCASC Dr. Rajendra Zunjarrao and Dr. Prabhakar Varade (NSS Program Officer of MCASC).











# *Events Conducted by National Service Scheme (NSS) in August 2020*


# Organ Donation Day– 13th August 2020

On the occasion of ***World Organ Donation Day 13th August***, NSS Unit of *Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5, organised ***Online Awareness Programme on*** 19th August 2020 to spread awareness in society for organ donation. Under the guidance of Honorable Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir, NSS Program Officer Dr. Prabhakar Varade and the NSS Volunteers organised the Online Awareness Event. The program began with a beautiful poem ***"My Final Gift"*** by Apeksha Dagale. It was followed by inspirational speech by Vidya Gaikwad on Organ Donation. The NSS Volunteers staged an Online Drama to create awareness about organ donation. Ishwar Thombare presented video based on Organ Donation. The story of the video is on the ***Robert Noel Test*** who gave his organs to our society.

A beautiful and heart touching poem was recited by Shyamsundar Kasbe. NSS Volunteer Gauri Khairnar delivered speech on the Importance of Organ Donation. The program concluded with a poem of Daniel Mark Extrom *"So Hope Will Live"* by Tanaya Mondhe. NSS Volunteer Trupti Shimpi anchored the programme. The wonderful and interesting program was carried out with a great beginning and motivational end.











# National Sports Day - 29th August 2020

On the occasion of ***National Sports Day 29th August*** , NSS Volunteers of *Progressive Education Society's* Modern College of Arts, Science, and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 organized Online Program to celebrate ***National Sports Day*** on 30th August 2020. This program was arranged under the Guidance of Principal Dr. Rajendra Zunjarrao Sir and NSS Program Officer Dr.Prabhakar Varade.

Director, Physical Education MCASC, Pune-5 Prof. Vikram Phale was the Guest for this Program. Prof. Phale delivered an inspirable speech on the importance of sports. He told that it is necessary to do some physical activities and to 'Stay fit and healthy'. NSS Volunteer Tanaya Mondhe presented a small video. Purva Sankpal shared her awesome experience on her Sports career. At the end of the program Dr. Prabhakar Varade Sir delivered motivational speech. NSS Volunteer Dhiraj Raut anchored the programme.









# Events Conducted in the Library During August 2020

## Sadbhavana Diwas: 20th August 2020

On 20th August 2020- ***Sadbhavna Diwas***, as per the Government of Maharashtra Circular, we in Library and Information Centre under the guidance of Respected Principal Dr.R.S.Zunjarrao Sir took the ***Sadbhavna Diwas Pledge*** and Sir also explained the significance of this day which marks the Birth Anniversary of Late Prime Minister of India Shri. Rajiv Gandhi.

Principal Sir gave a brief summary of the notable innovative work initiated by Late Shri. Rajiv Gandhi like Computerisation and ICT Development.

The program was conducted in the Library by following the Physical Distancing principle in the COVID-19 situation.


From-

Dr. Shantashree Sengupta,

Librarian.

**सद्भावना दिवस प्रतिज्ञा**

" मी अशी प्रतिज्ञा करतो / करते की, मी जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करीन. मी आणखी अशी प्रतिज्ञा करतो / करते की, आमच्यामधील वैयक्तिक किंवा सामुहिक स्वरूपाचे सर्व प्रकारचे मतभेद मी हिंसाचाराचा अवलंब न करता विचार विनिमय करून व संविधानिक मार्गांनी सोडवीन."



# Activities conducted by Modern Media Station

# मॉडर्न व्याख्यानमाला २०२०

*Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 in association with Rotary Club, Shivajinagar, Pune conducted a Webinar Series as an ***Online Co-curricular Activity*** for all students and staff of Modern College, Shivajinagar, Pune-5.




The activity commenced on every Thursday and Saturday through **Modern Media Station** (the official YouTube channel of Modern College, Pune 5. ) the online sessions will be streamed.




In the Inaugural session on 11th July 2020, Principal Dr. R. S. Zunjarrao Sir said -

*"We are at home due to COVID 19 Pandemic and lockdown. We have to take care of our physical as well as emotional health, come of negativity (if any), cherish ourselves, make ourselves happy and energize thereby...... Here is an opportunity brought to you from Modern College, Pune-5. All may please visit Modern Media Station on You Tube. The session will be live on this station. Like, Share and Subscribe the official YouTube channel of our College. Feel Happy....Be Happy".*









**Modern Media Station Channel Link :- https://www.youtube.com/channel/UCrbSMrkl_zYoARiZEZ6TfXA**


# Webinars organized during August 2020

## *Webinar on "Astrobiology Research and Career Opportunities in Biotechnology in UK " (Ph. D, Postdoc, Royal Society Fellowships, Rhodes, Commonwealth etc.)" for Biotechnology & Blended Science students*


Department of Biotechnology organized webinar on ***"Astrobiology Research and Career opportunities in Biotechnology in UK (Ph.D, Postdoc, Royal Society Fellowships, Rhodes, Commonwealth etc.)"*** for Biotechnology & Blended Science students on 1st August 2020 at 10:00 a.m.


**Dr. Rebecca Thombre**, Research Scientist, Blue Marble Space Institute of Science and Visiting Scientist in Astrobiology, University of Kent, UK guided the students through her knowledge.


Prof.Mrs.Radhika Oke, Assistant professor, Department of Biotechnology, Co-ordinated the Webinar with Prof.Dr.Sangita Bhagat, Head, Department of Biotechnology.





# 'Parent-Teacher Online Meeting' for MSc -II Zoology Students

Department of Zoology of our college organized **'Parent-Teacher Online Meeting'** on Sunday, 2nd August 2020 for the parents of M.Sc Part-II Zoology students. PG Coordinator Dr.Shubhangi S.Puranik suggested this idea and the departmental staff unanimously supported it with valuable guidance and support of Principal Dr. R.S.Zunjarrao.

At the onset of the Online Parent-Teacher meeting, Dr. Shubhangi Puranik welcomed all the parents, students, staff and our Principal Dr.Rajendra S.Zunjarrao. Initially all students and their parents introduced themselves followed by a round of self introduction by all teaching staff [Junior, UG and PG].

Prof. Narendra M. Naidu, Associate Professor and Head of the Department addressed the parents and students. He highlighted the achievements of Modern College of Arts, Science and Commerce [Autonomous], Pune-5; especially over the past decade. He appreciated the active participation of the students and the support given by their parents in response to the initiative of online teaching by our college. He encouraged the parents to establish a mutual relationship with the departmental staff.

After this session, parents expressed their views and offered some suggestions. It was heartening to note that none of the parents had any complaint or any negative comments. Instead, they whole heartedly praised our college and the department for being proactive in this pandemic situation. They expressed their gratitude to the college for the efforts taken by the college to conduct online lectures smoothly. They conveyed that their wards participated in online learning with enthusiasm.

Principal Dr.Rajendra S.Zunjararo in his concluding speech briefed to the parents about the precautionary measures taken by Modern College and the Progressive Education Society in view of the Covid-19 situation. He also told the parents about the Faculty Development Programmes [FDP], organized by our college as well as P.E.Society to train and empower the teachers for online learning, teaching and evaluation. He also attended to a few doubts raised by parents and students.

He congratulated the entire team of Department of Zoology for organizing this unique Online Parent-Teacher Meeting. He mentioned that this was the first department to conduct such an Online Meeting and was also pleased to note that students were also invited for this meeting.

Ms. Netra Kulkarni, Assistant Professor-PG, proposed the vote of thanks. Dr.Shubhangi Puranik efficiently moderated the entire event.

-Prof.Narendra M.Naidu
Head,
Department of Zoology.



# 'Parent-Teacher Online Meeting' for MSc -II Zoology Students











# Online Orientation on Creative Commons License (CC License) For Open Educational Resources

*(Licensing of E-Contents developed by Teachers)*

Internal Quality Assurance Cell (IQAC) and Library and Information Centre of *Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 organised Online Orientation on ***'Creative Commons License (CC License) for Open Educational Resources– Licensing of E-contents developed by Teachers'***. The online orientation program was conducted on Google Meet Platform on 07th August 2020 under the guidance of Principal Dr. R.S.Zunjarrao Sir.

Prof.Dr.Anjali Sardesai, IQAC Co-ordinator introduced the concept of Creative Commons License. Principal Dr. R. S. Zunjarrao Sir inaugurated the online orientation session and mentioned the importance of licensing the e-contents in the context of online teaching and learning.

Dr. Shantashree Sengupta, Librarian, MCASC,Pune-5 explained various types of Creative Commons License and also demonstrated the use of the CC License in various formats of documents in print and non-print media.












# Guest lecture on Mental Health amidst Covid- 19 Pandemic

*Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 Department of Psychology organized a guest lecture on Friday, 14th August, 2020 from 11.30 am to12.30 pm on ***Mental Health amidst Covid- 19 Pandemic*** on Google meet platform. **Prof. Mrs. Aparna Satpute**, Faculty at Department of Psychology, SPPU was invited as Resource Person.












# *Webinar on 'Traffic Rules for the Cargo Movement in Neurons'*

*Progressive Education Society's* Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 Department of Biotechnology organized Webinar on ***"Traffic rules for the cargo movement in neurons"*** on Friday, 14th August 2020 from 3:30 pm to 5:30 pm by Indian Neuroscientist **Dr. Sandhya Koushika,** Department of Biological Sciences, TIFR, Mumbai.



# *Event Organized by Value Education Committee*

## 'आत्मनिर्भरतेनी संकटावर मात करा'

कोरोनाची सद्य परिस्थिती पाहता आपणास वाटत असलेली चिंता आणि ज्या गोष्टी आपल्या हाती आहेत त्या ओळखून शक्य त्या उपाययोजनांचा शोध घेणे या विषयावर मूल्यशिक्षण समिती मॉडर्न कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय स्वायत्त शिवाजीनगर पुणे-५ व हार्टफुलनेस इंस्टिट्यूट यांच्या वतीने सहा दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन दिनांक १५ ऑगस्ट ते २० ऑगस्ट या कालावधी मध्ये ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले होते. या कार्यशाळेचे उद्दिष्ट त्यात सहभाग घेणाऱ्यांना स्वत:चे जीवन जगण्यास समर्थ करणे हा होता जेणेकरुन ते या संकटातून सक्षमपणे उभे राहतील.

या सहा दिवसांतील शोध विषय:

१५ ऑगस्ट : संकटप्रसंगी पटकन मूळस्थितीवर येण्याची क्षमता

१६ ऑगस्ट : स्व-नेतृत्व

१७ ऑगस्ट : कृतज्ञता

१८ ऑगस्ट : दया

१९ ऑगस्ट : सहृदय नातेसंबंध

२० ऑगस्ट : आकांक्षा




# *Activity based on "Best out of Waste" under the subject Production and Operations Management*

Activity based on ***Best out of Waste***, under the subject Production and Operations Management was conducted on 20th & 21st August 2020 for SYBBA(IB) students. Students were asked to prepare products using waste material and innovation, application of Recycle, Reduce, Reuse.

All the students performed very well and they explained Cost of Production and Selling Cost according to enter into the market.

Many of them are now thinking to start something in this area under the concept ***Aatmanirbhar Bharat*** introduced by our Honorable Prime Minister Narendra Modiji.

- Prof. Dr. Milind Alandikar
Vice Principal
Business Administration Campus, MCASC, Pune-5.












# *'आधुनिक मराठी कविता स्वरूप आणि वाटचाल'*


*प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या* मॉडर्न कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,(स्वायत्त) शिवाजीनगर,पुणे ५ येथील मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ आयोजित ***'आधुनिक मराठी कविता स्वरूप आणि वाटचाल'*** या विषयावर ३१ ऑगस्ट २०२० रोजी एकदिवसीय वेबिनारचे आयोजित करण्यात आले. या वेबिनार मध्ये शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर येथील मराठी विभागप्रमुख **डॉ. रणधीर शिंदे** यांनी 'मराठी कवितेचे स्वरूप आणि स्वछंदतावादी कविता' या विषयावर मार्गदर्शन केले.








# 'आधुनिक मराठी कविता स्वरूप आणि वाटचाल'



# *Faculty Members Invited as Resource Persons during August 2020*

# Dr. Prerana Ubale, Head, Department of Hindi Invited as Resource Person


रानी पार्वतीदेवी कला और वाणिज्य महाविद्यालय, बेळगावी, कर्नाटक द्वारा 17.08.2020 को आयोजित ***"नई शिक्षा नीति में भारतीय भाषाएँ और हिंदी का स्थान"*** विषय पर राष्ट्रीय वेबिनार में **डॉ. प्रेरणा उबाळे** , हिंदी विभागाध्यक्ष , मॉडर्न महाविद्यालय (स्वायत्त), शिवाजीनगर , पुणे-५ को व्याख्यान के लिये आमंत्रित किया गया था.











# MODERN ALUMNI ACHIEVEMENT

## मॉडर्न कॉलेजचे माजी विद्यार्थी श्री.गिरीश देसाई यांचे यश

विश्व मराठी परिषदेने आयोजित केलेल्या कोविड-१९ जागतिक कथा आणि कविता लेखन स्पर्धेमध्ये जगभरातील ३६ देशांमधून, अमेरिकेतील २१ राज्यांमधून आणि महाराष्ट्रासह भारतातील इतर राज्यांमधून ४६७४ बांधव सहभागी झाले होते. यामध्ये ऑस्ट्रेलिया,अमेरिका,लंडन,जपान,सिंगापूर,अबुधाबी,न्युझिलंड,केनिया,जर्मनी, नेदरलँड्स,घाना,कतार,थायलंड,ओमान,झांबिया,कॅनडा या देशातील तसेच तामिळनाडूतील तंजावर जवळच्या चेंगलपट्टू आणि महाराष्ट्रातील व इतरराज्यातील स्पर्धकांना पारितोषिके मिळाली.

***कथालेखन (विदेश गट) या स्पर्धेत श्री.गिरीश देसाई यांना "द्वितीय" परितोषिक मिळाले***, त्याबद्दल आपले मनःपूर्वक अभिनंदन !!! श्री.गिरीश देसाई हे अटलांटा येथे वास्तव्यास असून लेखक, Himalayan Trekker, IT professional आहेत.

करोना कोविड महामारीच्या अत्यंत अभूतपूर्व संकटकाळी विविध देशातील आणि भारतासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून हजारोंच्या संख्येने मराठी भाषिक या स्पर्धेमध्ये सहभागी झाले आणि त्यांनी आपल्या संवेदना कथा आणि कवितांच्या सृजनशील माध्यमातून व्यक्त केल्या ही अत्यंत स्पृहणीय घटना आहे. संपूर्ण जगामध्ये करोना काळात एखाद्या भाषिक समूहाने वैश्विक पातळीवर एकत्र येऊन सामूहिक सृजनात्मक प्रकटिकरणाचा कदाचित हा एकमात्र प्रयोग आहे. आपणां सर्वांच्या सहकार्याने हा प्रयोग यशस्वीरित्या संपन्न झाला आहे. या उपक्रमाचाविश्व मराठी परिषदेला सानंद अभिमान आहे.








# New Arrivals During August 2020

| Author | Title |
|---|---|
| Vayal, Shirish | Preranankur प्रेरणाकुर |
| Tamboli, Anagha | Ujedache Kavadase उजेडाचे कवडसे |
| Mahajan, Mukund | Urdu Shayariche Ras Rang उर्दू शायरीचे अंतरंग |
| Dev, Yashwant | Marathi Rubaya मराठी रुबाया |
| Phalanikar, Nina | Kupi कुपी |
| Jadhav, Kirti | Kshan Gumphalele क्षण गुंफलेले |
| Jain, Kavita | Aathavaninchya Kavita आठवणींच्या कविता |
| Aanandagavkar, Jivan Balwant | Aatmbhan आत्मभान |
| Pathare, Prasad | Swayambhu स्वयंभू |

***Maharashtra State Board Of Secondary / Higher Secondary Education***

***12th Standard Textbooks***




- Manasshastra XII मानसशास्त्र १२ वी
- Arthashastra XII अर्थशास्त्र १२ वी
- Political Science XII
- Geography XII
- Psychology XII
- Itihas XII इतिहास १२ वी
- Bhugol XII भूगोल १२ वी
- History XII
- Chemistry XII
- Mathematics And Statistics : XII Arts And Science Part 1
- Mathematics And Statistics : XII Arts And Science Part 2
- Physics XII
- Biology XII
- Mathematics And Statistics : XII Commerce Part 1
- Mathematics And Statistics : XII Commerce Part 2
- Information Technology XII Commerce
- German XII : Sprachlotsen 2
- Yuvakbharati Hindi XII युवकभारती हिंदी १२ वी
- Sanskritm Alhada XII : संस्कृतम आल्हाद १२ वी
- Information Technology XII Arts
- Information Technology XII Science

# *News Paper Clippings During August 2020*



Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

*[Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf ]*

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time.

As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service.

The E-Newspaper Clippings Section is divided into ***Education, Work of Appreciation, Contribution of Institutions towards the Society, Health, Research, Sports, Miscellaneous*** .

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

सकाळ

# शिक्षण धोरण : 'कही खुशी, कही गम'

## अंमलबजावणीचे आव्हान; कायद्यामध्ये बदलाची शिक्षणतज्ज्ञांकडून अपेक्षा

पुणे, ता. ३१ : केंद्र सरकारने नवीन शिक्षण धोरण जाहीर केल्यानंतर पुण्यातील शिक्षणतज्ज्ञांनी शालेय शिक्षणात केलेल्या बदलांचे स्वागत केले आहे. पण उच्च शिक्षणातील बदलांबाबत काहीशी चिंता व्यक्त केली आहे. धोरणात अनेक गोष्टी आदर्शवादी वाटत आहेत, पण त्याची अंमलबजावणी करण्याचे मोठे आव्हान आहे. त्यासाठी कायद्यांमध्ये बदल, चर्चा होणे गरजेचे आहे, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या शैक्षणिक धोरणात यामध्ये विद्यापीठांचे महत्त्व संपणार आहे. २०३२ पर्यंत देशभरातील चांगल्या दर्जाचे महाविद्यालये स्वायत्त करण्यात येतील, पण जे चांगल्या दर्जाचे नाहीत ते बंद केले जाणार आहेत,यावर सरकारने पुर्नविचार करणे आवश्यक आहे. देशाच्या अनेक भागात अद्याप शिक्षणाची स्थिती विदारक आहे, दर्जा चांगला नाही, त्यामुळे महाविद्यालय बंद करणे योग्य नाही. त्याच प्रमाणे शिखर संस्थांचे एकत्रीकरण केले जाणार असल्याने मोठे कायदेशीर बदल करावे लागणार आहेत. यावर सखोल चर्चा होणे आवश्यक आहे.

**- डॉ. गजानन एकबोटे,** कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

मानसशास्त्रचा विचार करून शालेय शिक्षणात ५-३-३-४ ही नवीन रचना महत्त्वाची ठरेल. मात्र, महाविद्यालयीन शिक्षणातही मानसशास्त्राचा विचार का केला जात नाही. यासाठी प्राध्यापकांना १८ पेक्षा जास्त वयातील मुलांना कसे शिकवावे यासाठी प्रशिक्षण देण्याची तरतूद या धोरणात अपेक्षीत होती. धोरण तयार करणार्या सदस्यांना शिक्षण क्षेत्रातील किती अनुभव आहे हा मुद्दा महत्त्वाचा आहे. कारणकी त्यांना अनुभव नसल्याने आदर्शवादी गोष्टींचा अंतर्भाव धोरणात केल्याने त्याची अंमलबजावणी अवघड आहे.

**- डॉ. अरुण अडसूळ,** शिक्षण तज्ज्ञ

आपल्याकडे १०वी, १२वी बोर्ड परीक्षेचा विद्यार्थ्यांवर ताण होता, किमान १०वीचा तरी कमी झाला आहे, हा महत्त्वाचा बदल आहे. परकीय विद्यापीठे भारतात येत असताना त्यांना पायघड्या घालून येथील संस्थांवर अन्याय करू नये. भारतीय व परदेशी विद्यापीठांना समान अटी व न्याय असला पाहिजे. परदेशी विद्यापीठांमुळे गुणवत्तेला महत्त्व येणार असल्याने चांगल्या शिक्षकांची गरज भासणार आहे.

**- ॲड. एस. के. जैन,** अध्यक्ष, शि. प्र. मंडळी

केंद्र सरकारने जाहीर केलेल्या नविन शैक्षणिक धोरणानुसार आता शैक्षणिक संस्था एकमेकांना सहकार्य करून आपल्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देऊ शकतील. यामुळे शहरातील लहान संस्थांना मदत होईल असे वाटते. मैदाने, प्रयोगशाळा, ग्रंथालय यांचा सामायिक वापर होऊ शकतो. शिक्षणातील नफेखोरीस पायबंद बसेल. याची योग्य अंमलबजावणी अत्यंत आवश्यक आहे.

**- डॉ. ए. पी. कुलकर्णी,** विद्यापीठ विकास मंच

केंद्र सरकारने शिक्षण हक्क कायदा आणला पण त्याची अंमलबजावणी पूर्ण झाली नाही. तसे या धोरणाचे होऊ नये. खासगी संस्था सरकारी पायाभूत सुविधा वापरू शकणार आहेत, पण त्यांच्या नफेखोरीवर नियंत्रण कसे ठेवणार हे धोरणात कुठेही नाही. धोरणातील चांगल्या गोष्टींची अंमलबजावणी होण्यासाठी कायद्यात बदल केले पाहिजेत, अन्यथा २०३० पर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण हे स्वप्न ठरेल.

**- मुकुंद किर्दत,** शहराध्यक्ष, 'आप'

Pune, Pune-Today
01/08/2020 Page No. 4

**Sakaal: 1.8.2020**

लोकमत

# अंतिम वर्ष परीक्षा; अंतरिम आदेशास सुप्रीम कोर्टाचा नकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कोरोनाची साथ असूनही विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यावर विद्यापीठ अनुदान आयोग ठाम असून तशी भूमिका सर्वोच्च न्यायालयात मांडण्यात आली. या परीक्षांच्या मुद्यावर कोणताही अंतरिम आदेश देण्यास न्यायालयाने नकार दिला. तसेच या प्रकरणाची पुढील सुनावणी १० ऑगस्टला होणार आहे.

विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत केंद्रीय गृह विभागाने आपले मत ७ ऑगस्टपर्यंत सादर करावे असा आता आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला. या सर्व घडामोडींमुळे विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा अजूनही रद्द झालेल्या नाहीत.

अंतिम वर्षाच्या परीक्षा सप्टेंबर महिन्यापर्यंत घेणे सर्व विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांना बंधनकारक आहे असे विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्वोच्च न्यायालयात गुरुवारी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले होते. केंद्रीय गृह मंत्रालयाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वांचा विद्यापीठ अनुदान आयोगाने अंतिम वर्षाच्या परीक्षांबद्दल भूमिका मांडताना विचार केला नव्हता हा युक्तिवाद सर्वोच्च न्यायालयाने मान्य केला नाही.

Pune Main
Page No. 7 Aug 01, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During August 2020

**Section: Education**

## ‘यूजीसी’ची सर्वोच्च न्यायालयात स्पष्टोक्ती

# परीक्षा होणारच!

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** उच्च शिक्षण संस्था आणि महाविद्यालयांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेची तयारी करावी. याप्रकरणी न्यायालयात सुनावणी होत असल्याने परीक्षांना स्थगिती मिळेल वा त्या पुढे ढकलल्या जातील असे गृहित धरू नये, अशी भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात मांडली. याप्रकरणी पुढील सुनावणी १० ऑगस्टला आहे.

देशातील करोनाची परिस्थिती लक्षात घेता, अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत केंद्रीय गृह मंत्रालयाने आपले म्हणणे मांडावे, असे निर्देश न्यायालयाने दिले. सोमवारी, ३ ऑगस्टपर्यंत हे निवेदन न्यायालयाला सादर केले जाईल, असे महाधिवक्ता तुषार मेहता यांनी स्पष्ट केले. परीक्षांना स्थगिती देण्याबाबत हंगामी आदेश देण्याची विनंती न्या. अशोक भूषण, न्या. आर. सुभाष रेड्डी आणि न्या. एम. आर. शहा यांच्या पीठाने फेटाळली. करोनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात राज्य आपत्ती नियंत्रण समिती बनवण्यात आली असून महाविद्यालयांच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात राज्य सरकारलाही म्हणणे मांडण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

अंतिम वर्षाच्या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्याचा आदेश ‘यूजीसी’ने ६ जुलै रोजी काढला होता. त्याला १३ राज्यांतील विद्यार्थ्यांनी आव्हान दिले आहे. विधि शाखेचा विद्यार्थी यश दुबे आणि युवा (पान २ वर)




- यूजीसी : काही राज्यांनी परीक्षा रद्द केल्यामुळे शैक्षणिक दर्जावर परिणाम होईल!
- युवा सेना : यूजीसीने विद्यार्थ्यांची शारीरिक-मानसिक स्थिती, त्यांच्या सुरक्षिततेचा विचार केलेला नाही!
- परीक्षेविरोधातील याचिकाकर्ते : ऑनलाइन परीक्षेचा पर्याय दिला असला तरी सर्वांची तशी परीक्षा घेणे शक्य नाही. विशेष संधीच्या पर्यायामुळे गोंधळ.

### गृह खात्याच्या भूमिकेकडे लक्ष

करोनाची परिस्थिती लक्षात घेता, अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत केंद्रीय गृह मंत्रालयाने म्हणणे मांडावे, असे निर्देश शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने दिले. त्यानुसार आता गृह विभाग परीक्षांबाबत कोणती भूमिका घेणार, याकडे शैक्षणिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे. येत्या सोमवारपर्यंत ही बाब न्यायालयाला कळविली जाणार आहे.

लोकसत्ता Sat, 01 August 2020
https://epaper.loksatta.com/c/53907523

# परीक्षा होणारच!

*(पान १ वरून)* सेनेचे नेते आदित्य ठाकरे यांनीही याचिका दाखल केली असून त्यावरील म्हणणे न्यायालयाने ऐकले. आयोगाने विद्यार्थ्यांची शारीरिक आणि मानसिक स्थिती तसेच, त्यांच्या सुरक्षिततेचा विचार केला नसल्याचे युवा सेनेच्या याचिकेत नमूद केले आहे. या सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी होत आहे.

‘‘आयोगाने ऑनलाइन परीक्षा घेण्याचा पर्याय दिला असला तरी काही विद्यापीठांमध्ये माहिती-तंत्रज्ञानाची मूलभूत सुविधाही नाही. सर्वांची ऑनलाइन परीक्षा घेणेही शक्य होणार नाही. परीक्षा घेतली नाही तर आभाळ कोसळणार नाही. आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत राज्यांना निर्णय घेण्याचा अधिकार असतो’’, असा युक्तिवाद यश दुबे यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी केला.

‘परीक्षा पूर्ण करण्याचा निर्णय अविचाराने घेतलेला नाही. काही राज्यांनी परीक्षा रद्द केल्यामुळे शिक्षणाच्या दर्जावर परिणाम होईल. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा देणे शक्य झाले नसेल त्यांना विशेष संधी दिली जाईल’, असे ‘यूजीसी’ने गुरुवारी न्यायालयात सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. ‘यूजीसी’च्या विशेष संधीच्या पर्यायामुळे गोंधळ निर्माण होईल, असा मुद्दा संघवी यांनी मांडला. विद्यार्थ्यांच्या वतीने अलख श्रीवास्तव यांनी, देशातील विविध ठिकाणच्या पूर परिस्थितीचा मुद्दाही उपस्थित केला आणि परीक्षांना स्थगिती देण्याची विनंती केली, पण ती न्यायालयाने फेटाळली.

### उच्च न्यायालयातील सुनावणी पुढे ढकलली

- विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत सर्वोच्च न्यायालयातही सुनावणी सुरू असल्याने याप्रकरणी दाखल याचिकांवरील सुनावणी उच्च न्यायालयाने शुक्रवारी पुढे ढकलली.
- विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला धनंजय कुलकर्णी यांच्यासह काही विद्यार्थ्यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. याशिवाय परीक्षा घेण्याच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्णयाच्या विरोधातही काही विद्यार्थ्यांनी याचिका दाखल केल्या आहेत.
- या सगळ्या याचिकांवर मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांच्या खंडपीठासमोर शुक्रवारी एकत्रित सुनावणी झाली. त्या वेळी याच विषयाशी संबंधित याचिका सर्वोच्च न्यायालयातही करण्यात आल्या असून आजच त्यावरही सुनावणी आहे, अशी माहिती याचिकाकर्त्यांचे वकील उदय वारुंजीकर तसेच राज्याचे महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी यांनी न्यायालयाला दिली.
- न्यायालयाने याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयात काय होते हे पाहू, त्यानंतर येथे दाखल याचिकांवरील सुनावणी घेऊ, असे स्पष्ट केले. तसेच याचिकांवरील सुनावणी १८ ऑगस्ट रोजी ठेवली.

लोकसत्ता Sat, 01 August 2020
https://epaper.loksatta.com/c/53907568

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# अंतिम वर्षाच्या परीक्षांवर यूजीसी ठाम

**सकाळ न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली, ता. ३१ : अंतिम वर्ष आणि सेमिस्टरच्या परीक्षा येत्या सप्टेंबरअखेर घेण्यावर विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) ठाम असून, देशभरातील विद्यार्थ्यांचे भविष्यातील शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठीच हा निर्णय घेतल्याचे प्रतिज्ञापत्र 'यूजीसी'ने शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात दिले आहे. खंडपीठाने अंतिम स्थगितीस नकार देताना पुढील सुनावणी १० ऑगस्टला घेण्याचे जाहीर केले.

कोरोनाच्या वाढत्या प्रभावामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यास महाराष्ट्रासह अनेक राज्यांचा विरोध आहे. मात्र यूजीसीची भूमिकाही ठाम असून, ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठांवर बंधनकारक असल्याचे 'यूजीसी'ने स्पष्ट केले आहे. त्यासाठी विद्यापीठांना ऑफलाइन आणि ऑनलाइन असे दोन पर्याय देण्यात आले आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना कोरोनामुळे परीक्षा देणे शक्य नाही, त्यांना कोरोनाचा प्रभाव कमी झाल्यानंतर देता येईल, असे 'यूजीसी'ने न्यायालयाला सांगितले.

### अंतरिम आदेश नाहीच

सप्टेंबरमध्ये असलेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर अंतरिम आदेश देण्यास आज सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. तसेच, याबाबत केंद्र सरकारला भूमिका स्पष्ट करण्याचे आदेशही दिले. यूजीसीची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, २०९ विद्यापीठांमध्येच अंतिम वर्षाची परीक्षा झाल्या आहेत. कोरोनामुळे बाकींच्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. त्यामुळे प्रकरण न्यायालयात आले म्हणून परीक्षा स्थगित होतील, असा कोणाचा समज होऊ नये. यानंतर न्या. अशोक भूषण यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने अंतिम स्थगितीस नकार दिला. यासंदर्भात महाराष्ट्राच्या आपत्ती व्यवस्थापन समितीने १९ जूनला दिलेल्या आदेशाची प्रत सादर करण्याची सूचनाही न्यायालयाने महाराष्ट्राची बाजू मांडणाऱ्या वकीलाला केली.

**Sakaal: 1.8..2020**

# नव्या शिक्षण धोरणात प्रयोगशीलतेला वाव!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून प्रशंसा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** कला, विज्ञान, वाणिज्य असे कप्पे नसतील. गणित शिकताना संगीतही जोपासता येईल. 'कोडिंग' करताना रसायनशास्त्राचाही अभ्यास करता येईल. मुला-मुलींनी काय शिकायचे हे समाजाने ठरवू नये, असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील बदलणाऱ्या शिक्षण पद्धतीची गरज स्पष्ट केली.

अखिल भारतीय तंत्रज्ञान शिक्षण परिषद आणि केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने आयोजित केलेल्या 'स्मार्ट इंडिया हॅकेथॉन'च्या समारोपात मोदी यांनी नव्या शैक्षणिक धोरणावर मत मांडले.

नव्या शिक्षणात विद्यार्थ्यांना जे शिकावेसे वाटते ते शिकण्याची संधी मिळेल. कोणत्या तरी विषयाच्या आधारावर त्यांची बौद्धिक क्षमता जोखली जाणार नाही. आई-वडिलांना वाटले, लोकांना वाटले म्हणून त्यांनी कुठला तरी विषय शिकण्याची गरज उरणार नाही. केवळ शिकायचे म्हणून पदवी घेण्याची गरज नाही. आत्ताच्या शिक्षणातून साक्षर बनवले जाते पण, त्या अभ्यासाचा पुढील आयुष्यात उपयोग होतोच असे नाही. निव्वळ पदवी घेणे अपुरे ठरते. त्यातून विद्यार्थी आत्मविश्वास गमावतात. त्याचा प्रभाव संपूर्ण जीवनावर होतो, असे मत मोदींनी मांडले. नवे शैक्षणिक धोरण निव्वळ दस्तऐवज नव्हे, देशातील तरुणांच्या आकांक्षा पूर्ण करणारे साधन आहे. त्यातून रोजगार शोधणारे हे तरुण रोजगार देणारे ठरतील, असेही मोदी म्हणाले.

नव्या धोरणात शिक्षणाबद्दलचा दृष्टिकोन बदलण्यात आला आहे. जुन्या शिक्षण पद्धतीतील काठीण्य दूर करून अधिक लवचीक बनवली गेली आहे. कमतरता दूर करून त्यात रचनात्मक सुधारणा केल्या जातील. २१ वे शतक ज्ञानाचे शतक आहे. त्यामुळे शिक्षण, संशोधन आणि कल्पनांचा विकास महत्त्वाचा आहे. त्याला नव्या धोरणात महत्त्व देण्यात आले आहे.



### भाषांचा विकास...

आत्तापर्यंत भाषांना विकसित होऊ दिले गेले नाही. नव्या धोरणातून भाषांचा विकास होईल. त्यातून ज्ञान, एकात्मिता वाढवेल. विश्वालाही भारतीय समृद्ध भाषांची माहिती होईल. विद्यार्थी मातृभाषेत शिकल्यास त्यावरील दबाव कमी होईल. त्याचा बौद्धिक विकास होण्यास मदत होईल. तो शिक्षणाशी जोडला जाईल. विकसित देशांमध्ये मातृभाषेतूनच शिकवले जाते. ते आपल्या भाषेत शिकतात, विचार करतात, असेही मोदी म्हणाले.

लोकसत्ता Sun, 02 August 2020 https://epaper.loksatta.com/c/53929752

# *News Paper Clippings During August 2020*

**Section: Education**

# ऑनलाइन शुल्क भरताना अडचणी

## अकरावीसाठीची हेल्पलाइन व्यस्त; विद्यार्थी-पालक हैराण

**पुणे, ता. १ :** अकरावी प्रवेश प्रक्रियेत अर्जाचा भाग-एक भरताना तांत्रिक अडचणींमुळे पालकांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रवेश प्रक्रियेतील शुल्क ऑनलाइनद्वारे भरताना सर्व्हर सातत्याने डाउन होत असल्याने विद्यार्थी-पालक हैराण झाले होते.

अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचे औपचारिक उद्घाटन झाले. तसेच प्रवेश अर्जातील भाग-एक भरण्यास शनिवारपासून सुरवात झाली. प्रवेश प्रक्रियेतील भाग-एक भरण्याचा शनिवार हा पहिला दिवस असल्याने विद्यार्थी-पालक यांच्याकडून अर्ज भरण्याची लगबग सुरू होती. अर्ज भरताना संबंधित संकेतस्थळ कासवगतीने सुरू होते, त्यामुळे काही विद्यार्थ्यांना अर्ज भरता आले नाहीत. तर प्रवेश प्रक्रियेत ऑनलाईन शुल्क भरताना तांत्रिक अडचणी येत असल्याचे विद्यार्थी आणि पालकांचे म्हणणे आहे.

**अकरावीच्या ऑनलाइन प्रवेशासाठी लवकरच मोबाईल ॲप सुरू करण्यात येणार आहे. सध्या या 'ॲप'चे टेस्टिंग सुरू आहे. प्रवेशाचा भाग दोन भरणे सुरू होईल, तेव्हापासून हे ॲप कार्यन्वित करण्याच्या दृष्टिने प्रयत्न सुरू आहेत.**
– **मीना शेंडकर**, सचिव, अकरावी ऑनलाइन प्रवेश नियंत्रण समिती

### अकरावी ऑनलाइन प्रवेशाची आकडेवारी

**७३,२४१**
नोंदणी केलेले विद्यार्थी

**१,७७६**
लॉक्ड झालेले अर्ज

**१,११६**
ऑटो व्हेरिफाय अर्ज

**२१**
व्हेरिफाय अर्ज (पडताळणी)

**Sakaal: 2.8.2020**

# अभ्यासक्रम कपातीबाबत संभ्रम

## कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची मार्गदर्शनाची मागणी

**पुणे, ता. १ :** अकरावी आणि बारावीचा अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अशा विविध अभ्यासक्रमाच्या वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षांची तयारी करत असतात. त्यामुळे शिक्षण विभागाने कमी केलेल्या २५ टक्के अभ्यासाबाबत संभ्रम असून त्याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे, अशी मागणी कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक करत आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पहिले ते बारावीचा अभ्यासक्रम २५ टक्क्यांनी कमी केला असून याबाबतची सविस्तर माहिती प्रसिद्ध केली आहे. मात्र आता कमी केलेल्या पाठाचा सविस्तर अभ्यास कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक करू लागले आहेत. त्याबाबत काही शिक्षकांनी आपली मते मांडली आहेत. अभ्यासक्रम कमी केला आहे, तरी काही पाठ स्वयं अध्ययनासाठी ठेवल्याने विद्यार्थ्यांना नक्की फायदा होणार आहे, प्रॅक्टिकल पण काही प्रमाणात कमी केले आहेत. शासनाचा हा निर्णय अगदी योग्य असून त्यामुळे विद्यार्थावरील अभ्यासाचा काही प्रमाणात कमी होणार असला तरी बारावीनंतर असलेल्या जेईई, नीट यांसारख्या स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थांचे नुकसान होणार असल्याचे काही कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचे म्हणणे आहे.

**अकरावी आणि बारावीच्या भूगोल विषयाच्या २५ टक्के कमी केलेल्या अभ्यासक्रमासंदर्भात १०० टक्के संभ्रम आहे. नेमके काय आणि कोणता घटक मूळ अभ्यासक्रमातून कमी केला आहे काहीच लक्षात येत नाही.**
– **राजेंद्र निकत**, भूगोल शिक्षक

**कमी केलेला अभ्यासक्रम अंतर्गत मूल्यमापनासाठी ठेवला आहे. त्यामुळे तो नक्की कसा घ्यायचा, याबाबत मार्गदर्शन केलेले नाही. स्वयंअध्ययनासाठी दिलेल्या संकल्पनाबाबत संभ्रम आहे.**
– **उषा जांभळे, विक्रम चिगरे**, अर्थशास्त्र विषय शिक्षक

**कमी केलेला अभ्यासक्रम स्वयंअध्ययन करण्यास सांगितले आहे. वाणिज्य शाखेत गणितामध्ये सोडविण्याची खूप गणिते स्वयं अध्ययनकरिता ठेवली आहेत. त्यामुळे खूप गोंधळ, अस्पष्टता आहे. नीट मार्गदर्शन व्हायला हवे.**
– **शुभदा जोशी**, गणित शिक्षिका

**Sakaal: 2.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

# परदेशी विद्यापीठांमुळे देशात शिक्षण परवडेनासे होईल!

टेकचंद सोनवणे।
लोकमत न्यूज नेटवर्क

## प्रा. भूषण पटवर्धन यांचे मत | उच्चशिक्षणातील बदल स्वागतार्ह; धोरणकर्त्यांना दिला सावधगिरीचा इशारा

**नवी दिल्ली :** परदेशी विद्यापीठांना भारतात आणण्याचा विचार चांगला असला तरी त्यात विद्यार्थिहिताचा विचार हवा. अन्यथा देशात वर्गसंघर्ष आणि सामान्यांना शिक्षण न परवडण्याचा धोका वाढेल. इथे परदेशी विद्यापीठांची बेटे तयार होतील. शिवाय जागतिक दर्जाची किती विद्यापीठे भारतात येतील, हा प्रश्न आहेच. सध्या बाजारू विद्यापीठे येण्याची भीती अधिक आहे, अशा शब्दांत विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष प्रा. भूषण पटवर्धन यांनी 'लोकमत'शी संवाद साधताना नव्या धोरणकर्त्यांना सावधगिरीचा इशारा दिला.

**प्रश्न - या स्थितीत परदेशी विद्यापीठांना काय पर्याय आहे?**

परदेशी विद्यापीठांमुळे सर्वांना शिक्षण परवडणे अवघड होईल. त्यातून समस्या वाढतील. विद्यार्थिहिताचा विचार व्हायला हवा. प्रतिष्ठित विद्यापीठे येण्यास अनुत्सुक असतील, तर बाजारू विद्यापीठे याचा फायदा उठवतील. आपल्याकडे नालंदा, तक्षशिलामध्ये जगभरातून विद्यार्थी येत. तशी व्यवस्था पुन्हा उभी करण्याचा विचार व्हायला हवा.



**प्रश्न - जागतिक क्रमवारीत आपण मागे आहोत?**

कोण ठरवते क्रमवारी? शिक्षण गुणवत्तेचे सर्वमान्य निकष आहेत. अमेरिका-युरोपमध्ये ते काही वेगळे नाही. येथील शिक्षण जागतिक दर्जाचे व्हायला हवे. जागतिक क्रमवारीचे क्रमवारीचे मार्केटिंग कुणी केले? त्यावर अमेरिका-चीनच्या सिस्टमचा प्रभाव आहे. भारताला हिणवणे सुरु झाले. आपल्यावरही दबाव वाढला. त्यामुळे नवी योजना तयार झाली. गुणवत्तावाढीऐवजी रॅट रेसमध्ये सामील झाले. त्यातून दिखाऊपणा वाढला. सरकारी मदत विद्यापीठांना दिली गेली. पण आपल्या समस्या सोडवण्यास विद्यापीठे सक्षम झाली का?

**प्रश्न- नव्या शैक्षणिक धोरणात सरकारने केलेल्या तरतुदींबाबत काय मत आहे?**



शैक्षणिक धोरण २०२०

उच्च शिक्षणात बदल, प्रस्तावित मल्टिसेंट्रिक शिक्षणामुळे आपले ध्येय साधता येईल. रँकिंग रेसऐवजी देशांची गरज ओळखून आपली विद्यापीठे उभी राहिली पाहिजे. विद्यापीठात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शेती प्रश्न कळतो? खरीप-रब्बीमधील फरक सांगता येतो? कोणतीही विद्याशाखा देशाची गरज व समस्या सोडवणारी हवी. प्रस्तावित बहुशाखा अभ्यासामुळे हा बदल होण्याची आशा आहे.

**प्रश्न - आपल्याकडे संशोधनाविषयी कमालीची उदासीनता दिसून येते?**



कारण अंडर ग्रॅज्युएट कोर्समध्ये विद्यार्थी तयार होत नाही. पदवी घेतल्याने नोकरी मिळणार नाही हे माहीत असल्याने विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेतो. त्यातूनच पुढे पीएचडी केली जाते. फेलोशिप मिळते. जगात सर्वाधिक संख्येने भारतात शिष्यवृत्ती दिली जाते, पण संशोधनात आपण खूप मागे आहोत. कारण विद्यार्थ्यांची क्षमता, गरज, आवड घेऊन शैक्षणिक प्रगतीचा कधीही विचार झाला नाही. प्रस्तावित राष्ट्रीय संशोधन परिषदेने याचाच गांभीर्याने विचार केला पाहिजे.

Pune Main
Page No. 1 Aug 03, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# 'ऑनलाईन'साठी शिक्षण मंत्रालयात राहणार विशेष विभाग

## 'डिजिटल डिव्हाईड' दूर करण्यावर भर : 'व्हर्च्युअल लॅब' विकसित करणार

योगेश पांडे।
लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** 'कोरोना'मुळे देशभरात 'ऑनलाईन' शिक्षणावर भर दिला जात असून या प्रणालीचे भविष्यातील महत्त्व सर्वांनाच लक्षात आले आहे. नवीन शैक्षणिक धोरणातदेखील 'डिजिटल' माध्यमावर विशेष भर देण्यात आला आहे. शिक्षण मंत्रालयात 'ऑनलाईन' शिक्षण प्रणाली विकसित करण्यासाठी विशेष समर्पित विभागच राहणार आहे.

'डिजिटल' शिक्षणासाठी पायाभूत सुविधा, साहित्य निर्मिती तसेच विविध बदलांनुसार शिक्षण तंत्रात बदल यासंदर्भात या माध्यमातून पावले उचलण्यात येतील.



शैक्षणिक धोरण २०२०

तंत्रज्ञान सातत्याने बदलताना दिसून येत असून दर सहा महिन्यांत नवीन उपकरणे व तंत्र समोर येत आहे. अशा स्थितीत या विशेष विभागामार्फत त्यानुसार 'ऑनलाईन' शिक्षण प्रणालीतदेखील आवश्यक बदल करण्यात येईल. शालेय शिक्षण व उच्च शिक्षणातील विद्यार्थी व शिक्षकांची गरज लक्षात घेऊन 'डिजिटल कंटेंट' विकसित करण्यात येईल. या विभागात शिक्षणतज्ज्ञच नाही तर प्रशासकीय, तंत्रज्ञान, 'ई-गव्हर्नन्स' आदी क्षेत्रांतील लोकांचाही समावेश राहणार आहे. शिवाय देशपातळीवर 'व्हर्च्युअल लॅब्स' विकसित करण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येईल.

### यावर मंत्रालयाचा भर

- 'पायलट स्टडी' राबविणार
- 'डिजिटल' पायाभूत सुविधांवर भर
- शिक्षणासाठी नवीन 'प्लॅटफॉर्म' विकसित करणार
- 'व्हर्च्युअल लॅब्स' विकसित करणार
- शिक्षकांच्या निरंतर प्रशिक्षणासाठी सुविधा
- परीक्षा व मूल्यमापनाचा आराखडा ठरविणार
- पारंपारिक व 'डिजिटल' शिक्षणप्रणालीची सांगड घालणारे 'मॉडेल' तयार करणार
- शिक्षणासाठी मापदंड निश्चित करणार.

### जनसंवाद माध्यमांतून २४ बाय ७ धडे

देशात लोकसंख्येचा मोठा टक्का आजदेखील 'ऑनलाईन' माध्यमांपासून दूर आहे. हे अंतर दूर करण्यासाठी व सर्व स्तरांतील विद्यार्थ्यांना हे शिक्षण सहजपणे उपलब्ध व्हावे यासाठी या धोरणानुसार विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे. याअंतर्गत दुरचित्रवाणी, रेडिओ, 'कम्युनिटी रेडिओ' या जनसंवाद माध्यमांतून वंचित कुटुंबातील विद्यार्थ्यांना धडे देण्यात येतील. विविध भाषांमध्ये शिक्षण देण्याची सुविधा असणार आहे.

### 'ॲप', 'गेम्स'देखील विकसित करणार

हसतखेळत व प्रात्यक्षिक आधारित 'ऑनलाईन' शिक्षण व्हावे यासाठी देशपातळीवर 'डिजिटल' संग्रह तयार करण्यात येणार आहे. यात 'कोर्सवर्क'ची निर्मिती, 'लर्निंग गेम्स', 'व्हर्च्युअल रिॲलिटी' इत्यादींचा समावेश असेल. याशिवाय विद्यार्थ्यांना विविध विषय तसेच भारतीय कला-संस्कृती सहजतेने कळावी यासाठी 'गेम'आधारित 'ॲप'देखील विकसित करण्यात येतील.

Pune Main
Page No. 7 Aug 03, 2020
Powered by: erelego.com

Page 44 P.E.Society’s Modern College, Shivajinagar, Pune
Page 44

# *News Paper Clippings During August 2020*

**Section: Education**

## प्राध्यापकांनाही परीक्षा नको!

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या परीक्षा घेण्याच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या बरोबरीने आता प्राध्यापकही उतरले आहेत. प्राध्यापकांच्या 'महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशन' (एमफुक्टो) या प्राध्यापक संघटनेने सर्वोच्च न्यायालयात हस्तक्षेप याचिका दाखल केली आहे.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनेला विरोध करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. विविध राज्यांतील विद्यार्थी, युवासेना यांनी दाखल केलेल्या या याचिकेत आता 'परीक्षा नको' अशी भूमिका मांडत प्राध्यापक संघटनेनेही हस्तक्षेप याचिका दाखल केली आहे.

**प्राध्यापकांचे म्हणणे काय?**

'सद्यःस्थितीत राज्यात करोनाचे रुग्ण वाढत असताना परीक्षा घेणे शक्य नाही. आयोगाच्या निर्णयाप्रमाणे राज्यात जवळपास ११ लाख विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागेल.



अनेक विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचण्यासाठी दूरचा प्रवास करावा लागेल. जे सद्यःस्थितीत शक्य नाही. एका परीक्षा कक्षात ४० विद्यार्थी असतात. सद्यःस्थितीत अंतराच्या निकषांचा विचार करता २० विद्यार्थ्यांना वर्गात बसवावे लागेल. त्यानुसार ६० ते ७० हजार प्राध्यापकांना पर्यवेक्षक म्हणून काम करावे लागेल.

सद्यःस्थितीत प्राध्यापकांच्या ५० टक्के जागा रिक्त आहेत. मोबाइल फोनवरून परीक्षा घेता येऊ शकत नाही. त्यामुळे ऑनलाइन परीक्षा घ्यायची झाल्यास विद्यार्थ्यांकडे संगणक असणे आवश्यक आहे. मात्र, विद्यार्थ्यांकडे साधने उपलब्ध नाहीत. आयोगाच्या अनेक नियमांची अंमलबजावणी करण्यात विद्यापीठांनी गोंधळ घातले आहेत. त्यामुळे पात्रताधारक शिक्षक उपलब्ध नाहीत. मात्र, त्याबाबत आयोग गंभीर नाही,' असे एमफुक्टोने त्यांच्या याचिकेत म्हटले आहे.

लोकसत्ता Mon, 03 August 2020 https://epaper.loksatta.com/c/!

# *News Paper Clippings During August 2020*

**Section: Education**

पुणे परिसर

पुणे, सोमवार, ३ ऑगस्ट २०२० २

# नामवंत महाविद्यालयांत ९० टक्क्यांची गरज

## अकरावी ऑनलाइन प्रवेशाची स्पर्धा वाढणार

**पुणे, ता. २ : तुम्हाला दहावीच्या परीक्षेत ९० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक टक्के गुण असल्यास शहरातील नामांकित महाविद्यालयात तुम्हाला प्रवेश मिळू शकतो. परंतु त्यातही चुरस रंगणार आहे. त्यामुळे अकरावीच्या प्रवेश अर्जात कनिष्ठ महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरताना विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक क्रम निवडणे महत्त्वाचे ठरणार आहे.**

दहावीच्या निकालामध्ये वाढ झाल्यामुळे यंदा अकरावी प्रवेशाचा कट ऑफ वाढणार आहे. केवळ मागील वर्षाच्या प्रवेशाचा कट ऑफ पाहून कनिष्ठ महाविद्यालयांची निवड केल्यास विद्यार्थ्यांना त्याच महाविद्यालयात प्रवेश मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशासाठी महाविद्यालयांचे पसंतीक्रम निवडताना काळजी घ्यावी लागणार आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या क्षेत्रात ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांतील एकूण एक लाख सहा हजार ९७२ जागांसाठी ऑनलाईन पद्धतीने अकरावी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रवेश प्रक्रियेसाठी ७७ हजार १११ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. त्यातील २२ हजार ३७० विद्यार्थ्यांचे अर्ज लॉक करण्यात आले आहेत. प्रवेश अर्जातील भाग एक भरण्यास शनिवारपासून सुरवात झाली आहे. यावर्षी लॉकडाउनमुळे विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रे मिळण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे यंदा विद्यार्थ्यांना केवळ गुणपत्रिका अपलोड करून प्रवेशाचा अर्ज भरण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

प्रवेश अर्जातील भाग दोन भरण्यासंदर्भात सविस्तर वेळापत्रक लवकरच शिक्षण विभागातर्फे जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम निवडण्याची सुविधा दिली जाणार आहे. हे पसंतीक्रम निवडताना साधारणपणे मागील वर्षी संबंधित महाविद्यालयातील कट ऑफ तपासले जातात. त्यावरून विद्यार्थ्यांना कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश मिळू शकतो, याचा अंदाज बांधला जातो. परंतु यंदा निकालाचा आणि ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या राज्य मंडळासह सीबीएसई, आयसीएसई मंडळाच्या विद्यार्थ्यांची संख्या तुलनेने अधिक असल्याने यंदाच्या वर्षी कट ऑफ दोन ते तीन टक्क्यांनी वाढण्याची शक्यता कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांकडून व्यक्त होत आहे.

### महाविद्यालयांतील शाखानिहाय गेल्या वर्षीचा 'कट ऑफ'

#### वाणिज्य शाखा

- बीएमसीसी : ९४.८ टक्के
- एमईएस गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स : ९१.२ टक्के
- सिंबायोसिस महाविद्यालय : ९० टक्के
- स.प. महाविद्यालय : ८८.६ टक्के
- मॉडर्न कॉलेज : ८६ टक्के
- विमलाबाई गरवारे महाविद्यालय : ८५.२ टक्के
- एमएमसीसी : ८५.२ टक्के
- नेस वाडिया महाविद्यालय : ८२.८ टक्के

#### कला शाखा

- फर्ग्युसन महाविद्यालय : ९५.६ टक्के (कला -इंग्रजी)
- फर्ग्युसन महाविद्यालय : ८१.२ टक्के (कला-मराठी)
- सिंबायोसिस महाविद्यालय : ९३.८ टक्के (कला - इंग्रजी)
- स.प. महाविद्यालय : ९४ टक्के (कला-इंग्रजी)
- आबासाहेब गरवारे महाविद्यालय : ५३.४ टक्के

#### विज्ञान शाखा

- फर्ग्युसन महाविद्यालय : ९६ टक्के
- आपटे प्रशाला : ९५.६ टक्के
- स. प. महाविद्यालय : ९१.२ टक्के
- मॉडर्न कॉलेज : ९०.६ टक्के
- आबासाहेब गरवारे महाविद्यालय : ८९.६ टक्के
- एमएमसीसी : ८९.२ टक्के
- नुमवि हायस्कूल ज्युनिअर कॉलेज : ८७.६ टक्के
- विमलाबाई गरवारे : ८७ टक्के
- विद्या भवन कनिष्ठ महाविद्यालय : ८५.४ टक्के
- मुक्तांगण कनिष्ठ महाविद्यालय : ८२.६ टक्के



# शैक्षणिक धोरण संघाला धार्जिणे

## काँग्रेसची टीका : गरीबांत डिजिटल दरी निर्माण होईल

सकाळ न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली, ता. २ : ''मोदी सरकारचे शैक्षणिक धोरण फक्त भाजप आणि संघ समर्थकांना खूश करणारे असून गरीब विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल दरी निर्माण करणारे, दलित, आदिवासी, ओबीसींपुढे आव्हान उभे करणारे आहे,'' अशी तोफ काँग्रेसने नव्या शैक्षणिक धोरणावर डागली आहे. कोरोना संकट काळात सर्व शैक्षणिक संस्था बंद असताना सल्लामसलत न करता धोरण आणण्याचे कारण काय, असा सवालही काँग्रेसने केला आहे.**

मागील आठवड्यात (२९ जुलैला) जाहीर झालेल्या शैक्षणिक धोरणावर काँग्रेसतर्फे माजी शिक्षणमंत्री पल्लम राजू, 'आयआयएम'चे माजी प्राध्यापक व काँग्रेस नेते राजीव गौडा यांनी आज पत्रकार परिषद घेऊन सडकून टीका केली. लॉकडाउनच्या काळात काँग्रेस मुख्यालयात आज ही पहिलीच पत्रकार परिषद झाली. अर्थात पल्लम राजू आणि राजीव गौडा हे ऑनलाइन सहभागी झाले होते. या धोरणाचा तपशील मंत्रालयाच्या संकेतस्थळावर टाकण्यात आल्याने आता ही सविस्तर प्रतिक्रिया देण्यात आल्याचे सुरजेवाला यांनी सांगितले.

ऐन कोरोना संकट काळात धोरण जाहीर करण्याचे कारण काय, असा सवाल उपस्थित करून पल्लम राजू यांनी सरकारला धारेवर धरले. या महत्त्वाच्या धोरणाबाबत संसदीय पातळीवरील विचारविनिमय करण्याचे साधे औचित्यही सरकारने दाखविले नसल्याचा टोला लगावताना पल्लम राजू यांनी यूपीए सरकारच्या काळात शिक्षण अधिकार कायदा आणला असताना संसदेत आणि बाहेरही व्यापक चर्चा झाल्याकडे लक्ष वेधले.

शिक्षण धोरणाचे उद्दिष्ट प्राथमिक आणि उच्च शिक्षणात आमूलाग्र बदलाचे असावे. परंतु मोदी सरकारचे शिक्षण धोरण शब्दच्छलाचे आणि चमकोगिरी करण्यापुरते मर्यादित राहिले आहे. अंमलबजावणीचा आराखडा आणि आर्थिक साधनांचा अभाव आहे. यासाठी कोणत्याही प्रकारे सल्लामसलत झाली नाही. भाजप आणि संघाशी संबंधित लोक वगळता सर्वांनीच नाराजी व्यक्त केली आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

तर, राजीव गौडा यांनी शिक्षणावरील खर्च घटल्याचा दावा केला. जीडीपीच्या सहा टक्के खर्च करण्याची शिफारस झाली केली असली तरी, प्रत्यक्षात मोदी सरकारच्या काळात शिक्षणावरील खर्चात घट झाली आहे. २०१४-१५ मध्ये जीडीपीच्या ४.१४ टक्के असलेला खर्च २०२०-२१ मध्ये ३.२ टक्के झाला आहे. एवढेच नव्हे तर या कोरोना संकटामुळे खर्चाला ४० टक्के कात्री लागणार आहे. याचाच अर्थ या वर्षी शिक्षणावर होणारा खर्च फक्त २ टक्क्यांपुरताच मर्यादित राहील, असे ते म्हणाले.

### आरक्षणाचा उल्लेख नाही

शिक्षण धोरणात ऑनलाइन शिक्षणाला प्राधान्य असल्याने मध्यमवर्गीय तसेच गरीब विद्यार्थ्यांकडे संगणक, इंटरनेटचा अभाव पाहता डिजिटल दरी वाढण्याची भीती व्यक्त केली. वंचित घटकांमधील ७० टक्के विद्यार्थी शिक्षण क्षेत्राच्या परिघाच्या बाहेर फेकले जातील. या धोरणात दलित, आदिवासी, ओबीसी आरक्षणाचा उल्लेख नाही. खासगी शिक्षणावर भर आणि सरकारी शिक्षण संस्थांचे प्रमाण कमी करण्याचे उद्दिष्ट या धोरणात असल्याने वंचित घटकांपुढे मोठे आव्हान उभे ठाकणार असल्याचा आरोप राजीव गौडा यांनी केला.

**Sakaal: 3.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# नव्या शैक्षणिक धोरणात मनुष्यबळ विकासाचा अभाव

### अंमलबजावणी आणि आर्थिक तरतुदींकडेही दुर्लक्ष - काँग्रेसची टीका

नवी दिल्ली, दि. २ - केंद्र सरकारच्या नुकत्याच जाहीर झालेल्या शैक्षणिक धोरणात मनुष्य बळ विकासाचा मुद्दा दुर्लक्षित राहिला असून ज्ञान आणि माहितीच्या विस्ताराबाबतही संकोच झाला आहे. या धोरणांबाबत मोठमोठ्या बाता मारल्या गेल्या असल्या तरी त्याची अंमलबजावणी आणि आर्थिक जबाबदारी मात्र सरकारने टाळलेली दिसून येत आहे, अशी टीका काँग्रेस पक्षाने केली आहे. हे धोरण तयार करताना शिक्षण तज्ज्ञांशी चर्चा केली गेली नाही केवळ संघाच्या धुरिणांशी चर्चा करूनच हे धोरण आखले गेले आहे असा आरोपही काँग्रेसने केला आहे.

काँग्रेस नेते एम.एम. पल्लम राजू, राजीव गौडा आणि प्रवक्ते रणदीप सुर्जेवाला यांनी पत्रकार परिषदेत ही टीका केली. ते म्हणाले की, या नव्या शैक्षणिक धोरणात गरीब आणि श्रीमंत यांच्यात डिजिटल विभाजन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. लोक शिक्षण व्यवस्थेच्या खासगीकरणावर भर देण्यात आला आहे.

देशातील शिक्षण व्यवस्थेवर जीडीपीच्या ६ टक्के खर्च झाला पाहिजे, अशी अपेक्षा होती. पण या सरकारच्या काळात हा खर्च कमीकमी होतानाच दिसत आहे. सन २०१४ मध्ये शिक्षणावर एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४.१४ टक्के रक्कम खर्च होत होती. पण ती आता ३.२ टक्के इतकी झाली असून यापुढेही ती करोनाचे कारण देऊन आणखी कमी केली जाण्याची शक्यता आहे. या धोरणाविषयी आमच्याशी कोणतीही चर्चा केली नाही, असे शिक्षण क्षेत्रातील साऱ्याच प्रमुख व्यक्ती म्हणत आहेत. या धोरणावर संसदेत व्यापक चर्चा व्हायला हवी होती ती चर्चाही टाळण्यात आली आहे असे ते म्हणाले.

शिक्षण क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण करण्यात आल्याने या क्षेत्रापुढे भविष्यात मोठी आव्हाने निर्माण होतील असे माजी मनुष्यबळ विकास मंत्री पल्लम राजू यांनी यावेळी सांगितले.

या क्षेत्रातील विकासासाठी पैशाची सोय कशी केली जाईल, या विषयी मात्र सरकारने मौन बाळगले आहे. ऑनलाईन शिक्षणावर सरकारला भर द्यायचा आहे. पण अनेक ठिकाणी कनेक्टीव्हीटीची समस्या आहे आणि समाजातल्या अनेक ठिकाणच्या गरिबांना ऑनलाईनची सुविधा परवडणारी नाही.

अशा ठिकाणी या ऑनलाईन शिक्षणाला प्रोत्साहन किंवा भर देण्याच्या इराद्याविषयी शंका उपस्थित होते असेही त्यांनी म्हटले आहे.

# विद्यार्थ्यांचे सक्षमीकरण आणि 'उच्च' स्वातंत्र्य

**नव्या शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यात प्राथमिक पासून ते उच्च शिक्षणापर्यंत अनेक बाबी समाविष्ट असून त्यातील लवचिकता, स्वायत्तता, २१ व्या शतकांच्या आव्हानांचा विचार या बाबी महत्त्वाच्या आहेत. या लेखात प्रामुख्याने उच्च शिक्षणाचा विचार केला आहे. त्यातील पुढील वैशिष्ट्ये महत्त्वाची वाटतात.**

डॉ. शर्मिष्ठा मतकर

### 1 ॲकेडमिक क्रेडिट बँक

उच्च शिक्षणाचे स्वरूप नवीन संरचनेमध्ये सर्वसाधन समृद्ध, बहुविध शाखांनी सुसज्ज करण्यात येईल. लवचिक अभ्यासक्रमावर भर देण्यात येईल. व्यावसायिक शिक्षणाचे एकत्रीकरण आणि बहुविध प्रवेश/प्रस्थानबिंदू (Entry - Exit Points) असतील. विद्यार्थी उच्च शिक्षणात प्रवेश घेतो ; परंतु त्यास अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. प्रथम वर्ष पूर्ण केल्यानंतर आर्थिक जबाबदारीमुळे अनेकांना नोकरी करावी लागते. अशावेळी विद्यार्थी प्रथमवर्ष पूर्ण करण्याचे प्रमाणपत्र स्वतःजवळ ठेवू शकेल. शिवाय त्या वर्षात मिळालेले क्रेडिट त्याला 'ॲकेडमिक क्रेडिट बँके'त सुरक्षित ठेवता येतील. दुसरे वर्ष पूर्ण केल्यास त्यास पदविका मिळेल. तीन वर्षे पूर्ण केल्यास त्यास पदवी मिळते. आणि तो उच्च शिक्षणाच्या माध्यमातून नोकरीच्या शोधास लागतो. नंतर त्याच्या लक्षात येते की, यास संशोधनाची जोड मिळाल्यास आपण अधिक उत्कृष्ट कार्य करू शकू. तर त्यास विशिष्ट कालावधीत चौथे वर्ष पोस्ट ग्रॅज्युएशनल किंवा पदव्युत्तर शिक्षण आणि त्यानंतर चार वर्षांचा पीएच. डी. अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. एम. फील. डिग्री मात्र बंद केलेली दिसते.

### 2 लवचिक नियमांचा फायदा

स्वतःच्या डीजिटल लॉकरमधे 'ॲकेडेमिक क्रेडिट बँके'त विद्यार्थ्यांचे क्रेडिट सुरक्षित असल्याने लवचिक,शैक्षणिक धोरणाचा उपयोग विद्यार्थ्यांनी अधिकाधिक केल्यास मोठे बदल दिसतील. २०३५ पर्यंत उच्च शिक्षणामध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण किमान ५०% पर्यंत करण्याकडे सरकारचा मानस आहे. सातत्यपूर्ण अंतर्गत परीक्षा मूल्यमापनावर यात भर दिला आहे. उच्च शिक्षणातील तांत्रिक कौशल्ये वाढविण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा पाया सहावीमध्ये कोडिंग शिकवून तयार केला जाईल. सर्व विद्यार्थ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोचविण्याच्या दृष्टिने सरकारी पातळीवर प्रयत्न केले जातील.




### 3 स्वायत्ततेची रचना

उच्च शिक्षणामध्ये सध्या स्वायत्त शिक्षणाकडे कल वाढत आहे. त्यादृष्टीने Graded Autonomy म्हणजे A + महाविद्यालयांना अधिक स्वायत्तता, A ग्रेड महाविद्यालयांना A+ आणि B Grade महाविद्यालयांनी विशिष्ट काळात आपल्या ग्रेडमध्ये सुधारणा न केल्यास विशिष्ट १५ वर्षांच्या कालावधीनंतर त्यांच्या अस्तित्वासंबंधी गांभीर्याने विचार केला जाईल. सध्याची सलग्नता महाविद्यालयेप्रणाली नजिकच्या काळात १५ वर्षांत समाप्त करण्यासाठी पावले उचलली जातील. स्वायत्त महाविद्यालयांना शैक्षणिक, प्रशासकीय आणि वित्तीय स्वायत्तता ग्रेडप्रमाणे प्रदान करण्यात येईल. परंतु शुल्कासंबंधीचे निर्णय मात्र राष्ट्रीय पातळीवर केले जाऊन शुल्क नियमन प्रणाली अस्तित्वात येईल. मनाला येईल तसे शुल्क आकारण्यावर मर्यादा येतील. कोचींग संस्था, कॅश रोख रक्कम घेत असत. त्यामध्ये धोरणात बदल केला आहे. पण त्याबाबतचे धोरण स्पष्ट नाही. तसेच आरक्षण धोरणाबाबतही टिप्पणी केलेली नाही.

### 4 स्पर्धात्मक परीक्षेची कौशल्ये

बोर्ड परीक्षा, वस्तुनिष्ठ आणि वर्णनात्मक झाल्याने विद्यार्थ्यांकडे असतील. महाविद्यालयांमध्ये Virtual Labs स्थापन केल्या जातील. वंचित शिक्षणाच्या संधी वाढविण्यासाठी शैक्षणिक नियोजन, प्रशासन अन् व्यवस्थापन सुसूत्रबद्ध करण्यासाठी योग्य पद्धतीने तंत्रज्ञान समाविष्ट करणे हे उद्दिष्ट आहे. देशात किमान एकूण आठ भाषांमध्ये ज्ञान भाषांतरीत करण्यात येईल. या आणि अशा अनेक सुधारणांसाठी सरकारने अंमलबजावणीची मर्यादा २०२३, २०२५, २०३० अशी समोर ठेवली आहे.

### 5 शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण

उच्च दर्जाचे शिक्षण सर्वांना मिळून शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याकडे सरकारचा कल आहे. ज्यामध्ये जागतिक उच्च दर्जाच्या संस्थांमध्ये आपले विद्यार्थी अन् विदेशातील विद्यार्थी भारतात शैक्षणिक धडे पूर्ण करू शकतील. यामधून कला, संस्कृतीची देवाण-घेवाण तर होईल. संशोधन कार्याच्या प्रगतीसाठी 'नॅशनल रिसर्च फाऊंडेशन'ची स्थापना केली जाईल. संशोधनासाठी जास्तीत जास्त निधी संशोधनकर्त्यांना उपलब्ध केला जाईल. यामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधनाबरोबरच समाजशास्त्रातील संशोधनाकडे विशेष लक्ष देण्यात येईल.

**Sakaal: 3.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

सारांश    पुणे, सोमवार, ३ ऑगस्ट २०२०    ७

# धाडसी, प्रागतिक आणि सर्वस्पर्शी धोरण

**भारतीयांनी भारतीयांसाठी तयार केलेले हे नवे शिक्षण धोरण ऐतिहासिक म्हणावे लागेल. त्याची प्रभावी अंमलबजावणी पुढच्या पिढ्यांच्या आयुष्यात बदल घडवेल, हे नक्की. भारताला ज्ञानाधारित शक्तीकडे नेणारी ही वाटचाल आहे.**

**अमिताभ कांत**

शिक्षणव्यवस्थेच्या दृष्टीने एका ऐतिहासिक बदलाच्या वळणावर आपण आहोत. जवळजवळ ३४ वर्षांनंतर आधीच्या धोरणांचा फेरआढावा घेऊन आपण नव्या धोरणाचा स्वीकार केला. गेली अनेक वर्षे त्यावर काम सुरू होते. शिक्षक, तज्ज्ञ, सर्वसामान्य व्यक्ती या शिक्षणाशी संबंधित सर्व घटकांचे मत घेण्यात आले. एवढेच नव्हे तर देशभरातील अडीच लाख ग्रामपंचायतींकडूनही माहिती गोळा करण्यात आली. त्याआधारे या नव्या धोरणाचा मसुदा करण्यात आला. संयुक्तिक सुधारणांना चालना देणारे 'एनईपी- २०२०' हे अत्याधुनिक संशोधनाधारित आणि सर्वोत्तम पद्धतींचे एकत्रीकरण आहे.

शैक्षणिक सुधारणांचा आराखडा तयार करण्याचे काम आधीपासूनच सुरू होते. विशेषतः 'शालेय शिक्षणाच्या दर्जाचा निर्देशांक' (स्कूल एज्युकेशन क्वालिटी इंडेक्स) हा उपक्रम 'नीती आयोगा'ने सुरु केला होता. याशिवाय शिक्षणातील मानवी भांडवलात सातत्याने आणि आमूलाग्र बदल घडवण्याचा कृती कार्यक्रम आणि 'प्रगतीशील जिल्हा कार्यक्रम'ही हाती घेण्यात आला होता. अशा व्यापक प्रयत्नांमुळे काळाची हाक ओळखणारे, प्रागतिक धोरण आकाराला आले. सार्वत्रिक शिक्षणसंधी, दर्जा, पायाभूत सुविधा, प्रशासकीय कारभार आणि शिकवण्याची प्रक्रिया या सर्व पैलूंना त्यात स्पर्श करण्यात आला आहे. या सर्व गोष्टींकडे समग्रपणे पाहणारे हे धोरण आहे, हे विशेष. नवा भारत घडवण्याच्या दिशेने टाकलेले हे पाऊल आहे.

### अंत्योदयाचे तत्त्व

अगदी बालवयापासून ते उच्च शिक्षणाच्या पातळीपर्यंत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करू पाहणारे हे धोरण आहे. शाळेबाहेर असलेल्या दोन कोटी मुलांना शिक्षणाच्या परिघात आणण्याचा हा प्रयत्न असून वंचित घटकांचा त्यात विचार करण्यात आला आहे. या धोरणामागे अंत्योदयाचे तत्त्व आहे.

### जुन्या पद्धतीत आमूलाग्र बदल

कामाच्या, अध्यापनाच्या पारंपारिक पद्धतीतही आमूलाग्र बदल सुचवण्यात आले आहेत. नव्या अभ्यासक्रमाच्या सहाय्याने लहान बालकांची काळजी तर घेतली जाईलच, त्याचबरोबर त्यांना वेगवेगळे सर्जनशील खेळ खेळण्यास दिले जातील. अक्षरओळख (साक्षरता मिशन) आणि आकडेमोड यासाठी सध्या सुरु असलेल्या मूलभूत कार्यक्रमांची जोड असेलच.

शिक्षणांचे भक्कम अधिष्ठान निर्माण करणारे हे धोरण आहे. अभ्यासक्रमांतर्गत विषय आणि अभ्यासक्रमबाह्य विषय यासारख्या भिंती आता काढून टाकण्यात आल्या आहेत. मुख्य म्हणजे उच्च शिक्षणात आत येण्याचे आणि बाहेर पडण्याचे अनेक पर्याय उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामुळे आलेली लवचिकता विद्यार्थ्यांना उपयोगी ठरेल. त्यांना त्यांच्या आवडी जोपासत शिकता येईल. हे शिक्षण आनंदायी असेल. नव्या अभ्यासक्रमामुळे निम्म्या विद्यार्थ्यांना तरी निश्चितच एखादे व्यावसायिक कौशल्य शिकण्याची संधी मिळणार आहे.




### 'परख'चे यश

नीती आयोगाच्या धोरणानुसार 'जे मोजले जाऊ शकत नाही, त्यात सुधारणाही केल्या जाऊ शकत नाहीत'. आतापर्यंत,भारताकडे शिकण्याच्या परिणामांची नियमित, विश्वासार्ह आणि तुलनात्मक मूल्यांकनासाठी एक विस्तृत प्रणाली नाही. परख (राष्ट्रीय कामगिरी मूल्यांकन, समग्र विकासासाठी ज्ञानाचे पुनरावलोकन आणि विश्लेषण केंद्र) नावाच्या 'राष्ट्रीय मूल्यांकन केंद्रा'ची स्थापना यशस्वी झाली, हा त्यामुळेच आनंदाचा भाग आहे. शिकण्याचा सतत मागोवा, लवचिक बोर्ड परीक्षा, वैचारिक आकलन आणि एआय-सक्षम डेटा प्रणाली यामुळे हे केंद्र परिणामकारक ठरेल.

### शिक्षकांसाठी काय?

'शिक्षकांचे शिक्षण'याही महत्त्वाच्या मुद्द्याचा विचार करण्यात आला आहे. नवीन व्यापक अभ्यासक्रमाची चौकट आणतानाच निकृष्ट संस्थांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. धाडसी सुधारणांच्या माध्यमातून शिक्षणास बळकटी देण्यात येईल. स्पर्धात्मक शिक्षण, संवादावर भर देणारी अध्यापनशैली, गुणवत्ता-आधारित शिक्षकनिवड, त्यासाठीचे योग्य निकष आणि पारदर्शक प्रणालींसाठी शालेय शिक्षण गुणवत्ता निर्देशांकाचा आधार घेणे हीदेखील नव्या धोरणाची वैशिष्ट्ये आहेत. या बदलांमुळे घोकंपट्टी (पठण अध्ययन) पद्धतीला सोडचिठ्ठी देण्यात आली आहे. सराव आधारित अभ्यासक्रम आणि स्थानिक व्यावसायिक तज्ज्ञांसह इंटर्नशिपच्या माध्यमातून 'एनईपी- २०२०' ची लोकविद्या ही पंतप्रधानाच्या 'लोकल फॉर व्होकल' या घोषणेची पुष्टी करणारे आहे.

### भारताचे ब्रँडिंग

उच्च शिक्षणात शैक्षणिक पतपेढी (अॅकिडमिक क्रेडीट बँक) तयार करण्याची कल्पनाही शिक्षण क्षेत्रातील भारताचे ब्रँडिंग सुधारण्यास उपयुक्त ठरेल.. बहुभाषिक शिक्षण आणि ज्ञानवर्धनाच्या प्रयत्नांमुळे तक्षशिला आणि नालंदाच्या गौरवशाली वारशाला उजाळा मिळेल..गुणवत्तापूर्ण शिक्षणाकडे जाणारा भारताचा प्रवास वेगाने करण्यासाठी नवे धोरण योग्य दिशेने जाणारे एक स्वागतार्ह पाऊल आहे. सर्वसमावेशक डिजिटल शिक्षण चौथ्या औद्योगिक क्रांतीच्या दिशेने जाण्याच्या भारताच्या वाटचालीला बळकट करेल. प्रत्येक धोरणाप्रमाणेच या धोरणाची खरी परीक्षा ही कागदावरील धोरण प्रत्यक्षात आणण्यात होणार आहे. भारतीयांनी भारतीयांसाठी तयार केलेले हे धोरण आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी पुढच्या पिढ्यांच्या आयुष्यात बदल घडवेल, हे नक्की. ज्ञानाधारित शक्तीकडे नेणारी ही वाटचाल आहे.

**(लेखक 'नीती' आयोगाचे सीईओ आहेत. लेखातील मते वैयक्तिक.)**

# ऑनलाइनद्वारेच ग्रेडचे गुणांमध्ये रूपांतर

## शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांची माहिती

**पुणे, ता. २ :** अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या सीबीएसई, आयसीएसईच्या विद्यार्थ्यांना आता 'ग्रेड'चे रूपांतर गुणांमध्ये करण्यासाठी प्रत्यक्ष मार्गदर्शन केंद्रावर जाण्याची गरज भासणार नाही. कारण विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरतानाच ही सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, अमरावती या क्षेत्रांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी राबविण्यात येत असलेल्या अकरावी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे औपचारिक उद्‌घाटन शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या उपस्थितीत युट्यूब लाईव्हच्या माध्यमातून झाले. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली.

त्या म्हणाल्या, "अकरावीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना घराबाहेर पडायला लागू नये, अशी सोय यंदाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत उपलब्ध करून दिली आहे. यामध्ये सीबीएसई आणि आयसीएसईच्या विद्यार्थ्यांना ग्रेडचे गुणांमध्ये रूपांतर करण्यासाठी ऑनलाइनवर सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच प्रवेश शुल्कदेखील क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अशा अधिकृत ऑनलाईनद्वारे पेमेंट करण्याची सोयही आहे. त्याशिवाय प्रत्येक प्रवेश फेरीची माहिती देखील विद्यार्थ्यांना संकेतस्थळ किंवा अकरावी प्रवेशाच्या 'अॅप'द्वारे मिळू शकणार आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेबाबत मदत हवी असल्यास हेल्पलाइन आणि ऑनलाईनच्या साह्याने करता येणार आहे. तक्रार नोंदविण्यासाठी ऑनलाइन तक्रार निवारण प्रणाली कार्यन्वित करण्यात आली आहे."या ऑनलाईन उद्‌घाटन सोहळ्यात शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक दिनकर पाटील आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची माहिती देण्यात आली.

**Sakaal: 3.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

**Section: Education**

## पदविका अभ्यासक्रम प्रवेशाकडे लक्ष

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २** - राज्य शिक्षण मंडळाच्या दहावी व बारावीचा निकाल जाहीर झाला. मात्र, अजूनही दहावी व बारावीनंतरच्या पदविका अभ्यासक्रम प्रवेशाची प्रक्रिया सुरू झालेली नाही. या पदविका अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्राची यादी प्रसिद्ध केली आहे. मात्र, प्रवेश कधी सुरू होणार, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

राज्य शिक्षण मंडळाने बारावीचा निकाल दि. १६ जुलै रोजी जाहीर केला. जवळपास १५ दिवस उलटून गेले तरी अजूनही पदविका अभ्यासक्रमाची माहिती तंत्रशिक्षण विभागाने जाहीर केली नाही. तंत्रशिक्षण विभागाकडून बारावीनंतर फार्मसी, हॉटेल मॅनेजेंट अॅन्ड केटरिंग टेक्नॉलॉजी आणि सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी या पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेशप्रक्रिया राबविली जाते. ही प्रवेश प्रक्रियेकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

दहावी निकालानंतर दुसऱ्या दिवशी व्यवसाय शिक्षण विभागाने 'आयटीआय' प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले आणि त्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू केली. त्याप्रमाणे तंत्रशिक्षण विभागाकडून दहावी निकालानंतर पॉलिटेक्निक अर्थात तंत्रशिक्षण प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर करणे अपेक्षित होते. मात्र, अजूनही त्याबाबत काहीच हालचाल होताना दिसत नाही. तंत्रशिक्षण विभागाने दहावी, बारावीनंतरच्या पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाची क्षमता किती आहे, त्याचा तपशील यापूर्वीच जाहीर केला आहे. त्याचप्रमाणे पदविका अभ्यासक्रमांसाठी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, त्याची माहिती दिली आहे. मात्र प्रवेशप्रक्रिया कधी सुरू करणार आहेत, त्याबाबत काहीच उल्लेख संकेतस्थळावर नाही.

### सोमवारी वेळापत्रक जाहीर?



तंत्रशिक्षण विभागाने दहावी, बारावीनंतरच्या पदविका अभ्यासक्रमासाठी सुविधा केंद्र निश्चित केली आहे. त्याची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यानंतर या अभ्यासक्रमासाठी प्रत्यक्ष ऑनलाइन अर्ज सुरू करण्याचे वेळापत्रक येत्या एक-दोन दिवसांत प्रसिद्ध होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**Prabhat: 3.8.2020**

## प्रवेशाच्या 'कट ऑफ'चा करावा लागणार अभ्यास

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २** - इयत्ता अकरावी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना नामांकित कनिष्ठ महाविद्यालयांच्या मागील वर्षाच्या 'कट ऑफ'चा अभ्यास करूनच पसंतीक्रम नोंदवावा लागणार आहे.

प्रवेश अर्जाचा भाग-२ भरताना विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदवावे लागणार आहेत. यासाठी संबंधित महाविद्यालयाचा मागील वर्षाचा 'कट ऑफ' किती होता याचा बारकाईने अंदाज घ्यावा लागणार आहे. ऑनलाइन अर्ज भरताना




'कट ऑफ'ची माहिती पोर्टलवरही मिळणार आहे. महाविद्यालयांच्या अनुदानित व विनाअनुदानित या प्रकारावरून 'कट ऑफ' वेगळे असतात. अनुदानितचा 'कट ऑफ' हा जास्त असतो. आरक्षणनिहाय ते बदलतात. मराठी व इंग्रजी या माध्यमनिहाय 'कट ऑफ' बदलतात.

### मागील वर्षाचे गुण, शाखानिहाय खुल्या वर्गातील 'कट ऑफ'

- सर परशुरामभाऊ महाविद्यालय - कला (४६२), वाणिज्य (४४३), विज्ञान (४५६).
- फर्गसन महाविद्यालय - कला (४७८), विज्ञान ( ४८0).
- मराठवाडा मित्र मंडळ महाविद्यालय - वाणिज्य (४२६), विज्ञान (४४६).
- बृहन्महाराष्ट्र महाविद्यालय - वाणिज्य (४७४).
- सिम्बॉयोसिस महाविद्यालय - कला (४६९), वाणिज्य (४५0).
- एमईएस गरवारे महाविद्यालय - वाणिज्य (४५६).
- आबासाहेब गरवारे महाविद्यालय - कला (२६७), विज्ञान ( ४४८).
- सेंट मिरा महाविद्यालय - कला (४00), वाणिज्य (३९२).
- मॉडर्न महाविद्यालय - कला ( २६९), वाणिज्य ( ४३0), विज्ञान ( ४५३).
- एमआयटी महाविद्यालय - वाणिज्य ( ४४१), विज्ञान ( ४४५).
- आबेदा इनामदार महाविद्यालय - (कला ३२३), वाणिज्य (३३२).
- एस.एम.चोक्सी महाविद्यालय - वाणिज्य (४२४), विज्ञान ( ४३१).
- विद्या भवन महाविद्यालय - विज्ञान (४२७).

### दोन दिवसांत १९ हजार विद्यार्थ्यांनी भरले अर्ज

इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेशासाठी दोन दिवसांत १९ हजार ४४ विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग-१ भरला. पुणे विभागात ३0४ कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी केली. या सर्व महाविद्यालयांची नोंदणी अॅप्रुव्ह झाली आहे. या महाविद्यालयांमध्ये १ लाख ६ हजार ९७२ प्रवेशाच्या जागा उपलब्ध झाल्या आहेत. शनिवारी (दि.१) दुपारी ३ नंतर विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग-१ भरण्यासाठी पोर्टलवर सुविधा उपलब्ध करून दिली. १0 हजार १९0 अर्जांची ऑनलाइन यंत्रणेद्वारे तपासणीही पूर्ण झाली. पुणे व मुंबई विभागासाठी एकच सर्व्हर असल्याने पोर्टलचा वेग मंदावला होता. प्रवेश प्रक्रियेचे शुल्क भरताना सर्व्हर डाऊन होत होते. त्याची दखल घेत रविवारी तत्काळ पुणे विभागासाठी स्वतंत्र सर्व्हर उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे आता तांत्रिक अडचणी दूर झाल्या आहेत, अशी माहिती इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

**Prabhat: 3.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

### ऑनलाइनची घाई नको : विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत होणार चर्चा

# ऑनलाइन शिक्षणासाठी हव्यात पायाभूत सुविधा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या येत्या मंगळवारी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ऑनलाइन शिक्षणाचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच महाविद्यालयांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा मुद्दा उपस्थित केला जाण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे अनेक ग्रामीण व दुर्गम भागातील महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. त्यामुळे ऑनलाइन शिक्षणाची घाई करावी का ? याबाबत अधिक स्पष्टता येणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी केली आहे. तसेच, येत्या पाच तारखेपासून ऑनलाइन शिक्षणाचा 'श्री गणेशा' करण्यात येणार आहे. परंतु, बहुतांश विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन शिक्षणासाठी आवश्यक साधने उपलब्ध नाहीत. तसेच, ग्रामीण व दुर्गम भागात राहणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना कनेक्टिव्हिटीची अडचण आहे. त्यामुळे विद्यापीठाने ऑनलाइन शिक्षणाची घाई करु नये, अशी मागणी प्राचार्य व प्राध्यापक संघटनेकडून केली जात आहे. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेतही याबाबत चर्चा होणार आहे.

प्राचार्य महासंघाचे सरचिटणीस डॉ. सुधाकर जाधवर म्हणाले की, ग्रामीण भागातील अनेक महाविद्यालयांमध्ये केवळ ५ ते १० टक्के विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेले आहेत. पूर्ण प्रवेशच झाले नाही तर शिकवायचे कोणाला? त्यामुळे ऑनलाइन शिक्षणाची घाई करुन चालणार नाही. तसेच ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणात अडचणी येणार आहेत.

एम. फुक्टोचे सचिव प्रा. एस. पी. लवांडे म्हणाले की, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन साधनांची व कनेक्टिव्हिटीची अडचण आहे. तसेच ऑनलाइन पद्धतीने परिणामकारक शिक्षण देता येणार नाही. अमेरिकेसारख्या राष्ट्रातसुद्धा ऑनलाइन शिक्षणाला विरोध झाला. ग्रामीण भागात काही ठिकाणी प्रवेश प्रक्रिया सुरुच झालेली नाही. त्यामुळे विद्यापीठाने ऑनलाइन शिक्षणाची घाई करु नये.

### महाविद्यालयांना हवा निधी...



◆ अभ्यासक्रमातील काही भाग ऑनलाइन शिक्षणासाठी अनिवार्य करण्याचा विचार विद्यापीठ करत आहे. त्यामुळे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांना ऑनलाइन साहित्य तयार करण्यास स्टुडिओ व इतर पायाभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा, असा प्रस्ताव विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेसमोर मांडला जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

" व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ऑनलाइन शिक्षणाचा आढावा घेतला जाईल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन कनेक्टिव्हिटीबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. त्यामुळे ऑनलाइन शिक्षणाची मर्यादा, आवश्यकता याबाबत विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

**- राजेश पांडे**, व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Main
Page No. 2 Aug 04, 2020
Powered by: erelego.com

# शैक्षणिक धोरण कृती आराखड्याच्या प्रतीक्षेत

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली** : नवे शैक्षणिक धोरण पुढील २० वर्षांमध्ये टप्प्याटप्प्याने लागू होणार आहे. त्यासाठी शालेय शिक्षणासाठी 'क्वेस्ट' आणि उच्च शिक्षणासाठी 'इक्विप' असे दोन स्वतंत्र मार्गदर्शक सूचनांचे दस्तावेज तयार केले जातील, असे केंद्रीय मनुष्यबळ विकासमंत्री रमेश पोखरियाल-निशंक यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले. या दस्तावेजांतून कृती आराखडा निश्चित होणार असल्याचे पोखरियाल यांनी नमूद केले असले तरी तो कधी होईल, हे मात्र स्पष्ट झालेले नाही.

### अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने



२०४० पर्यंत देशभर नवी शिक्षण व्यवस्था अस्तित्वात येऊ शकेल, असे उद्दिष्ट शिक्षण मंत्रालयाने ठेवले असून, त्या दृष्टीने विचार केला जात आहे. शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल केला जात असून त्याचा लाभ सर्व सामाजिक-आर्थिक वर्गातील विद्यार्थ्यांना झाला पाहिजे. विद्यमान शिक्षण पद्धतीमधील त्रुटी दूर करण्यासाठी शिक्षण मंत्रालय महत्त्वाच्या सुधारणा करेल. त्याची दिशा नव्या शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यातून स्पष्ट केल्याचा दावा केंद्रीय मंत्र्यांनी केला. राज्यांशी समन्वय साधला जाणार असून त्यांच्याशी चर्चा करूनच धोरणाची अंमलबजावणी होईल, असे त्यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्रिमंडळाने गेल्या बुधवारी नव्या शिक्षण धोरणाला मान्यता दिली. हे धोरण नेमके कधी लागू होईल, या प्रश्नावर पोखरियाल म्हणाले की, ''शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षणामध्ये नवे धोरण लागू करण्यासाठी शिक्षण मंत्रालय मार्गदर्शक तत्त्वे तयार करणार आहे. शालेय शिक्षणासाठी 'क्वेस्ट' आणि उच्च शिक्षणासाठी 'इक्विप' असे दोन स्वतंत्र सूचना दस्तावेज तयार केले जातील. त्यात नव्या धोरणाच्या अंमलबजावणीचा संपूर्ण आराखडा असेल. हा आराखडा राज्यांशी सल्लामसलत करून तयार केला जाईल.''

अंमलबजावणीच्या आराखड्यामध्ये कोणते बदल करावे लागतील, ते कसे केले जातील, त्याची कालमर्यादा काय, त्यातून कोणते उद्दिष्ट साध्य केले पाहिजे, नव्या बदलांची जबाबदारी कोणावर असेल, त्यासाठी कोणत्या संस्था निर्माण केल्या जातील, नव्या शैक्षणिक धोरणातील ***(पान २ वर)***

लोकसत्ता Tue, 04 August 2020
https://epaper.loksatta.com/c/53972873

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# शैक्षणिक धोरण कृती आराखड्याच्या प्रतीक्षेत

(पान १ वरून)

शिफारशी लागू करण्यासाठी किती निधी लागेल अशा विविध घटकांचा समावेश अंमलबजावणी दस्तावेजांमध्ये असेल.



### 'परख' यंत्रणा

दहावी आणि बारावीसाठी बोर्डाची परीक्षा बंद का केल्या नाहीत, या प्रश्नावर पोखरियाल म्हणाले, बोर्डाची परीक्षा वर्षातून दोनदा होईल. पहिली परीक्षा ही मुख्य परीक्षा असेल. त्यात मिळणाऱ्या गुणांबाबत विद्यार्थी समाधानी नसेल आणि त्याला सुधारणा करण्याची गरज भासत असेल तर त्याच वर्षी पुन्हा परीक्षा देता येऊ शकेल. नव्या पद्धतीत कोचिंग क्लासेसचे महत्त्वच संपून जाईल. आवडीचे विषय निवडता येतील. या परीक्षेतून विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता व कौशल्ये तपासली जातील. विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे करायचे हे ठरवणारी 'परख' ही यंत्रणा असेल.

### शुल्कनिश्चिती

शुल्कनिश्चिती हाही महत्त्वाचा मुद्दा असून शालेय व उच्च शिक्षणाचे व्यापारीकरण रोखले जाईल, असा दावाही त्यांनी केला. बहुस्तरीय यंत्रणेतून शुल्कनिश्चितीची प्रक्रिया नियंत्रित केली जाईल. शालेय शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर शाळांना त्यांचा दर्जा स्वयंघोषित करावा लागेल. त्यावर राज्य शालेय दर्जा प्राधिकरणाचे नियंत्रण असेल. शाळांच्या दर्जाची माहिती प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर असेल. उच्च शिक्षणातही हीच पद्धत अवलंबली जाईल. खासगी उच्च शिक्षण संस्थांच्या दर्जानुसार त्यांची वर्गवारी करून शुल्क निश्चित केले जाईल. ही प्रक्रिया पूर्ण पारदर्शक असेल व शुल्कावर कमाल मर्यादा असेल. प्रवेशावेळी शुल्कात अनियमित वाढ केली जाणार नाही. सामाजिक बांधिलकीने शैक्षणिक संस्था कार्यरत राहतील. त्याचबरोबर संस्था चालवण्यासाठी संयुक्तिक आर्थिक स्रोतही असेल याचा विचार केला जाईल, असे पोखरिया यांनी स्पष्ट केले.

### दिनदर्शिका

मंगळवार, ४ ऑगस्ट २०२०
भारतीय सौर १३ श्रावण शके १९४२
मिती श्रावण कृष्णपक्ष - प्रतिपदा : २१ : ५५ पर्यंत
नक्षत्र : श्रवण : ०८ : ११ पर्यंत
चंद्र - मकर : २० : ४७ पर्यंत
मेष : नोकरदारांना दिलासा.

लोकसत्ता Tue, 04 August 2020 https://epaper.loksatta.com/c/!

लोकमत

# 'बायकॉट चायना' म्हटले तर ते आत्महत्या केल्यासारखे होईल!

## ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांची लोकमतशी बातचित

अतुल कुलकर्णी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : आत्मनिर्भर भारत ही संकल्पना चांगली आहे. आपण ५९ चायनीज ॲपवर बंदी घातली हे चांगले झाले. त्यातून पाच नवे भारतीय स्टार्टअप उभे राहिले. पण काही गोष्टी अशाही आहेत की त्यावर आपण 'बायकॉट चायना' म्हटले तर ते आत्महत्या केल्यासारखे होईल, असे स्पष्ट मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ व सीएसआयआरचे माजी अध्यक्ष रघुनाथ माशेलकर यांनी 'लोकमत'शी बोलताना व्यक्त केले.



> ज्ञानसंवर्धन, बुद्धीसंवर्धन हे गुगलच्या माध्यमातून होईलही पण मूल्य संवर्धन होणार नाही. त्यासाठी डिजिटल आणि फिजिकल अशा दोन्ही गोष्टींची येत्या काळात गरज पडेल.

***ही संपूर्ण मुलाखत लोकमत यू ट्यूबवर 'ग्राऊंड झिरो' कार्यक्रमात आज रात्री ९ वाजता पहाता येईल***

आत्मविश्वास असल्याशिवाय आत्मनिर्भर होता येणार नाही. त्यासाठी आत्मसन्मान हवा आणि म्हणून आता मेक इन इंडियाची व्याख्याच बदलावी लागेल. आपण बाहेरुन वस्तू आणून त्या इथे असेंबल करणे म्हणजे मेक इन इंडिया नाही. आपल्याला घाम गाळून मेहनत करणारेही हवे आहेत आणि नवनवीन शोध करुन पैसा उभे करणारे देखील. त्यादृष्टीने मेक इन इंडियाची व्याख्या करावी लागेल, असेही माशेलकर म्हणाले. जेनरिक उत्पादनात आपण जगात एक नंबर आहोत, पण फार्मा उद्योगाला लागणारे एपीआय (ॲक्टीव्ह फार्मासिटीकल इन्ग्रियन्टस) ७० टक्के चायनामधून येते. उद्या जर आपण बायकॉट चायना केले तर आपली फार्मा इंडस्ट्री शुन्यावर येईल. त्यासाठी आपण 'कमीत कमी चायना' ही भूमिका घ्यावी, असेही ते म्हणाले.

जगाच्या तुलनेत आपण इनोव्हेशन्समध्ये कुठे आहोत? आपली तयारी किती आहे? 'ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्स'मध्ये आपण सहा वर्षांपूर्वी जगात ८१ व्या नंबरवर होतो आज आपण ५२ वर आलो, पण चायना पहिल्या ३० मध्ये गेला. कारण सतत नवनवीन शोध करणे त्यांनी सुरु ठेवले आहे. आपण सकाळी उठून २१ वर्षांच्या मुलाला तू आता इनोव्हेशन कर, असे सांगून काहीही साध्य होणार नाही. त्यासाठी मुलांची तयारी शाळेपासून करुन घ्यावी लागेल. नवीन शैक्षणिक धोरणात मुलांच्या क्रियटिव्हीटीवर भर दिला आहे. आपल्याकडे तसे शिक्षक तयार करावे लागतील त्याचे काय? नवे शिक्षक नव्या पद्धतीने तयार करावे लागतील. शिक्षकांचे कामच येत्या काळात बदलून जाणार आहे. शिक्षकांच्या भूमिका पूर्णपणे बदलतील. येत्या काळात डिजिटल आणि फिजिकल शिक्षण मुलांना द्यावे लागेल त्यासाठीचे शिक्षक तयार करणे हा अत्यंत महत्त्वाचा भाग त्यात असेल, असे ते म्हणाले.

Pune Main
Page No. 3 Aug 04, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# संशोधनामुळे वाढेल शैक्षणिक गुणवत्ता

## शास्त्रज्ञांचे मत; 'राष्ट्रीय संशोधन फाउंडेशन'चे केले स्वागत

### » राष्ट्रीय शैक्षणिक धोरण : संशोधन

**पुणे, ता. ४ :** नवीन 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा'च्या माध्यमातून देशात प्रथमच 'राष्ट्रीय संशोधन फाउंडेशन'ची (एनआरएफ) स्थापना करण्यात येणार आहे. यामुळे संशोधनाला गती तर मिळेलच, पण त्याचबरोबर शैक्षणिक गुणवत्तेसह रोजगारक्षमताही वाढेल, असे मत शास्त्रज्ञांनी व्यक्त केली आहे.

सर्वसमावेशक संशोधनाला चालना देण्यासाठी नव्या शैक्षणिक धोरणात राष्ट्रीय संशोधन फाउंडेशनची स्थापना करण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर 'सकाळ'ने संशोधकांशी संवाद साधला. विद्यापीठांसह देशभरातील संशोधन संस्थांमधील जागतिक स्तरावरील संशोधनाची कमतरता नवीन धोरणातून भरून निघेल, असा विश्वास संशोधक व्यक्त करत आहे.

### संशोधन फाउंडेशन का ?

- विद्यापीठे, महाविद्यालये आणि खासगी संस्थांमध्ये संशोधनासाठी मनुष्यबळ असतानाही धोरणाचा अभाव होता.
- संशोधनाला निधी मिळविण्यासाठी परिपूर्ण व्यवस्था, पायाभूत सुविधा, उद्योगांची सहभागीता आणि आंतरविद्याशाखीय शिक्षणाचा अभाव.
- शाश्वत विकासासाठी मोठ्या लोकसंख्येचे रोजचे जीवन सुखकर करणाऱ्या संशोधनाची गरज.

### कोणते बदल होणार :

- महाविद्यालये आणि विद्यापीठांतील संशोधनाला मिळणार चालना.
- प्राथमिक, मूलभूत आणि उपयोजित विज्ञानातील संशोधनाला निधी व मार्गदर्शन.
- संशोधक, विविध संशोधन संस्था, उद्योग आणि सरकारमध्ये समन्वय.
- महत्त्वपूर्ण संशोधन आणि राष्ट्रीय निकडीच्या संशोधनासाठी पूरक गोष्टींची उपलब्धता.
- विविध संशोधन संस्थांचा एकत्रीत 'ज्ञान समूह' तयार करता येणार.
- आंतरराष्ट्रीय सहकार्याला मिळणार चालना.

**सध्या विद्यापीठ आणि महाविद्यालयातील २० ते २५ टक्के शिक्षक संशोधनात सहभागी होतात. नव्या धोरणामुळे शिक्षकांसह संशोधनात रुची असलेल्या कोणत्याही व्यक्तीला योग्यतेनुसार आर्थिक तरतुदीचा मार्ग मोकळा होणार आहे.**

**– डॉ. पंडित विद्यासागर,**
माजी कुलगुरू, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ

**राष्ट्रीय संशोधन फाउंडेशनमुळे दर्जात्मक संशोधनाला वाव तर मिळेलच; पण त्याबरोबर संशोधकांचा उत्साह वाढेल. महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा आणि इतर पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यास संशोधनाला विशेष गती मिळेल.**

**– प्रा. अजिंक्य भोर्डे,**
श्री आनंद महाविद्यालय, पाथर्डी




**Sakaal: 5.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

**Section: Education**

पुणे शहर
पुणे, बुधवार, ५ ऑगस्ट २०२० २

# अकरावी प्रवेशाचा 'कट-ऑफ' वाढणार

## तीन ते पाच टक्के वाढीचा अंदाज; दहावी उत्तीर्णांची संख्या वाढल्याचा परिणाम

मीनाक्षी गुरव : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. ४ : राज्य मंडळ असो किंवा सीबीएसई, आयसीएसई असो दहावीच्या निकालात एकूणच वाढ झाल्याने अकरावी प्रवेशाचा टक्का आणि 'कट-ऑफ' देखील लक्षणीयरीत्या वाढण्याची शक्यता आहे. यंदाच्या वर्षी अकरावी प्रवेशाचा कट-ऑफ तब्बल तीन ते पाच टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज शिक्षणतज्ज्ञांनी वर्तविला आहे.**

अकरावी प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया सुरू झाली असून आता विद्यार्थ्यांना अर्जाचा भाग एक भरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. तसेच शहरातील कनिष्ठ महाविद्यालयाच्या गेल्या वर्षीच्या 'कट-ऑफ'ची यादी अकरावी प्रवेश नियंत्रण समितीतर्फे नुकतीच जाहीर केली आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचा पसंतीक्रम काळजीपूर्वक भरावा, यासाठी ही यादी काही दिवस आधीच जाहीर करण्यात आली आहे.

''यंदा अकरावी प्रवेशाचा कट-ऑफ सरासरी पाच टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे, असे शिवाजीनगर मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव यांनी सांगितले. तर सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप शेठ म्हणाले, ''राज्य मंडळ, सीबीएसई आणि आयसीएसईच्या दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. तसेच ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तुलनेने अधिक आहे. त्यामुळे यंदा कट ऑफ तीन ते पाच टक्क्यांनी वाढणार आहे.''

नूतन मराठी विद्यालय कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षक डॉ. माधुरी भामरे म्हणाल्या, ''यंदा राज्यातील दहावीचा निकाल मागील वर्षाच्या तुलनेत १८ टक्क्यांहून अधिक वाढला आहे. तर पुणे विभागाचा निकाल १५ टक्क्यांनी वाढला आहे. त्यामुळे अकरावी प्रवेशाचा कट ऑफ चार ते पाच टक्क्यांनी नक्कीच वाढणार आहे.''

> **कोरोनाचा संसर्ग वाढत असला, तरीही अकरावी प्रवेशावर त्याचा फारसा परिणाम होणार नाही. अकरावी प्रवेश प्रक्रियेनंतर कनिष्ठ महाविद्यालये सुरू झाले तरीही, वर्ग हे निदान नोव्हेंबरपर्यंत तरीही ऑनलाइनच भरतील. त्यामुळे बाहेरगावहून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर फारसा परिणाम होणार नाही.**
> - **डॉ. दिलीप शेठ,** प्राचार्य, सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचे

### प्रवेशात पण होणार वाढ

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाबरोबरच सीबीएसई आणि आयसीएसईच्या दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही तुलनेने जास्त आहे. यंदा या मंडळांच्या निकालाच्या टक्केवारीत वाढ झाल्याचे निदर्शनास येते. सीबीएसई दहावीचा निकाल गेल्या वर्षीच्या तुलनेत ०.३६ टक्क्यांनी, तर राज्य मंडळाचा (एसएससी) निकाल मार्च २०१९च्या तुलनेत तब्बल १८.२० टक्क्यांनी जास्त आहे. त्यामुळे अकरावी प्रवेशाची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### 'कट-ऑफ' वाढण्याची कारणे

- राज्य मंडळ, सीबीएसई, आयसीएसईच्या दहावीच्या निकालाची वाढलेली टक्केवारी
- १०० टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ
- ८० ते ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची वाढलेली संख्या

**Sakaal: 5.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

लोकमत

# अकरावी प्रवेशासाठी स्पर्धा वाढणार

### राज्यात ३ लाख ९५ हजारांची नोंदणी : पुण्यात ८४ हजार तर मुंबईत २ लाख २८ हजार विद्यार्थी

राहुल शिंदे ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे अकरावी प्रवेशाला केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी प्रमुख शहरांमधील ३ लाख ९५ हजार ६४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. मागील वर्षी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी संख्येच्या तुलनेत यंदा नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. या वर्षी अकरावी प्रवेशसाठी मोठी चुरस पाहायला मिळणार आहे.

मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक ,औरंगाबाद, अमरावती, नागपूर महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने केले जातात. त्यासाठी २४ जुलैपासून ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली. बुधवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत ३ लाख ९५ हजार ६४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

गेल्या वर्षी राज्यातील १ हजार ६०५ कनिष्ठ महाविद्यालयांमधील ५ लाख ६० हजार ९८२ जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. त्यातील ३ लाख ६६ हजार ४९५ जागांवर राज्यातील विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. राज्यात १ लाख ९४ हजार ३३५ जागा रिक्त राहिल्या होत्या.

**महापालिका क्षेत्रनिहाय नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी (५ ऑगस्ट, सायंकाळी ६ पर्यंत)**

| | |
|---|---|
| पुणे, पिंपरी-चिंचवड | ८४,१३३, |
| मुंबई | २,२८,२४८, |
| नागपूर | ३१,६०७, |
| नाशिक | २५,९०३, |
| औरंगाबाद | १४,४११, |
| अमरावती | १०,३४१ |

### गेल्या वर्षीची स्थिती

| शहर | एकूण जागा | झालेले प्रवेश | रिक्त जागा |
|---|---|---|---|
| पुणे | १,०५,९१४ | ६९,०५६ | ३६,८५८ |
| मुंबई | ३,२६,७९६ | २,१८,७३० | १,०८,०६६ |
| अमरावती | १४,९४२ | १०,४९१ | ४,४५१ |
| औरंगाबाद | २९,४९० | १६,५४९ | १२,८३१ |
| नागपूर | ५८,८२० | ३२,४२५ | २६,३९५ |
| नाशिक | २५,००० | १९,२४४ | ५,७५६ |

Pune Main
Page No. 2 Aug 06, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

### व्यवस्थापन परिषदेचा निर्णय : नव्या शैक्षणिक धोरणावरही समिती

# ऑनलाइन शिक्षणासाठी विद्यापीठाकडून स्वतंत्र कक्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सुरु केलेल्या ऑनलाइन शिक्षणातील अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये घेतला. तसेच नवीन शैक्षणिक धोरण शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णयही घेतला गेला.

कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषदेची बैठक मंगळवारी पार पडली. त्यात ऑनलाइन शिक्षण, नवीन शैक्षणिक धोरण, बृहत आराखड्यानुसार नवीन महाविद्यालयांचे बिंदू निश्चितीबाबत चर्चा झाली. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांना विविध विषयांचे ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन मिळावे, यासाठी विद्यापीठ प्रशासनाने स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. मात्र, ग्रामीण भागात अनेक महाविद्यालयांमध्ये अद्याप प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेले नाही; तसेच विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन शिक्षण घेण्यासाठी अँड्रॉइड मोबाइल किंवा लॅपटॉप उपलब्ध नाहीत. त्याचप्रमाणे ग्रामीण व आदिवासी भागात कनेक्टिव्हिटीचो अडचण आहे. सुरुवातीला १० संलग्न महाविद्यालयांना ऑनलाइन पद्धतीने शिक्षण सुरु करण्यासाठी आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. संजय चाकणे म्हणाले की, विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेले तंत्रज्ञान इंदापूर महाविद्यालयाने स्वीकारले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले जाणार आहे. हे तंत्रज्ञान सर्व संलग्न महाविद्यालयांना मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेतला.

### ऑनलाइन शिक्षण आवश्यक साधने नाहीत

विद्यापीठाने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करून संलग्न महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने शिकवले जाणार असले तरी; सर्व विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन पद्धतीने शिक्षण घेण्यासाठी आवश्यक साधने उपलब्ध नाहीत. त्याचप्रमाणे महाविद्यालयांना सुद्धा ऑनलाइन शिक्षण देण्यात काही अडचणी येऊ शकतात. त्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन केला जाणार असून, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी समिती स्थापना करणार आहे.



"केंद्र शासनातर्फे नवीन शैक्षणिक धोरण जाहीर करण्यात आले आहे. या शैक्षणिक धोरणातील मुद्द्याची माहिती शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांना व्हावी, यासाठी विद्यापीठातर्फे प्रयत्न केले जाणार आहेत. त्यासाठी विद्यापीठाने समिती स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे.

- राजेश पांडे, व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Main
Page No. 4 Aug 06, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# पुणे विद्यापीठात उद्योजकतेवर पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम

पुणे, दि. ५ (प्रतिनिधी) – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोवेशन, इनक्यूबेशन अँड एंटरप्राईजेस या विभागाने आंत्रप्रिन्युरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडियासोबत करार केला असून, त्या माध्यमातून विद्यापीठात लवकरच उद्योजकता या विषयावर नवीन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उद्योजक बनण्यासाठीचे धडे देण्यात येणार आहेत.

आंत्रप्रिन्युरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया संस्थेचे प्राध्यापक आणि विद्यापीठातील प्राध्यापक मिळून या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतील. या पदविका अभ्यासक्रमाबरोबरच उद्योजकता या विषयावरील आणखी काही छोट्या कालावधीचे अभ्यासक्रमसुद्धा सेंटरतर्फे सुरू होणार आहेत.

" सेंटर फॉर इनोवेशन, इनक्यूबेशन अँड एंटरप्राईजेस ही पुणे विद्यापीठाची सेक्शन ८ कंपनी नवीन उद्योजकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असते. सध्या आत्मनिर्भर भारत अभियानानुसार आम्ही उद्योजकतेच्या माध्यमातून इतरांसाठी रोजगार निर्माण करण्यावर भर देत आहोत.

– प्रा. डॉ. नितीन करमळकर कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**Saamana: 6.8.2020**

# SPPU forms special cell to track online classes of colleges

**In a train-the-trainer format, a college will be taught techniques which it will then pass on**

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

Savitribai Phule Pune University (SPPU) has formed a special cell and committee to monitor online education in its various affiliated colleges with some of those starting teaching since August 1. The varsity wants to maintain a healthy access to online education for all and thus, the cell will communicate with colleges to keep the medium rolling smoothly.

Sanjay Chakane, management council member, confirmed, "In case colleges need help with the online education, this committee can come to their help."

The committee is already aiding Indapur College of Arts Science and Commerce. Now, the initiative will be taken to different colleges by the Indapur institute in a chained manner, said Parag Kalkar, dean of commerce and management faculty at SPPU. He added, "The same colleges will help other colleges and train-the-trainer format will be applicable for this."

In the same process, in case any college requires any help or guidance, then the SPPU cell will help in continuing the online education. The committee will also look at the effective working of the system.

Kalkar said, "Faculties are also being trained every day to conduct the online sessions at different colleges. This would help academic staff members across the colleges to work in the virtual education domain. They are being trained to conduct everything — right from quizzes to evaluating tests."

SPPU has started a studio to develop videos for online education. The cell and committee will bridge the gap between the colleges and the studio and ensure that the material reaches every institute. Nitin Karmalkar, vice chancellor SPPU, had also informed that funds given for various sports activities will be diverted to colleges for developing online education.



FILE PHOTO

SPPU has started a studio to develop videos for online education

**Pune Mirror: 7.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education



# अकरावीला विद्यार्थी वाढण्याची चिन्हे

## प्रवेश क्षमतेत दहा टक्के वाढ करण्याची प्राचार्यांकडून मागणी

**पुणे, ता. ६ : दहावी उत्तीर्णांची टक्केवारी वाढल्याने यंदा अकरावीसाठी विद्यार्थ्यांची संख्या वाढण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे प्रवेश क्षमतेत किमान १० टक्क्यांनी वाढ करण्यासाठी आतापासूनच पावले उचलावीत, असे काही प्राचार्यांचे म्हणणे आहे.**

यंदा राज्य शिक्षण मंडळ, सीबीएसई, आयसीएसई अशा सर्व मंडळाची टक्केवारी वाढली आहे. पुणे विभाग आणि पुणे जिल्ह्याचा निकाल चांगला लागला आहे. अकरावीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होणार आहे. त्यामुळे समितीने प्रवेशाच्या जागांमध्ये वाढ द्यावी, अशी मागणी होऊ लागली आहे.

फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्रसिंह परदेशी म्हणाले, "अकरावीच्या प्रवेशासाठी महाविद्यालयाला प्रवेश क्षमतेत गेल्या वर्षी १० टक्क्यांनी वाढ मिळाली होती. यंदा एकूणच निकालात वाढ झाल्याने अकरावीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होणार, हे निश्चित. त्यामुळे प्रवेश क्षमतेत वाढ देण्यासाठी आतापासून पावले उचलणे महत्त्वाचे ठरेल."

मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव म्हणाले, "अधिकाधिक विद्यार्थ्यांना शहरातील नामांकित महाविद्यालयात प्रवेश मिळावा, यासाठी प्रवेश क्षमतेत वाढ देणे आवश्यक आहे. त्यासाठी समितीने महाविद्यालयांना प्रस्ताव सादर करण्यास सांगावे. तसेच शहरातील काही नामांकित उच्च माध्यमिक शाळांमध्ये कनिष्ठ महाविद्यालये सुरू करण्यासाठी मुळातच पायाभूत सुविधा आहेत. अशा शाळांनी कनिष्ठ महाविद्यालये सुरू करावीत."

**गेल्या वर्षी अकरावी प्रवेशासाठी १० टक्के जागा वाढवून दिल्या असल्या तरी प्रत्यक्षात ३६ हजार जागा रिक्त राहिल्या होत्या. त्यामुळे तूर्तास प्रवेशासाठी जागा वाढवून देण्याचा कोणताही विचार नाही; परंतु प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थी संख्येच्या तुलनेत प्रवेश क्षमता कमी असल्याचे निदर्शनास आले, तर मात्र जागा वाढवून देण्याचा विचार करण्यात येईल.**

**- मीना शेंडकर, सचिव,**
इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश नियंत्रण समिती

अकरावी प्रवेशासाठी प्रवेश अर्जाची संख्या आणि उपलब्ध जागा पाहून काही प्रमाणात जागा वाढवून दिल्या जातात. त्यासाठी समितीमार्फत जागा वाढविण्यासंदर्भातील प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना कनिष्ठ महाविद्यालयांना करण्यात येतात. मग शहरातील इच्छुक महाविद्यालये समितीकडे त्या संदर्भात प्रस्ताव सादर करतात.

**Saakal: 7.8.2020**



# ऑनलाइन शिक्षणासाठी कक्ष

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

यंदाच्या शैक्षणिक वर्षातील ऑनलाइन शिक्षणातील अडचणी जाणून घेऊन, त्या सोडविण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. यासोबतच नवीन शैक्षणिक धोरण शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक मंगळवारी पार पडली. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, नगर व नाशिक या तिन्ही जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना विविध विषयांचे ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन मिळावे, यासाठी विद्यापीठ प्रशासनाने ई-कंटेंटचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

### ई-कंटेंट विनामूल्य

विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेली ई-कंटेंट सुविधा आणि तंत्रज्ञान इंदापूर महाविद्यालयाने स्वीकारले असून, त्यानुसार विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले जाणार आहे. आगामी काळात हे तंत्रज्ञान सर्व संलग्न महाविद्यालयांना विनामूल्य उपलब्ध करून देण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

ग्रामीण भागांतील विद्यार्थी, शिक्षक यांचा विचार करून विद्यापीठातर्फे स्वतंत्र कक्ष स्थापन केला जाणार आहे. या कक्षावर देखरेख ठेवण्यासाठी समिती असेल. नवीन शैक्षणिक धोरणातील मुद्द्यांची माहिती शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांना व्हावी, यासाठी विद्यापीठातर्फे प्रयत्न केले जाणार आहेत. त्यासाठी विद्यापीठ समिती स्थापन करणार आहे.

**Maharashtra Times: 7.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

# सहायक प्राध्यापक नियुक्ती एकसूत्री असावा

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे अधिसभा सदस्यांची मागणी



**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ६ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागातील हंगामी प्राध्यापकांना निश्चित वेतन आणि संलग्न महाविद्यालयातील हंगामी प्राध्यापकांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन, असे नियुक्तीच्या निकषांत तफावत आहे. त्यामुळे सहायक प्राध्यापकांच्या नियुक्तीबाबत विद्यापीठ व महाविद्यालयस्तरावर एकसूत्रीपणा असावा, अशी मागणी अधिसभा सदस्यांनी केली आहे.

विद्यापीठाने काही विभागातील सहायक प्राध्यापकांच्या हंगामी नियुक्तीसाठीची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. त्यात प्राध्यापकांना तीस हजार रुपये वेतन असा उल्लेख आहे.

तर संलग्न महाविद्यालयांनी हंगामी प्राध्यापकांनी नियुक्ती करायची असल्यास त्यांना सहाव्या किंवा सातव्या वेतन आयोगानुसार वेतन देणे आवश्यक आहे.

त्यामुळे विद्यापीठाकडून शैक्षणिक विभाग आणि संलग्न महाविद्यालयांना एकाच पदासाठी वेगवेगळे नियम असल्याचा आक्षेप विद्यापीठाचे अधिसभा सदस्य प्रा. शामकांत देशमुख यांनी घेऊन त्याबाबत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना पत्र दिले आहे.

दरम्यान, संस्था आणि महाविद्यालय स्तरावर सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक पदाच्या हंगामी नियुक्तीसाठी नियुक्तीपत्रावर या पूर्वी सहाव्या वेतन आयोगाचा आणि आता सातव्या वेतन आयोगाचा उल्लेख असणे बंधनकारक आहे. वेतन आयोगानुसार सुमारे हजार रुपये वेतन द्यावे लागते.

तसा उल्लेख नसल्यास विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडून संबंधित नियुक्तीला मान्यता दिली जात नाही. तर विद्यापीठाच्या जाहिरातींमध्ये 'तीस हजार रुपये' असा स्पष्ट उल्लेख आहे. मग विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि संलग्न महाविद्यालये यांना वेगळे नियम का हा प्रश्न आहे. वेगवेगळे नियम हा दुजाभाव आहे, असे प्रा. देशमुख यांनी सांगितले.

**Prabhat: 7.8.2020**

# उद्योजक घडवण्यासाठी विद्यापीठात अभ्यासक्रम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यार्थ्यांना उद्योजक होण्यासाठीचे धडे देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठी विद्यापीठातील सेंटर फॉर इनोवेशन, इनक्यूबेशन अँड एंटरप्राईजेस आणि आंत्रप्रुनरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया एकत्र आले असून 'उद्योजकता' या विषयावरील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासह छोट्या कालावधीचे अभ्यासक्रम राबवले जाणार आहेत.

नुकत्याच झालेल्या करारावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि आंत्रप्रुनरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे संचालक मंडळ सदस्य मिलिंद कांबळे यांच्यासह प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, विज्ञान तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, सेंटर फॉर इनोवेशन, इनक्यूबेशन अँड एंटरप्राईजेसच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, रीसर्च पार्क फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अरविंद शाळीग्राम आदी उपस्थित होते. आंत्रप्रुनरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे महासंचालक डॉ. सुनील शुक्ला, एस. बी. सरीन, डॉ. सत्य रंजन आचार्य या वेळी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमधील उद्योजकतेला वाव देऊन नवीन उद्योजक तयार करण्यासाठी उद्योजकतेवरील 'डिप्लोमा इन इनोव्हेशन अँड न्यू व्हेंचर मॅनेजमेंट' हा एक वर्ष मुदतीचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने राबवला जाईल. या पदविका अभ्यासक्रमासह 'उद्योजकता' विषयावरील छोट्या कालावधीचे अभ्यासक्रमही सुरू केले जातील. तसेच नवउद्योजकांनाही विविध विषयांमधील प्रशिक्षण दिले जाणार आहे, असे डॉ. पालकर यांनी सांगितले.

> विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांमधील उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन रोजगार निर्माण करण्यावर भर देण्यात येत आहे. त्यासाठी हा विशिष्ट पदविका अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.
>
> **- डॉ. नितीन करमळकर**, कुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> प्रतिष्ठित सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह जोडले गेल्याचा आनंद आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून येणाऱ्या काळात प्राध्यापक विकास कार्यक्रम, अध्यापन प्रशिक्षण असे उपक्रम राबवण्याचे नियोजन आहे.
>
> **- डॉ. सुनील शुक्ला**, महासंचालक आंत्रप्रुनरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया

लोकसत्ता Fri, 07 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54043889

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

### व्यवस्थापन परिषदेचा निर्णय

# ऑनलाइन शिक्षणासाठी विद्यापीठात स्वतंत्र कक्ष

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** ऑनलाइन शिक्षणाच्या प्रक्रियेतील समस्या समजून घेऊन त्या दूर करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या कक्षाचे नियंत्रण करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात येईल.

**शिक्षण धोरण समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी समिती**

केंद्र शासनाने नुकतेच मान्यता दिलेले नवे शैक्षणिक धोरण समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विद्यापीठ प्रयत्न करणार आहे. त्यासाठी समिती स्थापन करण्यात येणार आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक नुकतीच झाली. या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीत ऑनलाइन शिक्षणासह नवे शैक्षणिक धोरण, बृहत आराखड्यानुसार नव्या महाविद्यालयांचे बिंदू निश्चित करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

करोना विषाणू संसर्गामुळे महाविद्यालये सुरू करता येत नसल्याने शिक्षणाची प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने करावी लागणार आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन मार्गदर्शनासाठी विद्यापीठाने स्वतंत्र व्यासपीठ निर्माण केले आहे. मात्र ग्रामीण भागात अनेक ठिकाणी साधने, कनेक्टिव्हिटी आदी समस्या आहेत, तसेच महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रियाही अजून पूर्ण झालेली नाही. ऑनलाइन शिक्षणासाठी येणाऱ्या या समस्या सोडवण्यासाठी विद्यापीठातर्फे स्वतंत्र कक्ष स्थापन केला जाईल. त्यासाठी वेगळी समितीही नियुक्त केली जाणार आहे.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Fri, 07 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54045705

---

लोकमत

### शिक्षणतज्ज्ञांचे मत : कृती आराखड्याची प्रक्रिया सुरु करण्यात यावी

# शैक्षणिक धोरण राबवणे आव्हानात्मक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे : नव्या शैक्षणिक धोरणात** आंतरविद्याशाखीय शिक्षणाचा पुरस्कार करण्यात आला आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून आयआयटी, आयआयएम, अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्चर अशा विशिष्ट शाखांचे शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था कार्यरत आहेत. या संस्थांना समोर ठेवून नवे शैक्षणिक धोरण राबवणे आव्हानात्मक असणार आहे, असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर येत्या शैक्षणिक वर्षांपासून नवीन शैक्षणिक धोरण राबविणे शक्य होणार नाही. येत्या जानेवारी महिन्यापर्यंत कोरोनाचा प्रादुर्भाव राहिला तरी त्यानंतरच्या ६ महिन्यांत नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याची तयारी केंद्र व राज्य शासनाला करता येणार नाही. त्याचप्रमाणे धोरणाच्या अंमलबजावणीमधील केंद्र शासनाने व राज्य शासनाने कोणती जबाबदारी घ्यावी. हे निश्चित करावे लागेल. त्यासाठी केंद्र शासनाने आताच कृती आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरु करायला हवी. नवीन शैक्षणिक धोरणात एकाच विद्याशाखेचे शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था मान्य नाही. परंतु, आयआयटी तांत्रिक शिक्षण देणारी संस्था असून आयआयएमसारख्या संस्था व्यवस्थापनाचे शिक्षण देत आहेत. तसेच फार विचारपूर्वक वैद्यकीय शिक्षणासाठी आरोग्य विज्ञान विद्यापीठाची व तंत्रशिक्षणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाची स्थापन करण्यात आली. त्यामुळे या विद्यापीठांचे व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांचे काय करायचे? असा आव्हानात्मक प्रश्न निर्माण होणार आहे. पुण्यातील बीएमसीसी महाविद्यालयाने आणि गोखले इन्स्टिट्यूटने विशिष्ट विद्याशाखेत महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. तसेच सीओईपीसारख्या अभियांत्रिकी महाविद्यालयांनी शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे सर्वच महाविद्यालयांमध्ये आंतरविद्याशाखीय शिक्षण देणे शक्य होईल का? याबाबत शंका निर्माण होते. त्यामुळे धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी तयार केल्या जाणाऱ्या रोडमॅपची वाट पाहावी लागेल, असेही तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे.

**आदिवासी विद्यार्थ्यांचे काय ?**

तीन वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा विचार शैक्षणिक धोरणांमध्ये मांडण्यात आला आहे. मात्र भटक्या विमुक्त आणि आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांचे शिक्षण कसे पूर्ण करणार याबाबत प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे शालेय शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या सर्व लहान-मोठ्या गोष्टींचा अभ्यास करावा लागेल.

> प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व उच्च शिक्षण यावर राज्यशासनाने आत्तापासूनच तज्ज्ञ व्यक्तींचा गट स्थापन करुन कृती आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरु करायला हवी. तसेच आयआयटी, आयआयएम सारख्या संस्था आणि वैद्यकीय, अभियांत्रिकी, आर्किटेक्चर फार्मसी आदी व्यावसाय शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयामध्ये आंतरविद्याशाखीय शिक्षण देणे आव्हानात्मक असेल.
>
> **- प्रा. नंदकुमार निकम, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ**



Hello Pune
Page No. 2 Aug 07, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

# अकरावी प्रवेशासाठी ८५ हजार विद्यार्थ्यांची नोंदणी

### मागील वर्षापेक्षा १५ हजार अधिक अर्ज : सर्वांना मिळणार प्रवेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या वर्षी पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता अकरावीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेत यंदा प्रवेश अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे १५ हजाराने वाढली आहे. त्यामुळे या वर्षी अकरावीत प्रवेश मिळवण्यात विद्यार्थ्यांमध्ये चुरस निर्माण होणार असली तरी प्रत्येकाला प्रवेश मिळेल एवढ्या मुबलक जागा उपलब्ध आहेत.


पुणे पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील ३०४ महाविद्यालयांमधील इयत्ता अकरावीच्या १ लाख ६ हजार ९७२ जागांवरील प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. २४ जुलै ते ६ ऑगस्ट या कालावधीमध्ये अकरावी प्रवेशासाठी ८५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यातील ५० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जातील पहिला भाग भरला असून त्यातील ३७ हजार ७८३ विद्यार्थ्यांचे अर्ज तपासून झाले आहेत.तसेच अजूनही ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरूच आहे. मागील वर्षी अकरावीच्या प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या सुमारे १ लाख ४ हजार जागांसाठी घेतलेल्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतून ६९ हजार ५६ जागांवर विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने प्रवेश घेतला होता. त्यामुळे ३६ हजार ८५८ जागा रिक्त राहिल्या होत्या. गुरुवारी दुपारपर्यंत ८५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केला असून त्यात पुढील काही दिवसांत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. अकरावी प्रवेशासाठी अर्ज करणारे काही विद्यार्थी तंत्रनिकेतन किंवा इतर अभ्यासक्रमास प्रवेश घेतात. त्यामुळे गेल्या वर्षाप्रमाणे यंदाही अर्ज करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश मिळणार आहे.

### गेल्या वर्षीची अकरावी प्रवेशाची आकडेवारी




**मागीलवर्षी** पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विज्ञान शाखेत २७ हजार ९५२ विद्यार्थ्यांनी तर वाणिज्य शाखेत इंग्रजी माध्यमामध्ये २१ हजार ५११ विद्यार्थ्यांनी आणि वाणिज्य मराठी माध्यमात ९ हजार ५०९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.

### अकरावीची २०१९ मधील रिक्त जागांची आकडेवारी




Pune Main
Page No. 2 Aug 07, 2020
Powered by: erelego.com

# 'एनएसएस'च्या पुरस्कारासाठी ऑनलाइन प्रस्ताव

**पुणे, दि. ६ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल पुरस्कार दिला जातो. त्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत महाविद्यालये, कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवकांनी पुरस्कारासाठी अर्ज करावेत, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे. विद्यापीठातर्फे जिल्हा व विद्यापीठ पातळीवर असे पुरस्कार दिले जाणार आहे. त्यानुसार २०१९-२० या शैक्षणिक वर्षामध्ये व मागील तीन वर्षामध्ये जी महाविद्यालये, कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांनी राष्ट्रीय सेवा योजनेत उल्लेखनीय कार्य केले आहे, त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली जाते. प्रत्येक महाविद्यालयाने त्याबाबतचे प्रस्ताव ऑनलाइन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर त्याची प्रथम छाननी, गुणवत्ता यादी प्रसिद्ध, द्वितीय छाननी आणि त्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध केले जाणार आहे.

प्रभात Fri, 07 August 2020 epaper.eprabhat.net/

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

**लोकमत**

शैक्षणिक धोरणात सुतोवाच : प्राथमिक ते माध्यमिक शिक्षकांसाठी बीएड हा एकमेव अभ्यासक्रम

### देशभरातील डीएड महाविद्यालयांचे अस्तित्व होणार इतिहासजमा

**अविनाश साबापुरे** |
लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ** : एकेकाळी त्वरित नोकरी मिळवून देणारा म्हणून प्रचंड लोकप्रिय झालेला डीएड अभ्यासक्रम आता कायमचा लुप्त होणार असून डीएड महाविद्यालयांचे अस्तित्वही इतिहासजमा होणार आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात ही बाब स्पष्ट करण्यात आली आहे. नव्या धोरणानुसार, शिक्षकाची नोकरी मिळविण्यासाठी देशभरात केवळ बीएड हा एकच अभ्यासक्रम उपलब्ध राहणार आहे. त्यासाठी २०२१ पर्यंत राज्य सरकारांशी चर्चा करून अभ्यासक्रम आणि त्यासाठीची पाठ्यपुस्तके तयार केली जाणार आहेत.

सध्या प्राथमिक शिक्षकांना डीएड हा अभ्यासक्रम आणि त्यानंतर टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. तर माध्यमिक शिक्षकांना पदवीनंतर बीएड आणि उच्च माध्यमिक शिक्षकांसाठी बीएड व पदव्युत्तर पदवी बंधनकारक आहे. मात्र नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार आता देशात चार वर्षीय इंटिग्रेटेड बीएड हाच अभ्यासक्रम शिकविला जाणार आहे. त्यातच शालेय शिक्षणातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक अशा सर्व स्तरावरील शिक्षकांसाठी आवश्यक असलेले अभ्यास घटक समाविष्ट केले जाणार आहेत. त्यामुळे प्राथमिक शाळेतील शिक्षक पदासाठीही चार वर्षीय बीएड अभ्यासक्रमच करावा लागणार आहे. आवश्यक असलेल्या विविध विद्याशाखा उपलब्ध असणाऱ्या महाविद्यालयांमध्येच इंटिग्रेटड बीएड अभ्यासक्रमाला परवानगी मिळणार आहे. २०३० पर्यंत बहुशाखीय सोय नसलेल्या, दुय्यम आणि मोडकळीस आलेल्या सर्व शिक्षक शिक्षण संस्था बंद करण्यात येणार आहेत. विद्यार्थीच मिळत नसल्याने महाराष्ट्रातील डीएड महाविद्यालयांना गेल्या काही वर्षात घरघर लागलेली आहे. एनसीटीईकडे सुमारे ११०० महाविद्यालयांची नोंदणी असली, तरी प्रत्यक्षात त्यातील अनेक कुलूपबंद आहेत. प्रत्यक्षात ३५० महाविद्यालये सुरु असली, तरी तेथे पुरेशी विद्यार्थीसंख्या नाही. बॉक्स'पवित्र' भरतीचे काय?नव्या शैक्षणिक धोरणानुसार, शिक्षक पदासाठी चार वर्षांचा बीएड अभ्यासक्रमच ग्राह्य धरला जाणार आहे. महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षांपूर्वी प्रवित्र प्रणालीमार्फत सुरु झालेली शिक्षकांची भरती प्रक्रिया अर्धवट आहे. त्यातील डीएडधारकांच्या भवितव्याचे काय होणार, हा प्रश्न आता निर्माण झाला आहे.




> इंटीग्रेटेड बीएडचा अभ्यासक्रम अजून तयार झालेला नाही. त्याबाबत नॅशनल कौन्सिल ऑ फ टीचर एज्युके शन (एनसीटीई) किंवा राज्य सरकार काय निर्णय घेते, हे महत्त्वाचे ठरणार आहे. केंद्र सरकारने नुकत्याच जाहीर के लेल्या नव्या धोरणातील शिक्षणाचा आकृतीबंध लक्षात घेता पारंपरिक डीएड अभ्यासक्रमाची गरज भासणारच आहे.
>
> - **देवेंद्र काळबांडे,** प्राचार्य नवप्रतिभा अध्यापक विद्यालय नागपूर

Pune Main
Page No. 4 Aug 08, 2020
Powered by: erelego.com

**लोकमत**

### शुल्क न भरल्याने निकाल प्रलंबित

सावित्रीबाई फुले विद्यापीठ : महाविद्यालयांच्या प्रथम-द्वितीय वर्षांचे निकाल

लोकमत न्युज नेटवर्क

**पुणे** : शुल्क भरले नाही म्हणून शाळांनी निकाल न दिल्याच्या तक्रारी पालकांकडून केल्या जातात. पण आता त्यामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठही मागे राहिले नाही. विद्यापीठाने परीक्षा शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांसह त्या वर्गातील सर्वच विद्यार्थ्यांचे निकाल प्रलंबित ठेवल्याचे समोर आले आहे. काही महाविद्यालयांतील प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांबाबत हा प्रकार घडला आहे.

कोरोना संकटामुळे विद्यापीठाने अंतिम वर्षाचे विद्यार्थी वगळता प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचे निकाल मागील गुणांवरून लावण्याचे जाहीर केले. त्यानुसार निकाल तयार करून विद्यार्थ्यांना वाटपही केले जात आहे. परंतु तत्पूर्वी विद्यापीठाने परीक्षांसाठी शुल्क भरण्याच्या सूचना विद्यार्थ्यांना दिल्या होत्या. त्यानुसार अनेक विद्यार्थ्यांनी शुल्क भरले. मात्र परीक्षाच होणार नसल्याने अनेकांनी शुल्क भरले नाही. या विद्यार्थ्यांसह विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयातील इतर शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांचे निकालही राखून ठेवले आहेत. शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असलेल्या महाविद्यालयांचा समावेश आहे.

#### शुल्कासाठी केला जातोय पाठपुरावा



शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांमध्ये दुसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे. मागील वर्षीचे काही विषय राहिलेल्या अनेक विद्यार्थ्यांचा समावेश त्यात आहे. या विद्यार्थ्यांना शुल्क भरण्यासाठी महाविद्यालयांकडून पाठपुरावा केला जात आहे. त्यांनी शुल्क भरल्याशिवाय इतर विद्यार्थ्यांना निकाल मिळणार नाही, असे महाविद्यालयातील प्राचार्यांकडून सांगितले जात आहे. निकाल राखून ठेवलेले विद्यार्थी व महाविद्यालयांची संख्या उपलब्ध होऊ शकली नाही.

> शुल्क न भरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या खूप कमी असलेल्या महाविद्यालयांचे निकाल हमीपत्रावर देण्यात आले आहेत. सुमारे ६0 लाख रुपये परीक्षा शुल्क मिळालेले नाही. त्यासाठी महाविद्यालयांनी पुढाकार घेऊन शुल्क जमा करून घ्यायला हवे.
>
> - **डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Hello Pune
Page No. 4 Aug 08, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# परीक्षा शुल्कासाठी रोखले निकाल

## महाविद्यालयांकडे ४२ लाखांची थकबाकी

सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. ७ : काही विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क न भरल्याने संपूर्ण वर्गाचा निकाल अडवून ठेवल्याचे प्रकार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात घडले आहेत. प्राचार्यांनी शुल्कासंदर्भात हमीपत्र दिल्यानंतर निकाल जाहीर केला जात आहे. दरम्यान, तब्बल ४२ लाख रुपयांचे परीक्षा शुल्क अद्याप विद्यापीठाला मिळाले नसल्याचे समोर आले आहे.**



विद्यापीठाच्या पदवीच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षेसाठी शुल्क भरण्याचे सूचना विद्यार्थ्यांना दिल्या होत्या. करोनामुळे परीक्षा शुल्क भरण्यास वेळोवेळी मुदतवाढही देण्यात आली. त्याच दरम्यान करोनामुळे अंतिम वर्ष वगळता सर्व विद्यार्थ्यांचे निकाल मागील गुणांवरून निकाल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

विद्यार्थ्यांनी भरलेले शुल्क महाविद्यालयांनी तपासल्यानंतर विद्यापीठाकडे जमा करणे अपेक्षित होते. मात्र, काही विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क भरले नसल्याने विद्यापीठाने संबंधित महाविद्यालयातील त्या वर्गाचा निकाल अडवून ठेवले असल्याचा आरोप प्राचार्यांनी केला आहे. याबाबत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे तक्रार करण्यात आली आहे.

प्राचार्य डॉ. संजय चाकणे म्हणाले, 'महाविद्यालयाने परीक्षा अर्ज मंजूर केल्यानंतर विद्यार्थ्यांनि शुल्क भरणे अपेक्षित होते. तसेच शुल्क भरले की नाही ते विद्यापीठाने तपासणी करायला पाहिजे होती. पण तसे न होता सर्वच विद्यार्थ्यांचा निकाल राखून ठेवला. ज्या विद्यार्थ्यांनि पैसे भरले आहेत, त्याचा निकाल लागला पाहिजे.

### एकाच महाविद्यालयाने २२ लाख रुपये थकवले

एकीकडे निकाल रखडल्याने आरडाओरडा सुरू झालेली असताना नगरमधील एका महाविद्यालयाने परीक्षा शुल्कात तब्बल २२ लाख रुपये विद्यापीठाकडे भरलेच नसल्याचे यानिमित्ताने समोर आले आहे.

**२९ महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून ३६ लाख ४० हजार रुपयांचे शुल्क गोळा केले आहे, पण हे पैसे अद्याप भरलेले नाहीत. तर ६८ महाविद्यालयांच्या सुमारे ३ हजार विद्यार्थ्यांनी ६ लाख ५० हजार रुपये महाविद्यालय व विद्यापीठ कुठेही भरलेले नाहीत. महाविद्यालयांकडून शुल्क भरले जाईल या हमीपत्रावरून निकाल देण्यात येत आहे.**

**- डॉ. महेश काकडे,** संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**Sakaal: 8.8.2020**

# नव्या शिक्षण धोरणाने भारताची पायाभरणी

## पंतप्रधान मोदी : विद्यार्थ्यांना भविष्याची खात्री

सकाळ न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली, ता. ७ : नवे शैक्षणिक धोरण २१ व्या शतकातील नव्या भारताची पायाभरणी करणारे आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज ठाम समर्थन केले. नव्या ऊर्जेला नव्या विचारांना वावच नसलेली, तरीही वर्षानुवर्षे जुनाट पद्धतीने चालविलेली शिक्षणपद्धत बदलून विद्यार्थ्यांची व्यक्तिगत आवड, क्षमता व मागणी यांचा विचार करून हे सर्वकष शैक्षणिक धोरण आखण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या उच्चशिक्षण संमेलनात त्यांनी याबाबत प्रथमच विस्ताराने भाष्य केले. भावी पिढ्यांसाठी सुसज्ज भविष्याची खात्री देणारे हे धोरण असल्याचा विश्वास सरकारला आहे, असेही ते म्हणाले.

### आक्षेपांना मोदींची उत्तरे



- **नव्या धोरणाची आताच गरज?** नवे शैक्षणिक धोरण आधुनिक जागतिक मूल्यांच्या कसोटीवर टिकण्यास सक्षम आहे. अतिशय मेहनत व डॉक्टर, अभियंते, वकील बनण्यासाठीच्या भाऊगर्दीतून विद्यार्थ्यांना बाहेर काढून त्याची क्षमता व आवडीनुसार शिक्षण देणे व त्यातूनही त्याला रोजगाराच्या संधी प्राप्त होतील याची खात्री देणे यादृष्टीने धोरण आखले गेले आहे.
- **पाचवीपर्यंत मातृभाषेतून शिक्षण का ?** मातृभाषेतून सुरुवातीचे शिक्षण मिळाले पाया भक्कम होऊन अभ्यासात पुढील प्रगती लक्षणीय होते हे जागतिक पातळीवर सिद्ध झालेले वास्तव आहे.
- **१०+२ शिक्षण पद्धतीऐवजी ५+३+३+४ ही पद्धती का ?** मुलांना एन्क्वायरी, डिस्कव्हरी, डिस्कर्शन व ॲनालिसीस यावर आधारीत शिक्षणासाठी प्रेरणा दिली पाहिजे. यातून शिक्षणाबद्दल आवड निर्माण होईल. नव्या जगात नवी गुणवत्ता मानकेही तयार झाली आहेत. त्या कसोटीवर उतरण्यासाठीच ५+३+३+४ ही शिक्षणपध्दती योग्य व सक्षम ठरेल.
- **कोणत्याही अभ्यासक्रमात प्रवेश घेणे व बाहेर पडणे यात सूट का ?** प्रत्येक विद्यार्थ्याला आवड जोपासण्याची संधी मिळायलाच हवी. विद्यार्थ्यांच्या वयात आवडीनिवडी बदलू शकतात. एक अभ्यासक्रम निवडला की त्यातच मन मारून कायम राहणे यापेक्षा बदल करावासा वाटला तर शाखा बदलास परवानगी हवीच. आम्ही अशा कालखंडाकडे चाललो आहोत ज्यात कोणीही आयुष्यभर त्याच व्यवसाय, नोकरीत राहू शकत नाही. त्याला सतत सुधारणा, बदल करावे लागतात.
- **नव्या शिक्षण पद्धतीतून काय साध्य होणार ?** आतापावेतो आमची शिक्षणपध्दती 'काय विचार करावा' (व्हॉट टू थिंक) यावर आधारीत होती. आता ती 'विचार कसा करावा' (हाऊ टू थिंक) यावर आधारीत असेल. कोणती माहिती आपल्याला आवश्यक वाटते व ती कशी मिळवावी, याचे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना देणारा हा बदल असणार आहे. जोवर शिक्षणात आपल्या ध्येयपूर्तीची आस, आपले राष्ट्रीय तत्त्वज्ञान, शिक्षणाच्या उद्देशाची परिपूर्ती या गोष्टी नसतील तोवर ती घोकंपट्टी नव्या भारतासाठी निरुपयोगी ठरेल.



**Sakaal: 8.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांची लूट

## बेकायदा शुल्क वसुली; उच्च शिक्षण विभागाचे चौकशीचे आदेश

**पुणे, ता. ७ : मागासवर्गीय व खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शुल्क सवलत मिळावी, यासाठी शैक्षणिक शुल्कासह इतर शुल्क घेऊ नयेत, असे आदेश राज्य सरकारने दिले; मात्र सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांनी चुकीच्या पद्धतीने शुल्क वसुली करून विद्यार्थी व शासनाची फसवणूक केली आहे. उच्च शिक्षण विभागाने पुणे विद्यापीठाला याबाबत वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.**

अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमधील कला, वाणिज्य, विज्ञान व विधी या शाखांमध्ये शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शुल्क घेऊ नये, असे आदेश राज्य सरकारने जून २००५ मध्ये काढले आहेत. याचाच आधार घेत १७ फेब्रुवारी २०११ मध्ये पुणे विद्यापीठाने परिपत्रक काढून महाविद्यालयांना शुल्क घेऊ नये, असे आदेश दिले होते; मात्र महाविद्यालयांनी याकडे दुर्लक्ष करत २०११ ते २०२० या काळात अतिरिक्त शुल्क वसुली केली आहे. त्यामुळे महाविद्यालयांचे ऑडिट करून शुल्क परत करावे व दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी सुराज्य विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष अमर एकाड यांनी केली आहे. याप्रकरणाची शहानिशा करून याबाबत कार्यवाही केली जाईल, असे पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी सांगितले.

पुणे विद्यापीठाने जे शुल्क ठरवून दिले आहे, ते शुल्क घेणे आवश्यक आहे; पण महाविद्यालयांनी चुकीच्या पद्धतीने शुल्क घेतल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. याची तपासणी करण्यासाठी पुणे विद्यापीठाला याबाबत पत्र पाठवले जाणार आहे, असे उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. धनराज माने यांनी सांगितले.

**"मी बीएससी तृतीय वर्षात शिक्षण घेत आहे. मागासवर्गीय प्रवर्गात असलो तरी मला पूर्ण शैक्षणिक व इतर सुविधांचे शुल्क भरावे लागत आहे. या आदेशाची अंमलबजावणी झाल्यास आर्थिक दिलासा मिळू शकतो.**
**- एक विद्यार्थी,** बारामती

**४७४**
पुणे विद्यापीठांतर्गत येणारी महाविद्यालये

**५ लाख**
एकूण विद्यार्थीसंख्या

**विद्यार्थी आणि पालकहो, आपल्याला असा फसवणुकीचा अनुभव आला असल्यास आम्हाला येथे कळवा.**
webeditor@esakal.com **Whatsapp : 9130088459**

**Sakaal: 8.8.2020**

# अनलॉक कॅम्पससाठी विद्यार्थ्यांचा 'धडा'

**पुणे, ता. ७ : लॉकडाउननंतर सुरु होणाऱ्या महाविद्यालयांचा कॅम्पस सुरक्षित ठेवण्याची गरज आहे. त्यासाठी नेमकी कोणती काळजी घ्यायला हवी आणि पूर्वतयारी कशी करावी यासाठी सरकारी पातळीवर, शैक्षणिक संस्थासह त्याच्याशी संबंधित सर्वच घटक विचार करून लागले आहेत. त्यालाच मार्गदर्शक ठरणारा 'धडा' काही विद्यार्थ्यांनी चित्रफितीद्वारे तयार केला आहे.**

मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालयातील (एमसीओई) विद्यार्थ्यांनी नुकताच 'अनलॉक : इंजिनिअरिंगच्या दृष्टिकोनातून' हा उपक्रम राबविला. या उपक्रमाच्या माध्यमातून महाविद्यालय पुन्हा सुरू झाल्यावर घ्यावयाची काळजी तसेच सध्याच्या परिस्थितीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करत कोणत्या उपाययोजना केल्या जाऊ शकतील, यावर जनजागृती करणारी चित्रफीत तयार केली आहे. यामध्ये वेगवेगळ्या अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला.

हा उपक्रम 'एमसीओई'च्या प्राचार्य कल्याणी जोशी आणि आयटी शाखेच्या विभागप्रमुख सरिता देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. तसेच देशातील इतर युवकांनी देखील अशाप्रकारची उपाययोजना सुचवावी, यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्याचा हेतू असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

**या उपाययोजना ठरतील उपयुक्त**

1. ५०-५० चे धोरण अंमलात आणून विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश
2. त्यामुळे सोशल डिस्टन्सिंग शक्य
3. महाविद्यालयासह घरात असलेल्या विद्यार्थ्यांनादेखील त्याचवेळी अध्यापन
4. प्रयोगशाळेत ग्लोव्हजचा वापर त्यामुळे संसर्ग पसरणार नाही
5. कँटीनमध्ये प्रत्येक विभागाला जेवणासाठीची ठराविक वेळ दिल्याने गर्दी कमी
6. ग्रंथालयातून पुस्तके घेण्याऐवजी 'ई-लायब्ररी'चा वापर

"महाविद्यालये सुरू झाल्यास विद्यार्थ्यांनी कशी आणि काय खबरदारी घ्यावी, यासाठी उपाययोजनांबाबत माहिती देण्याची संकल्पना सुचली. याबाबत महाविद्यालयातील आमच्या आयटी शाखेच्या विभागप्रमुखांशी संपर्क केला. त्यांनीदेखील यासाठी परवानगी दिली. त्यानंतर आम्ही इतर महाविद्यालयांशी संपर्क करून तेथील विद्यार्थ्यांना यात सहभागी करून घेतले.
**- अर्चि रोटे,** विद्यार्थिनी

"शिक्षणात कोणत्याच अडचणी येऊ नये यासाठी आम्ही महाविद्यालयात विविध उपाययोजना करणार आहोत. मुलांनी सुचविलेल्या उपाययोजनांमुळे ते आणखी सोपे झाले आहे. यासाठी पालकांसोबत याबाबत चर्चा देखील करण्यात आली असून पालकांनी देखील सहकार्य केले आहे. तसेच एकाच वेळी सर्व विद्यार्थ्यांचे प्रॅक्टिकल घेणे शक्य नसल्याने आम्ही दोन बॅच तयार केल्या आहेत. शिक्षकांचेही गट केले जातील.
**- कल्याणी जोशी,** प्राचार्य, 'एमसीओई'

"संगणक अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांच्या प्रॅक्टिकलमध्ये तसा काही ताण पडणार नाही. परंतु, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिकल शाखेच्या विद्यार्थ्यांना प्रत्येक्षात प्रयोगशाळेत उपस्थित राहणे आवश्यक असल्याने या विद्यार्त्यांचे गट करून त्यांना वेळा ठरवून देण्यात येणार आहेत. तसेच ई लायब्ररीसाठी पुस्तकांचे ऑनलाईन पीडीएफ करण्यात येत आहे.
**- सरिता देशपांडे,** आयटी शाखा विभाग प्रमुख, एमसीओई

**व्हिडीओ बघण्यासाठी https://youtu.be/few६३४wn५-k या लिंकचा वापर करावा**

**Sakaal: 8.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

**Section: Education**

# राज्यात नवीन महाविद्यालयांना मान्यता

## पदवी अभ्यासक्रमाच्या जागा वाढणार; विद्यार्थ्यांना दिलासा

**सकाळ वृत्तसेवा**

**मुंबई, ता. ७ : उच्च व तंत्रशिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी राज्यातील अकृषी विद्यापीठातील ४७ महाविद्यालयांना अंतिम मान्यता दिली आहे. यामुळे पदवी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमाच्या जागा वाढणार असून, कला, वाणिज्य, विज्ञान शाखांच्या पारंपरिक अभ्यासक्रमासह काही व्यावसायिक शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.**

विद्यापीठ कायद्यानुसार नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी विद्यापीठे संस्थांकडून प्रस्ताव मागवतात. या प्रस्तावांची छाननी झाल्यानंतर महाविद्यालये सुरू करण्यास सरकारकडून मान्यता दिली जाते. त्यानुसार यंदा उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दोन टप्प्यांमध्ये नवीन ४७ महाविद्यालयांना अंतिम मान्यता दिली असून, याबाबतचा सरकारी आदेश प्रसिद्ध करण्यात आला आहे. मान्यता देण्यात आलेल्या महाविद्यालयांमध्ये सर्वाधिक १३ महाविद्यालये ही मुंबई विद्यापीठाशी संलग्न असून, त्याखालोखाल संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीशी संलग्न नऊ महाविद्यालयांना मान्यता मिळाली आहे. यामध्ये एका महिला महाविद्यालयाचाही समावेश आहे.

डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद नऊ, संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ चार, तर एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या तीन महाविद्यालयांना मान्यता मिळाली आहे. याशिवाय शिवाजी विद्यापीठाअंतर्गत कोल्हापूरमध्ये दोन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत पुणे येथे तीन, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नदिड येथे एक आणि गोंडवाना विद्यापीठाअंतर्गत गडचिरोली येथील दोन महाविद्यालयांना आणि अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाअंतर्गत एका महाविद्यालयास मान्यता देण्यात आली आहे.

या महाविद्यालयांना कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता आली असून, भविष्यात कधीही अनुदान न मागण्याचे प्रतिज्ञापत्र दिल्यानंतर संलग्नता देण्याचा आदेश दिले आहेत.

**नव्या महाविद्यालयांची संख्या**

| | | |
|---|---|---|
| १३ मुंबई विद्यापीठ | ४७ एकूण महाविद्यालय | ३ एसएनडीटी, मुंबई |
| ९ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ | | १ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ |
| ४ संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ | ९ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ | ३ सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे |
| २ गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली | २ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ |



**Sakaal: 8.8.2020**

# संशोधन, विश्लेषणातून विद्यार्थ्यांचे शिक्षण!

## नवे शैक्षणिक धोरण बदलाचा महायज्ञ असल्याचे पंतप्रधानांचे मत

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**नवी दिल्ली :** आतापर्यंत आपल्याला काय विचार करायचा हे शिकवले गेले, पण विचार कसा करायचा हे आता शिकवले जाईल. नव्या शैक्षणिक धोरणाद्वारे संशोधन, चर्चा आणि विश्लेषणाच्या आधारावर विद्यार्थी शिकू लागतील. अभियंता, डॉक्टर, वकील बनवण्याच्या 'कळप मानसिकते'तून ते बाहेर पडू शकतील, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी व्यक्त केला.

नव्या शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीची फक्त अधिसूचना काढली म्हणजे धोरण लागू होत नाही. त्यासाठी संबंधित सर्व घटकांना प्रयत्न करावे लागतील. शिक्षकांना प्रशिक्षण मिळेल. शिक्षकांची आकलनवाढ झाली की देश पुढे जातो, असे मला वाटते. त्यामुळे नव्या शिक्षण पद्धतीतून देशाचे वर्तमान आणि भविष्य बदलण्याच्या प्रक्रियेला 'महायज्ञ' मानले पाहिजे, असेही मोदी म्हणाले.

गेल्या महिन्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने नव्या शिक्षण धोरणाला मंजुरी दिली. तब्बल ३४ वर्षांनंतर शैक्षणिक धोरणात बदल करण्यात आला आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अधिसूचना जारी केली जाणार असून त्यानंतर कृती आराखड्याद्वारे पुढील २० वर्षांत ते टप्प्याटप्प्याने ते लागू होणार आहे.

'नव्या धोरणातून शालेय तसेच उच्चशिक्षणात आमूलाग्र बदल' या विषयावरील चर्चासत्रात मोदी यांनी आगामी शिक्षण पद्धतीबद्दल मत मांडले. कुठल्याही देशाची शिक्षण पद्धती त्या देशाची मूल्ये जपणारी असावी आणि काळानुसार ती बदलत गेली पाहिजे. नवे शैक्षणिक धोरण २१व्या शतकातील भारत घडवण्यासाठी भक्कम पाया ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

उच्चशिक्षणातील स्वायत्ततेसंदर्भात दोन भिन्न विचार मांडले जातात. एका गटाला सरकारनेच शिक्षणाची जबाबदारी घ्यावी असे वाटते तर, दुसऱ्यांचा आग्रह अधिक स्वातंत्र्य देण्यावर आहे. पण उत्तम दर्जाच्या शिक्षणाचा मार्ग या दोन्हींमधूनच जातो. ज्या शैक्षणिक संस्थांचा दर्जा उत्तम असेल, त्यांना अधिक स्वातंत्र्य दिले जाईल, त्यांना प्रोत्साहन दिले जाईल, असे मोदी म्हणाले.

**जागतिक योगदानाची क्षमता**

नव्या शैक्षणिक धोरणातून सखोल चर्चेला वाव मिळू शकेल. आपले विद्यार्थी जागतिक नागरिक बनू शकतील. आता आयुष्यभर एकाच व्यवसायात राहण्याचे दिवस संपले. त्यामुळे व्यक्तीने सातत्याने नवनवे शिक्षण घेऊन कौशल्ये विकसित केली पाहिजेत.

भारत हा तंत्रज्ञान आणि बौद्धिक क्षमतेचा वापर करून जागतिक योगदान देऊ शकतो. २१व्या शतकातील भारताकडून जगाला खूप मोठ्या अपेक्षा आहेत. तंत्रज्ञानामुळे गरिबांनाही शिकण्याची संधी मिळत आहे, असे मोदी म्हणाले.

**मातृभाषेचा आग्रह यासाठी...**

देशात शिक्षण तीन भाषांमधून दिले जाणार असून पाचवीपर्यंत मातृभाषेत शिकवले जाईल, हा मुद्दा वादग्रस्त ठरला आहे. त्यावर मोदी म्हणाले की, घरातील आणि शाळेतील भाषा एकच असेल तर विद्यार्थ्यांची शिकण्याची क्षमता वाढते. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक पाया पक्का होते. म्हणूनच पाचवीपर्यंत मातृभाषेत शिकवले जावे अशी शिफारस केली आहे.

लोकसत्ता Sat, 08 August 2020 https://epaper.loksatta.com/c/54066491

# *News Paper Clippings During August 2020*

**Section: Education**

# चर्चेनंतरच परीक्षा रद्द!

## कुलगुरूंची मते विचारात घेतल्याचा राज्याचा दावा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय राज्यातील कुलगुरूंशी चर्चा केल्यानंतर घेण्यात आला, अशी माहिती महाराष्ट्र सरकारच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात शुक्रवारी देण्यात आली. या संदर्भातील सुनावणी १० ऑगस्ट रोजी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ३१ जुलै रोजीच्या सुनावणीत महाराष्ट्र सरकारला म्हणणे मांडण्यास सांगितले होते. करोनाच्या काळात परीक्षा घेणे योग्य नसल्याचे मत राज्यातील अनेक कुलगुरूंनी मांडले होते. त्यांचे मत विचारात घेऊन १३ जुलै रोजी राज्य आपत्ती नियंत्रण प्राधिकरणाने अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द *(पान २ वर)*



**कारणे काय?** महापालिकांनी लागू केलेली टाळेबंदी, करोना निर्बंधांमुळे प्रतिबंधित केलेले अनेक विभाग, महाविद्यालयीन इमारतींचा आरोग्य सेवा केंद्रे म्हणून होणारा वापर आणि कुलगुरूंचे मत यांचा विचार करून निर्णय घेण्यात आला, असे महाराष्ट्र सरकारच्या निवेदनात म्हटले आहे. राज्य सरकारने १९ जून रोजी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय जाहीर केला होता.

लोकसत्ता Sat, 08 August 2020 https://epaper.loksatta.com/c/540

# चर्चेनंतरच परीक्षा रद्द!

**(पान १ वरून)** करण्याचा निर्णय घेतल्याचे न्यायालयात सांगण्यात आले. १३ राज्यांतील विद्यार्थ्यांनी आणि विधि शाखेतील विद्यार्थी तसेच, युवा सेनेचे नेते आदित्य ठाकरे यांच्यावतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर न्या. अशोक भूषण, न्या. आर. सुभाष रेड्डी आणि न्या. एम. आर. शहा यांच्या पीठासमोर सुनावणी होत आहे. सर्व विद्यापीठांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्याचा आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने काढला आहे. या आदेशाला आव्हान देण्यात आले आहे. आयोगाच्या ६ जुलै रोजीच्या आदेशपत्राच्या पार्श्वभूमीवर १३ जुलै रोजी राज्य आपत्ती नियंत्रण प्राधिकरणाची बैठक घेऊन परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे निवेदन राज्याच्या उच्च शिक्षण संचालकांच्या वतीने सादर करण्यात आले. गेल्या सुनावणीमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वतीने महाधिवक्ता तुषार मेहता यांनी निवेदन सादर केले होते.

लोकसत्ता Sat, http

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

२ || प्रभात शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२०

# सप्टेंबरपासून शाळेची घंटा

**नव्या आचारसंहितेत विचार; केंद्राचे संकेत**

**नवी दिल्ली, दि. ७** - गेल्या काही महिन्यांपासून बंद पडलेल्या शाळा आता पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. यावर केंद्र सरकार गांभीर्याने विचार करत आहे. १ सप्टेंबरपासून टप्प्याटप्प्याने शाळा सुरू होणार आहेत. या प्रस्तावावर विचार सुरू असल्याचे संकेत केंद्रीय आरोग्यमंत्री डॉ. हर्ष वर्धन यांनी दिले आहेत. अनलॉक-३ची मुदत ३१ ऑगस्टला संपणार आहे. त्यानंतर नव्या गाईड लाईन्समध्ये यासंबंधी घोषणा होण्याची शक्यता आहे.

अनलॉकच्या प्रक्रियेनुसार सर्व व्यवहार सुरू करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यानुसार केंद्र सरकार सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात शाळा सुरू करण्याचा निर्णय घेऊ शकते. त्यात १० ते १२वीच्या वर्गांना परवानगी दिली जाऊ शकते. नंतर क्रमाने विद्यार्थ्यांना बोलावले जाऊ शकते. त्यासाठी नेमकी काय काळजी घ्यावी याची नियमावली शाळांना दिली जाणार आहे.

पहिल्या १५ दिवसांमध्ये दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्यास सांगितले जाऊ शकते. यानंतर वेळमर्यादित सहावी ते नववीचे वर्ग सुरु केले जाऊ शकतात. एका इयत्तेतील सर्व तुकड्यांना एकाच दिवशी शाळेत बोलावले जाणार नाही.

प्रत्येक तुकडीला दिवस ठरवून दिला जाईल. याशिवाय शाळा आणि वर्ग सॅनिटाइज करणं अनिवार्य असणार आहे. शाळांना दोन शिफ्टमध्ये काम करण्यास सांगितले जाऊ शकते. ही वेळा सकाळी ८ ते ११ आणि १२ ते ३ अशी असू शकते. सॅनिटाइज करण्यासाठी एक तास दिला गेला आहे. मात्र प्राथमिक आणि पूर्व प्राथमिक शाळांना सुरु करण्याची परवानगी दिली जाणार नाही, असे संकेतही केंद्राने दिली आहेत. मात्र देशात करोना रुग्णांचा आकडा वाढत असल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे.

# 'फी'साठी निकाल रखडला

प्रभात वृत्तसेवा

**■ पदवीचे शेकडो विद्यार्थी निकालाच्या प्रतीक्षेत**

पुणे, दि. ७ - विद्यार्थ्यांनी परीक्षा शुल्क न भरल्याच्या कारणावरून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने अनेक महाविद्यालयांतील पदवीच्या प्रथम व द्वितीय वर्षातील सर्वच विद्यार्थ्यांचे निकाल राखीव ठेवल्याचा प्रकार समोर आला आहे. काही विद्यार्थ्यांनी शुल्क न भरल्याने सर्वच विद्यार्थ्यांचे निकाल प्रलंबित ठेवणे कितपत योग्य आहे, असा प्रश्न महाविद्यालय प्रशासनाने उपस्थित केला आहे.

विद्यापीठाच्या पदवीच्या प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षेसाठी शुल्क भरण्याचे सूचना विद्यार्थ्यांना दिल्या होत्या. करोनामुळे परीक्षा शुल्क भरण्यास वेळोवेळी मुदतवाढही देण्यात आली. त्याचदरम्यान करोनामुळे अंतिम वर्ष वगळता सर्व (पान २ पहा) ▸▸

"ज्या महाविद्यालयातील मोजक्याच विद्यार्थ्यांनी शुल्क भरले नाही, त्यांना महाविद्यालयाच्या हमीपत्रावरून निकाल दिला आहे. विद्यापीठ हे सुविधा देणारे केंद्र आहे. शुल्कासंदर्भात महाविद्यालयांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. जवळपास ६० लाख रुपये परीक्षा शुल्क प्रलंबित आहे.

- डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**Prabhat: 8.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

# अंतर्गत गुणातील चूक; प्रतिविद्यार्थी १ हजार दंड

## विद्यापीठाचा निर्णय । २०२० च्या उन्हाळी परीक्षांपासून अंमलबजावणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध परीक्षांचे अंतर्गत गुण योग्य तऱ्हेने भरण्याची संपूर्ण जबाबदारी संयुक्तपणे संबंधित विषय शिक्षक व महाविद्यालयांची असून, याबाबत त्रुटी आढळल्यास महाविद्यालय आणि संबंधित शिक्षकांकडून प्रतिविद्यार्थी १ हजार रुपये दंड आकारण्यात येणार आहे. तसेच, महाविद्यालयाकडून ३ पेक्षा जास्त वेळेस अंतर्गत गुणांसंदर्भात त्रुटी आढळून आल्यास संबंधित महाविद्यालयावर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे, असे परिपत्रक परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी नुकतेच प्रसिद्ध केले आहे. याची अंमलबजावणी २०२० च्या उन्हाळी परीक्षांपासून होणार आहे.



**विद्यापीठाने दिलेल्या** कालावधीत विषय शिक्षकांनी अंतर्गत गुण हे ऑनलाइन पद्धतीनेच भरून ते बरोबर असल्याची खातरजमा झाल्यानंतर, त्याची प्रिंटआऊट काढून त्यावर स्वाक्षरी करावयाची आहे. स्वाक्षरी करताना संबंधित प्राध्यापकांनी 'वरील सर्व मार्क मी पूर्णपणे वाचले असून ते बरोबर असल्याची खात्री केलेली आहे' , असे हमीपत्र आवश्यक आहे. या हमीपत्रावर प्राचार्यांची स्वाक्षरी हवी. अंतर्गत गुणांबाबत अडचणी-त्रुटी उद्भवल्यास महाविद्यालयाने ऑनलाइन पद्धतीने भरलेले गुणच अंतर्गत गुण म्हणून ग्राह्य धरले जातील, असेही महेश काकडे यांनी स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१८ च्या सत्रापासून सर्व विद्याशाखांतर्गत होणाऱ्या विविध परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर, अंतर्गत गुण स्वीकारण्याबाबत विनंती करणाऱ्या महाविद्यालयांवर विद्यापीठाकडून कारवाई केली जात आहे. या कारवाई अंतर्गत विद्यापीठाकडून दिल्या जाणाऱ्या विविध अनुदान योजना, गुणवत्ता सुधार योजना, दहा टक्के वाढीव जागा, विविध प्रकारचे पुरस्कार आदीपासून महाविद्यालयांना दोन वर्षे कालावधीसाठी अपात्र ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, त्यात सुधारणा करण्याची शिफारस करण्यात आली होती. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने याबाबत स्वीकारलेल्या अहवालानुसार परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून सुधारित नियमावली व कार्यपद्धती प्रसिद्ध करण्यात आली आहे.

Pune Main
Page No. 2 Aug 09, 2020
Powered by: erelego.com

सकाळ

# आता विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक नोंद

## राज्यामध्ये सप्टेंबरपासून मोहिमेस प्रारंभ होणार

**पुणे, ता. ८** : विद्यार्थी संख्येच्या आधारे शिक्षक संख्या निश्चित करता यावी, तसेच शासकीय योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना श्रेयपणे मिळावा म्हणून शिक्षण विभाग राज्यातील ७० तालुक्यांमध्ये आधार नोंदणी आणि अद्ययावत बायोमेट्रिक नोंद मोहीम सुरू करणार आहे. येत्या सप्टेंबरपासून ही मोहीम सुरू होईल.

**"** प्रत्येक विद्यार्थ्याला शैक्षणिक योजनांचा लाभ घेत यावा, तसेच राज्यभरातील विद्यार्थी संख्या निश्चित होऊन, त्यानुसार शिक्षक संख्यादेखील या आधार नोंदणीमुळे निश्चित करता येणार आहे. सुरवातीला प्रत्येक जिल्ह्याच्या दोन तालुक्यात मोहीम राबविल्यानंतर उर्वरित सर्व शाळांमध्ये हा उपक्रम राबविला जाईल.

**- दत्तात्रेय जगताप,** संचालक, प्राथमिक शिक्षण विभाग

राज्याच्या प्राथमिक शिक्षण संचालनालयाने यासाठी पुढाकार घेतला आहे. यापूर्वी शाळांमध्ये आधार नोंदणी झाली असली, तर निम्म्याहून शाळांमधील हे काम अपूर्ण आहे. त्यासाठी नव्याने मोहीम आखण्यात आली आहे. त्यासाठी राज्यातील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना त्यांच्या नियंत्रणाखालील तालुक्यातील शाळा निश्चित करण्यास सांगण्यात आले आहे.



प्राथमिक शिक्षण संचालक दत्तात्रेय जगताप यांनी याबाबत सांगितले, की पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी ही आधार नोंदणी असेल. तसेच यापूर्वी विद्यार्थ्यांचा आधार नोंदणी झाली असेल, तर त्यांच्या बोटांच्या ठशांची (बायोमेट्रिक) सुधारित नोंद करून घेतली जाणार आहे. सध्या शिक्षणाधिकारी स्तरावर शाळा निश्चित करण्यास सांगितले आहे. शाळा सुरू झाल्यावर ही मोहीम राबविणे सोपे असले, तर काही भागांत सप्टेंबरपासून ही नोंदणी सुरू होईल. सोशल डिस्टन्सिंग, सॅनिटायझर यांचा वापर आणि अन्य नियमांचे पालन करून, ही नोंदणी केली जाणार आहे. आधार नोंदणी कार्यक्रमात सातत्य राहावे, यासाठी प्रत्येक तालुक्यासाठी दोन यंत्रे दिली जाणार आहेत.

Pune, Main
09/08/2020 Page No. 1

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

लोकमत

# शिवरायांवर पदव्युत्तर पूर्णवेळ अभ्यासक्रम

### संरक्षण, सामरिक विभागाचा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याची स्थापना केली. त्यांच्या संपूर्ण जीवन चरित्रासह त्यांची युद्धपद्धती, राष्ट्रउभारणीची संकल्पना, गनिमी कावा, गडकिल्ल्यांची वैशिष्ट्ये आदी संकल्पनांचा अभ्यास करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात या वर्षापासून पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागाने हा अभ्यासक्रम तयार केला, असून 'पीजी डिल्पोमा इन छत्रपती शिवाजी महाराज अँज ए नेशन बिल्डर' असे या अभ्यासक्रमाचे नाव आहे.

शिवरायांचे जीवनचरित्र शालेय अभ्यासक्रमात आहे. चीनच्या 'सन त्झू' या सामरिक तज्ज्ञाच्या युद्धनीतीचा अभ्यास जगभर केला जातो. त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांचे उत्कृष्ट नेतृत्व, राष्ट्रनिर्माते म्हणून जगभरात अभ्यासले जातात. मात्र, संपूर्ण छत्रपती शिवाजी महाराज डोळ्यांसमोर ठेवून त्यांच्यावर पूर्णवेळ अभ्यासक्रमाची अद्यापही निर्मिती झाली नाही. यामुळे संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. विजय खरे यांनी शिवरायांच्या विविध युद्धनीती व इतर विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी एक वर्षाचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाची निर्मिती केली. 'पीजी डिल्पोमा इन छत्रपती शिवाजी महाराज अँज ए नेशन बिल्डर' असे या अभ्यासक्रमाचे नाव असणार आहे.

कोणत्याही विद्याशाखेच्या पदवीधारकाला या अभ्यासक्रमात प्रवेश घेता येणार आहे. जवळपास २० मुलांना पहिल्या वर्षी प्रवेश दिला जाणार आहे. यातील काही जागा बाहेरील देशातील विद्यार्थ्यांसाठी राखीव असणार आहेत. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने प्रवेश घेता येईल.

#### क्षेत्रभेटी, प्रकल्प असणार

शिवाजी महाराजांचा समग्र अभ्यास या नव्या अभ्यासक्रमातून होणार आहे. कुठल्याही विद्यापीठात हा अभ्यासक्रम अद्यापपर्यंत सुरु झालेला नाही. या अभ्यासक्रमाला विद्यापीठ व्यवस्थापन परिषद, विद्या परिषदेने मान्यता दिली आहे. केवळ वर्गापुरता हा विषय मर्यादित नसून क्षेत्रभेटी, प्रकल्प आदींचा या अभ्यासक्रमात समावेश असल्याची माहिती डॉ. विजय खरे यांनी दिली.

Pune Main
Page No. 2 Aug 09, 2020
Powered by: erelego.com

# कंपन्यांमध्ये प्रशिक्षणाचे बंधन

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तरतुदी टप्प्याटप्प्याने लागू करण्यास केंद्रीय शिक्षण विभागाने सुरुवात केली असून सर्व विषयांतील पदवी अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कंपन्यांमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून काम करावे लागणार आहे.

सध्या पदव्युत्तर अभ्यासक्रम किंवा पदवी स्तरावरील व्यावसायिक विद्याशाखांच्या अभ्यासक्रमांसाठीच आंतरवासिता (इंटर्न) बंधनकारक आहे. पण आता पारंपरिक विद्याशाखांसह सर्व विद्याशाखांच्या पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी आंतरवासितेची तरतूद करण्यात आली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने याबाबत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. विद्यापीठे किंवा शिक्षणसंस्थांनी उद्योग, संशोधनसंस्था यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना आंतरवासितेची संधी उपलब्ध करून द्यायची आहे. नियमित वेळापत्रकानुसार आवश्यक विषयांना धक्का न लावता एका सत्रात विद्यार्थ्यांना प्रशिक्षणार्थी म्हणून काम करण्याची संधी (पान २ वर)

लोकसत्ता Sun, 09 August 2020
https://epaper.loksatta.com/

# पदवीच्या विद्यार्थ्यांवर आता कंपन्यांमध्ये प्रशिक्षणाचे बंधन

**(पान १ वरून)** संस्थांनी उपलब्ध करून द्यायची आहे. शिक्षणसंस्थेच्या आवारात ही संधी असू नये. विद्यार्थ्यांना कंपन्या किंवा प्रयोगशाळांमध्ये काम करण्याची संधी द्यावी, असेही आयोगाने नमूद केले आहे. विद्यापीठांनी त्यांचा अभ्यासक्रम, विषय रचना यात आवश्यक बदल केल्यानंतर नव्याने प्रवेश घेणाऱ्या तुकडीपासून त्या विद्यापीठात ही नवी रचना लागू करण्यात येईल. नुकत्याच जाहीर झालेल्या शिक्षण हक्क धोरणातही पदवी स्तरापासून आंतरवासिता, संशोधन या मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे.

### आंतरवासिता कशी असेल

- सध्या पारंपरिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कला, वाणिज्य, विज्ञान या शाखांतील पदवी अभ्यासक्रमांसाठीही इंटर्नशिप असेल
- श्रेयांक पद्धतीत पदवी अभ्यासक्रमाच्या १३२ श्रेयांकापैकी २० टक्के श्रेयांक प्रशिक्षणार्थी म्हणून काम करण्यासाठी असतील
- एकूण सर्व श्रेयांकापैकी २४ श्रेयांक हे ज्या विषयातील पदवी घ्यायची त्यातील मुख्य विषयांसाठी असणे अपेक्षित आहे
- प्रशिक्षणार्थी म्हणून काम केलेले विद्यार्थी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पात्र ठरतील
- विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाची संधी मिळवून देण्यासाठी शिक्षणसंस्थांनी उद्योग संस्थांचे सहकार्य घेणे अपेक्षित आहे
- विद्यार्थी शिकत असलेले विद्यापीठ किंवा शिक्षण संस्थेच्या आवारात केलेले काम इंटर्नशिप म्हणून ग्राह्य धरण्यात येणार नाही
- संस्था शेवटचे सत्र इंटर्नशिपसाठी राखीव ठेवू शकतील
- प्रशिक्षण मंडळ (बीओएटी), कौशल्य विकास केंद्र, शासनाचा कौशल्य विकास कार्यक्रम यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिपची संधी देता येऊ शकेल.

लोकसत्ता Sun, 09 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54079239

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

प्रवेश प्रक्रियेबाबत येणार स्पष्टता : ९० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी नोंदणी

# अकरावी प्रवेशाचे सविस्तर वेळापत्रक आज प्रसिद्ध होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : इयत्ता अकरावी प्रवेशासाठी शालेय शिक्षण विभागातर्फे राबविल्या जात असलेल्या केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक




येत्या सोमवारी (दि.१०) प्रसिद्ध केले जाणार आहे. त्यामुळे प्रवेश अर्जातील पहिला भाग किती तारखेपर्यंत भरता येईल व दुसरा भाग भरण्याची प्रक्रिया केव्हा सुरु होईल, याबाबत अधिक स्पष्टता येणार आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांसह राज्यातील प्रमुख शहरांमधील अकरावी प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरातील सुमारे ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावीच्या १ लाख ६ हजार ९७२ हजार जागांसाठी आतापर्यंत ९० हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी अर्ज भरले आहेत. त्यातील ६१ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी अर्ज लॉक केले असून ५२ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांचे अर्ज तपासून झाले आहेत. विद्यार्थ्यांना २४ जुलैपासून ऑनलाइन पद्धतीने प्रवेश नोंदणीसाठी मुदत दिली होती. तसेच १ ऑगस्टपासून विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जातील पहिला भाग भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. मात्र, आणखी किती दिवस प्रवेश अर्जातील पहिला भाग भरता येईल, याबाबत विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम होता. मात्र, नुकतीच शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अकरावी प्रवेश संदर्भातील बैठक पार पडली . त्यात येत्या सोमवारी प्रवेश प्रक्रियेचे पुढील सविस्तर वेळापत्रक प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला.

### प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी गुणात्मक स्पर्धा होणार

- गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सध्या २० हजाराने वाढल्याचे दिसून येत आहे.
- मागील वर्षी सुमारे ६९ हजार विद्यार्थ्यांनी इयत्ता अकरावीमध्ये प्रवेश घेतला होता. प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे यंदा नामांकित व पसंतीच्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये मोठी गुणात्मक स्पर्धा होणार आहे.

"अकरावी प्रवेशासाठी पहिला भाग विद्यार्थ्यांना किती तारखेपर्यंत भरता येईल. प्रवेश अर्जातील दुसरा भाग भरण्यासाठी किती तारखेपर्यंत मुदत असेल. विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम कसे भरावेत, आदी संदर्भातील सविस्तर वेळापत्रक सोमवारी (दि.१०) प्रसिद्ध केले जाणार आहे.

**- मीना शेंडकर**, सचिव, अकरावी, केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया, पुणे व पिंपरी-चिंचवड

Pune Main
Page No. 2 Aug 10, 2020
Powered by: erelego.com

# नव्या आरक्षणानुसार प्रवेशप्रक्रिया अनिवार्य

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ९** - सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेशप्रक्रिया सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना शैक्षणिक प्रवेशामध्ये आरक्षण धोरणाची काटेकोटपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले आहेत. नव्या आरक्षणानुसार प्रवेशप्रक्रियेची कार्यवाही करणे शिक्षणसंस्थांना अनिवार्य असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले.

राज्य शासनाने आरक्षणानुसार प्रवेश होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शासनाच्या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी,



असे विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने सर्व महाविद्यालयांना सूचित केले आहे. मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गास (एसईबीसी) जागा आरक्षित ठेवण्याबाबत शासनाने दि. ९ जुलै २०१९ रोजी परिपत्रक काढले आहे. त्यात 'एसईबीसी' वर्गास १२ टक्के जागा आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १० टक्के जागा आरक्षित ठेवणे राज्यातील सर्व विद्यापीठातील शिक्षण संस्थांना आवश्यक आहे.

### सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे महाविद्यालयांना आदेश

या आरक्षणाच्या तरतुदीनुसार कार्यवाही होणे महत्त्वाचे आहे.

राज्य शासनाने आरक्षणासंदर्भात घेतलेल्या निर्णयशैक्षणिकसंस्थांतील प्रवेशामधील राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या अल्पसंख्याकशैक्षणिकसंस्थाखेरिज सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, विधी विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, त्यांच्या संलग्नित असणारी सर्व अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालयांना राबविणे बंधनकारक आहे.

**Prabhat 10.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

### विद्यार्थ्यांना गुणवत्तेत सुधारणा करण्याची संधी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना महामारीच्या अभूतपूर्व परिस्थितीमुळे विद्यापीठाच्या पदवी अंतिम सत्र वगळता सर्व सत्रांच्या परीक्षा रद्द करून उच्च विद्यार्थ्यांना सत्र परीक्षा व अंतर्गत गुणांच्या गणितीय सूत्राच्या आधारे निकाल देण्याचा निर्णय विद्यापीठाकडून घेण्यात आला. परंतु, त्यामुळे काही विद्यार्थ्यांकडून नाराजीचा सूर उमटल्याने विद्यापीठाने अशा विद्यार्थ्यांना गुणवत्तेत सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

गुणवत्ता सुधार करण्याची संधी दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी लेखी परीक्षेच्या विषयांमध्ये गुणवत्ता सुधारण्यासाठी हिवाळी सत्राच्या परीक्षेपूर्वी स्वतंत्ररीत्या परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना २०२० च्या परीक्षेचे अर्ज भरण्याची संधी उपलब्ध होऊ शकणार आहे. गुणवत्ता सुधारण्यासाठी ३१ जुलै २०२० पर्यंत ज्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना १६ ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करावा लागणार आहे. तर ज्या परीक्षांचे निकाल ५ ऑगस्टनंतर जाहीर करण्यात येणार आहेत, त्यांच्यासाठी निकाल जाहीर झाल्यानंतर तिसऱ्या दिवसापासून पुढील दहा दिवसांमध्ये अर्ज सादर करण्याची मुदत राहणार आहे. दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी २०२० च्या परीक्षेचे अर्ज भरलेले आहेत व विद्यार्थ्यांच्या ज्या विषयांना गणितीय सूत्राचा वापर करून गुण प्रदान करण्यात आलेले आहेत, त्याच विषयांना गुणवत्ता सुधारण्याची संधी मिळणार आहे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी या नियोजित परीक्षेचे कोणतेही शुल्क आकारले जाणार नसल्याचे डॉ. काकडे यांनी स्पष्ट केले आहे. उन्हाळी २०२० परीक्षेसाठी पहिल्यांदाच अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुणदान गणितीय सुत्रानुसार केले, केवळ अशाच विद्यार्थ्यांना कमीत कमी एक व जास्तीत जास्त सर्व लेखी परीक्षेच्या विषयांसाठी गुणवत्ता सुधारण्यासाठी अर्ज करता येणार असल्याचे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**Pudhari: 10.8.2020**

**नवराष्ट्र**

### ऑनलाईन शिक्षण किती योग्य?

**ऑनलाईन** शिक्षणासाठी आवश्यक असलेले लॅपटॉप, फोन यासाठी हायस्पीड इंटरनेटची गरज असते. काही पालकांना ते परवडते; पण सरकारी शाळेमध्ये शिकणारा विद्यार्थी हा सामान्य कुटुंबातील असतो, लॅपटॉप, स्मार्टफोन यासारख्या गोष्टी त्यांना शक्य होत नाहीत. त्यांची बाजू सुद्धा समजून घेणे तितकेच महत्त्वाचे आहे. भारतात जवळजवळ 71 टक्के कुटुंब 2 किंवा एका खोलीमध्ये राहतात. त्यांना प्रायव्हसी नाही.अशा काळात ती मुले ऑनलाईन शिक्षण पद्धतीस योग्य राहतील का? कारण, यामध्ये शांतता खूप गरजेची आहे. त्यामुळे ही लादली जात आहे. याच्या वापराने मुलांची शारीरिक हालचाल होत नाही. परिणामी मान आखडणे, कंबर दुखणे, डोळ्यांचे विकार शिवाय जेवून एकाच ठिकाणी बसल्यामुळे खाल्लेले पूर्णपणे पचतसुद्धा नाही. त्यामुळे पित्ताचे प्रमाण वाढलेले दिसत आहे. खासगी शाळा तर फीसाठी मागणी करू लागल्या आहेत. आता या पद्धतीत असा कितीसा खर्च येत असेल? मुलांना समजू अगर नाही त्यांना त्यांचा पगार महत्त्वाचा आहे. शिक्षण क्षेत्रातील एका तज्ज्ञांनी भाष्य केले आहे. ते म्हणाले, हे वर्षच ड्रॉप करायला पाहिजे. माझ्या मैत्रिणीची मुलगी आता तिसरी इयत्तेमध्ये शिकत आहे. तिला याबाबतीत विचारण्यात आल्यावर ती म्हणाली, यावर्षी मी मुलगीला शाळेतच पाठवणार नाही. असा किती तोटा होणार आहे. त्यापेक्षा यावेळी स्विमिंग, डान्स सारखे क्लास लावणार. पुढच्या वर्षी शाळेत पाठवणार. असा विचारसुद्धा पालक करू लागले आहेत आणि इतकीच सरकारला काळजी आहे तर पुस्तके विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवायची व्यवस्था करा. मुलांना जास्तीत जास्त पुस्तकांचे वाचन करायला सांगा. शिकवण्याचे विषय इंग्लिश, गणित हे आहेत. बाकीचे विषय मुले स्वतः अभ्यास करू शकतात. फार फार तर आठ दिवसांतून एक, दोन दिवस ऑनलाईन शिकवू शकता.मुलांनी मोबाईल घेतल्यावर त्यांचे पालक लेक्चर संपेपर्यंत मुलांजवळ नाही बसू शकत. परिणामी मुले वेगवेगळे व्हीडिओ सर्च करताना दिसतात. लहान मुले कार्टून वगैरे सर्च करतात. महाराष्ट्रामध्ये दरवर्षी 15 ते 20 जूनपर्यंत शाळा सुरू होत असतात. आतासा कुठे महिना झाला आहे . मग इतकी घाई कशाला? आणि हे सगळे काही पालकांनाही पटत आहे; पण या स्पर्धेच्या युगात फक्त माझाच मुलगा, मुलगी मागे पडू नये अशा विचाराने नाईलाजास्तव या ऑनलाईन शिक्षणाला मान्य करून पालक मुलांना सुविधा उपलब्ध करून देत आहेत.




कोरोना वैश्विक महामारीमुळे सर्वत्र लॉकडाऊन केले गेले. गर्दी टाळण्यासाठी शाळा, महाविद्यालये बंद ठेवली आहेत. मात्र, विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा मार्ग शासनाने काढला आहे; पण ही शिक्षणपद्धती खरेच योग्य आहे का? हा मोठा प्रश्न आहे. वैद्यकीय शिक्षण घेत असलेले किंवा उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये, यासाठी त्यांना ही पद्धती गरजेची हे एकवेळ मान्य आहे; पण प्राथमिक, माध्यमिक स्तरावरील मुलांना ऑनलाईन शिकवताना शिक्षकांना तर त्रास होतोच आहे. शिवाय मुलांनी मोबाईल नीट धरला आहे का? रेंज आहे का? शिक्षकांनी सांगितल्याप्रमाणे आपल्या पाल्याने नीट लिहून घेतले आहे का? या बारीकसारीक गोष्टीकडे लक्ष देताना खरी कसरत पालकांची होत आहे. प्रत्यक्ष शिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण यामध्ये जमीन आस्मानचा फरक आहे.

Pune Edition
10 August 2020 Page No. 6
epaper.navarashtra.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

### विद्यापीठाकडून संधी गुणवत्ता सुधारण्याची

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष व्यतिरिक्त इतर वर्षातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेत सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करून दिली असून, निकालाच्या गुणवत्तेवर समाधानी नसणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेच्या माध्यमातून श्रेणी सुधारण्याची संधी मिळेल. यासाठीची प्रक्रिया निकाल जाहीर झाल्यानंतरच्या तीन दिवसांनी ऑनलाइन पद्धतीने सुरू होईल. दरम्यान, राज्य सरकारच्या निर्णयाची अंमलबजावणी करणारे पुणे विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.

करोनाच्या अभूतपूर्व परिस्थितीमुळे विद्यापीठाच्या पदवी अंतिमपूर्व परीक्षा रद्द करून उच्चशिक्षण विभागाच्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांना गेल्या सत्र परीक्षेचे गुण व अंतर्गत गुणांच्या गणितीय सूत्राच्या आधारे निकाल देण्याचा निर्णय विद्यापीठाकडून घेण्यात आला होता. मात्र, याबाबत काही विद्यार्थ्यांकडून नाराजीचा सूर उमटल्याने विद्यापीठाने, अशा विद्यार्थ्यांना गुणवत्तेत सुधारणा करण्याची संधी उपलब्ध दिली आहे.

विद्यापीठाच्या शैक्षणिक वेळापत्रकाचे नियोजन, परीक्षांचे आयोजन व निकाल जाहीर करण्यासंदर्भात राज्य सरकारच्या उच्चशिक्षण विभागाच्या सूचनेनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून प्रथम वर्ष ते अंतिमपूर्व परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात येत आहेत; परंतु विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार जुलै २०२० परीक्षेच्या निकालानंतरही ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याची इच्छा आहे, अशा विद्यार्थ्यांना पुढील सत्रात गुणवत्ता सुधार करण्याची संधी देण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांसाठी लेखी परीक्षेच्या विषयांमध्ये गुणवत्ता सुधारण्यासाठी स्वतंत्ररीत्या हिवाळी सत्राच्या परीक्षेपूर्वी परीक्षा आयोजित करण्यात येणार आहे. त्यामुळे या परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना २०२० च्या परीक्षेचे अर्ज भरण्याची संधी उपलब्ध होऊ शकणार आहे. गुणवत्ता सुधारण्याठी ३१ जुलै २०२० पर्यंत ज्या परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत, अशा विद्यार्थ्यांना १६ ऑगस्टपर्यंत अर्ज सादर करावा लागणार आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल ५ ऑगस्टनंतर जाहीर करण्यात येणार आहेत, त्यांच्यासाठी निकाल जाहीर झाल्यानंतर तिसऱ्या दिवसापासून पुढील दहा दिवसांमध्ये अर्ज सादर करण्याची मुदत राहणार आहे. दरम्यान, ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळीच्या परीक्षेचे अर्ज भरलेले आहेत; तसेच विद्यार्थ्यांच्या ज्या विषयांना गणितीय सूत्राचा वापर करून गुण प्रदान करण्यात आले आहेत, त्याच विषयांना गुणवत्ता सुधारण्याची संधी मिळणार आहे. यासोबतच विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता सुधारण्यासाठी नियोजित परीक्षेचे कोणतेही शुल्क आकारले जाणार नसल्याचेही परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे डॉ. महेश काकडे यांनी स्पष्ट केले आहे. उन्हाळी २०२० परीक्षेसाठी पहिल्यांदाच अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुणदान गणितीय सूत्रानुसार करण्यात आलेले आहे, केवळ अशाच विद्यार्थ्यांना कमीत कमी एक व जास्तीत जास्त सर्व लेखी परीक्षेच्या विषयांसाठी गुणवत्ता सुधारण्यासाठी अर्ज करता येणार असल्याचे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

> राज्य सरकारच्या निर्णयाप्रमाणे विद्यार्थ्यांना, त्यांची गुणवत्ता सुधारण्याची संधी दिली आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर या संधीचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. राज्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्वांत प्रथम विद्यार्थ्यांना संधी दिली आहे.
> – डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ



**Maharashtra Times: 10.8.2020**

### वाढीव शुल्कप्रकरणी चौकशी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित ६६८ कॉलेजांनी खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील ५ लाख विद्यार्थ्यांकडून २०११-१२ ते २०१९-२० या कालावधीत वाढीव शुल्क वसूल केल्याची तक्रार करण्यात आली आहे. कॉलेजांमधील अभ्यासक्रमांना प्रवेश घेताना १७ फेब्रुवारी २०११ च्या परिपत्रकानुसार शुल्क आकारणे बंधनकारक असताना वाढीव शुल्क वसूल केले आहे, अशी तक्रार आहे. या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून वस्तुस्थितीदर्शक अहवाल संचालनालयास सादर करण्याचे आदेश उच्चशिक्षण संचालनालयाचे प्रशासन अधिकारी सुयश दूसाने यांनी विद्यापीठाच्या कुलसचिवांना दिले आहेत. सुराज्य संघटनेचे अमर एकाड यांनी याबाबत कडक कार्यवाही करण्याची मागणी केली होती.

**Maharashtra Times: 10.8.2020**

लोकमत

### अकरावीचे प्रत्यक्ष प्रवेश उद्यापासून

#### अर्जाचा भाग १, २ भरता येणार : पसंतीक्रमही असणार

लोकमत न्युज नेटवर्क

**पुणे :** इयत्ता अकरावी प्रवेशाची शून्य फेरी उद्या (दि. १२) पासून सुरु होत आहे. या फेरीमध्ये विद्यार्थ्यांना व्यवस्थापन, इन हाउस आणि अल्पसंख्याक संस्थेतील कोट्यांतर्गत प्रवेश घेता येतील. तसेच, प्रवेश अर्जाचा भाग एक व दोनही भरता येणार असून पहिल्या नियमित फेरीसाठी पसंतीक्रम भरता येतील. पहिली नियमित फेरी २३ ऑगस्टपासून सुरु होईल.

शिक्षण विभागाकडून पुण्यासह पिंपरी-चिंचवड, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर महापालिका क्षेत्रासाठी ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविली जात आहे. सध्या प्रवेश अर्जाचा भाग एक भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. आता १२ ऑगस्टपासून अर्जाचा भाग दोन भरता येणार आहे. या भागामध्ये महाविद्यालयनिहाय पसंतीक्रम भरावे लागणार आहेत. प्रवेशाची शून्य फेरीही उद्यापासून सुरु होईल. यामध्ये विविध कोट्यातील प्रवेश व रिक्त जागा समर्पित करता येतील. दि. २२ ऑगस्ट पर्यंत ही फेरी सुरु राहील. या कालावधीत अर्जाचा भाग एकही भरता येणार आहे.

प्रवेशाची पहिली नियमित फेरी २३ ऑगस्टपासून सुरु होईल. या दिवशी पात्र विद्यार्थ्यांची तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल. विद्यार्थ्यांना त्यावर २५ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन हरकती घेता येणार आहेत. त्यानंतर ३० ऑगस्टला पहिल्या फेरीसाठी महाविद्यालयनिहाय प्रवेश यादी व कट ऑफ प्रसिद्ध केली जाणार आहे. महाविद्यालयात प्रवेशासाठी ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर ही मुदत असेल. या कालावधीत संबंधित महाविद्यालयातील प्रवेश ऑनलाइन पद्धतीने निश्चित करावा लागेल. तसेच प्रवेश नाकारणे किंवा रद्दही करता येणार आहे. महाविद्यालयांना 3 सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजेपर्यंत प्रवेश निश्चित केलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रसिद्ध करावी लागेल, अशी माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

#### नियमित फेरीसाठी सूचना

- पहिला पसंतीक्रम दिलेल्या विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयात प्रवेश बंधनकारक असेल; अन्यथा त्यांना पुढील नियमित फेऱ्यांमध्ये सहभागी होता येणार नाही. विशेष फेऱ्यांमध्ये त्यांचा विचार केला जाईल.
- पहिल्या फेरीत प्रवेश निश्चित झाल्यानंतर रद्द केल्यास या विद्यार्थ्यांनाही थेट विशेष फेरीत संधी दिली जाईल.
- या फेरीत प्रवेश निश्चित केल्यानंतर पुढील फेरीत सहभागी होता येणार नाही.

#### प्रवेशाचे वेळापत्रक

**१२ ते २२ ऑगस्ट :** अर्जाचा भाग १ व २ भरणे. शून्य फेरीअंतर्गत कोटा प्रवेश

**२३ ते २५ ऑगस्ट :** पहिली नियमित फेरी.

तात्पुरती गुणवत्ता यादी, त्यावर हरकती.



**30 ऑगस्ट :** पहिली प्रवेश यादी.

**३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर :** ऑनलाइन प्रवेशनिश्चिती. प्रवेश रद्द करणे, नाकारणे.

Pune Main
Page No. 2 Aug 11, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

### यूजीसीची कडक भूमिका : विद्यार्थ्यांनी अभ्यास सुरु ठेवावा

# परीक्षा होऊ दिल्या नाहीत तर पदवीही मिळणार नाही

*तुषार मेहता म्हणाले की, सुयोग्य पद्धतीने परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या ज्ञानाचे मूल्यमापन केल्याशिवाय त्यांना पदवी दिली जाऊ शकत नाही, असा कायदा आहे. त्यामुळे परीक्षा झाली नाही, तर पदवीही मिळणार नाही, हे लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी अभ्यास सुरु ठेवावा.*

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली** : पदवी अभ्यासक्रमांच्या अंतिम परीक्षा सर्व विद्यापीठांनी ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण कराव्यात, असा आग्रह धरणाऱ्या विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) परीक्षा दिल्याशिवाय विद्यार्थ्यांना पदवी मिळणार नाही, अशी आणखी कडक भूमिका सोमवारी सर्वोच्च न्यायालयात घेतली.

'यूजीसी'च्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, कायद्यानुसार विद्यार्थ्यांना पदवी देण्याचा व त्यासाठी कशी व कधी परीक्षा घ्यायची हे ठरविण्याचा अधिकार फक्त आयोगास आहे. राज्य सरकारे विद्यापीठांना परस्पर 'परीक्षा घेऊ नका' असे सांगू शकत नाहीत.

अंतिम पदवी परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत घेण्याच्या 'यूजीसी'च्या ६ जुलैच्या निदेशांच्या विरोधात दोन याचिका सर्वोच्च न्यायालयात आहे. यापैकी एक याचिका महाराष्ट्रातील मंत्री व युवासेनेचे अध्यक्ष आदित्य ठाकरे यांनी, तर दुसरी देशभरातील १३ विविध विद्यापीठांमध्ये शिकणाऱ्या ३१ विद्यार्थ्यांनी केली आहे. कोरोना साथीचा जोर अद्याप कायम असल्याने तशात परीक्षा घेणे विद्यार्थ्यांच्या आरोग्यास धोकादायक आहे. त्यामुळे अंतिम परीक्षा न घेता आधीच्या वर्षातील कामगिरीच्या आधारे पदवी दिली जावी, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. यावर 'यूजीसी'ने आपल्या निर्णयाचे ठाम समर्थन करणारे प्रतिज्ञापत्र केले. विद्यापीठांना परीक्षा न घेण्याचे आदेश देणाऱ्या महाराष्ट्र व दिल्ली या राज्य सरकारांनीही त्यांची प्रतिज्ञापत्रे केली.

न्या. अशोक भूषण, न्या. एस. सुभाष रेड्डी व न्या. एम. आर. शहा यांच्या खंडपीठापुढे या याचिका सुनावणीस आल्या तेव्हा राज्यांच्या प्रतिज्ञापत्रांना उत्तर देण्यास 'यूजीसी'तर्फे मेहता यांनी वेळ मागितला. तसा वेळ देऊन पुढील सुनावणी शुक्रवारी १४ ऑगस्ट रोजी ठेवली. हे प्रतिज्ञापत्र करताना आपत्ती निवारण कायदा 'यूजीसी'च्या निर्देशांहून वरचढ ठरू शकतो का, याचे उत्तर द्यावे, असे खंडपीठाने मेहता यांना सांगितले.

### महाराष्ट्र व दिल्ली सरकारचे म्हणणे काय?



महाराष्ट्र सरकारने म्हटले की, 'यूजीसी'ने हे निर्देश देण्याआधीच आम्ही विद्यापीठांना परीक्षा न घेण्याचे कळविले होते.

या निर्देशांनंतर राज्याच्या आपत्ती निवारण प्राधिकरणाने राज्यातील कोरोना स्थितीच्या अनुषंगाने १३ जुलै रोजी पुन्हा आढावा घेतला.

सर्वच विद्यापीठांच्या कुलगुरुंनी परीक्षा घेणे शक्य नसल्याचे कळविल्याने परीक्षा न घेण्याचा आधीचा निर्णय कायम ठेवण्याचे ठरविण्यात आले.

दिल्ली सरकारने कोरोना साथीसोबतच असे कारण दिले की, डिजिटल साधनांच्या बाबतीत विद्यार्थ्यांमध्ये मोठी विषमता असल्याने परीक्षा घेणे अन्यायाचे होईल.

Pune Main
Page No. 12 Aug 11, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

### पोखरीयाल यांचे स्पष्टीकरण : शैक्षणिक संस्थांना गुणवत्तावाढीची सक्ती

# नॅकच्या मूल्यांकनानंतरच महाविद्यालयांना स्वायत्तता

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली** : नव्या शैक्षणिक धोरणात सरसकट एका निर्णयाने शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता दिली जाणार नाही. टप्प्याटप्प्याने गुणवत्ता विकसन व त्यानंतर स्वायत्तता ही संकल्पना धोरणात आहे. त्यामुळे शैक्षणिक संस्थांनी गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करावेत, स्वायत्ततेसाठी नाही, अशा शब्दात केंद्रीय शिक्षणमंत्री रमेश पोखरीयाल निशंक यांनी धोरणनिर्मितीची भूमिका मांडली.

देशात ३५ हजार महाविद्यालयांपैकी ८ हजार स्वायत्त आहेत. प्रत्येक महाविद्यालय, शैक्षणिक संस्था (इज्युकेशनल इन्स्टिट्युटशन) गुणवत्ता वाढवून नॅकच्या स्पर्धेत उतरल्यावरच



टप्प्याटप्प्याने स्वायत्तता मिळेल, असेही निशंक यांनी स्पष्ट केले. नव्या शैक्षणिक धोरणावर आयोजित वेबिनारमध्ये पहिल्यांदा पोखरीयाल यांनी जाहीर संवाद साधला. नॅक मूल्यांकनासाठी आवश्यक सारे बदल महाविद्यालयांना करावेच लागतील, यावरच पोखरीयाल यांनी शिक्कामोर्तब केले.

### काय म्हणाले पोखरीयाल?

- मुलांना मार्कांच्या रेसमध्ये गुंतवायचे नाही. आता रिपोर्ट कार्ड नव्हे तर प्रोग्रेस कार्ड असेल. विद्यार्थ्यांनाच स्वत:चे मूल्यांकन करता येईल. त्याचे शिक्षक, सोबत शिकणाऱ्यांचाही समावेश असेल.
- विद्यार्थी सुरक्षेला सर्वाधिक प्राधान्य असल्याने अद्याप शाळा उघडण्याचा निर्णय झाला नाही. सध्यातरी केवळ सुरक्षेची चाचपणी केली जात आहे. नजीकच्या काळात त्यासंदर्भात निर्णय होईल.
- संशोधनात आपण जगात मागे असल्याने राष्ट्रीय संशोधन परिषदेचा प्रस्ताव. १३७ जागतिक विद्यापीठांशी त्यामुळे संपर्क वाढेल. केवळ परदेशी ज्ञान भारतात आणून भागणार नाही, आपले ज्ञानदेखील जगात विस्तारले पाहिजे. आयआयटीमध्ये संशोधन, अभ्यासोबतच प्रत्यक्ष अनुभवासाठी अनेक मोठे बदल करण्यात आले. विज्ञान शाखाविस्तारासाठी त्याचा लाभ होईल.

पोखरीयाल म्हणाले, मातृभाषेतून शिक्षण म्हणजे इंग्रजीला किंवा कोणत्याही विदेशी भाषेला विरोध असे नाही. कोणत्याही विषयाचे आकलन मातृभाषेत सहजपणे होते. मातृभाषेचा आग्रह धरताना आम्ही देशभरातून तज्ज्ञांचे मत जाणून घेतले. ९९ टक्के लोकांनी या निर्णयाचे समर्थन केले. कोणताही विकसित देश घ्या, तेथे मातृभाषेतून शिक्षण घेवून लोकांचा विकास झाला. इंग्रजीकडे केवळ एक विषय (भाषा) म्हणूनच बघितले पाहिजे.

गुणवत्ता उत्तम असलेली जागतिक विद्यापीठच भारतात येतील. जगात शिकायला गेलेले भारतीय विद्यार्थी मायदेशी परतण्याचे प्रमाण कमी. एक ते दीड लाख कोटी रुपये परदेशी शिक्षणावर दरवर्षी खर्च होतो. पैसा व प्रतिभा दोन्हींची गुंतवणूक देशाबाहेर. उत्तम गुणवत्ता असलेले शिक्षण भारतातच मिळेल, याची ग्वाही विद्यार्थ्यांना दिली पाहिजे. परदेशी विद्यापीठ आपल्या अटींवर भारतात येतील. अभ्यासक्रम, शिक्षणपद्धती, शिक्षक भारताच्या गरजेनुसार असतील, परदेशी विद्यापीठांच्या नव्हे.

Pune Main
Page No. 6 Aug 11, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

# कोविड आणि परीक्षा विवाद

**पदवीधर** व पदव्युत्तर विद्यार्थ्यांची परीक्षा पद्धत आणि मूल्यांकनाविषयी केंद्र व राज्य सरकार यांच्यात वाद निर्माण झाला आहे. विद्यापीठे व महाविद्यालयांच्या परिसरातील लेखी परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना श्रेणी द्यावी की गेल्या वर्षाच्या/सत्राच्या सरासरीच्या आधारे विद्यार्थ्यांचे मूल्यांकन व श्रेणीबद्ध करणे हा वादाचा विषय झाला आहे. केंद्र सरकारने सक्तीचा सल्ला दिला की, पुरेशा आरोग्य संरक्षणासह कॅम्पस परीक्षा राज्य सरकारने घ्यावी. परंतु, महाराष्ट्रासह काही राज्यांना वाटते की, कॅम्पसमध्ये परीक्षा घेण्यात तरुणांमध्ये कोविड पसरण्याचा धोका आहे. त्यांनी प्रा. कुहाड समितीच्या शिफारशीस अनुकूलता दर्शविली. ती अशी की, पुढील वर्ष/सत्रामध्ये बढतीसाठी व अंतिम वर्षाची पदवी बहाल करण्यासाठी गत वर्षाच्या वा सत्राच्या कामगिरीच्या आधारावर गुण द्यावेत. शिवाय गुणपत्रिकेत सुधारणा करण्यासाठी यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील वाटचालीच्या (कारकीर्द) नियोजनासाठी मुक्त केले जाईल. त्यावर राज्यांनी असा युक्तिवाद केला की, कोविडच्या घटना सर्वाधिक घडत असल्याने केंद्र सरकारने सुचविलेली ऑनलाईन व कॅम्पस परीक्षा घेणे, दोन्हीही महाराष्ट्रात गैरसोईच्या आहेत. राज्यांना असेही वाटते की, कॅम्पस परीक्षेत अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांची खरी गुणवत्ता प्रतिबिंबित होऊ शकणार नाही. या लेखात दोन्ही बाजूंचे युक्तिवाद तपासून मत व्यक्त केले आहे.





**प्रा. डॉ. सुखदेव थोरात**
माजी अध्यक्ष
विद्यापीठ अनुदान आयोग

**ऑनलाईन व कॅम्पस परीक्षा :** 'यूजीसी'ने निवडलेल्या आधारावर शिफारस केलेली सार्वत्रिक ऑनलाईन परीक्षा इंटरनेट कनेक्टिव्हिटीच्या कमी उपलब्धतेमुळे अनेक विद्यार्थी व शिक्षकांचे राज्यात समर्थन असलेले चित्र कठीण आहे. २०१८-१९ मधील एनएसएसओच्या सर्वेक्षणानुसार, ४२ टक्के शहरी कुटुंबात, तर केवळ १५ टक्केच ग्रामीण कुटुंबात इंटरनेट उपलब्ध आहे. म्हणून सार्वत्रिक ऑनलाईन परीक्षा हा उपाय नाही. मुंबई विद्यापीठातील प्राध्यापक संघटनेने केलेल्या सर्वेक्षणात विद्यार्थ्यांसाठी इंटरनेटचे अपुरे कनेक्शन्स असल्याचे आढळले. सर्वेक्षणात असे आढळले की, बरेच इंटरनेट डिस्कनेक्ट केले होते आणि काहींनी तर आर्थिक परिस्थितीमुळे मोबाईल विकलासुद्धा होता.

दुसरा पर्याय म्हणजेच विद्यार्थ्यांची उपस्थिती असलेल्या कॅम्पसमध्ये परीक्षा घेणेसुद्धा सुरक्षित होईल. असा युक्तिवाद केला जात आहे की, कॅम्पसमधील परीक्षा विद्यार्थी व शिक्षकांसाठीही दुःस्वप्नच असेल. देशातील विविध भागांतील लाखो विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील शहरांत आमंत्रित करणे म्हणजे विद्यापीठ व महाविद्यालये यांना कोविडचे केंद्र बनविणे होईल. शिवाय विद्यार्थी महाराष्ट्रात जाण्यासाठी इतर राज्यांमधून प्रवास करतात. ते मुख्यत: रेल्वेने प्रवास करतात. त्यामुळे त्यांना कोविडची लागण होणार नाही, याची शाश्वती नाही. परीक्षाकाळात परिसरातील संस्थेत त्यांचे राहणे धोकादायक असेल. 'यूजीसी'ने सुचविलेले निर्देश खबरदाऱ्या घेतल्यानंतरही परीक्षा हॉलमध्ये अधिक धोका आहे. या स्थितीत परीक्षा घेणे चांगले नाही. विद्यार्थ्यांना एकत्र आणण्याचे नुकसान परीक्षेतील लाभांपेक्षा अधिक असू शकते.

**खरी परीक्षा नाही :** ही असाधारण स्थितीसुद्धा गुणांच्या बाबतीत विद्यार्थ्यांची कामगिरी सुधारू शकणार नाही. या स्थितीतील परीक्षांचे परिणाम खरी गुणवत्ता प्रतिबिंबित करणार नाहीत. दिल्ली विद्यापीठासारख्या ऑनलाईन शिकविणाऱ्या काही विद्यापीठांमध्ये अनेक अडचणींमुळे उपस्थिती ५० टक्के होती. बरेच विद्यार्थी आता वसतिगृहात वा भाड्याने घेतलेल्या खोल्यांमध्ये आवश्यक पुस्तके व वाचनसामग्रीशिवाय त्यांच्या गावी राहतात म्हणून त्यांच्याकडे योग्य वाचनसामग्रीची कमतरता आहे. ते परीक्षेसाठी कसे तयार असतील? घरी अनुकूल वातावरणाचा अभाव आहे. काही कुटुंबे आजाराने किंवा आर्थिक आपत्कालीन परिस्थितीशी झुंज देत आहेत. नोकरी गमावणाऱ्यांवर सर्वांत जास्त वाईट परिणाम होत आहेत, ज्यात तात्पुरती मजुरी मिळणारे, करार नसलेले कामगार व छोट्या व्यावसायिकांचा समावेश आहे. राज्यात २०१७-१८ मध्ये अंदाजे एकूण पदवीधर व पदव्युत्तर विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४१ टक्के विद्यार्थी या तीन गटातील आहेत. यात सर्वाधिक प्रमाण अनुसूचित जमातीतील (६१ टक्के) विद्यार्थ्यांचे, अनुसूचित जाती (५५ टक्के), ओबीसी (४५ टक्के) व इतरांचे ३० टक्के आहे. त्यांच्या पालकांना जगण्याची तजवीज करण्यासाठी प्रचंड ताण येत आहे. संपूर्णत: विस्थापित झालेल्या स्थलांतरितांच्या विद्यार्थ्यांची परिस्थिती वाईट आहे. ते परीक्षेस परत येऊ शकणार नाहीत म्हणून या परिस्थितीत परीक्षा घेणे या वर्गाकरिता अन्यायकारक असेल. अशा विद्यार्थ्यांवर ते परीक्षा समाधानकारकपणे देण्याच्या स्थितीत नसल्याने त्यांच्यावर परिणाम होईल. ही परीक्षा योग्य गुणवत्तेची असेल याची शाश्वती नाही.

**योग्य उपाय :** कुहाड समितीने सुचविलेला योग्य पर्यायी दृष्टिकोन राज्य सरकारने स्वीकारला आहे, म्हणजे अंतिम वर्षाच्या तसेच इतर विद्यार्थ्यांना गत सत्रातील कामगिरीच्या सरासरीच्या आधारावर श्रेणी दिली जाईल. त्यांना मिळणाऱ्या गुणांमुळे, अशा भीतीग्रस्त वातावरणाने त्यांना परीक्षा देण्यास भाग पाडल्या जाणाऱ्या श्रेणीपेक्षा यथार्थवादी व उत्तम गुणवत्तेचे सूचक असेल. पदवीनंतर ज्यांना त्यांची शैक्षणिक विश्वासार्हता वाढविण्याची इच्छा आहे, त्यांना लवकर विशेष परीक्षेसाठी बदल प्रदान केला जाईल, जे की कुहाड समितीच्या अहवालानुसार सूचित केले आहे. हा एक उत्तम व निश्चित व्यवहार्य उपाय आहे, जो विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे जीवन धोक्यात न आणता, त्यांच्या गुणवत्तेची कमतरता न दाखविता विद्यार्थ्यांना न्याय देईल. केंद्र सरकारसाठी सर्वांत चांगला मार्ग म्हणजे राज्यांशी चर्चा करणे व सर्वसाधारण दृष्टिकोनातून निर्णय घेणे आणि निर्णय न लादणे. सर्व उच्च शिक्षण केंद्र व राज्यांच्या संयुक्त जबाबदारीसह समवर्ती यादीत आहे.

Pune Main
Page No. 4 Aug 11, 2020
Powered by: erelego.com

# परीक्षा रद्द करण्याचा अधिकार राज्यांना नाही!

## 'यूजीसी'चा युक्तिवाद; सुनावणी १४ ऑगस्टला

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



- सर्व विद्यापीठांनी ३० सप्टेंबरपर्यंत अंतिम वर्षाच्या परीक्षा पूर्ण करण्याची सूचना विद्यापीठ अनुदान आयोगाने ६ जुलै रोजी केली होती.
- महाराष्ट्र व दिल्लीसह अनेक राज्यांनी परीक्षा घेण्यासंदर्भात असमर्थता व्यक्त केली आहे.

**नवी दिल्ली :** अंतिम वर्षांच्या परीक्षा रद्द करण्याचा अधिकार राज्य सरकारांना नाही. पदवी देण्याचा अधिकार फक्त विद्यापीठ अनुदान आयोगाला असताना राज्ये परीक्षा रद्द कशी करू शकतात, असा सवाल महाधिवक्ता तुषार मेहता यांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयात केला.

कुठलीही पदवी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दिली जात असेल आणि आयोगाने परीक्षा घेण्याचा आदेश दिला असेल तर, परीक्षा रद्द करण्याचा निर्णय आयोगाच्या आदेशाविरोधात जाणारा ठरतो. परीक्षा झाली नाही तर पदवीही मिळणार नाही, असा कायदाच आहे, असा युक्तिवाद मेहता यांनी केला. त्यावर आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत विद्यापीठ अनुदान आयोगाचा आदेश रद्दबातल करता येतो का, याचे स्पष्टीकरण देण्याचे निर्देश न्या. अशोक भूषण, न्या. आर. सुभाष रेड्डी आणि न्या. एम. आर. शहा यांच्या पीठाने मेहता यांना दिले.

महाराष्ट्र आणि दिल्ली सरकारने सर्वोच्च न्यायालयात निवेदन सादर केले असून करोनामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे शक्य नसल्याची माहिती न्यायालयाला दिली आहे. याआधीच्या सुनावणीत महाराष्ट्राने राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने विविध कुलगुरूंशी चर्चा केल्यानंतर परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याचे निवेदन दिले होते. ११ जुलै रोजी ऑनलाइन व ऑफलाइन लेखी परीक्षा रद्द करण्याचा निर्णय राज्य सरकारने विद्यापीठांना कळवण्यात आला असल्याचे दिल्ली सरकारच्या वतीने न्यायालयात सांगण्यात आले. उत्तर देण्यासाठी आयोगाने वेळ मागून घेतला आहे. पुढील सुनावणी १४ ऑगस्ट रोजी होणार आहे.

लोकसत्ता Tue, 11 August 2020
https://epaper.loksatta.com/

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचा निर्णय कॉलेजच्या कोर्टात

### ७५ टक्के उपस्थितीची अट शिथिल करण्याचा अधिकार कॉलेजना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

शासन निर्णयानुसार परीक्षेला बसण्यासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये ७५ टक्के उपस्थिती बंधनकारक आहे. परंतु कोरोनाच्या पाश्र्वभूमीवर यंदा शाळा बंद शिक्षण सुरू असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या ७५ टक्के उपस्थितीबाबतचा निर्णय पहिल्या सत्रासाठी शिथील करावा. याचे अधिकार महाविद्यालयीन स्तरावर तसेच विद्यापीठाच्या विभागप्रमुखांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिले आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाने कोरोना विषाणूच्या प्रादूर्भावामुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेऊन शिकवण्याच्या प्रक्रियेची पद्धत, शैक्षणिक वर्षाचे नियोजन, परीक्षेची पद्धत, सामान्य मार्गदर्शक तत्वे याबाबत सूचना दिलेल्या आहेत. या मार्गदर्शक सूचनांनुसार २५ टक्के अभ्यासक्रम ऑनलाईनव्दारे तर ७५ टक्के अभ्यासक्रम फेस टू फेस पूर्ण करणे अपेक्षित आहे. परंतु कोरोनाच्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे सामाजिक अंतर, विद्यार्थ्यांची सुरक्षा, व आरोग्य विचारात घेऊन अद्यापही ऑफलाईन शिक्षण सुरू करता येत नाही. तसेच ते कधी सुरू होईल याबद्दल अनिश्चितता आहे. त्यामुळेच विद्यापीठ विभाग आणि सलंग्न महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन शिक्षण सुरू करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. मात्र विद्यार्थ्यांची भौगोलिक परिस्थिती विचारात घेता एकाचवेळी सर्व विद्यार्थ्यांना परिपूर्ण साधने उपलब्ध होत नसल्याने सर्व तासिकांना ऑनलाईन उपस्थित राहून ऑनलाईन शिक्षण घेता येत नाही.

शासनाने विद्यार्थ्यांच्या किमान उपस्थितीबाबतची टक्केवारी लक्षात घेता टाळेबंदीचा कालावधी विद्यार्थ्यांचा उपस्थिती कालावधी म्हणून ग्राह्य धरण्यात यावा, अशा सूचना यापूर्वीच दिल्या आहेत. त्यामुळे सद्यपरिस्थिती विचारात घेता विद्यापीठ अध्यादेश क्र.६८ मधील तरतुदीनुसार किमान ७५ टक्के आवश्यक असलेल्या उपस्थितीबाबतची अट शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील पहिल्या सत्रात शिथिल करण्याबाबत विद्यापीठातील विभागांचे विभागप्रमुख, संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्था यांनी त्यांच्या स्तरावर घ्यावा, असे आदेश विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाच्या उपकुलसचिवांनी दिले आहेत.

**Pudhari:12.8.2020**

# विद्यापीठामध्ये प्रवेशाची चुरस

### लॉकडाउन असतानाही २७ हजार विद्यार्थ्यांचे अर्ज

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये प्रवेश घेण्यासाठी लॉकडाउनमध्येही विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला असून, पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एकूण २७ हजार ७८७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेशक्षमता ही पाच हजार ६५३ आहे. लॉकडाउनमुळे कमी प्रमाणात विद्यार्थी अर्ज करतील, अशी शक्यता वर्तविण्यात येत होती. मात्र, यंदाही विद्यापीठातील अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्यासाठी चुरस राहणार आहे.

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात पदव्युत्तर अभ्यासक्रमासह अनेक पदवी व पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समावेश आहे. या अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठ प्रशासनाने १० ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याची मुदत होती. पदवी व पदव्युत्तरची प्रवेश क्षमता तीन हजार ३५३ इतकी आहे. त्यासाठी अर्जांची संख्या २२ हजार ४६७ इतकी आहे. पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता दोन हजार ३०० असून, त्यासाठी दोन हजार ६५० विद्यार्थ्यांचे अर्ज आले आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाचे उपकुलसचिव उत्तम चव्हाण यांनी दिली.

दरम्यान, ऑनलाइन अर्जाची मुदत संपली. त्यानंतर आता पदवी व पदव्युत्तरसाठी प्रवेश परीक्षा घेतली जाणार आहे. त्यानंतर गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाते. त्यानंतर संबंधित विभागाकडून प्रवेश दिले जाणार आहे. विद्यापीठात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी गुणवत्तेचा कस लागणार आहे, असे विद्यार्थ्यांच्या अर्जांवरून स्पष्ट होत आहे.

#### १६ ऑगस्टला प्रवेश परीक्षा

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना रोजगार मिळण्याच्या उद्देशाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने बॅचरल ऑफ व्होकेशनल (बी. व्होक), बीए लिबरल आर्ट्स, संगीत, नृत्य, नाटक, बी. टेक एव्हिएशनसह अन्य पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यापीठातर्फे येत्या १६ ऑगस्ट रोजी प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. ही परीक्षा विद्यार्थ्यांना प्रॉक्टर्ड मेथडद्वारे ऑनलाइनद्वारे घरी बसून लॅपटॉप, कम्प्युटर, मोबाइलद्वारे देण्याची सुविधा आहे. त्यानंतर अशाच पद्धतीने पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. या प्रवेश परीक्षेची तारीख नंतर जाहीर करण्यात येणार आहे.

| विद्याशाखा | अर्ज संख्या | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| विज्ञान आणि तंत्रज्ञान | १७१०४ | १३४२ |
| वाणिज्य व व्यवस्थापन | ११४४ | २२० |
| मानव विज्ञान | ५३७४ | ११७५ |
| आंतरविद्याशाखीय अभ्यास | १८५६ | ६१६ |
| पदविका व प्रमाणपत्र | ३३०९ | २३०० |
| एकूण अर्जांची संख्या | २७७८७ | ५६५३ |

#### दहावीच्या गुणपत्रिका १७ ऑगस्टपासून

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची दहावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना १७ ऑगस्टपासून गुणपत्रिका उपलब्ध होणार आहेत. विभागीय मंडळांकडून १४ ते १७ ऑगस्ट दरम्यान शाळांना गुणपत्रिका वितरित करण्यात येणार आहेत, तर शाळांकडून १७ ऑगस्टपासून नियमांचे व सूचनांचे पालन करून विद्यार्थ्यांना गुणपत्रिका वितरित करण्यात येणार आहेत. करोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन सुरक्षित वावर ठेवून अधिकाधिक केंद्रे निश्चित करून गुणपत्रिका, अभिलेख वितरित करण्यात येणार आहेत. शाळांनीही विद्यार्थ्यांची गर्दी होणार नाही याबाबत खबरदारी घेण्याच्या सूचना मंडळाने दिल्या आहेत.

**Maharashtra times: 12.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

करोनाचा परिणाम; उच्च शिक्षणाचे वेळापत्रकासह ठोकताळेही बदलले

## महाविद्यालयीन निवडणुका नाहीच

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ११ -** विधानसभा निवडणुका, सरकार स्थापन न झाल्याने राष्ट्रपती राजवट आणि नवे सत्ताधारी या कारणाने गतवर्षीच्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात विद्यार्थी निवडणुका होऊ शकल्या नाहीत. करोनाचे संकट लक्षात घेता यंदाही महाविद्यालयीन विद्यार्थी निवडणुकांबाबत शासनाकडून नकार घंटाच होणार असल्याची शक्यता आहे.

राज्यात महाविद्यालयीन विद्यार्थी निवडणुका होणार असल्याची घोषणा तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी ऑक्टोबर २०१८ मध्ये केली होती. त्यानंतर विद्यापीठाचा नवा कायदा आला. त्यात विद्यार्थी निवडणुकांची तरतूद करण्यात आली. त्यामुळे २०१९ मधील शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात निवडणूक होणार असल्याने विद्यार्थी संघटनांनी जोरदार तयारी सुरु केली होती. मात्र, विधानसभा निवडणुका, आचारसंहिता आणि राजकीय पक्षाला सत्तास्थापन करण्यास विलंब यामुळे गतवर्षी महाविद्यालय निवडणुकांना मुहूर्त मिळाला नाही. त्यामुळे यंदाही या निवडणुका होतील, असे चित्र नाही.

तथापि, यंदा करोना विषाणूच्या वाढत्या संसर्गाचा विचार करता यंदाही महाविद्यालयात विद्यार्थी निवडणुका रेंगाळणार असल्याचे स्पष्ट होत आहे. करोनामुळे सर्व क्षेत्रासह शिक्षण क्षेत्रात विचित परिस्थिती आहे. नियोजित वेळापत्रकानुसार पुढच्या महिन्यात महाविद्यालये सुरू होणार आहेत. परंतु, करोनाचे वाढता प्रादुर्भात पाहता विद्यार्थी महाविद्यालयात येतीलच, याविषयी प्राचार्यच अनभिज्ञ आहेत. अशा परिस्थितीत उच्च शिक्षणाचे वेळापत्रक कोलमडले आहे. त्या पार्श्वभूमीवर तूर्तात विद्यार्थी निवडणुका हा विषयच बाजूला पडल्याचे दिसून येत आहे.

गतवर्षी सर्वच विद्यापीठांनी विद्यार्थी निवडणुकांची तयारी केली होती. त्याबाबतचे वेळापत्रक प्रसिद्ध केले होते. विद्यापीठाने सर्व यंत्रणा राबविली होती. मात्र विद्यार्थी निवडणुकांविषयी राज्य शासनाकडून काहीच आदेश न आल्याने विद्यापीठांनीही पुढची कार्यवाही सुरू केली नाही. यंदाही करोनामुळे शैक्षणिक वर्तुळात विद्यार्थी निवडणुका घेण्याविषयी फारसे अनुकूल स्थिती नसल्याचे दिसून येत आहे.

### प्रवेशावर लक्ष केंद्रित...

करोनामुळे राज्यातील विविध भागातील विद्यार्थी पुण्यात शिक्षणासाठी प्रवेशाची संख्या घटण्याची भीती आहे. करोनाचा विचार करता विद्यार्थी स्थानिक भागातील महाविद्यालयात प्रवेशासाठी पसंती आहे. त्यामुळे यंदा जास्तीत जास्त प्रवेश होण्यासाठी महाविद्यालय प्रशासन प्रयत्न करीत आहे. प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच विद्यार्थी निवडणुकांचा विचार करता येईल. त्याबाबत राज्य शासनाने निर्देश दिल्यानंतरच कार्यवाही केली जाईल, अशी माहिती विविध महाविद्यालयातील प्राचार्य व विद्यापीठातील अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.




**Prabhat: 12.8.2020**

प्रभात पुणे, बुधवार, दि. १२ ऑगस्ट २०२० || ३

## अंतिम वर्षाच्या परीक्षा घेऊ नयेत : मुख्यमंत्री

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ११ -** 'विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून त्यांचे जीव धोक्यात घालता कामा नये. त्यामुळे पारंपरिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेऊ नयेत,' अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली.

'विद्यार्थ्यांना सरासरी मार्क्स देऊन (ॲग्रिगेट) उत्तीर्ण करण्यात यावे. करोनामुळे किती काळ असे राहणार, याचे उत्तर नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य किती काळ टांगून ठेवणार, यासाठी देशपातळीवर एकच निर्णय लवकरात लवकर घेण्याची आवश्यकता आहे,' असे ठाकरे यांनी सांगितले.

पंतप्रधानांनी मंगळवारी महाराष्ट्र, गुजरात, पश्चिम बंगाल, पंजाब, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, तामिळनाडू, बिहार आणि उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधत करोना उपाययोजनांचा आढावा घेतला. त्यावेळी ठाकरे यांनी पंतप्रधानांशी पदवी परीक्षांच्या तिढ्याविषयी चर्चा केली.

वैद्यकीय शिक्षणाच्या अंतिम वर्षाच्या परिक्षाबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता असून विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार, मौखिक स्वरूपात परीक्षा घेण्याची गरज आहे. अंतिम वर्षाचे विद्यार्थी उत्तीर्ण झाले, तर करोना युद्धात त्यांच्या इच्छेनुसार मदत घेता येईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

घरीच रहा सुरक्षित रहा!
Punit Balan Group

# *News Paper Clippings During August 2020*

**Section: Education**

लोकमत

# अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत देशपातळीवर एकच निर्णय घ्या

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे; पंतप्रधानांकडे केली मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कोरोना महामारीत विद्यार्थ्यांचे जीवन धोक्यात घालता कामा नये. नॉन प्रोफेशनल कोर्सेसच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेता विद्यार्थ्यांना सरासरी गुण देऊन उत्तीर्ण करता येईल. परंतु यासाठी देशपातळीवर एकच निर्णय घ्यायला हवा, अशी मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली.

कोरोनाचे संकट किती काळ राहणार याचे उत्तर नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य किती काळ टांगून ठेवणार, असे सांगून ठाकरे म्हणाले, वैद्यकीय शिक्षणाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबतही निर्णय व्हायला हवा. विद्यार्थ्यांच्या इच्छेनुसार त्यांची तोंडी परीक्षा घ्यावी. हे विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यास कोरोना युद्धात त्यांची मदत घेता येईल.

पंतप्रधान मोदी यांनी महाराष्ट्र, गुजरात, पश्चिम बंगाल, पंजाब, आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, तमिळनाडू, बिहार व उत्तर प्रदेश या दहा राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी मंगळवारी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारा संवाद साधून कोरोनाविषयीची सद्यस्थिती जाणून घेतली.



### कोरोनाची दुसरी लाट येऊ देणार नाही

महाराष्ट्राने कोरोना रुग्णसंख्या व मृत्यू झालेली एकही केस लपवली नाही. धारावी, वरळी येथील स्थिती नियंत्रणात आणली. मात्र अजूनही लढाई संपली नाही. कोरोनाची दुसरी लाट महाराष्ट्रात येऊ देणार नाही, यासाठी प्रयत्नशील असल्याचे ठाकरे यांनी सांगितले.

### राज्यात साथरोग नियंत्रण रुग्णालय

महाराष्ट्रात मुंबईसह सर्व जिल्ह्यांमध्ये साथरोग नियंत्रण रुग्णालये सुरु करणार असल्याचे मुख्यमंत्री ठाकरे यांनी यावेळी सांगितले. कोरोनामुक्त झालेल्या काही रुग्णांना नंतर अन्य आजार झाल्याचे निदर्शनास आले असून कोरोनानंतरच्या उपचाराची व्यवस्था निर्माण होण्याची गरज असल्याचे ठाकरे यावेळी म्हणाले.

**देशाच्या** एकूण कोरोना रुग्णसंख्येपैकी८० टक्के रुग्ण हे १० राज्यांमध्ये आहेत.

**या दहा** राज्यांच्या प्रयत्नातून कोरोनाला हरविले तर देश जिंकेल, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला.

Pune Main
Page No. 11 Aug 12, 2020
Powered by: erelego.com

# ग्रंथपालही होताहेत 'स्मार्ट'

## ऑनलाइन शिक्षणात ई-साहित्य पुरविण्याकडे लक्ष

Ashwini.kawale
@timesgroup.com
tweet : @ashwinikawaleMT

नाशिक : करोना आला आणि शिक्षण क्षेत्राला मोठा हादरा बसला. शाळा बंद झाल्या. मात्र विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात कायम ठेवण्यासाठी, त्यांना सतत शाळेशी, अभ्यासक्रमाशी जोडून ठेवण्यासाठी शाळांनी पारंपरिक शिक्षणपद्धतीऐवजी ऑनलाइन शिक्षणावर भर दिला. या शिक्षणात तंत्रकुशल शिक्षकांसह शाळेतील ग्रंथपालही मोलाची भूमिका बजावत आहेत.

करोना संसर्गाचा प्रादुर्भाव वाढू नये, विद्यार्थ्यांना त्याचा धोका पोहोचू नये, यासाठी मार्च महिन्यापासून शाळा बंद ठेवत ऑनलाइन शिक्षणाच्या स्वीकारलेल्या पर्यायात आता विद्यार्थी, शिक्षक काही प्रमाणात स्थिर होताना दिसत आहेत. विद्यार्थ्यांपर्यंत ई साहित्य पोहोचावे, तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करून अभ्यासक्रम पूर्ण व्हावा, यासाठी प्रयत्न केले जात आहे. या नवीन शिक्षण पद्धतीत शाळेतील ग्रंथपालही अभ्यासक्रमाचे ई साहित्य, अवांतर वाचनाचे पीडीएफ साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत कसे पोहोच करता येईल यासाठी झटत आहेत.




दरवर्षी शालेय पुस्तकांचे वाटप करणे, विद्यार्थ्यांना गोष्टी, कविता, बोधकथा, कादंबऱ्या, मासिके ग्रंथालयात उपलब्ध करून देणे आदी काम ग्रंथपाल करीत असतात. मात्र, चार महिन्यांपासून ऑनलाइन शिक्षण सुरू आहे. विद्यार्थ्यांचा शिक्षकांशी ई-संवाद होतोय. ग्रंथपालांची भेट मात्र दुरापास्तच झाली आहे. मात्र, तरीही विद्यार्थ्यांपर्यंत ई साहित्य पोहोचविण्याचा प्रयत्न राज्यभरातील ग्रंथपालांकडून सुरू आहे. अभ्यासक्रमाविषयी महत्त्वाची माहिती, ऑडिओ पुस्तक, छापील पुस्तकांच्या पीडीएफ, रोजच्या अभ्यासातून थोडा विरंगुळा विद्यार्थ्यांना मिळावा म्हणून कथा, बोधकथा, कविता, नवनवीन माहितीचा संग्रह असलेले ई साहित्य शिक्षकांमार्फत ग्रंथपालांकडून विद्यार्थ्यांना पोहोचवले जात आहे.

> *राज्यभरात ग्रंथपालांकडून विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन स्पर्धा घेण्याबरोबरच ई लायब्ररी तयार करणे, त्यामार्फत पुस्तके शिक्षक-विद्यार्थ्यांना पाठविणे सुरू आहे. सतत ग्रंथालयात रमणाऱ्या ग्रंथपालांनी काळाची पाऊले ओळखली आहेत.*
>
> -विलास सोनार, राज्यअध्यक्ष, ग्रंथालय शिक्षक परिषद

> रोजच्या अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांना कथा, कविता, सामान्य ज्ञान असे ई साहित्य शिक्षकांमार्फत पोहोचवित आहोत. काही ग्रंथपालांनी स्वतः रेकॉर्ड केलेली पुस्तकेही उपलब्ध करून दिली आहेत.
>
> -अरविंद दिघे, ग्रंथपाल

**Maharashtra Times: 12.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

# ग्रंथ व वाचक यांच्यातील दुवा म्हणजे ग्रंथपाल



**भारतात ग्रंथालयशास्त्राचा प्रसार करणारे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व म्हणजे डॉ. शियाळी रामामृत ऊर्फ एस. आर. रंगनाथन. १२ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय ग्रंथपाल दिन' म्हणून भारतात साजरा करण्यात येतो. ग्रंथालयांच्या शास्त्रीय अभ्यासाची गरज त्यांनी प्रथम जाणली व 'द्विबिंदू वर्गीकरण पद्धत' शोधून काढली. भारतीय व्यक्तीने केलेला ग्रंथालयशास्त्रातील हा पहिला शोध.**

ग्रंथालय क्षेत्राच्या वाटचालीत डॉ. रंगनाथन यांच्या सूत्रांचा आजही वेध घेताना, ग्रंथालयातील ग्रंथसंग्रहांचा वापर हा झालाच पाहिजे. वैयक्तिक संग्रहातील ग्रंथांचा उपयोग होत नसेल तर संबंधितांनी तो योग्य त्या ग्रंथसंग्रहालयाकडे सुपूर्त केला पाहिजे. प्रत्येक ग्रंथाला वाचक तर प्रत्येक वाचकाला हवा तो ग्रंथ, वाचनसाहित्य मिळालेच पाहिजे, हे तर ग्रंथालयांच्या कामाचे प्राणसूत्र आहे. विविध क्षेत्रांतील अभ्यासक, विद्यार्थी तसेच संदर्भासाठीची माहिती हवी असलेल्या संशोधकांना, अभ्यासकांना ग्रंथपाल हवे ते संदर्भ पुरवितात. परंतु अनेकदा माहितीचे, संदर्भाचे स्रोत असलेल्या ग्रंथांचा वा ग्रंथपालांचा नामोल्लेखही अनेकदा होत नाही. पण ग्रंथपाल वाचकाला हवा तो ग्रंथ मिळवून देण्यात तत्पर असतो. ग्रंथपाल व्यासंगी व ग्रंथसंदर्भात उत्तम जाणकारी असल्यास वाचकांचा वेळ वाचतो. दैनंदिन स्वरुपात मुद्रित ग्रंथ, नियतकालिके तसेच ध्वनिमुद्रित संदर्भ, ई-साहित्य असे अनेक स्वरुपातील साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध व संग्रहित होत असल्याने ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे, हा द्रष्टेपणाही डॉ. रंगनाथन यांच्याकडे होता. त्यामुळेच ग्रंथालयांचा विस्ताराचा विचार करण्याबाबत ते आग्रही होते.

'ग्रंथालयशास्त्र संदर्भातील पंचसूत्री-

१. ग्रंथ हे उपयोगासाठी असतात.
२. प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळाला पाहिजे.
३. प्रत्येक वाचकाला हवा तो ग्रंथ मिळाला पाहिजे.
४. वाचकाचा वेळ वाचावा.
५. ग्रंथालय एक वर्धिष्णू संस्था आहे.

ही पंचसूत्री कालजयी अशीच आहे. केवळ ग्रंथच नाही, तर वाचनाचे आजचे कोणतेही आधुनिक स्वरुपातील वाचनसाहित्य प्रकार यांनाही आजमितीला ते लागू होतात.

### राष्ट्रीय ग्रंथपाल दिन
### प्रा|सं|गी|क

खरं तर, ग्रंथालय हा विषय खूप व्यापक आहे. पण किमान डॉ. रंगनाथन यांच्या नियमांची अंमलबजावणी प्रत्येक ग्रंथालयात पूर्णपणे होते का? खासगी संस्थेत निधीच्या कमतरतेचा प्रश्न असतो, संशोधन केंद्राच्या स्वरुपातील ग्रंथालये विकसित होण्याबाबतची अनास्था. तसेच ग्रंथालयाचा विकास व नियमांचे पालन करणाऱ्या ग्रंथपालाला स्वातंत्र्य व आर्थिक स्थैर्य मिळणेही आवश्यक आहे. वाचनसंस्कृतीचं जतन ही सामूहिक तशीच वैयक्तिकही जबाबदारी आहे. सामाजिक जीवनात संस्कृतीचा प्रकाश उजळ्वायचा, तर पुस्तकांचीच सोबत धरायला हवी. ग्रंथालयात वाचकांना हवी असलेली पुस्तके उपलब्ध करून दिली तरच त्या ग्रंथालयाचा विकास होऊ शकतो.

आजच्या कोरोनाच्या जागतिक आपत्ती काळात ग्रंथालये मग ती सार्वजनिक असो, खाजगी असो वा शैक्षणिक, बंदच आहेत. ती वेळेत सुरु व्हावीत यासाठी शासकीय वा समाजमाध्यमानेही ग्रंथ हेही जीवनावश्यकच आहेत, हे मानणे आवश्यक आहे. यासाठीच डॉ. रंगनाथन यांच्या ग्रंथालयीन पंचसूत्रीचा प्रसार केला तर हवे त्याला ग्रंथ उपलब्ध होतील. यासाठी ग्रंथालय, वाचक, ग्रंथपाल या त्रिमूर्तीचे एकत्रीकरण ही काळाची गरज आहे.

- प्रसाद भडसावळे,
संदर्भ ग्रंथपाल

Hello Pune
Page No. 2 Aug 12, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# परीक्षांबाबत एकच निर्णय घ्या!

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची पंतप्रधानांकडे मागणी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई:** विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांवरून राज्य सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्यातील वाद सर्वोच्च न्यायालयात निर्णायक वळणावर आलेला असतानाच विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून त्यांचे जीवन धोक्यात घालता कामा नये. त्यामुळे अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेऊ नयेत अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी पुन्हा एकदा पंतप्रधानांकडे केली.

करोनामुळे किती काळ अशीच परिस्थिती राहणार याचे उत्तर नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य किती काळ टांगून ठेवणार असा प्रश्न करीत विद्यार्थ्यांना सरासरी गुण देऊन उत्तीर्ण करावे. यासाठी देशपातळीवर एकच निर्णय लवकरात लवकर घ्यावा अशी विनंती मुख्यमंत्र्यांनी केली.

### सर्व जिल्ह्यांमध्ये साथरोग नियंत्रण रुग्णालये



राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये साथरोग नियंत्रण रुग्णालये सुरू करणार असल्याचे ठाकरे यांनी सांगितले. करोनामुक्त झालेल्या काही रुग्णांना बरे झाल्यानंतरही अन्य आजार झाल्याचे निदर्शनास आले असून करोनानंतरच्या उपचाराची व्यवस्था निर्माण होण्याची गरज असल्याचेही ठाकरे यांनी पंतप्रधानांच्या निदर्शनास आणले.



नरेंद्र मोदी



उद्धव ठाकरे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्र, गुजरात, पश्चिम बंगाल, पंजाब, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, तामिळनाडू, बिहार आणि उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांशी दूरचित्रसंवादाच्या माध्यमातून संवाद साधत करोना उपाययोजनांचा आढावा घेतला.

राज्याच्या वतीने मुख्यमंत्री ठाकरे यांच्यासह आरोग्यमंत्री राजेश टोपे, मुख्य सचिव संजय कुमार हे सहभागी झाले होते. यावेळी बोलताना वैद्यकीय शिक्षणाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षाबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता असून विद्यार्थ्यांना त्यांच्या इच्छेनुसार, मौखिक स्वरूपात परीक्षा घेण्याची गरज आहे असे त्यांनी सांगितले.

अंतिम वर्षाचे विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर करोना युद्धात त्यांच्या इच्छेनुसार मदत घेता येईल, याकडेही मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले. तर देशाच्या एकूण करोना रुग्णसंख्येपैकी ८० टक्के रुग्ण हे १० राज्यांमध्ये आहेत. या दहा राज्यांच्या प्रयत्नातून करोनाला हरविले तर देश जिंकेल, असा विश्वास मोदी यांनी बैठकीत व्यक्त केला.

### शिवभोजन योजनेचा लाभ

याकाळात शिवभोजन योजनेच्या माध्यमातून महिन्याला लाखो लोकांना केवळ ५ रुपयांमध्ये जेवणाची सोय केली. राज्यातील गरीब जनतेला याचा मोठा लाभ झाला आहे. मागच्या आठवड्यात कुपोषण निर्मुलनासाठी आदिवासी बालकांना व मातांना दुध भूकटी मोफत देण्याचा निर्णय देखील राज्यशासनाने घेतल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

करोनाबाधित आणि मृत्यू झालेली एकही नोंद( केस) लपवली नाही. पारदर्शीपणे माहिती दिली जात असून, करोनाबाबत काहींच्या मनात भीती तर अनेकांमध्ये काहीही होत नसल्याची बेपर्वाई आहे तर पोटासाठी बाहेर पडण्याची मजबुरीदेखील आहे अशा तीन अवस्थेत करोनाचा सामना सुरू असल्याचे सांगितले.

**'लढाई संपलेली नाही'**

मृत्युदर कमी करण्याचा प्रयत्न केला जात असून मुंबईतील धारावी, वरळी येथील स्थिती नियंत्रणात आणल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. मात्र अजूनही लढाई संपली नाही. करोनाची दुसरी लाट महाराष्ट्रात येऊ देणार नाही यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.

लोकसत्ता Wed, 12 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54164275

# नॉलेज क्लस्टरमुळे मिळेल पुण्याच्या विकासाला गती

### शिक्षण, उद्योग, संशोधन क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत

**पुणे :** 'पुणे नॉलेज क्लस्टरच्या माध्यमातून पुणे महापालिका, पुणे स्मार्ट सिटी व राज्य सरकारच्या सहकार्याने विविध प्रकल्प राबवले जातील. पुण्यातील वृक्षसंपदेचा अभ्यास व वाढीसाठी प्रयत्न, ई-वाहतुकीचा अभ्यास व लास्ट माइल कनेक्टिव्हिटी, इलेक्ट्रिक वाहने ही घरांना अथवा ग्रीडला जोडण्याबाबत प्राथमिक अभ्यास, आरोग्य समस्या; तसेच साथरोगांचा अभ्यास हे काही प्रकल्प प्राधान्याने राबवले जातील,' अशी माहिती क्लस्टरचे प्रधान समन्वयक डॉ. अजित केंभावी यांनी दिली.

'शहराचे राहणीमान उंचवावे, यासाठी इंटिग्रेटेड इलेक्ट्रिक मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट, पुणे डिजिटल ट्विन आणि शहरातील पाण्याचे व्यवस्थापन हे प्रकल्पदेखील प्राथमिक पातळीवर राबवले जाणार आहेत,' असे 'आयुका'चे संचालक डॉ. सोमक रायचौधरी म्हणाले.

'पुण्यामध्ये या क्लस्टरची स्थापना होणे ही पुण्यासाठी अभिमानाची बाब आहे. यामुळे विद्यापीठाचाही हुरूप वाढेल,' असा विश्वास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केला.

'पुण्यातील उद्योगजगतातर्फे क्लस्टरला पूर्ण सहकार्य केले जाईल,' असे 'एमसीसीआयए'चे अध्यक्ष प्रदीप भार्गवा म्हणाले. 'शिक्षण, उद्योग व संशोधन या तिन्ही क्षेत्रांच्या समन्वयामुळे पुण्याला मोठा फायदा होईल,' असे पर्सिस्टंट सिस्टीम्सचे सीएमडी डॉ. देशपांडे म्हणाले. 'अनेक देशांमध्ये अशी क्लस्टर असून, त्यांनी संबंधित देशांच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. तशी संधी आता पुण्याला मिळाली आहे,' असे 'एमसीसीआयए'चे महासंचालक प्रशांत गिरबने म्हणाले.

**Maharashtra Times: 13.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# पुणे नॉलेज क्लस्टरला केंद्राची अधिकृत मान्यता

## उद्योग, शिक्षण, संशोधन क्षेत्रात होणार एकत्रित काम

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुण्यातील आघाडीच्या शिक्षण आणि संशोधन संस्था, प्रयोगशाळा तसेच उद्योग या क्षेत्रांना एका व्यासपीठावर आणून त्याद्वारे त्या परिसरातील आणि राष्ट्रीय पातळीवरील समस्यांवर अभ्यास आणि संशोधनावर आधारित उपाय शोधून काढण्यासाठी पुणे क्लस्टर नॉलेजच्या स्थापनेला केंद्र सरकारने अधिकृत मान्यता दिली आहे.

अशी मान्यता मिळालेल्या मोजक्या शहरांमध्ये पुण्याने आघाडी घेतली आहे. भारत सरकारच्या मुख्य वैज्ञानिक सल्लागार कार्यालयाकडून यासाठी आर्थिक निधी पुरविला जाणार आहे. याचा कालावधी ३ वर्षांचा असून, त्यानंतर संबंधित क्लस्टरची कामगिरी पाहून त्याच्या मुदतवाढीचा निर्णय घेतला जाऊ शकेल. या प्रकल्पाशी संबंधित पदाधिकाऱ्यांनी त्याची अधिकृत घोषणा आज मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अॅग्रिकल्चरने आयोजित केलेल्या ऑनलाइन पत्रकार परिषदेत



- संशोधनाद्वारे विविध प्रश्नांवर उपाय शोधणार
- वृक्ष संवर्धन, पाणी व्यवस्थापन, इलेक्ट्रिक मोबिलिटीवर भर
- कोविड-१९ वर संशोधन सुरू

पान २ वर»

### पुणे नॉलेज क्लस्टरला केंद्राची अधिकृत मान्यता

करण्यात आली. पुणे नॉलेज क्लस्टर चे प्रिन्सिपल इन्व्हेस्टिगेटर आणि आयुका (आय यु सी ए ए ) चे माजी संचालक डॉ. अजित केंभवी, या क्लस्टरचे को प्रिन्सिपल इन्व्हेस्टिगेटर आणि आयआयएसई आर चे बॉयोलॉजीचे प्राध्यापक (सध्या अशोका विद्यापीठाशी संलग्न) एल एस शशीधर, आयुकाचे संचालक डॉ. सोमक रायचौधरी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, व्हेंचर सेंटरचे संस्थापक संचालक डॉ. व्ही. प्रेमनाथ, पर्सिस्टंट सिस्टीम्स लिमिटेड चे संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. आनंद देशपांडे, मराठा चेंबरचे अध्यक्ष डॉ. प्रदीप भार्गव आणि महासंचालक प्रशांत गिरबाने यावेळी उपस्थित होते.

केंभवी यांनी या क्लस्टर योजनेच्या विविध वैशिष्ट्यांचा आढावा घेणारे सादरीकरण केले . या व्यासपीठादारे पुणे आणि परिसरातील विज्ञान, तंत्रज्ञान, नावीन्यपूर्ण संशोधन आणि उद्योजकता या विविध क्षेत्रांशी निगडित संस्था आणि संघटनांमधील उच्च पातळीवरील तज्ञ एकत्र येऊ शकणार आहेत. यात विविध विद्यापीठे, महाविद्यालये, संशोधन प्रयोगशाळा राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील संशोधन आणि विकास आस्थापना आणि उद्योगांचा समावेश असेल. भारत सरकारचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार प्रा. के विजय राघवन यांनी गेल्या सप्टेंबर मध्ये पुणे आणि परिसरातील शिक्षण आणि उद्योग क्षेत्रातील अनेक नामवंतांच्या भेटीगाठी घेऊन हा विषय त्यांच्यापुढे मांडला होता . प्रा . अजित केंभवी आणि एल. एस. शशीधर यांनी क्लस्टरच्या वतीने प्रारंभिक प्रस्ताव सरकारला सादर केला होता. 'द इंटरयुनिव्हर्सिटी सेंटर फॉर अॅस्ट्रोनॉमी अँड अॅस्ट्रोफिजिक्स' म्हणजेच आयुका या योजनेची फॅसिलिटेटर म्हणून कार्य करणार असून, त्याचे संचालक सरकारच्या निधीचा विषय हाताळतील. शहरातील जगण्याचा दर्जा वाढावा म्हणून मोठ्या प्रमाणावर काही प्रकल्प हाती घेण्यात येणार आहेत. त्यात एकात्मिक इलेक्ट्रिक मल्टीमोडल ट्रान्स्पोर्ट, पुणे डिजिटल टिन आणि शहराचे पाणी व्यवस्थापन यांचा समावेश आहे. संसर्गजन्य रोगाबाबत महाराष्ट्रासाठी डेटा बेस तयार करणे, इंडियन कॅन्सर जिनोम अॅटलास, सर्जिकल प्रॉडक्ट्स ट्रान्सलेशन अॅक्सिलरेशन सेंटर, डायग्नॉस्टिक्स अॅट स्केल ( स्केल डी एक्स), इलेक्ट्रिक मोबिलिटी इनिशिएटिव्ह या प्रकल्पांसाठी निधीसाठीचे प्रस्तावही सादर करण्यात आले आहेत. पर्यावरण, आरोग्य, इलेक्ट्रिक मोबिलिटी, बिग डेटा आणि अर्टिफिशिअल इंटेलिजन्स या प्रमुख शाखांवर क्लस्टरचा भर असेल. प्रा. केंभवी यांच्या म्हणण्यानुसार अशा क्लस्टर साठी पूणे हे आदर्श शहर आहे. हे शहर नॉलेज आणि इंडस्ट्री हब म्हणून ओळखले जाते. शहराच्या विकासाचे प्रकल्प शोधून काढून त्यावर एकत्रित रीत्या काम केले जाणार आहे. या उपक्रमासाठी स्वतंत्र सीईओ नेमला जाणार आहे, त्याचे काम येथील मध्यवर्ती कार्यालयातून चालणार असले तरी, त्याचे विविध उपक्रम शहराच्या वेगवेगळ्या भागात चालतील. उद्योग आणि शिक्षण क्षेत्राने एकत्र येऊन परस्परांच्या गरजा ओळखव्यात आणि अभ्यासक्रमात योग्य ते बदल करावेत, ही फार वर्षांपासूनची अपेक्षा आता या क्लस्टरमुळे पूर्ण होऊ शकते, याबद्दल कुलगुरू डॉ. करमळकर यांनी समाधान व्यक्त केले .

**Pudhari: 13.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# पुणे ज्ञान समूहाला केंद्राकडून मान्यता

## देशातील पहिला ज्ञान समूह ठरण्याचा मान

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** विविध समस्यांवर उपाय शोधण्यासाठी शिक्षण संस्था, संशोधन संस्था आणि उद्योग क्षेत्राला एकत्र आणून पुणे ज्ञान समूहाची (पुणे नॉलेज क्लस्टर) स्थापना करण्यात आली आहे. केंद्राची अंतिम मान्यता मिळालेला पुणे ज्ञान समूह देशात पहिला असून, पर्यावरण, आरोग्य, इलेक्ट्रिक वाहने, बिग डेटा, कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांसाठी हा ज्ञान समूह काम करणार आहे. या ज्ञान समूहाच्या समन्वयाची जबाबदारी (नोडल एजन्सी) आंतरविद्यापीठीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी केंद्राकडे (आयुका) देण्यात आली आहे.

केंद्र सरकारच्या प्रधान वैज्ञानिक कार्यालयाकडून या ज्ञान समूहाच्या स्थापनेला नुकतीच औपचारिक मान्यता देण्यात आली. तसेच या ज्ञान समूहाला केंद्राकडून निधीही दिला जाणार आहे. आयुकाचे माजी संचालक आणि ज्ञान समूहाचे प्रधान संचालक डॉ. अजित केंभावी, सहप्रधान संचालक आणि अशोका विद्यापीठाचे प्रा. एल. एस. शशिधरा यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. आयुकाचे संचालक डॉ. सोमक रायचौधुरी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, पर्सिस्टंट सिस्टिम्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. आनंद देशपांडे, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चरचे (एमसीसीआयए) अध्यक्ष प्रदीप भार्गवा, एमसीसीआयएचे महासंचालक प्रशांत गिरबने, व्हेंचर सेंटरचे संचालक डॉ. व्ही. प्रेमनाथ या वेळी उपस्थित होते.

डॉ. केंभावी म्हणाले, की पुणे आणि परिसरातील शिक्षण, संशोधन आणि औद्योगिक संस्थांना ज्ञान समूहात सहभागी होता येईल. शहराच्या समस्या शोधणे, विद्यार्थी, युवा संशोधक, नवउद्यमी आणि उद्योजकांना संधी मिळण्यासाठी सहकार्य, ज्ञान आणि कौशल्यवृद्धीसाठी विविध उपक्रम, ज्ञानाधारित उद्योगांमधील रोजगारक्षमता वाढवणे ही या ज्ञान समूहाची उद्दिष्टे आहेत. करोनाची साथ आटोक्यात आणण्यासाठी, आत्मनिर्भर भारत संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुणे महापालिका, पुणे स्मार्ट सिटी व राज्य सरकारच्या सहकार्याने विविध उपक्रम राबवले जातील.

### उद्योग क्षेत्राकडून सहकार्य

शिक्षण, उद्योग आणि संशोधन या तीनही क्षेत्रांत आघाडीवर असल्याने पुण्याला ज्ञान समूहाची संधी मिळाली. हा ज्ञान समूह दिशादर्शक ठरेल, असे भार्गवा म्हणाले. पुण्यातील उद्योगजगतातर्फे क्लस्टरला पूर्ण सहकार्य केले जाईल. शिक्षण, उद्योग आणि संशोधन या तिन्ही क्षेत्रांच्या समन्वयाचा पुण्याला फायदा होईल, असे मत डॉ. देशपांडे यांनी मांडले. अनेक देशांमध्ये कार्यरत असलेल्या ज्ञान समूहांनी त्या देशाच्या विकासाला हातभार लावला आहे. ती संधी पुणे ज्ञान समूहाला प्राप्त झाली आहे, असे गिरबने यांनी सांगितले.

### केंद्राकडे प्रस्ताव सादर

राज्यातील साथरोगासंदर्भातील माहितीसाठा, करोनाची साथ आटोक्यात आणण्यासाठी, आत्मनिर्भर भारत संकल्पनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी भारतीय कॅन्सर जनुकीय आराखडा अशा काही प्रकल्पांचा प्रस्ताव मान्यता आणि निधी मिळण्यासाठी पुणे ज्ञान समूहातर्फे केंद्र शासनाला सादर करण्यात आल्याची माहिती डॉ. रायचौधुरी यांनी दिली.

लोकसत्ता Thu, 13 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54189475

# बॅकलॉग विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी अडवणूक

## सरकारच्या आदेशाला महाविद्यालयांकडून हरताळ

ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा

**पुणे, ता. १२ : "कोरोनामुळे माझी परीक्षा झाली नाही, त्यामुळे बी.कॉम द्वितीय वर्षाचे दोन विषय तसेच राहिले. राज्य सरकाराच्या निर्णयानुसार मला तृतीय वर्षात प्रवेश मिळायला हवा होता. पण विद्यापीठाकडून आदेश आले नाहीत असे सांगून पुढील वर्षात प्रवेश दिला नाही," असे नगरमधील एका महाविद्यालयाचा विद्यार्थी सांगत होता. हिच परिस्थिती वारजे येथील एका महाविद्यालयातील विद्यार्थीनीची आहे.**

कोरोनामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर पदवीच्या परीक्षा अर्धवट राहिल्या. लॉकडाउन संपल्यानंतर परीक्षा होतील, असे सांगण्यात आले. मात्र कोरोनातून लवकर सुटका होणार नाही, हे समजल्याने परीक्षेबाबत काय करायचे, हा प्रश्न संपूर्ण राज्यात निर्माण झाला. त्यामुळे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) नियमानुसार अंतीम वर्ष वगळता इतर वर्षांच्या विद्यार्थ्यांना सरासरी गुण देऊन उत्तीर्ण करा, असा आदेश दिला आहे. त्यानुसार पुणे विद्यापीठाने गणितीय पद्धतीनुसार सरासरी काढून निकाल लावण्याची प्रक्रिया सुरू केली.

जुलैपासून आतापर्यंत अंतीम वर्ष वगळता इतर सर्व वर्षांच्या तीन लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर केले आहेत.

### बॅकलॉग असले तरी पुढच्या वर्गात प्रवेश

राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयामध्ये अंतीम वर्ष वगळता इतर वर्षाच्या विद्यार्थ्यांना ५० टक्के अंतर्गत मूल्यांकन व ५० टक्के पुर्वीच्या गुणांवरून मूल्यांकन करून उत्तीर्ण केले जाईल. हा निर्णय बॅकलॉग असलेल्या विद्यार्थ्यांनाही लागू होईल, असे स्पष्ट केले होते. मात्र, पुणे विद्यापीठाने निकालानंतर पुढील वर्षाचे प्रवेश सुरू केल्यानंतर बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांची अडवणूक केली जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये | ९६८ | इतर महाविद्यालये | ५१३ |
| कला, वाणिज्य महाविद्यालये | ३४६ | विद्यार्थी संख्या | ६१२००० |
| अभियांत्रीकी महाविद्यालये | १०९ | बॅकलॉगचे प्रमाण : सुमारे | ४०% |

जे विद्यार्थी दुसऱ्या वर्षाच्या पहिल्या सत्रामध्ये सर्व विषयांत उत्तीर्ण होते, त्यांना तृतीय वर्षात प्रवेश मिळाला. पण, माझ्यासह अनेकांचे विषय राहिले आहेत, अशांचा निकाल लावला नसल्याने तृतीय वर्षात प्रवेश मिळाला नाही. सरकारने काढलेल्या आदेशाची अंमलबजावणी करत नाहीत.
– प्रियांका, वारजे माळवाडी

परीक्षा झाली असती तर बॅकलॉगच्या दोन विषयांत मी उत्तीर्ण झालो असतो. मला बी.कॉमच्या तृतीय वर्षात प्रवेश मिळायला हवा होता. पण, बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांना पुढील वर्षात प्रवेश देण्यासंदर्भात विद्यापीठाचे परिपत्रक मिळाले नाही, असे सांगून महाविद्यालयांकडून अडवणूक सुरू झाली आहे.
– संजय, नगर

राज्य सरकारने काढलेल्या १८ मे च्या आदेशानुसार व पुणे विद्यापीठाने सर्क्युलर क्रमांक १३, १४ नुसार अंतिम वर्ष वगळता इतर वर्षाच्या प्रवेशासंदर्भात महाविद्यालयांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. तरीही विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अडचणी येत असतील तर त्यांनी विद्यापाठाकडे संपर्क साधवा.
– डॉ. एन. एस. उमराणी, प्र- कुलगुरू, पुणे विद्यापीठ

Scanned with CamScanner

**Sakaal: 13.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education



# पुणे होणार ज्ञानसंकुल

## 'नॉलेज क्लस्टर'च्या माध्यमातून शिक्षण, उद्योग, संशोधनाला चालना

महाराष्ट्र टाइम्स पुणे सुपरफास्ट

म. टा. प्रतिनिधी, पुणे

शिक्षण, उद्योग आणि संशोधन या तिन्ही क्षेत्रात आघाडीवर असलेल्या पुण्यात आता या तिन्ही क्षेत्रांची सांगड घातली जाणार आहे. 'पुणे नॉलेज क्लस्टर'च्या माध्यमातून शहराला; तसेच देशाला भेडसावणाऱ्या समस्यांवर या तिन्ही क्षेत्रांतील व्यक्ती एकत्रित काम करतील. एकमेकांच्या कौशल्यवृद्धीसाठीही त्याचा वापर शक्य असल्याने सर्वांनाच त्याचा फायदा होईल. केंद्र सरकारने प्रधान वैज्ञानिक सल्लागारांच्या कार्यालयामार्फत 'पुणे नॉलेज क्लस्टर'च्या स्थापनेला मान्यता दिल्याची अधिकृत घोषणा बुधवारी ऑनलाइन पत्रकार परिषदेत झाली.

देशातील पहिल्यावाहिल्या नॉलेज क्लस्टरच्या रूपात पुण्याचे 'क्लस्टर' देशासाठी दिशादिग्दर्शकाचे काम करणार असून, पुण्याच्या 'सुपरफास्ट' विकासाच्या दिशेने बुधवारी आणखी एक पाऊल पुढे पडल्याचे तज्ज्ञांनी म्हटले आहे. पर्यावरण, आरोग्य, इलेक्ट्रिक वाहने, बिग डेटा व आर्टिफिशियल इंटलिजन्स या क्षेत्रांसाठी प्रामुख्याने हे क्लस्टर काम करणार आहे. आंतरविद्यापीठीय खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकी केंद्र (आयुका) हे या प्रकल्पासाठी 'नोडल एजन्सी' असेल. 'आयुका'चे माजी संचालक व क्लस्टरचे प्रधान संचालक डॉ. अजित कॅंभावी, क्लस्टरचे सहप्रधान संचालक व अशोका विद्यापीठाचे प्रा. एल. एस. शशिधरा यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. 'आयुका'चे संचालक डॉ. सोमक रायचौधरी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर, पर्सिस्टंट सिस्टीम्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. आनंद देशपांडे, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड अॅग्रीकल्चरचे (एमसीसीआयए) अध्यक्ष प्रदीप भार्गवा, महासंचालक प्रशांत गिरबने, व्हेंचर सेंटरचे संस्थापक संचालक डॉ. व्ही. प्रेमनाथ उपस्थित होते.

'राज्यातील साथरोगांसंदर्भातील माहितीसाठा, भारतीय कॅन्सर जिनोम अॅटलास, सर्जिकल प्रॉडक्ट्स ट्रान्सलेशन अॅक्सिलरेशन सेंटर, डायग्नोस्टिक्स अॅट स्केल व ई-मोबिलिटी या प्रकल्पांना मान्यता व निधी मिळावा, यासाठी पुणे नॉलेज क्लस्टरतर्फे केंद्राकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे,' असे डॉ. सोमक रायचौधरी म्हणाले.

### 'सिटी नॉलेज क्लस्टर' म्हणजे काय?

उद्योगांच्या गरजा आणि शैक्षणिक क्षेत्रांमधील संशोधनाची सांगड घालण्यासाठी केंद्र सरकारने 'सिटी नॉलेज क्लस्टर' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. त्यासाठी देशभरातून पुण्यासह सहा शहरे निवडण्यात आली होती. सुमारे तीन वर्षे यावर अनेक बैठकांमधून सविस्तर चर्चा झाली. शहरातील मान्यवरांनी त्यात सहभाग देऊन काही प्रकल्प, आराखडे, योजनाही सादर केल्या. अखेर देशातील पहिल्या अधिकृत 'नॉलेज क्लस्टर'चा मान पुण्याला मिळाला, तर हैदराबाद आणि जोधपूर येथील 'क्लस्टर'नाही या आठवड्यातच मान्यता मिळेल.

> पुणे व परिसरातील सर्व शैक्षणिक, संशोधन व औद्योगिक संस्थांना या क्लस्टरमध्ये सहभागी होता येईल. शहराला भेडसावणाऱ्या समस्या शोधणे, विद्यार्थी, युवा संशोधकांना नव्या संधी उपलब्ध करून देणे, स्टार्टअप व आंत्रप्रेनर्सना संधी मिळण्यासाठी सहकार्य, ज्ञान व कौशल्यवृद्धीसाठी विविध उपक्रम, ज्ञानाधारित उद्योगांमधील रोजगारक्षमता वाढविणे या क्लस्टरचा उद्देश आहे.
>
> – डॉ. अजित कॅंभावी, 'क्लस्टर'चे प्रधान संचालक

### काय फायदा होणार?

'नॉलेज क्लस्टर'च्या माध्यमातून पुण्यातील आघाडीच्या कंपन्या, उद्योजक व शैक्षणिक संस्था एकाच प्लॅटफॉर्मवर येणार असून त्याद्वारे ज्ञान व संशोधन साधनांची देवाणघेवाण होण्यास मदत होणार आहे; तसेच त्यांच्या समस्या सुटण्यासही मदत होणार असल्याने सर्वांसाठीच ही 'विन-विन सिच्युएशन' ठरणार आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

» संबंधित वृत्त...६

Scanned with CamScanner

**Maharashtra Times: 13.8.2020**



# विद्यापीठाकडून महाविद्यालयांना मिळणार ऑनलाइन यंत्रणा

**कुलगुरू डॉ. नितीन करमळकर; संकेतस्थळावर मार्गदर्शिका उपलब्ध**

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १२ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने ऑनलाइन शिक्षणासाठी उभारण्यात आलेली यंत्रणा महाविद्यालयांना मोफत पुरविण्यात येणार आहे. या यंत्रणेच्या वापराविषयी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर मार्गदर्शिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी स्पष्ट केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या सर्व व्यावसायिक आणि अव्यावसायिक महाविद्यालयांमधील प्राचार्य, संचालक यांच्याकरिता 'ऑनलाइन शिक्षण' या विषयावरील वेबिनार आयोजित करण्यात आला होता. त्यात ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, ईएमआरसीचे संचालक डॉ. समीर सहस्रबुद्धे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, मानवविज्ञान शाखेच्या अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे, ई कंटेन्ट डेव्हलपमेंट अँड लर्निंग इनोव्हेशन सेंटरच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, आय. टी. कन्सल्टंट दीपक हर्डीकर आदी ऑनलाइनच्या माध्यमातून उपस्थित होते.

करोनामुळे आपण सर्व जण आता क्लासरूम टीचिंग वरून थेट ऑनलाइन शिक्षणाकडे आलो आहोत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंटरनेट कनेक्टिव्हिटीची अडचण यापुढील काळात जाणवू शकते. या सर्वांचा विचार करून नवीन शैक्षणिक वर्षाचे कामकाज ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्यासाठी विद्यापीठाने नवीन यंत्रणा विकसित केली आहे.

आत्तापर्यंत जवळजवळ दीड ते दोन हजार तासांची माहिती या नवीन व्यासपीठावर अपलोड केली असून त्या माध्यमातून दोन ते अडीच लाख विद्यार्थ्यांनी याचा फायदा घेतला आहे. या यंत्रणेची चाचणी यापूर्वी आपण विद्यापीठाशी संलग्नित दहा महाविद्यालयांमध्ये केलेली असून आता आणखी दहा महाविद्यालयांमध्ये या यंत्रणेची चाचणी करण्यात येणार आहे, असेही डॉ. करमळकर यांनी सांगितले आहे.

### स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षणाचे प्रवेश सुरू

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाअंतर्गत यूपीएससी आणि एमपीएससी स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रवेश परीक्षा घेऊन दिला जातो. या वर्षी स्पर्धा परीक्षापूर्व प्रशिक्षण वर्गासाठी प्रवेश मिळवण्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाइन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले आहेत. यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्टपर्यंत आहे. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पूर्व परीक्षा देणे आवश्यक आहे. त्यातून गुणवत्तेनुसार प्रवेश निश्चित केला जाणार आहे. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना दहमहा विद्यावेतन दिले जाणार आहे. प्रवेशाची अधिक माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**Prabhat: 13.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय

## 'उपस्थिती' अटीतून विद्यार्थ्यांची सुटका

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १२** - करोना संकटामुळे महाविद्यालयात ऑनलाइन शिक्षण सुरू आहे. त्यामुळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांची किमान ७५ टक्के उपस्थितीची अट शिथिल करण्याची मागणी होत होती. त्या पार्श्वभूमीवर यंदाच्या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबतची अट शिथिल करण्याचा निर्णय संबंधित महाविद्यालय व शैक्षणिक संस्थांनी त्यांच्या स्तरावर घ्यावा, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्पष्ट केले.

करोनामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाने मार्गदर्शक तत्वे प्रसिद्ध केले. त्यानुसार २५ टक्के अभ्यासक्रम ऑनलाइन व ७५ टक्के अभ्यासक्रम प्रत्यक्षात वर्गात पूर्ण करणे अपेक्षित आहे. त्यानुसार विद्यापीठ विभाग व महाविद्यालयांना ऑनलाइन शिक्षण सुरू करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे बहुतांश महाविद्यालयात ऑनलाइन शिक्षण सुरू आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांची भौगोलिक परिस्थिती विचारात घेता एकाचवेळी सर्व विद्यार्थ्यांना परिपूर्ण साधने उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. सर्व तासिकांना ऑनलाइन उपस्थित राहणे काही विद्यार्थ्यांना शक्य नाही.

सर्व विद्यार्थ्यांना वर्गात ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य आहे. मात्र, करोनामुळे राज्य शासनाने टाळेबंदीचा कालावधी हा विद्यार्थ्यांचा उपस्थिती कालावधी म्हणून ग्राह्य धरावा, अशा सूचना यापूर्वीच दिलेल्या आहेत.

त्यानंतर मंगळवारी विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने उपस्थितीत शिथिलता बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. त्यात यावर्षीच्या पहिल्या सत्रात विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत शिथिलता देण्याचा निर्णय संबंधित महाविद्यालय व संस्थांनी घेण्याचे सूचित केले आहे.

**Prabhat: 13.8.2020**

## शिक्षण ऑन'लाइन'वर कधी येणार?

### २५ टक्के विद्यार्थ्यांसमोर अडचण : ५१८ महाविद्यालयांची स्थिती

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १२ - बहुसंख्य महाविद्यालयांनी महाविद्यालयांनी ऑनलाइन शिक्षणाची यंत्रणा सज्ज ठेवून त्याचा वापर करण्यास सुरुवात केली आहे. काही महाविद्यालयांची तयारीही सुरू आहे. ७५ टक्के विद्यार्थ्यांकडे ऑनलाइन शिक्षणाची साधने उपलब्ध आहेत. ५ टक्के विद्यार्थ्यांकडे काहीच साधने नाहीत. २० टक्के विद्यार्थ्यांकडे इंटरनेट कनेक्शन व विजेची अडचण असल्याचे उघड झाले आहे. ज्या विद्यार्थ्यांकडे साधने उपलब्ध नाहीत, त्यांच्यापर्यंतही शिक्षण पोहचविण्यासाठी विद्यापीठ, महाविद्यालयांना खास उपाययोजना अंमलात आणाव्या लागणार आहेत.**



**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला मार्ग शोधावा लागणार**

करोनामुळे शासनाने ऑनलाइन शिक्षण पद्धतीस प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी ऑनलाइन शिक्षण सुरू केले आहे. पण, यासाठी पुरेशा सुविधा नसल्यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, याची दक्षता महाविद्यालयांना घ्यावी लागणार आहे. सर्वच विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाच्या प्रवाहात आणावेच लागणार आहे.

पुणे विद्यापीठाने पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांमधील अनुदानित व विनाअनुदानित अशा एकूण ५१८ महाविद्यालयांकडून ऑनलाइन शिक्षणाच्या उपलब्ध असलेल्या विद्यार्थ्यांकडील संसाधनांची माहिती मागवली होती. अँड्रॉइड मोबाइल, टॅब, व्हॉट्सॲप, ई-मेल आयडी, फेसबुक अकाऊंट, वायफाय सुविधा, मोबाइल इंटरनेट, स्वतंत्र अभ्यासाची जागा, संगणक, लॅपटॉप, टेलिग्रॉम अकाऊंट, लँडलाइन दूरध्वनी, केबल, डीश टीव्ही आदींची माहिती मागवण्यात आली. उपलब्ध झालेल्या माहितीचे मूल्यमापन तयार करुन त्याबाबतचा अहवाल पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाकडे सादर केला आहे.

विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. मोहन खताळ यांनी प्राचार्यांशी संवाद साधला. ऑनलाइन शिक्षणासह इतर विविध बाबींचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. विद्यार्थ्यांचे प्रवेश, फी भरण्यास सवलत, कागदपत्र पडताळणी याबाबतही त्यांनी सूचना दिल्या आहेत. यावर आता तातडीने कार्यवाही केल्यास विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

> "ऑनलाइन शिक्षण प्रभावीपणे वापरण्यासाठी सर्वच महाविद्यालयांना कामकाज करावे लागणार आहे. प्राचार्यांनी शासनस्तरावरील प्रलंबित काही प्रश्न बैठकीत मांडले आहेत. ते सोडवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. शासनस्तरावर पाठपुरावाही करण्यात येणार आहे.
>
> – डॉ. मोहन खताळ, उच्च शिक्षण सहसंचालक, पुणे विभाग

**Prabhat: 13.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# परीक्षांना केंद्राची अनुमती

## सर्वोच्च न्यायालयात 'यूजीसी'च्या भूमिकेला पाठबळ



लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

### ...तर शैक्षणिक दर्जावर परिणाम

अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याचा महाराष्ट्र आणि दिल्ली सरकारचा निर्णय उच्च शिक्षणाच्या दर्जावर परिणाम करणारा असून, तो विद्यार्थ्यांच्या हिताचा नाही, अशी भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाने गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे मांडली. अंतिम वर्षांची परीक्षा न घेता पदवी दिली जावी, अशी मागणी केली जात असली तरी असे पाऊल विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी चुकीचे ठरेल, असे आयोगाने म्हटले आहे. - सविस्तर/देशविदेश

**नवी दिल्ली :** अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) भूमिकेला केंद्र सरकारने पाठबळ दिले आहे. सर्व विद्यापीठांना अंतिम वर्षांच्या परीक्षा घेण्यास अनुमती देण्यात आल्याची माहिती केंद्रीय गृहमंत्रालयाच्या वतीने गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात देण्यात आली. या प्रकरणावर आज, शुक्रवारी सुनावणी होणार आहे.

परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने ६ जुलै रोजी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या होत्या. परीक्षा ऑनलाइन, ऑफलाइन किंवा संमिश्र पद्धतीने घेण्याची मुभाही आयोगाने दिली. या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण कराव्यात, अशा सूचना आयोगाने विद्यापीठांना दिल्या होत्या.

या प्रकरणात भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्रालाही दिले होते. त्यावर भूमिका मांडताना केंद्रीय गृहमंत्रालयाने आयोगाच्या निर्णयाचे समर्थन करीत परीक्षांना अनुमती देण्यात आल्याचे स्पष्ट केले. टाळेबंदी शिथिलीकरणाच्या तिसऱ्या टप्प्यातही शैक्षणिक संस्था ३१ ऑगस्टपर्यंत बंद असल्या तरी अंतिम वर्षांच्या परीक्षा व मूल्यमापनाठी त्यांना निर्बंधातून सूट देण्यात आल्याचे गृहमंत्रालयाने न्यायालयात सांगितले.

### हस्तक्षेपास कर्नाटक उच्च न्यायालयाचा नकार

बेंगळूरु : कर्नाटकमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी होणाऱ्या प्रवेश परीक्षेत हस्तक्षेप करण्यास कर्नाटक उच्च न्यायालयाने गुरुवारी नकार दिला. येत्या १९ ऑगस्टला नियोजित असलेल्या या परीक्षा घेण्यास आव्हान देणाऱ्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने हा निर्णय दिला. करोना फैलावाच्या पार्श्वभूमीवर ही परीक्षा पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका दाखल करण्यात आली होती. या परीक्षेचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यावर काहीही परिणाम होणार नसल्याने ती तातडीने घेण्याचे कारण नाही, असे याचिकाकर्त्यांनी म्हटले होते.

लोकसत्ता Fri, 14 August 2020 https://epaper.loksatta.com/c/54215131

# दहावी, बारावीच्या फेरपरीक्षा ऑक्टोबरमध्ये

लोकसत्ता प्रतिनिधी



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (राज्य मंडळ) दहावी आणि बारावीच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा यंदा ऑक्टोबरमध्ये घेण्याचा विचार राज्य मंडळाकडून करण्यात येत आहे. मात्र, ऑक्टोबरमधील परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना अकरावीला प्रवेश मिळणार का याबाबत संदिग्धता आहे.

फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणाऱ्या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या किंवा एटीकेटी असलेल्या विद्यार्थ्यांना ऑक्टोबरमधील परीक्षा देण्याची संधी मिळत असे. मात्र, पाच वर्षांपूर्वी मंडळाने नियमात बदल करून फेरपरीक्षा जुलैमध्ये घेण्यास सुरुवात केली. जुलै-ऑगस्टमधील परीक्षांचा निकाल साधारण महिन्याभरात जाहीर करून विद्यार्थ्यांना त्याच वर्षी अकरावीला प्रवेश दिला जात होता. यंदा करोनाच्या प्रादुर्भावामुळे या परीक्षांचे निकाल दरवर्षीपेक्षा उशिरा जाहीर झाले. फेब्रुवारी-मार्चमधील परीक्षांचे निकालच जुलै महिन्यात जाहीर झाले. त्यामुळे यंदा जुलैमध्ये फेरपरीक्षा घेणे शक्य झाले नाही. आता ऑक्टोबरमध्ये फेरपरीक्षा घेण्याचा विचार राज्य मंडळ करत आहे. याबाबत गुरुवारी मंडळाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यानुसार ६ ऑक्टोबरपासून परीक्षा घेण्याचे संभाव्य वेळापत्रक मंडळाने तयार केले आहे. विभागीय मंडळांकडून या वेळापत्रकावर १७ ऑगस्टपर्यंत सूचना मागवण्यात आल्या आहेत. विभागीय मंडळाच्या सूचनांनंतर आवश्यक त्या प्रक्रिया पूर्ण करून मंडळाकडून अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे.

मंडळाने फेरपरीक्षा घेण्याची तयारी सुरू केली असली तरी या फेरपरीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना यंदाच अकरावीला प्रवेश देण्यात येणार का याबाबत अद्यापही संदिग्धता आहे. यंदाची अकरावीची प्रवेश प्रक्रियाही अद्याप सुरू झालेली नाही. प्रवेश प्रक्रियेच्या शेवटच्या टप्प्यांत विद्यार्थ्यांना एटीकेटी किंवा फेरपरीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो. या विद्यार्थ्यांची संख्याही तुलनेने कमी असते. यंदा ऑक्टोबरमध्ये परीक्षा घेऊन त्याचा लवकरात लवकर निकाल जाहीर केल्यास विद्यार्थ्यांना अकरावीला प्रवेश देता येऊ शकेल, असे एका मुख्याध्यापकांनी सांगितले.

### केंद्रीय शिक्षण मंडळाच्या परीक्षांवरून वाद

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) फेरपरीक्षा घेणे आवश्यक असल्याचे स्पष्ट करून त्या घेण्याची सूचना दिली आहे. मात्र, सद्य:स्थितीत या परीक्षा घेण्यास पालकांनी विरोध केला असून याबाबत काही संघटनांनी सर्वोच्च न्यायालयाना पत्र लिहून हस्तक्षेप करण्याची विनंती केली आहे. त्यामुळे राज्य मंडळाने ऑक्टोबरमध्ये परीक्षा घेण्याचा निर्णय घेतल्यास पालक तो स्वीकारणार का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

लोकसत्ता Fri, 14 August 2020 https://epaper.loksatta.com/c/54215238

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

### आता नवीन शैक्षणिक वर्षाचे कामकाज होणार ऑनलाईन; पुणे विद्यापीठातर्फे यंत्रणा विकसित

**पुणे :** ऑनलाईन पद्धतीने शिक्षण घेताना मुख्यत्वे करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंटरनेट कनेक्टिव्हिटी आणि बॅण्डविड्थ यांची अडचण यापुढील काळात जाणवू शकते. या सर्वांचा विचार करून नवीन शैक्षणिक वर्षाचे कामकाज ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यासाठी विद्यापीठाने नवीन यंत्रणा विकसित केली आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून कमी कनेक्टिव्हीटी असलेल्या भागांमध्ये विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण घेणे शक्य होणार आहे, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी दिली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे सर्व व्यावसायिक आणि अव्यावसायिक महाविद्यालयांमधील प्राचार्य आणि संचालक यांच्याकरिता व ऑनलाईन शिक्षण विषयावर वेबिनार आयोजित करण्यात आला होता. यामध्ये डॉ. करमळकर यांच्यासह प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, ईएमआरसीचे संचालक डॉ. समीर सहस्रबुद्धे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, ई कंटेन्ट डेव्हलपमेंट अँड लर्निंग इनोव्हेशन सेंटरच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर आदी उपस्थित होते.

या ऑनलाईन वेबिनारमध्ये प्राचार्य / संचालक यांना मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. करमळकर म्हणाले, कोरोनामुळे आपण सर्व जण आता क्लासरूम टीचिंगवरून थेट ऑनलाईन शिक्षणाकडे आलो आहोत. आत्तापर्यंत जवळजवळ दीड ते दोन हजार तासांची माहिती या नवीन व्यासपीठावर अपलोड करण्यात आली आहे. या माध्यमातून दोन ते अडीच लाख विद्यार्थ्यांनी याचा फायदा घेतला आहे.

**Kesari:14.8.2020**

### 'परीक्षा रद्द'च्या भूमिकेवर ठाम

**पुणे :** राज्यातील अकृषी विद्यापीठांतील अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष पदवी परीक्षांबाबत राज्य सरकारने मांडलेली भूमिकाच सर्वोच्च न्यायालयात सादर केली आहे. करोनाच्या संसर्गामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या परीक्षा महाराष्ट्रात होऊ शकत नाहीत, हेच आम्ही सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे.

परीक्षा घेणार नाही, असे कोणत्याही 'जीआर'मध्ये म्हटलेले नाही. परिस्थिती सामान्य झाल्यावर विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याचा पर्याय खुला आहे, असे सामंत यांनी स्पष्ट केले आहे. पदवी परीक्षा सप्टेंबरअखेरपर्यंत घ्याव्यात, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने देशातील सर्व विद्यापीठांना दिले आहेत. 'यूजीसी'च्या या निर्णयाच्या विरोधात युवा सेना, प्रा. धनंजय कुलकर्णी यांच्यासह विद्यार्थी संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली आहे. त्यावरील सुनावणी आज, शुक्रवारी (१४ ऑगस्ट) होणार आहे.

**Maharashtra Times: 14.8.2020**

### विद्यार्थ्यांसाठी अॅप

**पुणे :** अकरावीसह, एमबीए, इंजिनीअरिंग, फार्मसी व पॉलिटेक्निकल विद्यार्थ्यांना पसंतीक्रम नोंदविण्यासह शाखानिवडीसाठी मदत व्हावी, यासाठी विद्यार्थी मित्र संस्थेने वेबसाइट आणि 'अॅप'द्वारे विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यामध्ये विनामूल्य मार्गदर्शन व 'कट-ऑफ'ची यादी उपलब्ध होणार आहे. 'विद्यार्थ्यांचे गुण व गुणवत्ता यादी क्रमांक, संवर्ग, कोणत्या शहरात प्रवेश पाहिजे आदी बाबी पडताळून त्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे,' असे 'विद्यार्थी मित्र'चे संस्थापक के. रवींद्र यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना http://cutoff.vidyarthimitra.org ही साइट पाहता येईल किंवा 'प्ले-स्टोअर'वरून 'विद्यार्थी मित्र अॅप' डाउनलोड करता येईल.

**Maharashtra Times: 14.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# ग्रंथालयांमुळे मिळते शहराला ओळख



फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या (एफटीआयआय) नूतनीकरण केलेल्या ग्रंथालयाचे उद्घाटन अशोक जहागीरदार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी डॉ. मोहन आगाशे, प्रकाश मगदूम, भूपेंद्र कैंथोला, सय्यद रबीहाश्मी, धीरज मेश्राम, आर. एन. पाठक उपस्थित होते.

**ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांचे मत**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'कोणत्याही शहराचे महत्त्व तेथील ग्रंथालयांमुळे वाढते. ग्रंथालयांमुळे शहर ओळखले जाते. लंडन हे शहर ब्रिटिश फिल्म इन्स्टिट्यूट आणि त्या इन्स्टिट्यूटमधील ग्रंथालयामुळे ओळखले जाते. एफटीआयआयमधील ग्रंथालय आता पुण्याची ओळख व्हावी,' अशी भावना ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांनी गुरुवारी व्यक्त केली.

फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या (एफटीआयआय) नूतनीकरण केलेल्या ग्रंथालयाचे उद्घाटन अशोक जहागीरदार यांच्या हस्ते करण्यात आले. इन्स्टिट्यूटचे पहिले संचालक गजानन जहागीरदार यांचे नाव या ग्रंथालयाला देण्यात आले आहे. गजानन जहागीरदार यांच्या स्मृतिदिनाच्याच दिवशी हा कार्यक्रम पार पडला. 'एफटीआयआय'चे माजी संचालक व अभिनेते डॉ. मोहन आगाशे, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाचे संचालक प्रकाश मगदूम, 'एफटीआयआय'चे संचालक भूपेंद्र कैंथोला, कुलसचिव सय्यद रबीहाश्मी, चित्रपट विभागाचे अधिष्ठाता धीरज मेश्राम, दूरचित्रवाणी विभागाचे अधिष्ठाता आर. एन. पाठक आणि ग्रंथपाल अनुराधा वाजिरे उपस्थित होते. ग्रंथालयात चित्रपट विद्यार्थ्यांसाठी आणि संशोधकांसाठी तीस हजारांपेक्षा अधिक पुस्तके आणि चार हजार ध्वनिमुद्रिका उपलब्ध आहेत.

'पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय आणि 'एफटीआयआय'मधील ग्रंथालये ही चित्रपट क्षेत्रासाठी महत्त्वाची ग्रंथालये आहेत. देशभर लौकिक असलेल्या 'एफटीआयआय'ला अनुकूल ग्रंथालयाची उभारणी झाली आहे,' असे गौरवोद्गार आळेकर यांनी काढले.

'दिवंगत कलाकारांच्या स्मृती जागवण्याच्या उपक्रमातून मागच्या पिढीतील लोकांचे नाव आणि त्यांचे कर्तृत्व याची ओळख नवीन पिढीला होत राहील,' असे आगाशे यांनी सांगितले.

'क्लासरूम थिएटरला सतीश बहादूर यांचे तसेच क्लासरूमला मणी कौल, रेणू सलुजा, सुधाकर ठकार आणि के. के. महाजन यांचे नाव देण्यात आले आहे. प्रीव्ह्यू थिएटर मनोहर श्याम जोशी यांच्या नावाने ओळखले जाऊ लागले आहे,' अशी माहिती कैंथोला यांनी दिली.

**सत्यजित राय यांनी सुचवले जहागीरदारांचे नाव**

गजानन जहागीरदार १२ जानेवारी १९६१ ते १९ जानेवारी १९६२ या एका वर्षासाठी तेव्हाच्या फिल्म इन्स्टिट्यूटचे पहिले संचालक होते. त्यांच्या निवडीची रंजक आठवण अशोक जहागीरदार यांनी सांगितली. ते म्हणाले, 'फिल्म इन्स्टिट्यूट सुरू झाल्यानंतर सरकारने संचालक म्हणून प्रख्यात दिग्दर्शक सत्यजित राय यांची निवड केली. गजानन जहागीरदार यांची निवड करावी, असे पत्र सत्यजित राय यांनी सरकारला पाठवले आणि त्यानंतर वडिलांची निवड झाली.'

**Maharashtra Times: 14.8.2020**

# 'टीचर्स ॲकॅडमी'चे बांधकाम रखडले

**उच्चशिक्षण मंत्र्यांकडून अधिकाऱ्यांची झाडाझडती**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्य सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असणाऱ्या टीचर्स ट्रेनिंग ॲकॅडमीचे बांधकाम रखडल्यामुळे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी महापालिका अधिकारी, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे (एमएसबीटीई) अधिकारी आणि कंत्राटदारांना खडे बोल सुनावले. 'काम त्वरित पूर्ण न झाल्यास, शिक्षकांच्या प्रशिक्षणाची रक्कम कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावी,' असे आदेशही सामंत यांनी दिले.

आधुनिक शिक्षण पद्धतीतील बदल लक्षात घेऊन प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी मॉडेल कॉलनीत 'एमएसबीटीई'च्या जागेत टीचर्स ट्रेनिग टीचर्स ट्रेनिंग ॲकॅडमी सुरू करण्यात येणार आहे. या ॲकॅडमीच्या बांधकामाचा आढावा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी घेतला. ॲकॅडमी काम २०१५ मध्ये सुरू झाले. मात्र, पाच वर्षांपासून हे काम पूर्ण झालेले नाही. निम्म्याहून अधिक रक्कम देऊन कामच झाले नसल्यामुळे सामंत यांनी कंत्राटदार आणि सल्लागार प्रतिनिधींना फैलावर घेतले.

इमारत उभारणीच्या २० कोटी रकमेपैकी १३ कोटी रुपये कंत्राटदाराला देण्यात आले आहेत. २०१४ मध्ये संबंधित कामाची निविदा काढण्यात आली होती. या कामासाठी १२ महिन्यांची मुदत देण्यात आली. परवानगी मिळाल्यानंतर २०१५ मध्ये हे काम सुरू करण्यात आले. परंतु आजही त्या ठिकाणी केवळ स्लॅब आणि कॉलमरूपी इमारत उभी राहिली आहे. मधला पाच वर्षांचा कालखंड गेल्यानंतर ३१ मार्चपर्यंत काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. कामाचा आढावा घेण्यासाठी सामंत यांनी भेट दिली असता, त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करून अधिकारी आणि कंत्राटदारावर प्रश्नांची सरबत्ती केली. 'काम न होताच कामाची रक्कम देता कशी,' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यापुढे शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा खर्च कंत्राटदाराकडून वसूल करण्यात यावा, असे आदेश सामंत यांनी दिले. येत्या १ डिसेंबर रोजी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते टीचर्स ट्रेनिंग सेंटरचे उद्घाटन केले जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, एकंदर कामाची परिस्थिती पाहता कंत्राटदाराला ही डेडलाइन पाळणे जवळपास अशक्यच असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**Maharashtra Times: 14.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

### 'शिक्षक प्रशिक्षण केंद्राचे डिसेंबरमध्ये उद्‌घाटन'

**पुणे :** राज्यातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी राज्य सरकार उभारत असलेले शिक्षक प्रशिक्षण केंद्र डिसेंबरपासून सुरू करण्यात येणार आहे. या केंद्राचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते १ डिसेंबरला उद्‌घाटन करण्यात येणार असल्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी केली.

केंद्र सुरू करण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या बांधकामाचा सामंत यांनी आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सामंत म्हणाले, 'आतापर्यंत शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि अन्य खासगी संस्थांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जात होते. मात्र राज्य शासनाने स्वतःचे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अन्य संस्थांमध्ये हे कार्यक्रम घेण्याची गरज नाही.

लोकसत्ता Fri, https

### 'सीईटी'बाबत आठ दिवसांत निर्णय

#### उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची घोषणा, '...तर बारावीच्या गुणांवर प्रवेश'

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** वैद्यकीय, अभियांत्रिकी, औषधनिर्माण आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेच्या (एमएचटी-सीईटी) आयोजनासाठी सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाचे (सीईटी सेल) आयुक्त पाहणी करत आहेत. पुढील सात-आठ दिवसांत अहवाल सादर झाल्यानंतर प्रवेश परीक्षेचा निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी दिली.

तसेच आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास बारावीच्या गुणांवर प्रवेश प्रक्रिया राबवण्याचेही संकेत सामंत यांनी दिले.

शिक्षक प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीच्या पाहणीनंतर सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. अंतिम वर्ष परीक्षा, शुल्क, सीईटी अशा विविध विषयांवर सामंत यांनी भाष्य केले. अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत सामंत म्हणाले, की राज्य शासनाने अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सर्वोच्च न्यायालयात सादर केले आहे. न्यायालयाच्या निर्णयानंतर पुढील निर्णय घेतला जाईल. करोना संसर्गाच्या काळात विद्यार्थ्यांना धोक्यात आणून परीक्षा न घेण्याची शासनाची भूमिका आहे. परीक्षा न घेण्याचा उल्लेख शासन निर्णयात नाही. गुणांकन सुधारू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाईल असे स्पष्ट करण्यात आले होते.

राज्यातील पाच-साडेपाच लाख विद्यार्थी सीईटी देत असल्याने ही परीक्षा तालुका, जिल्हास्तरावर घेण्यासाठी सीईटी सेलकडून पाहणी सुरू आहे. काही शाळा, महाविद्यालयांमध्ये विलगीकरण कक्ष करण्यात आले आहेत. तसेच परीक्षेसाठी संगणक व्यवस्था, अन्य यंत्रणा, पायाभूत सुविधा सक्षम आहे का हे तपासण्यात येत आहे. आणीबाणीची परिस्थिती आल्यास बारावीच्या गुणांवरच प्रवेश प्रक्रिया राबवण्याचा विचार होऊ शकतो. मात्र अनेक विद्यार्थ्यांना सीईटीचे गुण अधिक महत्त्वाचे वाटतात. या सगळ्याचा विचार करून निर्णय घेतला जाईल, असेही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले.



**औषधनिर्मिती विद्यापीठ औरंगाबादमध्ये प्रस्तावित**

औषधनिर्मितीशास्त्राचे स्वतंत्र विद्यापीठ औरंगाबादमध्ये सुरू करण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवण्यात आला आहे. या विद्यापीठासाठी २५ ते ३० एकर जागा देण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी मान्यही केले आहे. या विद्यापीठामुळे रोजगार निर्मितीही होऊ शकणार आहे. या प्रस्तावासह राज्याकडून केंद्राकडे गेलेल्या प्रस्तावांच्या पाठपुराव्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आल्याची माहितीही सामंत यांनी दिली.

**शुल्काबाबत लवकरच निर्णय**

करोनाच्या काळात महाविद्यालये बंद असल्याने व्यायामशाळा, प्रयोगशाळा, ग्रंथालये बंद आहेत. महाविद्यालयांचा वीज, देखभाल दुरुस्ती खर्चही होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क कमी करण्याची होत असलेली मागणी रास्त आहे. या संदर्भात शासनस्तरावर विचार सुरू आहे. लवकरच या बाबतचा निर्णय घेतला जाईल. तसेच अंतिम वर्षाच्या परीक्षा न झाल्याने विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परत द्यायचे, की पुढच्या वर्षाचे शुल्क म्हणून ग्राह्य धरायचे या बाबतही निर्देश दिले जातील, असे सामंत यांनी नमूद केले.

**कुलगुरूंसह सर्वांत जास्त बैठका**

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री झाल्यापासून प्रत्येकवेळी सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंशी चर्चा केली आहे. परीक्षांबाबतही कुलगुरूंशी चर्चा करूनच निर्णय घेतला. काही लोक खोटे बोलून गैरसमज पसरवत आहेत. कुलगुरूंबरोबर गेल्या पाच वर्षांत घेतल्या गेल्या नाहीत एवढ्या बैठका मी मंत्री झाल्यापासून घेतल्या आहेत, असे सामंत म्हणाले.

लोकसत्ता Fri, 14 August 2020 https://epaper.loksatta.com/c/54215424

### परीक्षा न घेतल्यास शैक्षणिक दर्जावर परिणाम

#### विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** अंतिम वर्षाच्या परीक्षा या वर्षी न घेण्याचा महाराष्ट्र व दिल्ली सरकारचा निर्णय उच्च शिक्षणाच्या दर्जावर परिणाम करणारा असून तो विद्यार्थ्यांच्या हिताचा नाही, असे प्रत्युत्तर विद्यापीठ अनुदान आयोगाने गुरुवारी सर्वोच्च न्यायालयात सादर केले.

दोन्ही राज्यांनी दिलेल्या निवेदनावर आयोगाला आपले म्हणणे मांडण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. करोनाच्या आपत्तीमुळे परीक्षा घेता येणार नसेल तर, पुढील शैक्षणिक वर्षदेखील कसे सुरू करता येईल? महाराष्ट्र सरकारने मात्र परस्परविरोधी भूमिका घेतली असल्याचा मुद्दा आयोगाच्या निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. अंतिम परीक्षा न घेता पदवी दिली जावी अशी मागणी केली जात असली तरी असे पाऊल विद्यार्थ्यांचे भविष्य बरबाद करणारे ठरेल. अंतिम परीक्षा नको मात्र, पुढील शैक्षणिक वर्ष सुरू करणे विद्यार्थ्यांचे हिताचे ठरेल, अशी राज्यांची विसंगत भूमिका योग्य नसल्याचे आयोगाचे म्हणणे आहे.

परीक्षा घेण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने ६ जुलै रोजी सूचनापत्र जाहीर केले होते. त्यानुसार, परीक्षा घेण्यासंदर्भात सविस्तर सूचना केली गेली होती. तसेच, परीक्षा देता न येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष संधी




दिली जाईल व नव्या तारखा जाहीर केल्या जातील. परीक्षा ऑनलाइन, ऑफलाइन व दोन्ही एकत्रित पद्धतीने अशा तीन मार्गांने देण्याची मुभाही देण्यात आली आहे. शिवाय, परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण करायच्या असल्याने पुरेसा कालावधीही विद्यापीठांकडे उपलब्ध आहे. इतकी लवचीक भूमिका आयोगाने घेतली असताना परीक्षा रद्द करण्याची गरज नाही, असे आयोगाचे म्हणणे आहे.

विविध कुलगुरूंची मते जाणून घेतल्यानंतर महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने १३ जुलै रोजी बैठक घेऊन अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याचा निर्णय घेतला होता, असे निवेदन राज्य सरकारच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात सादर केले आहे. दिल्ली सरकारनेही राज्य विद्यापीठांना पत्र लिहून परीक्षा रद्द करण्याचा निर्णय कळवला आहे. मात्र, आयोगाच्या सूचना राज्य सरकार व विद्यापीठांना लागू होऊ शकत नाही, हा दावा चुकीचा असल्याची भूमिका विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतली आहे. प्रत्येक विद्यापीठ आयोगाच्या सूचनांशी बांधील असते, असेही आयोगाचे म्हणणे आहे.

विविध राज्यांतील विद्यार्थ्यांनी परीक्षा घेण्याच्या आयोगाच्या भूमिकेला आव्हान दिले असून सर्व याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात एकत्रित सुनावणी होत आहे. परीक्षा नसेल तर पदवीही नसेल. पदवी देण्याचा अधिकार फक्त विद्यापीठ अनुदान आयोगाला असून राज्य सरकारे आयोगाच्या नियमांमध्ये बदल करू शकत नाहीत, असा मुद्दा महाधिवक्ता तुषार मेहता यांनी आयोगाच्या वतीने न्यायालयात मांडला होता.

लोकसत्ता Fri, 14 August 2020 https://epaper.loksatta.com/c/54215495

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

### बारावीत महाविद्यालय बदलता येणार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १३ - विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार दरवर्षीप्रमाणे यंदाही इयत्ता बारावीमध्ये कनिष्ठ महाविद्यालय बदलून देण्याची कार्यवाही संबंधित कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर करण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने यास मान्यता दिली आहे.

अकरावीमध्ये प्रवेश घेऊन उत्तीर्ण झाल्यानंतर बारावीसाठी कनिष्ठ महाविद्यालय बदलण्यासाठी विद्यार्थी धडपड करत असतात. सहजासहजी महाविद्यालय बदलून मिळत नसल्याची विद्यार्थ्यांची तक्रार असते. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून लागू असेल, असा आदेश शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव राजेंद्र पवार यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालकांना दिला. ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या डाटाबेसमध्ये विद्यार्थ्यांनी महाविद्यालय बदलल्यानंतर आवश्यक सुधारणा करून घेण्याची कार्यवाहीही महाविद्यालयांनी करणे आवश्यक आहे.



**शालेय शिक्षण विभागाची मान्यता**

**या कारणांसाठी मुभा**

- महाविद्यालय घरापासून लांब असणे
- पालकांची बदली होणे
- वैद्यकीय कारणास्तव
- शाखा बदलून मिळणे
- राहण्याचा पत्ता बदलणे
- बारावीमध्ये बोर्ड बदल

Prabhat: 14.8.2020

### परीक्षा घेण्याची जबाबदारी युजीसीची

नवी दिल्ली, दि. १३ - यूजीसी ही स्वतंत्र संस्था आहे. विद्यापीठांमध्ये परीक्षा घेण्याची जबाबदारी यूजीसीची असून कोणत्याही राज्य सरकारची नाही. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करता सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेण्याचा हक्क असल्याचे यूजीसीने पुन्हा आपल्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. विद्यापीठांमधील अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याच्या याचिकांना उत्तर म्हणून यूजीसीने सर्वोच्च न्यायालयात आज (एससी) प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. या याचिकेवर उद्या पुन्हा सुनावणी होणार आहे.

करोनाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली सरकार आणि महाराष्ट्र सरकारने आपापल्या राज्यातील

**न्यायालयात यूजीसीचे प्रतिज्ञापत्र सादर**

विद्यापीठांमधील अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यास विरोध दर्शविला आहे. दरम्यान, गृह मंत्रालयानेही सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. गृह मंत्रालयाने म्हटले आहे की, देशभरातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून ६ जुलै २०२० रोजी अधिसूचना जारी करून विद्यापीठे आणि संस्थांकडून परीक्षा घेण्यास परवानगी दिली आहे. हा निर्णय मानव संसाधन विकास मंत्रालय करण्यात आलेल्या आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५च्या कलमानुसार देण्यात आले आहे.

Prabhat: 14.8.2020

### नव्या शैक्षणिक धोरणासाठी कृती समिती

#### नव्या विद्यापीठांच्या निर्मितीऐवजी विकेंद्रीकरणावर भर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १३ - केंद्र सरकारने लागू केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करण्यासाठी राज्यात लवकर तज्ज्ञांची कृती समिती स्थापन केली जाणार असल्याचे उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. धोरणातील विविध तरतुदींची अंमलबजावणी व बदल करण्याबाबत पुढील एक-दोन महिन्यांत निर्णय घेतला जाणार असल्याचे ते म्हणाले.

सध्या नवीन विद्यापीठांची निर्मिती करण्याऐवजी विद्यापीठांचे विकेंद्रीकरणावर भर दिला जाणार आहे. स्वतंत्र कोकण विद्यापीठ करण्यास तेथील अनेकांचा नकार आहे. त्यामुळे विद्यापीठांची उपकेंद्र चांगल्या प्रकारे विकसित केली जातील. त्याअनुषंगाने शैक्षणिक धोरणाचाही आधार घेतला जाईल. तज्ज्ञ समिती त्यावर अभ्यास करेल, असे सामंत यांनी सांगितले.

**केवळ शिक्षण शुल्क घेणे अपेक्षित**

पदवीच्या प्रथम व द्वितीय वर्ष विद्यार्थ्यांची परीक्षा होणार नाहीत. महाविद्यालये बंद आहेत. त्यामुळे जिम, प्रयोगशाळा, ग्रंथालये बंद आहेत. देखभाल-दुरूस्तीचाही खर्च नाही. त्यामुळे प्रवेश शुल्कामध्येही या बाबींचा समावेश न करता केवळ शिक्षण शुल्क घेणे अपेक्षित आहे.

**आदित्य ठाकरेंची निवड योग्यच**

पद्म पुरस्कार समितीच्या अध्यक्षपदी पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या नियुक्तीला भाजपाने विरोध केला आहे. त्याबाबत उदय सामंत म्हणाले, राजकारणामध्ये किती वर्षे आहे, यापेक्षा त्यामध्ये गुणवत्ता किती आहे हे पाहायला हवे. त्यामुळे आदित्य ठाकरे यांच्या निवडीत काहीच वावगे नाही.

Prabhat: 14.8.2020

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# विद्यापीठ विभाजनाला पुन्हा गती?

## शैक्षणिक धोरणातील प्रस्तावित संलग्नत्व मर्यादेमुळे चर्चा

मटा विशेष

Harsh.Dudhe
@timesgroup.com
Tweet : @HarshDudheMT

**विद्यापीठाची सद्यस्थिती**

| जिल्हा | कॉलेज | इन्स्टिट्यूट |
|---|---|---|
| पुणे | ४२८ | १२७ |
| नाशिक | १६४ | २६ |
| नगर | १३८ | २२ |
| दादरा नगर हवेली | ३ | १ |



पुणे : राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यापीठांनी कॉलेजांना संलग्नत्व देण्याबाबत घातलेल्या प्रस्तावित मर्यादेमुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विभाजनाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेला आला आहे. सुमारे नऊ वर्षांपूर्वी तत्कालीन राज्य सरकारने नेमलेल्या समितीने विद्यापीठ विभाजनाची योजना सादर केली होती. त्याला आता गती मिळणार का, असाही प्रश्न विचारला जात आहे.

'एका विद्यापीठाला कमाल ३०० महाविद्यालयांना संलग्नत्व देता येईल,' असे वक्तव्य केंद्रीय शिक्षणमंत्री रमेश पोखरियाल निशंक यांनी नुकतेच केले. त्यावरून पुन्हा एकदा विद्यापीठांवरील महाविद्यालयांचा बोजा आणि त्यामुळे अपरिहार्य असलेले त्यांचे विभाजन याबाबत शैक्षणिक वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विभाजन करण्यासाठी प्रा. राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सरकारने २०११ मध्ये समिती नेमली होती. त्या समितीने नगर आणि नाशिक येथील उपकेंद्रे बळकट करून, पाच वर्षांनी या उपकेंद्रांचे विद्यापीठात रूपांतर करण्याचा प्रस्ताव दिला होता. संलग्न महाविद्यालयांच्या भरमसाट संख्येमुळे परीक्षा घेणे हेच विद्यापीठांचे प्रमुख काम होऊन बसले आहे. देशातील अनेक नामांकित विद्यापीठांना सध्या ६०० पेक्षा अधिक महाविद्यालये संलग्न आहेत. त्यामुळे विद्यापीठांच्या, तसेच महाविद्यालयांच्या गुणवत्तेवर परिणाम होत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विस्ताराचा विचार करायचा, तर विद्यापीठाचे कार्यक्षेत्र पुणे, नगर, नाशिक या जिल्ह्यांसह दादरा नगर हवेलीमध्ये आहे. या तिन्ही जिल्ह्यांतील एकूण संलग्न महाविद्यालयांची संख्या ९०५ एवढी आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील सूचनेची अंमलबजावणी करायची झाल्यास पुणे, नगर आणि नाशिक या तीन जिल्ह्यांसाठी तीन स्वतंत्र विद्यापीठे निर्माण करण्याची गरज आहे.

"महाविद्यालयांचे नियमन आणि गुणवत्ता राखणे हे महत्त्वाचे मुद्दे आहेत. त्यासाठी महाविद्यालयांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण ठेवावे लागेल. मोठ्या शैक्षणिक संस्थांची सात ते आठ महाविद्यालये असतील, तर त्यांचे एकत्रित क्लस्टर विद्यापीठ तयार करता येईल.
- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

नगर आणि नाशिकला स्वतंत्र विद्यापीठे निर्माण करावीत, ही अनेक वर्षांपासून आमची मागणी आहे. शैक्षणिक गुणवत्ता राखण्यासाठी त्याची आवश्यकता आहे. नव्या विद्यापीठांसाठी मान्यता देण्याचे धोरण केंद्र सरकारने स्वीकारले असल्याने, त्याचा फायदा राज्याला होईल.
- डॉ. ए. पी. कुलकर्णी, विद्यापीठ विकास मंच

विद्यापीठ निर्मितीला भरपूर खर्च लागणार असल्याने, ताकवले समितीच्या शिफारशींवर पुढे चर्चा झाली नाही. अनेक सदस्यांनी तर संलग्न महाविद्यालये १५०च असावीत, अशी सूचना केली होती. विद्यापीठ, राज्य सरकार आणि लोकवर्गणीतून नवी विद्यापीठे तयार करावीत.
- डॉ. गजानन एकबोटे, कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

राष्ट्रीय ज्ञान आयोगात विद्यापीठांना संलग्न महाविद्यालयांची संख्या कमी ठेवण्याचा मुद्दा मांडण्यात आला होता. आताची महाविद्यालयांची संख्या पाहता ते योग्य आहे. महाविद्यालयांना शैक्षणिकदृष्ट्या बळकट करून त्यांना पदवी प्रदान करणाऱ्या महाविद्यालयांचा दर्जा मिळावा, हा मुख्य उद्देश या धोरणामागे आहे.
- डॉ. भूषण पटवर्धन, उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग

### राज्यात अनेक विद्यापीठे शक्य

राज्यात मुंबई विद्यापीठ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ या विद्यापीठांना ३०० पेक्षा अधिक महाविद्यालये संलग्न आहेत. त्यांचे विभाजन करणे शक्य आहे.

**Maharashtra Times:14.8.2020**

लोकमत

# पुरवणी परीक्षेसाठी राज्य मंडळाची चाचपणी

लोकमत न्युज नेटवर्क

पुणे : राज्यात पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा तसेच एमएचटी-सीईटीबाबत गोंधळाची स्थिती असताना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी व बारावीच्या पुरवणी परीक्षेची चाचपणी सुरु केली आहे. ही परीक्षा ऑक्टोबर महिन्यात घेण्याची तयारी सुरु केली असून, याबाबतच्या सूचना सर्व विभागीय मंडळांकडून मागविण्यात आल्या आहेत. विभागांकडून आलेल्या सूचना तसेच कोरोनाची स्थिती विचारात घेऊन परीक्षेच्या तारखांबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल.

कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे राज्य शासनाने पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. पण विद्यापीठ अनुदान आयोगाने परीक्षा घेण्याबाबत कठोर भूमिका घेतल्याने हा मुद्दा आता सर्वोच्च न्यायालयात गेला आहे. तसेच एमएचटी-सीईटीवरही अद्याप निर्णय झालेला नाही. सीईटी सेलच्या आयुक्तांकडून सर्वेक्षण सुरु असल्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले आहे. शाळा सुरु करण्याबाबतही तळ्यात-मळ्यात असल्याने विद्यार्थी-पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यातच राज्य शिक्षण मंडळाने दहावी व बारावीच्या पुरवणी परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक तयार केले आहे.

लेखी, प्रात्यक्षिक तसेच तोंडी परीक्षा ऑक्टोबर महिन्यात घेण्याचे नियोजन आहे. हे वेळापत्रक सर्व विभागीय मंडळांना पाठविण्यात आले आहे. त्यावर सूचना व दुरुस्त्या मागविण्यात आल्या आहेत. दरवर्षी जुलै महिन्यात या परीक्षा होतात. पण यंदा कोरोनामुळे निकाल विलंबाने लागल्याने पुरवणी परीक्षा होणार की नाही, याबाबतचा प्रश्न होता. पण राज्य मंडळाकडून संभाव्य वेळापत्रक तयार केल्याने आता या परीक्षेची चर्चा सुरु झाली आहे. दरवर्षी संभाव्य तारखा निश्चित करुन विभागीय मंडळांकडून सूचना मागविल्या जातात. या वर्षीही त्याच प्रक्रियेनुसार कामकाज सुरु आहे. पण यंदा कोरोनामुळे परिस्थिती वेगळी आहे.

### राज्य शासन कोंडीत

पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याच्या भूमिकेवर राज्य शासन अद्यापही ठाम आहे. तर दुसरीकडे सीईटी तसेच पुरवणी परीक्षांची चाचपणी सुरु करण्यात आली आहे. या परीक्षा घ्यायचे झाल्यास पदवीच्या परीक्षा न घेण्याचा निर्णय वादात सापडू शकतो. पुरवणी परीक्षा न घेतल्यास एटीकेटी प्राप्त विद्यार्थ्यांपैकी अनेकांचे वर्ष वाया जाऊ शकते. तर सीईटी न झाल्यास व्यावसायिक अभ्यासक्रमांना बारावीच्या गुणांवर प्रवेश द्यावा लागेल. पण अनेक विद्यार्थी बारावीच्या परीक्षेऐवजी सीईटीचाच कसून अभ्यास करतात. अशा विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या स्पर्धेत फटका बसू शकतो.

Pune Main
Page No. 2 Aug 15, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

### सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद, १८ ऑगस्टला पुढील सुनावणी

# आता परीक्षा कशी घेता येईल?

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

नवी दिल्ली : एप्रिलमध्ये हजार करोना रुग्ण असताना अंतिम वर्षांच्या परीक्षा घेता आल्या नाहीत, आता तर लाखो रुग्ण आहेत, मग परीक्षा कशी घेता येईल, तिसऱ्या वर्षांच्या विद्यार्थ्यांचा जीव पहिल्या वा दुसऱ्या वर्षांच्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी महत्त्वाचा असतो का, असा युक्तिवाद युवासेनेच्या वतीने ज्येष्ठ वकील श्याम दिवाण यांनी सर्वोच्च न्यायालयात केला.

युवासेनेचे नेते आदित्य ठाकरे यांनी केलेल्या याचिकेवर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. अंतिम वर्षांच्या परीक्षा रद्द करण्याची मागणी ठाकरे यांनी याचिकेद्वारे केली आहे. विधि शाखेचा विद्यार्थी यश दुबे यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी युक्तिवाद केला. परीक्षा रद्द करण्याच्या मागणीसाठी दाखल झालेल्या याचिकांवर न्या. अशोक भूषण, न्या. सुभाष रेड्डी आणि न्या. एम. आर. शहा यांच्या पीठासमोर सुनावणी होत आहे. पुढील सुनावणी १८ ऑगस्ट रोजी होणार आहे.

**झाले काय?** : यश दुबे यांच्या वतीने युक्तिवाद करताना सिंघवी म्हणाले की, शिकवणे आणि परीक्षा देणे यांचा एकमेकांशी थेट संबंध आहे. जर शिकवलेच गेले नाही तर परीक्षा तरी कशी घेणार? साथरोगाने अभूतपूर्व परिस्थिती निर्माण केली आहे, शिक्षणाने नव्हे! साथरोग कुणालाही होऊ शकतो. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने न्यायदालनात प्रत्यक्ष सुनावणी घेण्यासही मनाई केली आहे. मग आपल्या हक्कांबद्दल मी आग्रह धरू शकतो का, असा मुद्दा सिंघवी यांनी उपस्थित केला. परीक्षा घेणे व पदवी बहाल करणे हा विद्यापीठ अनुदान आयोगाचा अधिकार असून राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेऊ शकत नाही, असा मुद्दा आयोगाच्या वतीने मांडण्यात आला आहे. आयोगाचा आदेश प्रांतीय अधिकारांवर गदा आणणार असल्याचेही सिंघवी यांनी अधोरेखित केले.

विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठांना ३० सप्टेंबरपर्यंत अंतिम वर्षांच्या परीक्षा घेण्याचा आदेश काढला असून त्या संदर्भात सूचनाही जाहीर केल्या आहेत. मात्र, या सूचनांचे स्वरूप 'सल्ला' असे असून स्थानिक गरजांनुसार त्यात बदल करता येऊ शकतो. करोनाचे रुग्ण पटीने वाढत असून अनेक महाविद्यालयांचे विलगीकरण केंद्रात रूपांतर करण्यात आले आहे, अशा स्थितीत तिथे परीक्षा कशी घेता येऊ शकेल, असा मुद्दा दिवाण यांनी उपस्थित केला. टाळेबंदी शिथिलीकरणाच्या तिसऱ्या टप्प्यातही शैक्षणिक संस्था सुरू करण्याची परवानगी केंद्रीय गृह मंत्रालयाने दिलेली नाही. राज्यांनाही केंद्राच्या आदेश शिथिल करण्यास मनाई करण्यात आली आहे. शिवाय, विद्यापीठ अनुदान आयोगाने करोनासंदर्भातील परिस्थितीत सुधारणा झाल्याचे कुठेही म्हटलेले नाही. मग परीक्षा घेण्याचा आग्रह का धरला जात आहे, असा युक्तिवाद दिवाण यांनी केला. आपत्तीच्या काळात आपत्ती व्यवस्थापन कायद्याअंतर्गत घेतल्या गेलेल्या निर्णयांनाच प्राधान्य असते व ते अन्य कोणत्याही अधिसंस्थांना डावलण्याचा अधिकार नाही, असाही मुद्दा दिवाण यांनी मांडला.

PUBLIC NOTICE

लोकसत्ता Sat, 15 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54239921

लोकमत

## पदवी अंतिम वर्ष परीक्षांच्या याचिकेची सुनावणी १८ ऑगस्टला

### विद्यापीठ अनुदान आयोग स्वत:च्या भूमिकेवर ठाम

**नवी दिल्ली :** कोरोनाची साथ असूनही पदवीसाठी अंतिम वर्षाच्या परीक्षा विद्यापीठांनी घ्यायलाच हव्यात या ठाम भूमिकेत विद्यापीठ अनुदान आयोगाने कोणताही बदल केला नसून, त्याला विरोध करणाऱ्या याचिकेची सर्वोच्च न्यायालयातील पुढील सुनावणी आता १८ ऑगस्टला होणार आहे.

कोरोनाच्या रुग्णांची संख्या देशात वाढत असताना पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यास विद्यार्थ्यांनी विरोध केला आहे. विद्यार्थ्यांचे आरोग्याला धोका पोहोचेल, असा कोणताही निर्णय घेण्यात येऊ नये ही केलेली विनंती विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्य न केल्याने मग विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली.

या प्रकरणी दिल्ली व महाराष्ट्र सरकारने सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राला उत्तर देताना विद्यापीठ अनुदान आयोगाने १३ ऑगस्ट रोजी न्यायालयाला सांगितले की, पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय विद्यार्थ्यांच्या हिताचा नाही. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे भविष्यात शैक्षणिक नुकसानही होऊ शकते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊनच पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यास परवानगी देण्यात आली आहे असे केंद्रीय गृह मंत्रालयाने न्यायालयाला सांगितले. कोरोनाच्या साथीमुळे पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा आम्ही घेणार नाही असे प्रतिज्ञापत्र दिल्ली व महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात सादर केले होते. युवा सेना या संघटनेच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ श्याम दिवाण यांनी न्यायालयाला सांगितले की, पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घ्याव्यात हा निर्णय केंद्र सरकारला बंधनकारक करता येणार नाही.

Pune Main
Page No. 5 Aug 15, 2020
Powered by: erelego.com

## पुणे विद्यापीठाचे मॉडेल राज्यभर राबविणार !



**पुणे, दि. १४-** ऑनलाइन शिक्षण महत्त्वाचा भाग बनला आहे. ऑनलाइन शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने केलेली यंत्रणा अतिशय उत्तम आहे. त्याचप्रमाणे ऑनलाइन शिक्षणाचे पुणे विद्यापीठाचे मॉडेल राज्यभर राबविण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

पुण्यातील शिक्षक प्रशिक्षण केंद्राचा आढावा उदय सामंत यांनी घेतला. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सामंत म्हणाले की, करोना संसर्गामुळे झालेले नुकसान मोठे आहे. मात्र, आपल्याला नव्या संधीही निर्माण झाल्या आहेत. येत्या काळात ऑनलाइन शिक्षण महत्त्वपूर्ण आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाइन शिक्षणासाठी केलेले स्टुडिओ, यंत्रणा सुसज्ज आहे. ऑनलाइन शिक्षणासाठी विद्यापीठाची यंत्रणा समोर ठेवून राज्यातील सर्वच विद्यापीठांमध्येही अशा सुविधा निर्माण करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**Prabhat: 15.8.2020**

## पुणे विद्यापीठची ऑनलाइन शिक्षणासाठीची यंत्रणा राज्यात ठरली वेगळी

**पुणे :** कोरोना संसर्गामुळे नुकसान झाले असले, तरी नव्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत. राज्यभरातील विद्यापीठांना ऑनलाइन शिक्षणाच्या दृष्टीने सक्षम करण्याची आवश्यकता आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाइन शिक्षणासाठी उभी केलेली यंत्रणा राज्यात वेगळी ठरली आहे. त्यामुळे विद्यापीठाचे ऑनलाइन शिक्षणाचे पुणे मॉडेल आता राज्यभर नेण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

टिचर्स ट्रेनींग ॲकडमीच्या कामकाजाची पाहणी सामंत यांनी केली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. कोरोना संसर्गामुळे सध्या ऑनलाइन पद्धतीने शिक्षणाची प्रक्रिया सुरु आहे. या पार्श्वभूमीवर बदलत्या काळानुसार विद्यापीठांतील ऑनलाइन शिक्षण, पायाभूत सुविधांचा विकास या बाबत राज्य शासनाचे काय धोरण आहे, सुविधांचा विकास करण्यासाठी करावा लागणारा खर्च करावा लागेल याबाबत विचारण्यात आले होते. सामंत म्हणाले, कोरोना संसर्गामुळे झालेले नुकसान मोठे आहे. मात्र आपल्याला बदलण्यासाठी नव्या संधीही निर्माण झाल्या आहेत. येत्या काळात ऑनलाइन शिक्षण हा महत्वाचा भाग होणार आहे.

**Kesari: 15.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

## अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबतची सुनावणी पुन्हा लांबणीवर

**नवी दिल्ली** : विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत अजूनही अंतिम निर्णय झालेला नाही. शुक्रवारी या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होती. मात्र, ही सुनावणी पुन्हा एकदा लांबणीवर पडली आहे. आता या प्रकरणाची सुनावणी पुढील आठवड्यात १८ ऑगस्ट रोजी होणार आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या केंद्रीय अनुदान मंडळाच्या निर्णयाविरोधात युवासेनेसह १३ राज्यांनी अर्ज दाखल केले आहेत. या अर्जांवर काल सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली होती. कालच्या सुनावणीत सगळे युक्तिवाद एकाच बाजूचे होते. पुढील सुनावणीत विद्यापीठ अनुदान मंडळ बाजू मांडणार आहे.

## शैक्षणिक धोरणात आव्हानांचा वेध

### केंद्रीय पर्यावरणमंत्री जावडेकर यांचे मत

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १४** - एकविसाव्या शतकातील नव्या आव्हानांचा वेध घेत शिक्षण क्षेत्रातील संक्रमण आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने नवीन शैक्षणिक धोरण आखण्यात आल्याचे मत केंद्रीय पर्यावरणमंत्री प्रकाश जावडेकर यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शिक्षक संघ व विद्यापीठ विकास मंचतर्फे 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' याविषयावर आयोजित वेबिनारमध्ये जावडेकर बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष भूषण पटवर्धन, प्रोगेसिव्ह एज्युकेशन संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, इंदापूर शिक्षणसंस्थेचे संचालक हर्षवर्धन पाटील, फर्गसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र परदेशी, नारळकर शैक्षणिक संस्थेचे संचालक प्रा. महेश अबाळे या तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

भूषण पटवर्धन म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी प्रभावी पद्धतीने झाली



पाहिजे. भारताला हजारो वर्षांची शैक्षणिक परंपरा लाभली असूनही आज जागतिक क्रमवारीत भारतीय विद्यापीठांची नावे दिसत नाहीत. विद्यापीठांद्वारे केवळ नोकर वर्ग तयार करण्याची प्रक्रीया खंडीत झाली असून समाज आणि उद्योगाभिमुख नागरिक आगामी काळात घडतील. नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना अनेक नवीन संधी उपलब्ध होतील. शिक्षणाची संज्ञाच यामुळे बदलली गेली असून आदान-प्रदानाच्या माध्यमातून शिक्षण हे नवीन धोरण अस्तित्वात येईल.

डॉ. करमळकर म्हणाले की, राज्याराज्यात विद्यापीठ पातळ्यांवर टास्क फोर्सची स्थापना करून नवीन शैक्षणिक धोरणाचा प्रचार-प्रसार केला पाहिजे. प्रास्ताविक राजेश पांडे यांनी केले. या वेबिनारचे आयोजन राजेश पांडे, डॉ.प्रशांत साठे, डॉ. संजय चाकणे, बागेश्री मंठाळकर, डॉ. महेश अबाळे, प्रसनजीत फडणीस आणि विजय सोनवणे यांनी केले होते.

**Prabhat: 15.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

# Institutes spend big on technology to roll out online classes for pupils

## Most Heads Feel Remote Classes Are Here To Stay

Swati Shinde Gole & Ardhra Nair | TNN

**Pune:** Education institutes are going to great lengths to ensure that students are learning from home in a situation forced by the pandemic. Colleges are open to innovation and are re-imagining teaching and learning in a Covid-19 struck world.

Colleges have been conducting training sessions, orientation programmes and workshops in association with Educational Multimedia Research Centre of Savitribai Phule Pune University to enable the faculty to comprehend all aspects of e-learning, from content creation, to teacher-student and peer interaction, and the process of student assessment and evaluation.

Girija Shankar, principal of Ness Wadia College, said their staff has designed sessions to give hands-on training to teachers to bring about effective teaching and learning efficiency.

"For the implementation of online education, the college has initiated an e-content development project, whose objectives are to develop e-teaching materials creatively by making optimal use of available IT support with up-to-date ICT tools and maintain uniformity and follow appropriate standards of interoperability. Action committees chalk out a plan, coordinate, review and preserve e-content modules in tune with the guidelines issued by the SPPU and the changing needs of the college," she said.

The college has conceived a start-up plan with tasks to be completed and deadlines. The online teaching-learning devised by the college is based on the Four-Quadrant Approach stipulated by UGC. Meanwhile, as a pilot, lectures for some classes on Google Classroom have commenced, Shankar said.

The new normal in education is technology enabled blended learning, multiskilling, technology readiness, creativity, innovation and an entrepreneurial mindset.

At the Suryadatta Group of Institutes, a strong digital infrastructure, high-speed internet lease line, smartboard blended learning using digital platforms such as Google Classroom and Webex Microsoft Team have been set up.

Founder president Sanjay Chordia said, "Recorded lectures are uploaded for students' reference, periodical training and guidance sessions are conducted while online courses are encouraged and conducted."

According to Anand Bhalerao, principal of Bharati Vidyapeeth deemed university's college of engineering, online education has become integral and will continue even after Covid-19.

"The next version of curriculum delivery will be blended with 20-30% in online mode. We are prepared with the use of two technologies. Lectures for a few classes will be through a video lecture capturing system by Impartus which will make videos of senior professors available to students with a time lag. Live lectures will be delivered using Microsoft Teams facilitating run-time discussions to clear doubts of students and interactions. We had a licensed version of it."


Principal of SNDT Muktaja Matkari said the university teachers underwent training in faculty development programs to impart knowledge and skills for online teaching, learning and evaluation.

"We have smart classrooms where teachers can come and record online lectures. E-content has been developed by all teachers. Learning management systems are being used along with online meeting applications effectively. The knowledge resource centre (library) is assisting by providing online resources and scanned copies of reference material," she added.

Sharad Kunte, chairman of Deccan Education Society, said online lectures will go on for the entire year. "We have bought licenses to the tune of Rs 1 crore so that teachers can use them for online classes. They are doing it from the comfort of their homes as calling them to college is risky. We have about 60 institutes and are covered for a year," he said.

Shikshan Prasarak Mandali has purchased Microsoft licenses to the tune of Rs 88 lakh and will scale it up to Rs 1.5 crore once all classes begin functioning, said president S K Jain.

"We have about 44 institutes and over 40,000 students. Even if by any chance classes start, it will be in batches with only certain students coming in a week. Others will continue with online lectures at home," he added.




The Times of India: 17.8.2020

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

**लोकमत**

# शिक्षककेंद्री पद्धत बदलावी लागेल : डॉ. भूषण पटवर्धन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : समाज हा सुद्धा प्रभावी शिक्षक असतो. आपल्याला माहिती, ज्ञान, तंत्रज्ञान व कसब देणारे आचार्य, पंडित आणि दृष्टी देणारा गुरु व्हायला हवे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार आजची शिक्षककेंद्री पद्धत बदलताना शिक्षकांना त्यांची मानसिकता बदलून जास्तीत जास्त सकारात्मक विचारसरणीवर भर द्यायला हवा. या नवीन शैक्षणिक धोरणाने शिक्षकांच्या पुनर्रचनेवर भर दिला आहे, असे मत विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षातर्फे 'नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर आयोजित वेबिनार झाले. विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. प्रफुल्ल पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, मानवविज्ञान शाखेच्या अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे, ई कंटेन्ट डेव्हलपमेंट अँड लर्निंग इनोव्हेशन सेंटरच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर आदी सहभागी झाले.

> अभ्यासक्रमांमध्ये मूलभूत बदल करणे आवश्यक असून, नवीन शैक्षणिक धोरणानुसार हे शक्य होणार आहे. समुदाय विकास ही महत्त्वपूर्ण संकल्पना या धोरणामध्ये आहे. इंटर्नशिप ही विज्ञानशाखांसोबतच इतर शाखांना अनिवार्य केलेली आहे. त्यामुळे अत्यंत नावीन्यपूर्ण अशा संकल्पना घेऊन हे नवीन शैक्षणिक धोरण आलेले आहे.
>
> **- नितीन करमळकर**

पटवर्धन म्हणाले की, आंतर विद्याशाखीय शिक्षणाची संकल्पना भारतात सर्वप्रथम पुणे विद्यापीठात राबविण्यात आली. नवीन शैक्षणिक धोरणात या संकल्पनेवर भर देण्यात आलेला आहे.

Pune Main
Page No. 2 Aug 18, 2020
Powered by: erelego.com

**पुढारी**

# शिक्षककेंद्री पद्धत बदलावी लागेल

## डॉ. भूषण पटवर्धन यांचे प्रतिपादन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार आजची शिक्षककेंद्री पद्धत आपल्याला बदलावी लागेल, शिक्षकांना बदलावे लागेल, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षातर्फे 'नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर आयोजित वेबिनारमध्ये ते बोलत होते. या वेबिनारमध्ये कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. प्रफुल्ल पवार आदी ऑनलाईन उपस्थित होते.

डॉ. पटवर्धन म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणानुसार आजची शिक्षककेंद्री पद्धत बदलताना शिक्षकांना त्यांची मानसिकता बदलून जास्तीत जास्त सकारात्मक विचारसरणीवर भर द्यायला हवा. या नवीन शैक्षणिक धोरणाने शिक्षकांच्या पुनर्रचनेवर भर दिला आहे. तर प्रास्ताविक करताना डॉ. करमळकर म्हणाले, समुदाय विकास ही महत्वपूर्ण संकल्पना या धोरणामध्ये आहे. इंटर्नशिप ही विज्ञानशाखांसोबतच इतर शाखांना अनिवार्य केलेली आहे. त्यामुळे अत्यंत नाविन्यपूर्ण अशा संकल्पना घेऊन हे नवीन शैक्षणिक धोरण आलेले आहे. वेबिनारमध्ये सूत्रसंचालन डॉ. प्रफुल्ल पवार यांनी केले तर प्र- कुलगुरू डॉ. एन.एस. उमराणी यांनी आभार मानले. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या ४०० प्राचार्य, प्राध्यापक यांनी या वेबिनारमध्ये सहभाग नोंदवला.

My Pune Edition
Aug 18, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# ऑनलाइन शिक्षणाचे 'पुणे मॉडेल' आता राज्यभरात नेण्याचा प्रयत्न

लोकसत्ता प्रतिनिधी



**पुणे :** 'करोना संसर्गामुळे नुकसान झाले असले, तरी नव्या संधीही उपलब्ध झाल्या आहेत. राज्यभरातील विद्यापीठांना ऑनलाइन शिक्षणाच्या दृष्टीने सक्षम करण्याची आवश्यकता आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाइन शिक्षणासाठी केलेली यंत्रणा महत्त्वपूर्ण असून, ऑनलाइन शिक्षणाचे पुणे मॉडेल आता राज्यभर नेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

शिक्षक प्रशिक्षण केंद्राच्या पाहणीसाठी सामंत नुकतेच पुण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

करोना संसर्गामुळे सध्या ऑनलाइन पद्धतीने शिक्षणाची प्रक्रिया सुरू आहे. या पार्श्वभूमीवर बदलत्या काळानुसार विद्यापीठांतील ऑनलाइन शिक्षण, पायाभूत सुविधांचा विकास या बाबत राज्य शासनाचे काय धोरण आहे, सुविधांचा विकास करण्यासाठी करावा लागणारा खर्च करावा लागेल या बाबत विचारण्यात आले होते.

सामंत म्हणाले, की करोना संसर्गामुळे झालेले नुकसान मोठे आहे. मात्र आपल्याला बदलण्यासाठी नव्या संधीही निर्माण झाल्या आहेत. येत्या काळात ऑनलाइन शिक्षण हा महत्त्वाचा भाग होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाइन शिक्षणासाठी केलेले स्टुडिओ, यंत्रणा अतिशय उत्तम आहे. ऑनलाइन शिक्षणासाठी विद्यापीठाची यंत्रणा समोर ठेवून राज्यातील बाकी सर्वच विद्यापीठांमध्येही अशा सुविधा निर्माण करण्यात येतील.

**गोंडवाना विद्यापीठात विदा केंद्राची उभारणी**

आजवर मोठ्या शहरांतील विद्यापीठांशिवाय अन्य विद्यापीठांकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. मात्र, या विद्यापीठांमध्येही सुविधा निर्माण व्हायला हव्यात. त्या दृष्टीने गोंडवाना विद्यापीठात विदा केंद्र (डेटा सेंटर) उभारण्यासाठी मान्यता देण्यात आली असून, दीड कोटीचा निधीही दिला जाणार आहे, असेही सामंत यांनी सांगितले.

लोकसत्ता Tue, 18 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54301674

---

पुढारी

# विद्यापीठाच्या ऑनलाइन शिक्षणाचे 'पुणे मॉडेल' आता राज्यभरात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यभरातील विद्यापीठांना ऑनलाइन शिक्षणाच्या दृष्टीने सक्षम करण्याची आवश्यकता आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाइन शिक्षणासाठी उभी केलेली यंत्रणा राज्यात वेगळी ठरली आहे. त्यामुळे विद्यापीठाचे ऑनलाइन शिक्षणाचे पुणे मॉडेल आता राज्यभर नेण्याचा प्रयत्न आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

टीचर्स ट्रेनिंग ॲकॅडमीच्या कामकाजाची पाहणी करण्यासाठी सामंत नुकतेच पुण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

बदलत्या काळानुसार विद्यापीठांतील ऑनलाइन शिक्षण, पायाभूत सुविधांचा विकास या बाबत राज्य शासनाचे काय धोरण आहे, सुविधांचा विकास करण्यासाठी करावा लागणारा खर्च, याबाबत त्यांना विचारण्यात आले होते. सामंत म्हणाले, की कोरोना संसर्गामुळे झालेले नुकसान मोठे आहे. मात्र आपल्याला बदलण्यासाठी नव्या संधीही निर्माण झाल्या आहेत. येत्या काळा[t] ऑनलाइन शिक्षण हा महत्त्वाचा भा[ग] होणार आहे.

**गोंडवाना विद्यापीठात डेटा सेंटर**

आजपर्यंत मोठ्या शहरांमधील विद्यापीठांशिवाय अन्य विद्यापीठांक[डे] फारसे लक्ष दिले गेले नाही. मात्र, य[ा] विद्यापीठांमध्येही सुविधा निर्मा[ण] व्हायला हव्यात. त्या दृष्टीने गोंडवान[ा] विद्यापीठात डेटा सेंटर उभारण्यासा[ठी] मान्यता देण्यात आली असून दीड कोटीचा निधीही दिला जाणा[र] असल्याचेही सामंत यांनी सांगितले.

My Pune Edition
Aug 18, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

---

# आजची शिक्षककेंद्री पद्धत बदलावी लागेल

## - डॉ. भूषण पटवर्धन

पुणे, दि. १७ (प्रतिनिधी) - 'नवीन शैक्षणिक धोरणानुसार आजची शिक्षककेंद्री पद्धत आपल्याला बदलावी लागेल, शिक्षकांना बदलावे लागेल,' असे मत विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षातर्फे 'नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर आयोजित वेबिनारमध्ये ते बोलत होते.

या वेबिनारमध्ये कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्रकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. प्रफुल्ल पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, वाणिज्य व व्यवस्थापन शाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, मानवविज्ञान शाखेच्या अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे, ई-कंटेण्ट डेव्हलपमेंट ॲण्ड लर्निंग इनोव्हेशन सेंटरच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर आदी ऑनलाइनच्या माध्यमातून उपस्थित होते.

डॉ. पटवर्धन म्हणाले, समाज हासुद्धा प्रभावी शिक्षक असतो. त्यामुळे आपल्याला माहिती, ज्ञान, तंत्रज्ञान आणि कसब देणारे आचार्य, पंडित व्हायला हवे. विद्यार्थ्याला दृष्टी देणारा, त्याला आपल्यासोबत घेऊन जाणारा गुरू बनायचं आहे. त्यामुळेच नवीन शैक्षणिक धोरणानुसार आजची शिक्षककेंद्री पद्धत बदलताना शिक्षकांना त्यांची मानसिकता बदलून जास्तीत जास्त सकारात्मक विचारसरणीवर भर द्यायला हवा. या नवीन शैक्षणिक धोरणाने शिक्षकांच्या पुनर्रचनेवर भर दिला आहे.

कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, अभ्यासक्रमांध्ये मूलभूत बदल करणे आवश्यक असून, नवीन शैक्षणिक धोरणानुसार हे शक्य होणार आहे. समुदाय विकास ही महत्त्वपूर्ण संकल्पना या धोरणामध्ये आहे. इंटर्नशिप ही विज्ञानशाखांसोबतच इतर शाखांना अनिवार्य केलेली आहे. त्यामुळे अत्यंत नावीन्यपूर्ण अशा संकल्पना घेऊन हे नवीन शैक्षणिक धोरण आलेले आहे. या नवीन शैक्षणिक धोरणाचे मी स्वागत करतो. सर्व प्राचार्य, प्राध्यापक यांनी डोळसपणे या धोरणाचा अभ्यास करावा.

डॉ. प्रफुल्ल पवार यांनी प्रास्ताविक केले, तर प्रकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी आभार मानले.

**Saamana : 18.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

### 'पुणे मॉडेल राज्यात राबवणार'

पुणे : 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे ऑनलाइन शिक्षणासाठीचे मॉडेल आता राज्यातील विद्यापीठांमध्ये नेण्याचा प्रयत्न केला जाईल,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

'करोना संसर्गामुळे शैक्षणिकदृष्ट्या फटका बसला तरी, तरी नव्या शैक्षणिक संधीही उपलब्ध झाल्या आहेत. या परिस्थितीत राज्यभरातील विद्यापीठांना विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण प्रदान करण्याच्या दृष्टीने सक्षम यंत्रणा उभारण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने डिजिटल व ऑनलाइन शिक्षणासाठी केलेली यंत्रणा महत्त्वाची आहे. त्यामुळे ऑनलाइन शिक्षणाचे पुणे विद्यापीठाचे मॉडेल आता राज्यातील विद्यापीठांमध्ये नेण्याचा प्रयत्न केला जाईल,' अशी माहिती उदय सामंत यांनी दिली.

टीचर्स ट्रेनिंग अॅकॅडमीच्या बांधकामाचा आढावा घेण्यासाठी सामंत पुण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाइन शिक्षणासाठी केलेले स्टुडिओ, महाविद्यालयांना ई-कंटेंट पुरविण्याची यंत्रणा, डिजिटल प्लॅटफॉर्म अतिशय उत्तम आहे,' असेही सामंत म्हणाले.

Maharashtra Times: 18.8.2020

### सर्वांना शिक्षण व चांगले शिक्षण

**केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर यांची वेबिनारमध्ये माहिती**

**नवीन शैक्षणिक धोरण अस्तित्वात येण्याआधीच आम्ही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात या धोरणाची अंमलबजावणी केली आहे. उत्कृष्ट शिक्षण निर्मिती आणि वितरण या दोन्ही बाबींवर कटाक्षाने लक्ष आहे. शिक्षणाला प्रशासकीय गुंतागुंतीमध्ये अडकवून न ठेवता विद्यार्थ्यांना कृतिशील शिक्षणाचे पर्याय देण्यात आम्हाला यश आले आहे.**

**- डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'सर्वांना शिक्षण आणि चांगले शिक्षण या सूत्रावर शैक्षणिक धोरणाची आखणी करण्यात आली असून, शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर जाणाऱ्यांनादेखील या धोरणाद्वारे शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा यशस्वी प्रयत्न केला गेला आहे,' असे मत केंद्रीय पर्यावरण आणि वनमंत्री प्रकाश जावडेकर यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शिक्षक संघ आणि विद्यापीठ विकास मंच यांच्या वतीने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावरील वेबिनारचे उद्घाटन जावडेकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. 'एनवायसीएस इंडिया' या फेसबुक पेजवरून याचे थेट प्रसारण करण्यात आले. या वेबिनारच्या अध्यक्षपदी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर होते. विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, प्रोगेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य डॉ. रवींद्र परदेशी, प्रा. महेश आबाळे यांनी मार्गदर्शन केले.

जावडेकर म्हणाले, 'एकविसाव्या शतकातील आव्हानांचा वेध घेऊन शिक्षण क्षेत्रातील संक्रमण आवश्यक असल्यानेच डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होईल, या दृष्टीने नवीन शैक्षणीक धोरण आखण्यात आले. या धोरणात भारताला आत्मविश्वासाने पुढे घेऊन जाण्याची ताकद आहे. मागासवर्गीय, दिव्यांग, आर्थिकदृष्ट्या कमकुवत स्तरातील घटकांना शिष्यवृत्तीचे अनेक पर्याय खुले करण्यात आले आहेत. केवळ आर्थिक परिस्थिती नाही म्हणून कोणीही शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे.' 'शैक्षणिक धोरणामुळे अनेक पाश्चात्य शैक्षणिक संस्था भारतात येऊन त्यांच्या शैक्षणिक संकुलांद्वारे विद्यार्थांना शिक्षणाच्या अनेक नवनवीन संधी उपलब्ध करून देतील. अद्यापपर्यंत भारतीय विद्यार्थी परदेशांत जाऊन डॉलरमध्ये त्यांची अर्थव्यवस्था बळकट करण्याचे काम करीत होता. ती बुद्धिमत्ता त्यांच्या प्रगतीसाठी खर्ची घालत होता. आता तोच विद्यार्थी भारतात राहून भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार होईल. या धोरणामुळे शैक्षणिक संस्था, विद्यार्थी, शिक्षक, व्यवस्थापन सर्वांचेच उत्तरदायित्व वाढणार आहे,' असेही जावडेकर यांनी सांगितले. या वेबिनारचे आयोजन राजेश पांडे, डॉ. प्रशांत साठे, डॉ. संजय चाकणे, बागेश्री मंठाळकर, प्रसेनजित फडणीस आणि विजय सोनवणे यांनी केले.

Maharashtra Times: 18.8.2020

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करणे अशक्य

## 'यूजीसी'ची सर्वोच्च न्यायालयात माहिती

**नवी दिल्ली, ता.१८ (वृत्तसंस्था)** : देशभरातील सर्व विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत घेतल्या जाव्यात म्हणून विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना आव्हान देणाऱ्या विविध याचिकांवर सुनावणी घेताना सर्वोच्च न्यायालयाने आज पुन्हा आपले आदेश राखून ठेवले. विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा या पुढे ढकलल्या जाऊ शकतात; पण त्या रद्द केल्या जाऊ शकत नाही. असे यूजीसीकडून न्यायालयामध्ये सांगण्यात आले.

न्या. अशोक भूषण यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर आज या प्रकरणी सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने सर्व पक्षकारांना त्यांनी सादर केलेल्या म्हणण्यावर तीन दिवसांमध्ये एक वेगळी नोट सादर करा, असे निर्देश दिले आहेत.

यावेळी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की," विद्यापीठे परवानगी घेऊन परीक्षा पुढे ढकलू शकतात पण ते परीक्षा न घेताच पदव्या मात्र देऊ शकत नाही." तत्पूर्वी याचिकाकर्त्यांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयामध्ये आपले म्हणणे मांडताना 'यूजीसी'चा अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबतचा निर्णय हा यूजीसी कायदा आणि नियामक व्यवस्थेचा भंग असल्याचा दावा केला होता.

विधिज्ञ अलख आलोक श्रीवास्तव यांनी सादर केलेल्या याचिकेमध्ये म्हटले आहे की, "यूजीसीने ७ जुलै २०२० रोजी जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे ही यूजीसी कायद्यातील बाराव्या कलमाचे उल्लंघन करणारी आहेत." आजच्या सुनावणीदरम्यान विधिज्ञ अरविंद दातार यांनी महाराष्ट्र सरकारची बाजू मांडली.

### न्या. भूषण यांच्याकडून दखल

आपत्ती व्यवस्थापन कायद्याशी संबंधित प्रश्नावर न्या. अशोक भूषण यांनी या कायद्याअंतर्गत अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या अधिकारांबाबत विस्ताराने मांडणी केली. परीक्षा घेणे ही बाब विद्यार्थ्यांसाठी हितावह आहे की नाही याचा निर्णय अधिकाऱ्यांनी घ्यावा कारण विद्यार्थी याबाबत निर्णय घेण्यास सक्षम नसल्याचे भूषण यांनी सांगितले. हे प्रकरण केवळ एखादे राज्य किंवा यूजीसीपुरते मर्यादित राहता कामा नये. वेगवेगळ्या राज्यांध्ये परीक्षांच्या वेगवेगळ्या तारखा देण्यात आल्यास यूजीसी सापत्न वागणूक देत आहे, असा आरोप केला जाईल, असेही भूषण म्हणाले.

**Sakaal: 19.8.2020**

# पुणे विद्यापीठ 'परीक्षे'त उत्तीर्ण

## हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची ऑनलाइन प्रवेश परीक्षा

**पुणे, ता. १८** : कोरोनामुळे सुरक्षितपणे परीक्षा कशा घ्यायच्या, याचे आव्हान असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मात्र हे करून दाखवले आहे. 'प्रॉक्टर्ड मेथड टेस्ट' या प्रणालीच्या वापराने घरबसल्या एक हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा विनाअडथळा ऑनलाइन दिली. आता विद्यापीठाने २६ हजार विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याची तयारी सुरू केली आहे.

पान ४ वर »

### 'प्रॉक्टर्ड टेस्ट'द्वारे नियंत्रण

'प्रॉक्टर्ड टेस्ट' या प्रणालीद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याचा 'लॉग-इन आयडी' तयार करण्यात आला. मोबाईल, लॅपटॉप, टॅब, कॉम्प्युटरवर कमीत कमी रेंजमध्येही लॉग-इन करता येते. ज्या ठिकाणी हा विद्यार्थी परीक्षेला बसला आहे, तेथून तो जागेवरून हलू शकत नाही. जागेवरून उठल्यास किंवा गैरप्रकार करत असल्यास लगेच संबंधित यंत्रणेला त्याची माहिती मिळते. तीन वेळा त्याला सूचना देऊनही सुधारणा न झाल्यास विद्यार्थ्याला परीक्षा देता येत नाही.



# पुणे विद्यापीठ 'परीक्षे'त उत्तीर्ण

» पान १ वरून

कोरोनामुळे एप्रिल-मे महिन्यातील परीक्षा होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे अंतिम वर्षाचे निकाल रखडले आहेत. पुणे विद्यापीठाने पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू केली; पण परीक्षा कशी घेणार, हा प्रश्न होता. त्यासाठी विद्यापीठाने 'प्रॉक्टर्ड टेस्ट' या तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतला. रविवारी (ता. १६) सकाळी ८ ते रात्री ८ या वेळात परीक्षा घेण्यात आली. यामध्ये

१५ पदवी अभ्यासक्रमांमधील ५१४ जागांचा समावेश होता. नोंदणी केलेल्या १ हजार ३४० पैकी १ हजार १४६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे. ८५ टक्के विद्यार्थ्यांना कोणतीही तांत्रिक अडचण न येता त्यांनी परीक्षा दिली, असे उपकुलसचिव उत्तम चव्हाण यांनी सांगितले.

#### पदव्युत्तर पदवीची तयारी सुरू

पदवी प्रवेश परीक्षेच्या निमित्ताने 'प्रॉक्टर्ड टेस्ट'ची प्रायोगिक तत्त्वावरील चाचणी यशस्वी झाल्याने आता पुढच्या टप्प्यात पदव्युत्तर पदविका व पदव्युत्तर पदवीची प्रवेश परीक्षा घेण्याचे नियोजन पुणे विद्यापीठाने सुरू केले आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठीच्या २३ हजार १३२ तर पदव्युत्तर पदविकेसाठी ३ हजार ३०९ अर्ज आले आहेत. विद्यार्थी संख्या जास्त असल्याने दोन ते तीन दिवस या परीक्षा चालण्याची शक्यता आहे, असे चव्हाण यांनी सांगितले.

### प्रवेश परीक्षा दृष्टिक्षेपात

| | |
|---|---|
| १५ पदवी अभ्यासक्रम | ११४६ परीक्षा दिलेले विद्यार्थी |
| ५१४ प्रवेश क्षमता | १ तास परीक्षेचा कालावधी |
| १३४० प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी | |

**Sakaal: 19.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

## विद्यापीठाकडून ऑनलाइन प्रवेश परीक्षा

### परीक्षेदरम्यान कोणतीही तांत्रिक समस्या नाही



- पदवी अभ्यासक्रम – १५
- प्रवेशक्षमता – ५१४
- नोंदणी केलेले विद्यार्थी – १३४०
- परीक्षा देणारे विद्यार्थी – ११४६
- गुणवत्ता यादी जाहीर – २१ ऑगस्ट

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोना संसर्गाच्या काळात परीक्षांचा प्रश्न निर्माण झालेला असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रॉक्टर्ड मेथड टेस्टद्वारे पदवी अभ्यासक्रमाची ऑनलाइन प्रवेश परीक्षा यशस्वीरीत्या घेतली. घरबसल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातील पहिले ठरले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग आणि संकुलातील विविध पदवी, पदविका, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेश परीक्षा ऑनलाइन पद्धतीने होणार आहेत. त्यासाठी २७ हजार ७८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विद्यापीठाने आयआयटीसारख्या नामांकित राष्ट्रीय संस्थांमध्ये परीक्षा घेण्यासाठी वापरली जाणारी प्रॉक्टर्ड मेथड वापरून परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यापीठाने नुकतीच १५ पदवी अभ्यासक्रमांसाठीची ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेतली. विद्यार्थ्यांनी मोबाइल, संगणक, लॅपटॉप, टॅब अशा साधनांचा *(पान २ वर)*

लोकसत्ता Wed, 19 August 2020 https://epaper.loksatta.com/c/

## ऑनलाइन प्रवेश परीक्षा

*(पान १ वरून)* वापर करून ही परीक्षा दिली. परीक्षेसाठी एका तासाचा वेळ देण्यात आला होता. परीक्षेदरम्यान कोणतीही तांत्रिक किंवा नेटवर्क समस्या आली नाही. विद्यार्थ्यांना घरबसल्या प्रवेशपरीक्षा देता आल्याने, पालकांनी समाधान आणि आनंद व्यक्त केल्याचे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे उपकुलसचिव उत्तम चव्हाण यांनी सांगितले. आता पुढच्या टप्प्यात पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीची प्रवेशपरीक्षा याच पद्धतीने घेतली जाणार आहे.

लोकसत्ता Wed, http

## बारावीच्या गुणांच्या आधारे प्रवेश प्रक्रिया राबवण्याची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर देशभरातील सात राज्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) न घेता बारावीच्या गुणांवर नव्या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे. त्या धर्तीवरच राज्य शासनानेही निर्णय घेण्याची मागणी असोसिएशन ऑफ द मॅनेजमेंट ऑफ अनएडेड इन्स्टिट्यूट्स इन रूरल एरियाचे अध्यक्ष रामदास झोळ यांनी केली आहे.

राज्यात बारावीचा निकाल जाहीर होऊन महिन्याभरानंतरही अभियांत्रिकी, औषधनिर्माण अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीच्या प्रवेश परीक्षेबाबत स्पष्टता नाही. प्रा. झोळ म्हणाले, की विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या मुद्द्यावर अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याची राज्य शासनाची भूमिका आहे. तर प्रवेश परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची सुरक्षिततही महत्त्वाची आहे. हरयाणा, मध्य प्रदेश, पंजाब, पुदुच्चेरी, तामिळनाडू, हिमाचल प्रदेश, छत्तीसगड या राज्यांनी प्रवेश परीक्षा रद्द करून बारावीच्या गुणांच्या आधारे व्यावसायिक अभ्यासक्रमांची (अभियांत्रिकी, औषधनिर्माण इत्यादी) प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे राज्य शासनानेही केवळ यंदासाठी बारावीच्या गुणांवर व्यावसायिक अभ्यासक्रमाला प्रवेश देण्याचा निर्णय घ्यावा. सीईटीबाबत अद्यापही चर्चाच सुरू असून, प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थी-पालक चिंतेत आहेत.

लोकसत्ता Wed, 19 August 2020 https://epaper.loksatta.com/c/!

## पुणे विद्यापीठाने 'रोल मॉडेल' म्हणून पुढाकार घ्यावा

### डॉ. भूषण पटवर्धन : आंतर विद्याशाखीय शिक्षण संकल्पनेवर मार्गदर्शन

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १८ -** देशात आंतर विद्याशाखीय शिक्षणाची संकल्पना सर्वप्रथम पुणे विद्यापीठात राबवण्यात आलेली आहे. नवीन शैक्षणिक धोरणात या संकल्पनेवर भर देण्यात आलेला आहे. भविष्यातील विद्यापीठ कसे असावे, याबाबत एक आराखडा तयार करण्यासाठी पुणे विद्यापीठाने 'रोल मॉडेल' म्हणून पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी केले.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षातर्फे 'नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर आयोजित वेबिनारमध्ये ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. प्रफुल्ल पवार, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, डॉ. मनोहर चासकर, डॉ. पराग काळकर, डॉ. अंजली कुरणे, इनोव्हेशन सेंटरच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर आदी ऑनलाइनच्या माध्यमातून उपस्थित होते.

डॉ. पटवर्धन म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणानुसार आजची शिक्षककेंद्री पद्धत बदलताना शिक्षकांना त्यांची मानसिकता बदलून जास्तीत जास्त सकारात्मक विचारसरणीवर भर द्यायला हवा.

कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर म्हणाले, अभ्यासक्रमांमध्ये मूलभूत बदल करणे आवश्यक असून नवीन शैक्षणिक धोरणानुसार हे शक्य होणार आहे. सर्व प्राचार्य, प्राध्यापक यांनी डोळसपणे या शैक्षणिक धोरणाचा अभ्यास करावा. सूत्रसंचालन कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी केले तर डॉ. एस.एस. उमराणी यांनी आभार मानले.

**Prabhat: 19.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

# 'युजीसी'ला राज्यांचा निर्णय डावलता येईल?

## सर्वोच्च न्यायालयाची विचारणा; अंतिम परीक्षांचा निकाल राखीव

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** राज्यामध्ये एखादी विशिष्ट परिस्थिती उद्भवली असेल तर विद्यापीठ अनुदान आयोग राज्य सरकारचा निर्णय डावलून परीक्षा घेण्याची सक्ती करू शकतो का, अशी अत्यंत महत्त्वाची विचारणा करत सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासंदर्भातील निकाल मंगळवारी राखून ठेवला. या खटल्याशी संबंधित सर्व पक्षकारांना पुढील तीन दिवसांमध्ये लेखी निवेदन सादर करण्याचे निर्देशही दिले.

महाराष्ट्र सरकारच्या वतीने ज्येष्ठ वकील अरविंद दातार यांनी केलेल्या जोरकस युक्तिवादानंतर न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिकार कक्षांबाबत महाधिवक्ता तुषार मेहता यांच्याकडे विचारणा केली. न्या. अशोक भूषण, न्या. आर. सुभाष रेड्डी व न्या. एम. आर. शहा यांच्या पीठासमोर चार तास सुनावणी झाली. त्यात, महाराष्ट्रासह, दिल्ली, ओडिशा, पश्चिम बंगाल या राज्यांच्या वतीनेही अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत असमर्थता व्यक्त करण्यात आली. देशभर करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे अनेक राज्यांमध्ये परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने विद्यापीठांना ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा पूर्ण करण्याचा आदेश ६ जुलै रोजी काढला होता. मात्र, त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले असून यासंदर्भातील याचिकांवर एकत्रित सुनावणी घेतली गेली.

करोनाच्या काळात परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोग ठाम असून राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाला परीक्षा रद्द करण्याचा अधिकार नसल्याचे आयोगाचे म्हणणे आहे. आयोगाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत काढलेल्या सूचनापत्राला वैधानिक स्वरूप असून त्याचे पालन करणे विद्यापीठांना सक्तीचे आहे. केंद्रीय संस्था म्हणून आयोगाला राज्यांचा निर्णय डावलून निर्णय घेण्याचा अधिकार आहे, असा युक्तिवाद मेहता यांनी केला. विद्यार्थी २१-२२ वर्षांचे असून ते घराबाहेर पडतच नाहीत असे कसे समजायचे? विद्यापीठांना परीक्षा घेण्याची मुदत वाढवून घेता येऊ शकेल, पण परीक्षा न घेता पदवी बहाल करता येणार नाही, असाही मुद्दा मेहता यांनी मांडला.

करोनाच्या संकटामुळे महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याची भूमिका राज्याच्या वतीने मांडलेली आहे.

परीक्षा न घेण्यामुळे शैक्षणिक दर्जा खालावणार नाही का, असा सवाल न्या. रेड्डी यांनी उपस्थित केला. त्यावर, आयआयटीसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शैक्षणिक संस्थेनेही परीक्षा न घेताच पदवी देण्याचा निर्णय घेतला. मग, राज्य सरकार परीक्षा रद्द करण्याचा निर्णय का घेऊ शकत नाही, असा युक्तिवाद ज्येष्ठ वकील अरविंद दातार यांनी केला. महाराष्ट्र व तमिळनाडूमध्ये सेमिस्टर पद्धत आहे. समजा ४२ अभ्यासक्रम असतील तर विद्यार्थ्यांनी ३६ पूर्ण केले आहेत. पहिल्या पाच सेमिस्टर आधारावर सरासरी गुण (सीजीपीए) ठरवता येऊ शकतात, असाही युक्तिवाद करण्यात आला.




### राज्य सरकारचे म्हणणे...

राज्य सरकारच्या वतीने युक्तिवाद करताना ज्येष्ठ वकील अरविंद दातार म्हणाले की, आयोगाला मार्गदर्शक सूचना करण्याचा आणि परीक्षांचा दर्जा राखण्याचा अधिकार आहे, पण विशिष्ट तारखांपर्यंत परीक्षा पूर्ण करा, असा आदेश आयोग देऊ शकत नाही. विद्यापीठे व अन्य संस्थांशी चर्चा करायला हवी. आयोग एकतर्फी निर्णय घेऊ शकत नाही. पुण्यामध्ये अन्य शहरांतून शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असून हे विद्यार्थी आपापल्या गावी गेले आहेत. शिवाय, अनेक शैक्षणिक संस्था विलगीकरण केंद्रे बनली आहेत. मग, परीक्षा कशी घेणार?

लोकसत्ता Wed, 19 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54314571

पैसा आणि प्रतिभावंतांचा परदेशी ओघ थांबवण्याचा उपाय

# परदेशी विद्यापीठांना भारतात मान्यता -पोखरियाल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** 'भारतातील पैसा आणि प्रतिभावान विद्यार्थ्यांना परदेशी जाण्यापासून थांबवण्यासाठी परदेशातील विद्यापीठांना आपल्याकडे त्यांचे शिक्षणसंकुल सुरू करण्यास परवानगी देण्याची तरतूद शिक्षण धोरणात करण्यात आली आहे. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात परदेशी विद्यापीठांना भारतात त्यांची संकुले सुरू करण्यासाठी मान्यता देण्याबाबत चर्चा झाली तेव्हा ही विद्यापीठे त्यांच्या अटींवर भारतात येणार होती. मात्र, आता आपल्या अटींनुसार विद्यापीठे येतील,' अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्री डॉ. रमेश पोखरीयाल यांनी मंगळवारी 'द इंडियन एक्स्प्रेस ई-अड्डा' या कार्यक्रमात दिली.



एक्स्प्रेस ई-अड्डा या वेबसंवादात नव्या शिक्षण धोरणावर द इंडियन एक्स्प्रेसच्या 'नॅशनल ओपिनियन एडिटर' वंदिता मिश्रा आणि वरिष्ठ सहाय्यक संपादक रितिका चोप्रा यांनी डॉ. पोखरीयाल यांना बोलते केले.

डॉ. पोखरीयाल म्हणाले, 'आता परदेशी विद्यापीठे आमच्या अटी मान्य करून येतील. यापूर्वी जेव्हा या तरतूद चर्चेत होती, तेव्हा परदेशी विद्यापीठे त्यांच्या अटींवर येणार होती. दरवर्षी जवळपास ७ ते ८ लाख भारतीय विद्यार्थी शिक्षणासाठी परदेशी जातात. त्यामुळे कोट्यवधी रुपये परदेशी जातात. आपल्याकडील प्रतिभा आणि पैसा येथेच राहावा यासाठी परदेशी विद्यापीठांनाच भारतात येण्यास मान्यता देण्याची तरतूद करण्यात आली आहे. सध्या ५० हजारांपेक्षा अधिक परदेशी विद्यार्थी भारतात शिक्षणासाठी येतात. अधिकाधिक परदेशी विद्यार्थी भारतात शिक्षणासाठी यावेत आणि त्याचप्रमाणे येथील विद्यार्थी येथेच राहावेत असा उद्देश आहे. परदेशी विद्यापीठे भारतात आल्यावर येथील स्पर्धा वाढेल आणि त्यातून दर्जा वाढेल.'

### आर्थिक जबाबदारी राज्यांचीही

धोरणाची अंमलबजावणी करतान राज्यांनीह काही आर्थिक जबाबदारी उचलणे आवश्यक आहे असे सांगून डॉ. पोखरियाल म्हणाले, 'काही राज्ये दरडोई उत्पन्नाच्या दीड-दोन टक्केच खर्च शिक्षणावर करतात. केंद्राने ६ टक्के खर्च करण्याचे धोरण आखले आहे. मात्र, शिक्षण ही राज्यांचीही जबाबदारी असून त्यांनीही काही आर्थिक भार उचलणे आवश्यक आहे.'

लोकसत्ता Wed, 19 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54323841

# अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत सुनावणी पूर्ण

## सर्वोच्च न्यायालयाने निर्णय राखून ठेवला

**नवी दिल्ली :** विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत विद्यापीठ अनुदान मंडळाच्या निर्देशांना आव्हान देण्यात आलेल्या अर्जांवरील सुनावणी मंगळवारी पूर्ण झाली. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात आपला निर्णय राखून ठेवला आहे. न्यायमूर्ती अशोक भूषण, न्यायमूर्ती आर.सुभाष रेड्डी, आणि न्यायमूर्ती ए.आर. शहा यांच्या खंडपीठासमोर दोन्ही पक्षांच्या वकिलांनी आपआपली बाजू मांडली. दरम्यान, न्यायालयाने सर्व पक्षकारांना तीन दिवसांत आपले म्हणणे लेखी स्वरूपात न्यायालयापुढे मांडावे, असे आदेश दिले आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षांचा निर्णय अद्यापही झालेला नाही. दुसरीकडे, गेल्या अनेक दिवसांपासून परीक्षांच्या निर्णयाची वाट पाहणारे विद्यार्थी अजूनही संभ्रमातच आहेत.



महाराष्ट्र सरकार परीक्षा घेण्याच्या विरोधात आहेत. मात्र, विद्यापीठ अनुदान मंडळाने परीक्षा घेण्याचे आदेश दिले आहेत. यानंतर राज्य सरकार परीक्षा न घेण्याच्या निर्णयावर ठाम राहिले. याच कारणामुळे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले होते.

दरम्यान, न्यायालयाने दिल्ली, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र आणि ओडिशा राज्यांची बाजू ऐकून घेतली आहे. महाराष्ट्र आणि दिल्ली सरकारने परीक्षा रद्द कराव्यात, असे मत व्यक्त केले. तर ओडिशा, पश्चिम बंगाल, राजस्थान आणि पंजाबने परीक्षा घेण्यास असमर्थता व्यक्त केली आहे.

Kesari:19.8.2020

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

# पदवी परीक्षांचा निर्णय कोर्टाने राखून ठेवला

## देशभरातील विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला

लोकमत न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : देशातील सर्व विद्यापीठांनी त्यांच्या पदवी अभ्यासक्रमांच्या अंतिम परीक्षा येत्या ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण कराव्यात, या विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या निर्देशांच्या विरोधात केलेल्या याचिकांवरील निकाल सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी राखून ठेवला. त्यामुळे परीक्षा होणार की नाही, या अनिश्चिततेने २७ लाख विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे.

यासंबंधीच्या मूळ यचिका ११ राज्यांमधील ३१ विद्यार्थी तसेच महाराष्ट्राचे मंत्री व भारतीय युवा सेनेचे अध्यक्ष आदित्य ठाकरे यांनी केल्या आहेत. त्यांच्या समर्थनार्थ आणि परीक्षा घेण्याच्या विरोधात नंतर इतरही काही विद्यार्थी, शिक्षक संघटना तसेच ओडिशा, प. बंगाल व दिल्ली या राज्यांची सरकारेही त्यात सामील झाली. देशातील कोरोना महामारीचा जोर अद्याप कायम असल्याने परीक्षा घेणे विद्यार्थ्यांच्या जिवास धोकादायक आहे. प्रत्येक राज्यातील सध्याची परिस्थिती विचारात न घेता सर्वांना एकाच फूटपट्टीने मोजून परीक्षांची सक्ती करणे, केवळ अन्यायकारकच नाही तर राज्यांच्या अधिकारांचा संकोच करणारे आहे. त्यामुळे एक तर परीक्षा घेणे किंवा न घेण्याचा निर्णय राज्यांवर सोडावा अथवा अंतिम परीक्षा न घेता आधीच्या वर्षाच्या परीक्षांमधील कामगिरीच्या आधारे पदवी दिली जावी, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे.

याउलट विद्यापीठ अनुदान आयोगाचे म्हणणे असे की, परीक्षेसह एकूणच शिक्षणाचा दर्जा ठरविण्याचा अधिकार व तो जपण्याचा अधिकार फक्त आयोगास आहे. राज्य सरकारे त्यात लुडबूड करु शकत नाहीत. कोणत्याही व्यक्तीच्या आयुष्यात पदवी हा त्याचे भवितव्य ठरविणारा महत्त्वाचा टप्पा असल्याने परीक्षेविना पदवी दिली जाऊ शकत नाही.

### रुग्णांत सहापट वाढ

◆ विद्यापीठ अनुदान आयोगाने हे निर्देश ६ जुलै रोजी दिले त्या दिवसाच्या तुलनेत आता देशातील कोरोनाबाधितांची संख्या सहापटीने आणि कोरोनामुळे झालेल्या मृत्यूची संख्या दुपटीने वाढली आहे, अशा परिस्थितीत न्यायालय आयोगाचे म्हणणे मान्य करते की अमान्य, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

Pune Main
Page No. 8 Aug 19, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# रासेयो विद्यार्थ्यांची कामगिरी कौतुकास्पद : भगतसिंह कोश्यारी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : दैनंदिन शिक्षणाबरोबर सामाजिक भान देण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजना करीत असते. कोरोना महामारीच्या काळात मास्क, सॅनिटायझर बनविणे, गरजू लोकांपर्यंत आवश्यक साधनसामग्री पोहोचविणे, पोलीस मित्र म्हणून काम पाहणे, आरोग्य सर्वेक्षण करणे अशी समाजोपयोगी कामे करुन विद्यार्थ्यांनी रासेयो स्वयंसेवक म्हणून आपले वेगळेपण देशाला दाखवून दिले आहे, असे मत राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमधील विद्यार्थ्यांनी गेल्या वर्षभरात केलेल्या कामाची माहिती घेत विद्यार्थी स्वयंसेवकांनी केलेली ही कामगिरी कौतुकास्पद असल्याचे कोश्यारी यांनी सांगितले. राजभवन येथे आयोजित बैठकीत कोश्यारी बोलत होते. या वेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रसेनजीत फडणवीस, अधिसभा सदस्य श्रीमती बागेश्री मंठाळकर, अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई आदी उपस्थित होते.

Pune Main
Page No. 2 Aug 19, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

२० पुणे

# 'प्रॉक्टर्ड मेथड'चा प्रयोग यशस्वी

## विद्यापीठाकडून पदवी अभ्यासक्रमांची ऑनलाइन प्रवेश परीक्षा

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोनाच्या प्रादुर्भावात विद्यार्थ्यांच्या परीक्षा कशा घ्यायच्या, असा प्रश्न शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांसमोर असतानाच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'प्रॉक्टर्ड मेथड टेस्ट'चा वापर करून पदवी अभ्यासक्रमांची ऑनलाइन प्रवेश परीक्षा रविवारी यशस्वीपणे घेतली. विद्यार्थ्यांनी घरबसल्या ती परीक्षा दिली. अशा प्रकारची प्रवेश परीक्षा घेणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातील एकमेव विद्यापीठ ठरले असून, याच पद्धतीने पदवी अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा होऊ शकतात.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक विभाग आणि संकुलातील विविध पदवी, पदविका, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ऑनलाइन पद्धतीने प्रवेश परीक्षा घेण्याचे ठरवले आहे. त्यानुसार या अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा देण्यासाठी २७ हजार ७८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. करोनाच्या प्रादुर्भावात नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे मोठे आव्हान विद्यापीठासमोर होते. मात्र, प्रवेश परीक्षा पुढे न ढकलता विद्यापीठाने आयआयटीसारख्या नामांकित राष्ट्रीय संस्थांमध्ये परीक्षा घेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या 'प्रॉक्टर्ड मेथड'चा उपयोग करण्याचा निर्णय घेतला.

'प्रॉक्टर्ड मेथड'ने प्रायोगिक तत्त्वावर पदवीच्या १५ अभ्यासक्रमांसाठी ऑनलाइन परीक्षा घेण्यात आली. त्यानुसार विद्यार्थ्यांनी सकाळी आठ ते रात्री आठ या वेळेत त्यांच्या सोयीनुसार घरबसल्या परीक्षा दिली. यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाइल, कंप्युटर, लॅपटॉप, टॅब अशा साधनांचा वापर केला. या परीक्षेत कोणतीही तांत्रिक किंवा नेटवर्कची समस्या उद्धवली नाही,' असे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाचे उपकुलसचिव उत्तम चव्हाण यांनी सांगितले.

या प्रवेश परीक्षेची गुणवत्ता यादी दिलेल्या तारखेपूर्वी जाहीर होण्याची शक्यता अधिक आहे. आता पुढच्या टप्प्यात पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश परीक्षा 'प्रॉक्टर्ड मेथड'नेच घेण्याचे नियोजन विद्यापीठाकडून केले जात आहे.

### अशी झाली परीक्षा

पदवी अभ्यासक्रम : १५
प्रवेशक्षमता : ५१४
नोंदणी केलेले विद्यार्थी : १३४०
परीक्षा देणारे विद्यार्थी : ११४६
परीक्षेचा कालावधी : १ तास
गुणवत्ता यादी जाहीर : २१ ऑगस्ट



### एकूण २७ हजार ७८७ विद्यार्थ्यांचे अर्ज

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रवेशांसाठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी १० ऑगस्ट ही अंतिम मुदत देण्यात आली होती. या मुदतीत २७ हजार ७८७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश क्षमता तीन हजार ३५३ आहे. त्यासाठी २२ हजार ४६७ विद्यार्थ्यांचे अर्ज आले आहेत. तर पदविका, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची क्षमता २,३०० असून, त्यासाठी २६५० विद्यार्थ्यांचे अर्ज आले आहेत.




**"प्रॉक्टर्ड मेथडचा वापर करून पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा घेण्यात आली. प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी विद्यार्थ्यांची मॉक टेस्ट घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी घरी बसून परीक्षा दिली. कोणतीही तांत्रिक अडचण किंवा समस्या उद्धवली नाही. या पद्धतीची परीक्षा विद्यार्थी आणि पालकांनाही आवडली असून, त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. प्रवेश परीक्षेचा निकाल, गुणवत्ता यादी लवकरच जाहीर होईल.**

**- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**Maharashtra Times: 19.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# पुणे विद्यापीठाच्या कार्याला राज्यपालांकडून शाबासकी

## राष्ट्रीय सेवा योजनेची कामगिरी कौतुकास्पद : भगतसिंह कोश्यारी

**पुणे, ता. १९ :** 'कोरोना'च्या सुरूवातीच्या काळात नागरिकांमध्ये दहशत असताना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेमधील विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून, घरोघरी जाऊन नागरिकांना मदत केली, धीर दिला याची दखल राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी घेत कौतुक केले. शिक्षणाबरोबर सामाजिक भान देण्याचे काम रासेयो करीत असते, अशी शाबासकीही दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिष्टमंडळाने राजभवन येथे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेतली. यावेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, अधिसभा सदस्य प्रसेनजीत फडणवीस, बागेश्री मंठाळकर, अधिष्ठाता डॉ. पराग काळकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यावेळी उपस्थित होते.

कुलगुरू करमळकर यांनी पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे गेल्या वर्षभरात केलेल्या गिनीज विश्वविक्रम, पंढरीची वारी, सांगली व कोल्हापूर याठिकाणी केलेले पुरग्रस्त लोकांसाठीचे काम या कामाची माहिती राज्यपालांना दिली. तर राजेश पांडे यांनी पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे हे काम इतर विद्यापीठाच्या तुलनेत वैशिष्ट्यपूर्ण असून गिनीज विश्वविक्रम करणारे पुणे विद्यापीठ हे भारतातील एकमेव विद्यापीठ असल्याचे सांगितले.

राज्यपाल कोश्यारी म्हणाले, "दैनंदिन शिक्षणाबरोबर सामाजिक भान देण्याचे काम रासेयो करीत असते. कोरोना महामारीच्या काळात मास्क, सॅनिटायझर बनविणे, गरजू लोकांपर्यंत आवश्यक साधनसामुग्री पोहोचविणे, पोलीस मित्र म्हणून काम पहाणे, आरोग्य सर्वेक्षण करणे अशी समाजपयोगी कामे करून विद्यार्थ्यांनी रासेयो स्वयंसेवक म्हणून आपले वेगळेपण देशाला दाखवून दिले आहे."

**Sakaal: 20.8.2020**

# शिक्षककेंद्रित पद्धती बदलावी लागेल

## डॉ. भूषण पटवर्धन यांचे मत; नव्या शैक्षणिक धोरणावर चर्चा

**पुणे, ता. १९ :** "आजची शिक्षण पद्धती शिक्षककेंद्रित झाली आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार ही पद्धत आपल्याला बदलावी लागेल. शिक्षकांनाही त्यांची मानसिकता बदलावी लागेल," असे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सिद्धता कक्षातर्फे 'नवीन शैक्षणिक धोरण' या विषयावर वेबिनार झाला. या वेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव व अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे संचालक डॉ. प्रफुल्ल पवार आदी उपस्थित होते.

डॉ. पटवर्धन पुढे म्हणाले, 'समाज हासुद्धा प्रभावी शिक्षक असतो. त्यामुळे आपल्याला माहिती, ज्ञान, तंत्रज्ञान आणि कसब देणारे आचार्य, पंडित व्हायला हवे. विद्यार्थ्याला दृष्टी देणारा, त्याला आपल्यासोबत घेऊन जाणारा गुरू बनायचे आहे. त्यामुळेच नवीन शैक्षणिक धोरणानुसार आजची शिक्षककेंद्रित पद्धत बदलताना शिक्षकांना त्यांची मानसिकता बदलून जास्तीत जास्त सकारात्मक विचारसरणीवर भर द्यायला हवा.

डॉ. नितीन करमळकर म्हणाले, 'अभ्यासक्रमांमध्ये मूलभूत बदल करणे आवश्यक असून, नवीन शैक्षणिक धोरणानुसार हे शक्य होणार आहे. समुदाय विकास ही महत्त्वपूर्ण संकल्पना या धोरणामध्ये आहे. इंटर्नशिप ही विज्ञान शाखांसोबतच इतर शाखांना अनिवार्य केलेली आहे. त्यामुळे अत्यंत नावीन्यपूर्ण अशा संकल्पना घेऊन हे नवीन शैक्षणिक धोरण आलेले आहे. वेबिनारमध्ये ४०० प्राचार्य, प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला होता.

### भविष्यातील विद्यापीठाचा आराखडा तयार करा

नवीन शैक्षणिक धोरणात विद्यापीठाचे स्वरूप बदलणार आहे. हे भविष्यातील विद्यापीठ कसे असावे, याबाबत आराखडा तयार करण्याचे काम पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील प्राचार्यांनी हाती घ्यावे, असे आवाहन डॉ. पटवर्धन यांनी केले.

**Sakaal: 20.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

पुणे शहर
पुणे, गुरुवार, २० ऑगस्ट २०२० II
• Date of Publication : गुरुवार, २० ऑगस्ट २०२० • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय.-१५५७/५७, रजि. नं. पी.सी.डब्ल्यू./०६९/२०१८-२०२०.

# प्राध्यापकांच्या वाढीव मानधनाला कात्री

## पुणे विद्यापीठाचा निर्णय; विद्यार्थ्यांकडून शुल्क प्रलंबित

**पुणे, ता. १९ :** कोरोनामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार की नाही याचीच शाश्वती नसल्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परीक्षेच्या कामाच्या मानधनात कपात करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे प्राध्यापकांनाही वाढीव मानधनावर पाणी सोडायची वेळ आली आहे.

राज्यातील इतर विद्यापीठांपेक्षा पुणे विद्यापीठाचा कारभार बराच मोठा आहे. विद्यार्थ्यांकडून येणाऱ्या परीक्षा शुल्कातून विद्यापीठाला वर्षाकाठी सुमारे ४५ कोटी रुपये मिळतात. दरवर्षी सुमारे १०० कोटींचा खर्च होतो. प्रश्नपत्रिका काढणे, परीक्षेसाठी पर्यवेक्षक म्हणून काम करणे, उत्तरपत्रिका तपासणी, परीक्षा केंद्राचे पर्यवेक्षक, भरारी पथक, प्रॅक्टिकल परीक्षा घेणे, त्याचे पर्यवेक्षण करणे यासह अनेक प्रकारच्या जबाबदाऱ्यांना मानधन दिले जाते. २००८-०९ पासून या मानधनात वाढ झालेली नव्हती. त्यामुळे विद्यापीठाने ऑक्टोबर २०१९ पासून १५ ते २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला होता.

मात्र आमच्या परीक्षाच घेतलेल्या नाहीत तर आम्ही शुल्क का भरावे? म्हणून काही विद्यार्थी संघटनांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यामुळे नुकत्याच झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत वाढीव मानधनाला ब्रेक लावण्यात आला आहे.

**प्राध्यापकांना मिळणारे मानधन** (रुपयांत)

| कामाचे स्वरूप | मानधन |
|---|---|
| वर्ग एक व दोनसाठी प्रवास भत्ता | ६५० |
| वर्ग तीन व चारसाठी प्रवास भत्ता | ५२० ते ३९० |
| पेपर सेटिंग | ३४० ते ८८६ |
| पेपर तपासणी | २६ |
| समन्वयक | २००० |
| प्रॅक्टिकलसाठी पेपर सेटिंग | ३४० ते ७१५ |
| सहाय्यक समन्वयक | १००० |
| वरिष्ठ पर्यवेक्षक | २०० ते २६० |
| लिपिक कामकाज | ४० ते २०० |

**कामावर कोणताही परिणाम नाही**

विद्यापीठाच्या एका प्राध्यापकाने नाव न प्रसिद्ध करण्याच्या अटीवर सांगितले, की परीक्षेच्या कामासाठी आम्हाला मानधन दिले जाते. नव्या धोरणानुसार साधारणपणे २० टक्के वाढ झाली होती; मात्र यंदाची स्थिती वेगळी असल्याने पुणे विद्यापीठाने मानधन कपात करण्याचा निर्णय घेतला असावा. विद्यापीठाचा एक घटक म्हणून याचे आम्ही स्वागतच करू. मानधन कमी झाले म्हणून कामावर कोणताही परिणाम होणार नाही.

**“ एका सत्रामध्ये साधारणपणे २२ ते २४ लाख उत्तरपत्रिका तपासल्या जातात. त्यासाठी मोठी यंत्रणा काम करते. यासाठी मानधन दिले जाते; मात्र कोरोनामुळे परीक्षा शुल्क परत करावे, यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तेथे काय निर्णय होतो हे माहिती नसल्याने विद्यापीठाने खर्चात कपात करण्यासाठी सुधारित मानधन स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे.**

**- डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा मंडळ

# नवीन शैक्षणिक धोरण समिती सर्वांपर्यंत पोचविणार

## पुणे विद्यापीठाकडून त्रिसूत्रीवर आधारित कार्यक्रम

**पुणे, ता. १९ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरणावर सखोल चर्चा करण्यासाठी व यातील तरतुदी प्रत्येक घटकांपर्यंत पोचविण्यासाठी चार सदस्यीय समिती गठीत केली आहे. जागृती, प्रतिक्रिया आणि अंमलबजावणी या त्रिसूत्रीवर ही समिती काम करणार आहे.

पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांच्यासह पुणे विद्यापीठाच्या एका विद्याशाखेचे अधिष्ठाता आणि एक विभागप्रमुख हे या समितीमध्ये असणार आहेत. केंद्र सरकारने नवीन शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे. त्यामध्ये कार्यानुभव, सर्व विद्याशाखांमध्ये शिक्षणाची मुभा, परदेशी विद्यापीठांना भारतात संधी, विद्यापीठांचे विभाजन, नवीन विद्यापीठांची निर्मिती, प्राध्यापकांचे प्रशिक्षण यासह अनेक तरतूदींचा त्यात समावेश आहे. नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थी, प्राध्यापक, संस्थाचालक, शिक्षकेतर कर्मचारी-अधिकारी यांना समजणे, त्यांची माहिती देऊन चर्चा घडवून आणणे आवश्यक आहे. यासाठी विद्यापीठाने ही चार सदस्यीय समिती नियुक्त केली आहे.

**“ शैक्षणिक धोरण अमूलाग्र बदल करणारे आहे. त्यासाठी हे सर्वांपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. पुढील काळात ही समिती माजी कुलगुरू, शिक्षण तज्ज्ञ, विद्यार्थी, संस्थाचालक, उद्योजक यांच्याशी चर्चा करेल.**

**- राजेश पांडे,**
सदस्य, व्यवस्थापन परिषद

**Sakaal: 20.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

## प्राध्यापकांना वाढीव मानधनावर पाणी

### परीक्षा कामाच्या सुधारित मानधनास स्थगिती

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १९** - करोनामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार की नाही, अशी स्थिती आहे. त्या पार्श्वभूमीवर खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने परीक्षा व मूल्यमापन प्रकल्पांतर्गत कामाबद्दल दिल्या जाणाऱ्या सुधारित मानधनास स्थगिती देण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला आहे. त्यामुळे परीक्षेचे काम करणाऱ्या हजारो प्राध्यापकांना वाढीव मानधनावर पाणी सोडावे लागणार आहे. याउलट विद्यापीठाची कोट्यवधी रुपयांची बचत होणार आहे.

परीक्षा शुल्काच्या माध्यमातून विद्यापीठास वर्षभरात सुमारे ४५ कोटी रुपये मिळतात. मात्र प्रश्नपत्रिका तयार करणे, परीक्षेसाठी पर्यवेक्षक म्हणून काम करणे, उत्तरपत्रिका तपासणी, परीक्षा केंद्राचे पर्यवेक्षक, समन्वयक, भरारी पथक, प्रात्यक्षिक परीक्षा घेणे, अशा प्रकारच्या उत्तरपत्रिकाचे मूल्यमापन करणाऱ्या संबंधित प्राध्यापक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मानधन दिले जाते. २००८-०९ पासून या मानधनात वाढ झालेली नव्हती. त्यामुळे विद्यापीठाने ऑक्टोबर २०१९ पासून १५ ते २० टक्के मानधनात वाढ केली. तथापि, 'विद्यापीठाने आमच्या परीक्षाच घेतलेल्या नाहीत तर आम्ही शुल्क का भरावे?' असा प्रश्न उपस्थित करत काही विद्यार्थी संघटनांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. असे असताना परीक्षेचे मानधन वाटप झाल्यास मोठा फटका पुणे विद्यापीठाला बसण्याची शक्यता आहे.

" एका सत्रामध्ये साधारणपणे २२ ते २४ लाख उत्तरपत्रिका तपासल्या जातात. त्यासाठी मानधन दिले जाते. मात्र, करोनामुळे परीक्षा शुल्क परत करावे यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तेथे काय निर्णय होईल, हे माहिती नसल्याने विद्यापीठाने खर्चात कपात करण्यासाठी सुधारित मानधन स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**Prabhat: 20.8.2020**

## कला अभ्यासक्रमांबाबत विद्यार्थी संभ्रमात

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई** : राज्यातील अनुदानित, विनाअनुदानित कला महाविद्यालयांतील प्रवेश, ऑनलाइन वर्ग अशा कोणत्याही गोष्टींबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने महाविद्यालये, विद्यार्थी संभ्रमात आहेत.

राज्यातील शासकीय महाविद्यालयांचे कामकाज सुरू झाले आहे. मात्र, कला संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या राज्यातील १७२ अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालयांच्या कामकाजाबाबत अद्याप संचालनालयाने काहीच सूचना दिलेल्या नाहीत. साधारण दहा अभ्यासक्रमांचे वेळापत्रक संचालनालयाने अद्यापही जाहीर केलेले नाही. टेक्सटाइल डिझाइन, इंटिरिअर डिझाइन, कला शिक्षक पदविका यांसह विविध अभ्यासक्रमांसाठी दहावी, बारावी झालेले विद्यार्थी या अभ्यासक्रमांना पात्र ठरतात.

या दोन्ही परीक्षांचे निकाल जाहीर होऊन अनेक दिवस झाले तरीही अद्याप पुढील प्रक्रियेबाबत काहीच स्पष्टता नाही. त्यामुळे पदविका अभ्यासक्रम चालवणारी महाविद्यालये गोंधळात आहेत. त्याचप्रमाणे ऑनलाइन अभ्यासक्रम कसे असावेत, त्याचे वेळापत्रक अद्याप जाहीर करण्यात आलेले नाहीत, अशी माहिती शिक्षकांनी दिली.

कला संचालनालय घेत असलेल्या एलिमेंटरी, इंटरमिजिएट परीक्षांची गुणपत्रकेही अद्याप दिलेली नाहीत. त्यामुळेही पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश रखडले असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. याबाबत संचालक डॉ. राजीव मिश्रा यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

### अहवाल धूळ खात?

परीक्षा कशी घेता येईल, अभ्यासक्रम कसे राबवावेत, ऑनलाइन अभ्यासक्रम कसे असावेत याबाबत अध्यापक आणि प्राचार्यांनी साधारण महिन्याभरापूर्वी संचालनालयाला अहवाल दिला आहे. मात्र, अद्यापही त्याबाबत संचालनालयाने निर्णय घेतलेला नाही, अशी माहिती शिक्षकांनी दिली.

लोकसत्ता Thu, 20 August 2020 https://epaper.loksatta.com/c/5

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# प्रवेशांसाठी महाविद्यालयांची तारांबळ

## अकरावी ऑनलाइन प्रवेशाला मुदत वाढीची मागणी

**पुणे, ता. २० : अकरावी प्रवेश प्रक्रियेत कनिष्ठ महाविद्यालयांना 'इनहाउस' कोटयातील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज करण्यासाठी एकाच दिवसाची (ता.२२) मुदत दिल्यामुळे महाविद्यालयांची चांगलीच तारांबळ उडत आहे.**

काही दिवसांपूर्वी प्रवेश नियंत्रण समितीने कनिष्ठ महाविद्यालयांना दिलेल्या मुदतीत इनहाउस कोट्यातील प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी त्यांच्या सोयीनुसार स्वतंत्र वेळापत्रक तयार करावे, अशी सूचना दिली होती. त्याप्रमाणे संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांनी नियोजन देखील केले. परंतु विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत ही देखील मुदत दिलेल्या त्याच दिवसापर्यंत असल्यामुळे इनहाउस कोटयासाठी देखील विद्यार्थी त्यांच्या सोयीनुसार नोंदणी करत आहेत. परिणामी महाविद्यालयांना या कोटयातील प्रवेशाची प्रक्रिया येत्या शनिवारपर्यंत पूर्ण करणे शक्य होत नसल्याने समोर येत आहे. त्यामुळे इनहाउस कोटयातील प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांना कालावधी वाढवून द्यावा, अशी मागणी सध्या होत आहे.

> **कोरोनाच्या पार्श्वभूमीवर इनहाउस आणि व्यवस्थापन कोटयातील जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया उपलब्ध करून दिली आहे. अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले, त्याचवेळी कनिष्ठ महाविद्यालयांना इनहाउस कोटयातील जागांवरील प्रवेशाच्या नियोजनाचे वेळापत्रक त्यांच्या स्तरावर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे महाविद्यालयांनी पावले उचलणे अपेक्षित होते.**
> - **मीना शेंडकर,** सचिव, इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश नियंत्रण समिती

### अकरावी प्रवेश आकडेवारी

| (ऑनलाइन अर्जाचा भाग एक) | (ऑनलाइन अर्जाचा भाग दोन) |
| --- | --- |
| नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या : ९८,२४८ | नोंदणी केलेले विद्यार्थी : ७०,५९९ |
| लॉक्ड झालेल्या अर्जाची संख्या : ८०,०९६ | अर्ज पूर्ण : ६७,२६२ |
| व्हेरिफाय झालेले अर्ज : ४२,९०८ | लॉक्ड झालेले अर्ज : ६५,८०० |

**३०४** अकरावी प्रवेशासाठी कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या

**प्रवेश क्षमता**

| | |
| --- | --- |
| १५,६८१ कला | ४३,९८१ विज्ञान |
| ४२,८१५ वाणिज्य | ४,४९५ एमसिव्हीसी |

**Sakaal: 21.8.2020**

# नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तज्ज्ञ समिती नेमा!

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा आदेश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** केंद्र सरकारने नुकत्याच जाहीर के लेल्या नव्या शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीबाबत राज्यातील सर्व विभागांतील शिक्षणतज्ज्ञांचा व अभ्यासकांचा समावेश असलेली समिती नेमण्याचा आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी दिला.

नवीन शिक्षण धोरणासंदर्भात मुख्यमंत्री ठाकरे यांनी वर्षा निवासस्थानी बैठक घेतली. शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड, उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत, मराठी भाषामंत्री सुभाष देसाई, पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे, शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू, मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार अजोय मेहता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशीष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे बैठकीस उपस्थित होते.

या नव्या शिक्षण धोरणात अनेक नव्या संकल्पना आहेत. त्यादृष्टीने राज्य सरकारला कायद्यातही अनेक बदल करावे लागतील. राज्यभरातील सर्व विभागांचे प्रतिनिधित्व असलेली तज्ज्ञ व संशोधक, अभ्यासक यांची समिती स्थापन करून या धोरणाच्या संदर्भात विचार करणे योग्य ठरेल. यामुळे शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडू शकतील का ते पाहण्याची गरज आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### दहावीचे वर्ग सुरू करण्याबाबत चर्चा

राज्यात १०० टक्के विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाइन, ऑफलाइन व जसे शक्य होईल तसे शिक्षण पोहोचले पाहिजे. त्यासाठी शिक्षण विभागाने यातील सर्व उणिवा, अडथळे दूर करावेत, असे मुख्यमंत्री ठाकरे यांनी सांगितले. तसेच नजीकच्या काळात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तरी प्रत्यक्ष शाळा काही प्रमाणात सुरू करता येतील का, यावरही बैठकीत चर्चा झाली. मात्र अंतिम निर्णय झाला नाही. तसेच नेहमी जूनपासून शैक्षणिक वर्ष सुरू होते, मात्र सध्याचा काळ पाहता जानेवारी ते डिसेंबर असे शैक्षणिक वर्ष सुरू करता येते का याबाबत केंद्राशी विचारविनिमय करण्याची सूचनाही मुख्यमंत्र्यांनी शिक्षण विभागाला केली.

लोकसत्ता Fri, 21 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54377384

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# ऑनलाइन प्रवेशामुळे कनिष्ठ महाविद्यालयांचे भविष्य धोक्यात

देवेश गोंडाणे, लोकसत्ता

गपूर : राज्यात शहरी भागातील निष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी शासाठी राबवण्यात येणाऱ्या निलाइन प्रवेशामुळे विद्यार्थ्यांच्या जारो जागा रिक्त राहत असून याचा टका महाविद्यालयांना बसतो हे. मागील वर्षात मुंबईमध्ये १ ख ८ हजार, पुण्यात २७ हजार नागपुरात २१ हजारांवर करावीच्या जागा रिक्त होत्या. निलाइन प्रवेशप्रक्रियेमुळे कवणी वर्गांनी आपला मोर्चा हरालगतच्या ग्रामीण भागातील हाविद्यालयांकडे वळवला आहे. परिणामी, शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांसाठी ही धोक्याची घंटा ठरत असून येथील शिक्षक अतिरिक्त ठरण्याचा धोका निर्माण झाला आहे.

मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती या शहरांतील महानगरपालिका क्षेत्रात अकरावीसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जाते. मात्र, दोषपूर्ण प्रक्रियेमुळे याला मोठ्या प्रमाणात विरोध होत आहे. इंग्रजी शाळांचे वाढते वलय लक्षात घेता मराठी शाळांना आता घरघर लागली असून प्राथमिक आणि माध्यमिकच्या शिक्षकांवर अतिरिक्त होण्याची वेळ आली आहे. यामुळे दरवर्षी शेकडो शिक्षक अतिरिक्त ठरत असून समायोजनाची डोकेदुखी वाढली आहे. यात आता कनिष्ठ महाविद्यालयांचाही समावेश होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. हा संभाव्य धोका ओळखूनच अनेक कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर प्राध्यापकांची भरती प्रक्रिया सुरू केली आहे. मागील काही वर्षांपासून

## विद्यार्थ्यांच्या लाखो जागा रिक्त; शिक्षकांवर अतिरिक्त होण्याची वेळ

> अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया केवळ महापालिकेच्या हद्दीतील कनिष्ठ महाविद्यालयांमध्येच राबवण्यात येत असल्याने शहर सीमेला लागून असलेल्या स्वयंअर्थसहाय्यित व विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये शिकवणी वर्गांच्या माध्यमातून विद्यार्थी प्रवेश घेतात. त्याचा परिणाम शहरातील महाविद्यालयांवर होतो. त्यामुळे ही प्रक्रिया संपूर्ण जिल्ह्यांमध्ये राबवण्यात यावी अथवा शहरातून रद्द करावी, यासाठी न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे.
>
> रवींद्र फडणवीस, कार्यवाह, महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्था महामंडळ.

विद्यार्थ्यांचा ओढा हा सीबीएसई शिक्षणाकडे वळला आहे. त्याचा फटका कनिष्ठ महाविद्यालयांना बसत आहे.

मागील दोन वर्षांतील राज्यातील अकरावी प्रवेशातील रिक्त जागांची संख्या पाहता पुढील वर्षांपासून कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षक समायोजनाचा प्रश्न गंभीर होण्याची दाट शक्यता आहे. मागील वर्षी मुंबई विभागात अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत १ लाख ०८ हजार जागा रिक्त राहिल्या होत्या. यात सर्वात जास्त विज्ञान शाखेच्या ४६,९२०, त्यानंतर वाणिज्यच्या ४२,५२३ तर कला शाखेच्या १६,२२४ जागा रिक्त होत्या. अशीच स्थिती पुणे, नागपूर व अन्य शहरातील होती. यंदाही अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून उपराजधानीतील ५९ हजार जागांसाठी केवळ ३८ हजार अर्ज आले आहेत.

### २०१९ मधील रिक्त जागा

| शहर | प्रवेश क्षमता | प्रवेश निश्चिती | रिक्त जागा |
|---|---|---|---|
| मुंबई | ३ लाख २६ हजार | २ लाख १८ | १ लाख |
| पुणे | १ लाख ४ हजार | ६३,५६६ | २७ हजार |
| नाशिक | २३ हजार ८६० | १५,३०० | ८ हजार |
| नागपूर | ५८ हजार ७६० | ३७,७०० | २१ हजार |

लोकसत्ता Fri, 21 August 2020 https://epaper.loksatta.com/c/54377488

# बारा विद्याशाखांतील अभ्यासक्रमांना 'दूरशिक्षण'द्वारे प्रवेश नाही

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** व्यावसायिक अभ्यासक्रमांतील अभियांत्रिकी, हॉटेल मॅनेजमेंट, वास्तुकला अशा बारा विद्याशाखांतील अभ्यासक्रमांचे आणि एम.फिल., पीएच.डी.चे दूरशिक्षण किंवा मुक्तशिक्षणाद्वारे प्रवेश देता येणार नाहीत, असे विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) स्पष्ट केले आहे.



### विद्यार्थ्यांनी खात्री करावी

उच्च शिक्षण संस्थांमध्ये दूरशिक्षण अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी यूजीसीच्या संकेतस्थळावरून संबंधित शिक्षण संस्थेला दूरशिक्षण अभ्यासक्रम राबवण्यासाठीची संलग्नता असल्याची खात्री करावी, असे आवाहनही यूजीसीने केले आहे.

करोना विषाणू संसर्गामुळे देशभरातील जवळपास सर्व शिक्षण संकुले बंद आहेत. या पार्श्वभूमीवर यूजीसीने मुक्तशिक्षण किंवा दूरशिक्षणासाठी प्रतिबंधित अभ्यासक्रमांबाबतची माहिती परिपत्रकाद्वारे संकेतस्थळावर जाहीर केली आहे. यूजीसीने २० टक्के अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने पूर्ण करण्यास या पूर्वीच परवानगी दिली आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांतील अभियांत्रिकी, हॉटेल मॅनेजमेंट, वास्तुकला अशा बारा विद्याशाखांतील अभ्यासक्रमांचे आणि एम.फिल., पीएच.डी.चे दूरशिक्षण किंवा मुक्तशिक्षणाद्वारे प्रवेश देता येणार नाहीत. खासगी शिकवणी संस्थांशी करार करून खासगी किंवा सार्वजनिक विद्यापीठांना त्यांचे अभ्यासक्रम मुक्तशिक्षण किंवा दूरशिक्षण पद्धतीने प्रवेश देऊन चालवता येणार नाही, असे यूजीसीने परिपत्रकात नमूद केले आहे. प्रत्येक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया उच्च शिक्षण संस्थेच्या मुख्यालयामार्फत पारदर्शक पद्धतीनेच राबवावी. दूरशिक्षण किंवा मुक्तशिक्षण अभ्यासक्रमाचे प्रवेश यंदा सप्टेंबर-ऑक्टोबर आणि फेब्रुवारी-मार्चपासून राबवले जाणार आहेत. त्यात पदवीपूर्व अभ्यासक्रमासाठी बारावी उत्तीर्ण आणि पदव्युत्तर पदवीसाठी पदवी उत्तीर्ण पात्रता आहे, असे यूजीसीने नमूद केले आहे.

लोकसत्ता Fri, 21 August 2020 https://epaper.loksatta.com/c/54377609

# जानेवारी ते डिसेंबर नवे शैक्षणिक वर्ष

## केंद्राशी चर्चा करा : मुख्यमंत्र्यांचे शिक्षण विभागाला आदेश

**मुंबई, दि. २० ( प्रतिनिधी ) - राज्यात काहीही झाले तरी १०० टक्के विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाइन, ऑफलाइन व जसे शक्य होईल तसे शिक्षण मिळालेच पाहिजे. नेहमी जूनपासून शैक्षणिक वर्ष सुरू होते; मात्र सध्याचा काळ पाहता जानेवारी ते डिसेंबर असे शैक्षणिक वर्ष सुरू करता येते का, त्याबाबत केंद्राशी विचारविनिमय करा, असे आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज शिक्षण विभागाला दिले.**

'वर्षा' निवासस्थानी नवीन शैक्षणिक धोरणासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी बैठक घेतली. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, कोरोना परिस्थितीमुळे सध्या सर्वच क्षेत्रांना फटका बसला आहे. शिक्षण क्षेत्रही त्याला अपवाद नाही. मात्र, काही झाले तरी राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण मिळायलाच हवे. या बैठकीत शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड, उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत, मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू सहभागी झाले होते.





ऑनलाइन-ऑफलाइनमध्ये ज्या उणिवा जाणवत आहेत त्या शिक्षण विभागाने यातील सर्व उणिवा, अडथळे दूर करावेत, शिक्षकांची उपस्थिती कशी आहे ते तपासावे, विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात काय अडचणी येत आहेत त्या तत्काळ पहाव्यात, असे आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले आहेत.

### दहावीसाठी प्रत्यक्ष शाळा सुरू करण्याचा विचार

भविष्यात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तरी प्रत्यक्ष शाळा काही प्रमाणात सुरू करता येतील का, याबाबतही बैठकीत चर्चा झाली. मंत्री गायकवाड यांनी ११ वी प्रवेशाचे काम व्यवस्थित सुरू असल्याचे यावेळी सांगितले. पहिली ते बारावीपर्यंत २५ टक्के अभ्यासक्रम कमी केला आहे, असेही त्या म्हणाल्या. अतिरिक्त मुख्य सचिव वंदना कृष्णा यांनी ऑनलाइन शिक्षण हळूहळू अंगवळणी पडते आहे, असे सांगून पाठ्यपुस्तकेही सर्वांपर्यंत वितरित झाल्याचे सांगितले.

बैठकीला मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार अजोय मेहता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे आदी उपस्थित होते.

> नव्या शैक्षणिक धोरणामुळे कायद्यातही अनेक बदल करावे लागतील. काही आवश्यक आणि अनिवार्य बदल स्वीकारावेच लागतील, तर जे स्वीकारले जाऊ शकत नाहीत किंवा त्यात काही अडचणी आहेत तर त्याबाबतही विचार करावा लागेल.

नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण

### अंमलबजावणीसाठी शिक्षणतज्ज्ञ, अभ्यासकांची समिती

**शिक्षणक्षेत्रात आमूलाग्र बदल घडेल का?**

केंद्राने घोषित केलेल्या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी समिती नेमण्यात यावी. या समितीमध्ये शिक्षणतज्ज्ञ आणि अभ्यासकांचा समावेश करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिले. नव्या धोरणात अनेक नव्या संकल्पना मांडण्यात आल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य सरकारलाही शैक्षणिक धोरणात बदल करण्यासाठी कायदे करावे लागतील. यासाठी राज्यभरातील सर्व विभागांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेला तज्ज्ञ, संशोधक आणि अभ्यासक यांचा एक एक अभ्यास गट तयार करावा. या अभ्यास गटाने तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण तसेच मातृभाषेतून शिक्षण, विद्यार्थिकेंद्रित शिक्षण, विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण होईल तसेच ते जास्तीत जास्त प्रश्न विचारू शकतील अशी शैक्षणिक पद्धती यावर सखोल चर्चा करावी. त्यातून शिक्षणात आमूलाग्र बदल घडून विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल, असे शैक्षणिक धोरण तयार करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**Saamana: 21.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# जानेवारीपासून शैक्षणिक वर्ष सुरू करण्याची चाचणी

## ■ मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची केंद्राशी विचारविनिमय करण्याची सूचना ■



मुंबई, दि. २० - करोना परिस्थितीमुळे सर्वच क्षेत्रांना फटका बसला आहे. या शिक्षण क्षेत्रही अपवाद नाही. नेहमी जूनपासून शैक्षणिक वर्ष सुरू होते. मात्र सध्याचा काळ पाहता जानेवारी ते डिसेंबर असे शैक्षणिक वर्ष सुरू करता येते का, त्याबाबत केंद्राशी विचारविनिमय करण्याची सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे.

मुख्यमंत्र्याच्या वर्षा निवासस्थानी नवीन शैक्षणिक धोरणासंदर्भात मुख्यमंत्र्यांनी आज बैठक झाली. यावेळी शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड, उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत, मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू उपस्थित होते. भविष्यात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तरी प्रत्यक्ष शाळा काही प्रमाणात सुरू करता येतील का यावरही बैठकीत चर्चा झाली.

उद्धव ठाकरे म्हणाले, या नव्या धोरणात अनेक नव्या संकल्पना आहेत. त्यादृष्टीने राज्य सरकारला कायद्यातही अनेक बदल करावे लागतील. काही आवश्यक आणि अनिवार्य बदल स्वीकारावेच लागतील तर जे स्वीकारले जाऊ शकत नाही किंवा त्यात काही अडचणी आहेत तर त्याबाबतही विचार करावा लागेल. या दृष्टीने या धोरणाची सध्या केवळ चर्चा करण्यात आली आहे. आपण राज्यभरातील सर्व विभागांचे प्रतिनिधित्व असलेला तज्ज्ञ व संशोधक, अभ्यासक यांचा गट स्थापन करून या धोरणाच्या संदर्भात विचार करणे योग्य ठरेल. यामध्ये तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण तसेच मातृभाषेतून शिक्षण, विद्यार्थी केंद्रित शिक्षण, विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण होईल तसेच ते जास्तीत जास्त प्रश्न विचारू शकतील, असे त्यांनी सांगितले.

**Prabhat: 21.8.2020**

लोकमत

# शैक्षणिक वर्ष जानेवारी ते डिसेंबर!

## मुख्यमंत्र्यांचे सूतोवाच; नवे शैक्षणिक धोरण राबविण्यासाठी समिती

विशेष प्रतिनिधी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : सध्याचा कोरोनाचा काळ बघता शैक्षणिक वर्ष जानेवारी ते डिसेंबर असे सुरु करता येईल का, याबाबत राज्य शासन केंद्राशी विचारविनिमय करणार आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तशा सूचना शिक्षण विभागाला दिल्या आहेत. केंद्राच्या नवीन शैक्षणिक धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी तज्ज्ञांची एक समिती नेमण्याचे आदेशही त्यांनी दिले.

शैक्षणिक धोरणासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी बैठक झाली. सध्याच्या स्थितीत काहीही झाले (पान ६ वर)



### नव्या संकल्पना -मुख्यमंत्री

मुख्यमंत्री म्हणाले की, या नव्या धोरणात अनेक नव्या संकल्पना आहेत. त्या दृष्टीने राज्य सरकारला कायद्यातही अनेक बदल करावे लागतील. काही आवश्यक आणि अनिवार्य बदल स्वीकारावेच लागतील तर जे स्वीकारले जाऊ शकत नाहीत किंवा त्यात काही अडचणी आहेत तर त्याबाबतही विचार करावा लागेल.

### तज्ज्ञ, संशोधक, अभ्यासकांचा गट स्थापन करणार

यादृष्टीने या धोरणाची सध्या केवळ घोषणा करण्यात आली आहे. आपण राज्यभरातील सर्व विभागांचे प्रतिनिधित्व असलेला तज्ज्ञ व संशोधक, अभ्यासक यांचा गट स्थापन करुन या धोरणाच्या संदर्भात विचार करणे योग्य ठरेल. यामध्ये तंत्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण, तसेच मातृभाषेतून शिक्षण, विद्यार्थी केंद्रित शिक्षण, विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण होईल, तसेच ते जास्तीत जास्त प्रश्न विचारु शकतील, असा प्रस्तावित शैक्षणिक ढांचा यावर सखोल चर्चा करता येईल.

Pune Main
Page No. 3 Aug 21, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# शैक्षणिक वर्ष जानेवारी ते डिसेंबर!

(पान १ वरून) तरी १०० टक्के विद्यार्थ्यांपर्यंत ऑनलाईन, ऑफलाईन व जसे शक्य होईल तसे शिक्षण मिळालेच पाहिजे. शिक्षण विभागाने यातील सर्व उणिवा, अडथळे दूर करावेत, शिक्षकांची उपस्थिती तपासावी. विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात काय अडचणी येत आहेत त्या तत्काळ पाहाव्यात, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी केल्या. येत्या ऑक्टोबरमध्ये याबाबत आढावा घेण्यात येईल, असे शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी बैठकीत सांगितले. भविष्यात दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तरी प्रत्यक्ष शाळा काही प्रमाणात सुरु करता येतील का, यावरही बैठकीत चर्चा झाली. बैठकीला मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत, पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, शिक्षण राज्यमंत्री बच्चू कडू आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

Pune Main
Page No. 8 Aug 21, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

संडे अँकर । प्राध्यापकांमध्ये संभ्रम । सीएचबी प्राध्यापकांचे मानधन कोण देणार?

### ऑनलाइन शिक्षण ग्राह्य धरणार का ?

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि विद्यापीठाशी संलग्न काही महाविद्यालयांतर्फे विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण दिले जात आहे; मात्र हे शिक्षण शासन ग्राह्य धरणार किंवा नाही, याबद्दल अद्याप कोणतीही स्पष्टता नाही; तसेच तासिका तत्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांकडून दिल्या जाणाऱ्या ऑनलाइन शिक्षणाचे मानधन त्यांना मिळणार का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.



कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना वर्गात बोलवून शिक्षण देणे शक्य नसल्याने विद्यापीठ व महाविद्यालयांकडून सध्या ऑनलाइन शिक्षणाचे धडे गिरवले जात आहेत. विद्यापीठाशी संलग्न काही नामांकित महाविद्यालयांची प्रवेशप्रक्रिया पूर्ण झाली आहे, तर काही महाविद्यालयांची प्रवेशप्रक्रिया सप्टेंबर महिन्यात पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यात तासिका तत्त्वावरील प्राध्यापक शिक्षण देत आहेत. विद्यापीठाने मागील वर्षी नियुक्त झालेल्या तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना यंदा कायम ठेवण्याचे निर्देश दिले असले, तरी राज्य उच्च शिक्षण विभागाने यासंदर्भात आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे या प्राध्यापकांचे मानधन कोण देणार, याबाबत संभ्रम आहे.

#### यावर शासनाची चुप्पी

या पुढील काळात सुमारे ४० टक्के अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने शिकविण्याचा निर्णय विद्यापीठ घेणार आहे. ऑनलाइन शिक्षणासाठी विद्यापीठ 'स्वतंत्र प्लॅटफॉर्म' उपलब्ध करून देत आहे. सुरुवातीला दहा महाविद्यालयांत या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून ऑनलाइन शिक्षण दिले जाणार असून, सप्टेंबरअखेर सर्व महाविद्यालयांना त्यात सामावून घेण्याचा प्रयत्न आहे. परंतु, इंटरनेट कनेक्टिव्हिटी, ॲण्ड्रॉईड मोबाईल नसल्याने अनेक विद्यार्थी ऑनलाइन शिक्षणापासून वंचित राहात आहेत. या विद्यार्थ्यांना महाविद्यालय नियमित सुरु झाल्यावर वर्गात मार्गदर्शन मिळणार की नाही, याबद्दल शासन गप्प आहे.

'उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या विविध बैठकांमध्ये कुलगुरूंना ऑनलाइन शिक्षणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले; मात्र शिक्षण विभागाने याबाबत लेखी आदेश काढलेला नाही,' असे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. मोहन खताळ यांनी स्पष्ट केले. प्राचार्य महासंघाचे अध्यक्ष प्रा. नंदकुमार निकम म्हणाले की, ऑनलाइन शिक्षणाच्या ग्राह्यतेबद्दल अस्पष्टता कायम आहे. तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या मानधनाबद्दलही संभ्रम आहे. या दोन्ही विषयांवर शासनाने भूमिका स्पष्ट करावी.

Pune Main
Page No. 2 Aug 23, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

### सर्वसाधारण गुणवत्ता यादी आज जाहीर होणार

अकरावी प्रवेश । २५ ऑगस्टपर्यंत यादीवरील आक्षेप नोंदवता येणार

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील इयत्ता अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज केलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी येत्या रविवारी (दि.२३) दुपारी प्रसिद्ध केली जाणार आहे. सर्व विद्यार्थ्यांनी सर्वसाधारण गुणवत्ता यादी पाहणे आवश्यक असून, येत्या २५ ऑगस्टपर्यंत विद्यार्थ्यांचे यादीवरील आक्षेप निकाली काढले जाणार आहेत.

पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय व इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश समितीच्या माध्यमातून पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांमधील १ लाख ६ हजार ९७२ जागांसाठी ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविली जात आहे.

#### २७ हजार जणांनी भरले नाहीत पसंतीक्रम

- शिक्षण विभागाने प्रसिद्ध केलेल्या अकरावी प्रवेशाच्या वेळापत्रकानुसार येत्या २३ ऑगस्ट रोजी दुपारी बारा वाजता प्रवेश अर्ज भरलेल्या सर्व विद्यार्थ्यांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. प्रवेशासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी २७ हजार ११७ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जात पसंतीक्रम भरले नाहीत.
- कोरोनामुळे पुण्याबाहेरुन शहरातील नामांकित महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांनी यंदा अर्ज भरला नसावा. त्यामुळे ही संख्या घटली असावी अशी शक्यता शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

**98,895** विद्यार्थ्यांनी शनिवारी सायंकाळी सात वाजेपर्यंत प्रवेशासाठी नोंदणी केली.

त्यातील **81,513** विद्यार्थ्यांनी अर्ज लॉक केले.

**81,053** विद्यार्थ्यांचे अर्ज शिक्षण विभागाने तपासले

त्यातील केवळ **71,778** विद्यार्थ्यांनीच पसंतीक्रम भरले आहेत. त्यामुळे पसंतीक्रम भरणारे विद्यार्थीच प्रवेशासाठी पात्र असणार आहेत.

Pune Main
Page No. 2 Aug 23, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

# परीक्षेच्या वाढीव मानधनाला स्थगिती

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय । परीक्षा शुल्क परत देण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे** : कोरोनामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार किंवा नाही, याबाबत अद्याप कोणतीही स्पष्टता नाही. तसेच, परीक्षाच झाली नसल्याने विद्यापीठाने परीक्षा शुल्क परत द्यावे अशी मागणी करत काही विद्यार्थी संघटनांनी न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाने परीक्षेच्या कामकाजासाठी वाढविलेल्या मानधनाला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमध्ये सुमारे सात लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. या विद्यार्थ्यांच्या विविध परीक्षांच्या निकालाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १० हजारांपेक्षा अधिक प्राध्यापक, तसेच हजारो शिक्षकेतर कर्मचारी काम करतात. विद्यार्थिसंख्या मोठी असल्यामुळे या विद्यार्थ्यांकडून एका वर्षात परीक्षा विभागाकडे सुमारे ४५ कोटी रुपये शुल्काच्या स्वरूपात जमा होतात. परंतु, परीक्षा घेण्यासाठी प्रश्नपत्रिका काढणे, परीक्षेसाठी पर्यवेक्षकांची नियुक्ती करणे, उत्तरपत्रिकांची तपासणी करणे, प्रात्यक्षिक परीक्षा घेणे आदी कामांसाठी मानधन द्यावे लागते.

### मानधनात १५ ते २० टक्के वाढीचा होता निर्णय

- शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून या मानधनात वाढ झाली नव्हती. त्यामुळे विद्यापीठाने परीक्षेच्या कामाच्या मानधनात १५ ते २० टक्के वाढ करण्याचा निर्णय घेतला होता.
- तसेच, ऑक्टोबर २०१९ पासून त्याची अंमलबजावणी सुरु झाली होती. मात्र, विद्यापीठाने परीक्षाच घेतल्या नाहीत तर शुल्क का भरावे, असे म्हणत विद्यार्थी संघटनांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.



- न्यायालयाने विद्यार्थ्यांचे शुल्क परत देण्याबाबत आदेश दिल्यास विद्यापीठाला मोठा आर्थिक फटका बसू शकतो. त्यामुळे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत वाढीव मानधनाला पुढील दोन सत्रांसाठी स्थगिती देण्यात आली आहे.

Pune Main
Page No. 2 Aug 23, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM


रविवार विशेष

रविवार, २३ ऑगस्ट २०२०

मिलिंद सोहोनी,
अनिरुद्ध केतकर

**विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी) आणि महाराष्ट्र व इतर राज्ये यांच्यामधील अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबतचा वाद न्यायालयात सुरू असून यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रातील केंद्र-राज्य संबंधांमधला तिढा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. राज्यघटनेअंतर्गत उच्च शिक्षणाची गुणवत्ता निर्धारित करण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे आणि त्यातूनच पात्रता/ स्पर्धा परीक्षा, नियामक संस्था आणि क्रमवारी (रँकिंग) असे घटक प्रबळ ठरलेली उच्च शिक्षण व्यवस्था आकारास आली आहे. परीक्षांबाबतच्या सध्याच्या वादाचा न्यायालयीन निकाल काहीही लागला, तरी अशी व्यवस्था विद्यार्थ्यांच्या किती फायद्याची याचा विचार व्हायला हवा. तसा तो अलीकडेच जाहीर झालेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात झाला आहे का?**



# उच्च शिक्षण व्यवस्थेची फेररचना हवी!

**विद्यापीठ अनुदान** आयोग (यूजीसी) आणि महाराष्ट्र व इतर राज्ये यांच्यामधील महत्त्वाचा वाद सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. यामुळे उच्च शिक्षण क्षेत्रातील केंद्र-राज्य संबंधांमधला तिढा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. करोना साथीच्या धोक्यामुळे महाराष्ट्र व इतर काही राज्यांनी पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा रद्द केली आहे आणि सेमिस्टरच्या कामगिरीच्या आधारे पदवी प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे. यूजीसीने- ३० सप्टेंबर २०२० पूर्वी विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाइन, ऑफलाइन किंवा संमिश्र पद्धतीने घेण्यात याव्यात, असे फर्मान काढले आहे. मुंबई उच्च न्यायालयाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात यूजीसीने युक्तिवाद केला आहे की, राज्यघटनेअंतर्गत उच्च शिक्षणाची गुणवत्ता निर्धारित करण्याचा अधिकार सर्वस्वी केंद्र सरकारला आहे आणि राज्ये त्या कार्यकक्षेत अतिक्रमण करीत आहेत. त्याचबरोबर यूजीसीचा दावा आहे की, त्यांच्या मार्गदर्शक सूचना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याचे रक्षण करीत आहेत.

अर्थात हे खरे आहे की, घटनेप्रमाणे ''उच्च शिक्षण, संशोधन, वैज्ञानिक वा तांत्रिक संस्थांमधील गुणवत्ता प्रस्थापित करण्यासाठी समन्वय आणि निर्धारण करणे'' हा अधिकार केंद्र सरकारला आहे. यातूनच यूजीसी ही संस्था निर्माण झाली. पुढल्या काळात या आणि काही मोजक्या कायद्यांमुळे महाविद्यालयीन शिक्षकांसाठी 'यूजीसी-नेट' ही पात्रता परीक्षा; आयआयटीमध्ये प्रवेशासाठी 'जेईई' व नंतर 'गेट'; वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी 'नीट' या स्पर्धा परीक्षा अस्तित्वात आल्या. अशा प्रकारे संपूर्ण देशाची उच्च शिक्षण व्यवस्था ही पात्रता व स्पर्धा परीक्षा, नियामक संस्था आणि क्रमवारी (रँकिंग) यांच्या जंजाळात अडकली. मात्र, या सगळ्या व्यवस्थेमुळे विद्यार्थ्यांचे भवितव्य जास्त सुरक्षित झाले का? त्यांना शिक्षणानुरूप नोकऱ्या उपलब्ध झाल्या का? राज्यांना त्यांचा विकास घडवून आणण्यासाठी योग्य संशोधन, प्रशिक्षण व व्यवसाय तयार झाले का? उच्च शिक्षणाची गुणवत्ता टिकवण्यासाठी केंद्राने असे नेमके काय केले आहे, हे आपण पडताळून पाहिले पाहिजे.

कुठल्याही समाजामध्ये उच्च शिक्षणाचा दर्जा सांभाळणे यात दोन मुख्य गोष्टी येतात : (१) अभ्यासक्रम निश्चित करणे आणि (२) पात्रता ठरवणे. या अभ्यासक्रमाची सतत समीक्षा करणे आणि तो काळानुरूप समाजाच्या गरजेनुसार बदलणे हे ओघाने आलेच.

अभियांत्रिकी अभ्यासक्रम बघितले, तर ते एका काल्पनिक जागतिक अर्थव्यवस्थेसाठी आखलेले आहेत व भारतभर एकसमान आहेत. त्यात एकही प्रादेशिक विषय किंवा उद्योग यांचा अभ्यास नाही. हिमाचलच्या डोंगराळ भूभागाचे प्रश्न किंवा महाराष्ट्राचे सिंचन व्यवस्थापन हे दोन्ही तिथल्या अभ्यासक्रमात नाही. त्यामुळे आपले पदवीधर साहजिकच पांढरपेशा नोकऱ्यांकडे वळतात. त्यांना उद्योग किंवा उत्पादन क्षेत्रात स्वारस्य नसल्याने आपले उद्योग खुंटलेले राहिले आहेत. 'मेक इन इंडिया' या केंद्राच्याच उपक्रमालादेखील ही त्रुटी उमजलेली दिसत नाही.

बी.ए. आणि बी.एस्सी.च्या महाविद्यालयांतल्या शिक्षकांना 'यूजीसी-नेट' ही केंद्र शासनाची पात्रता परीक्षा उत्तीर्ण करावी लागते. त्याचा अभ्यासक्रम पुन्हा 'राष्ट्रीय' किंवा 'जागतिक' असाच आहे. अर्थशास्त्राच्या अभ्यासक्रमात १० प्रकरणांमध्ये केवळ शेवटच्या प्रकरणात भारतीय अर्थव्यवस्थेची ओळख होते. बाकी सगळी प्रकरणे पाश्चात्त्य अर्थव्यवस्थेतून आकारलेले अर्थशास्त्र, त्यातले मॉडेल्स व सिद्धान्त. त्यात उपयुक्त असे कमीच. राज्याचे आर्थिक नियोजन, जिल्हा आर्थिक आराखडा, शहरांची आर्थिक बैठक, राज्याबद्दल सांख्यिकी माहिती याचे विश्लेषण सोडाच, परिचयसुद्धा नाही. समाजशास्त्र घेतले तर मार्क्स आणि वेबर यांचे तत्त्वज्ञान शिकवले जाते, पण 'मनरेगा' सारख्या महत्त्वपूर्ण विकास कार्यक्रमांचा उल्लेख नाही व कोणत्याही स्थानिक विषयाचा अंतर्भाव नाही. याने साहजिकच आपले पदवीधर यांची स्थानिक उपयुक्तता कमी आणि नोकऱ्याही कमीच आहेत.

खरे तर शैक्षणिकदृष्ट्या स्थानिक संदर्भ असलेले, रोजच्या जीवनातले प्रश्न मांडले की विद्यार्थी जास्त चांगल्या प्रकारे आत्मसात करतात. हेच उद्दिष्ट ठेवून राज्य सरकार 'उन्नत महाराष्ट्र अभियान' हा उपक्रम राबवत आहे. या अंतर्गत अभियांत्रिकी संस्था व स्थानिक प्रशासन यांच्यात 'केस स्टडीज्'च्या माध्यमातून आसपासच्या भागातल्या विकासाच्या समस्या मार्गी लागत आहेत. परंतु या उपक्रमाला केंद्राचे सहकार्य लाभले नाही.

आपल्या उच्च शिक्षण व्यवस्थेतले दुसरे कटू सत्य म्हणजे स्पर्धा परीक्षा! यातदेखील केंद्रीय परीक्षांचा प्रभाव मोठा आहे. सध्या 'जेईई', 'गेट' आणि 'नीट' या केंद्रीय प्रवेश परीक्षाच शिक्षणाचे नवीन मापदंड बनल्या आहेत. 'जेईई'च्या माध्यमातून आयआयटी या प्रथितयश संस्थेत प्रवेश- म्हणजे गलेलठ्ठ पगार व जागतिक व्यवस्थेसाठी खुले प्रवेशद्वार, असेच समीकरण झाले आहे. तीव्र स्पर्धेमुळे कोचिंग क्लासेसची मोठी बाजारपेठ तयार झाली आहे. हे सगळे क्लास मोठ्या शहरांमध्ये असतात, जे गावामधल्या मुलांना परवडत नाहीत व ती मागे राहतात. शिवाय परीक्षार्थींपैकी फक्त एक-दोन टक्केच निवडले जातात, जे बहुतेक शहरांतले असतात. ते राज्याच्या आंतरिक प्रश्नांबाबत अनभिज्ञ असतात आणि नोकरीसाठी अर्थातच शहरात किंवा परदेशी जातात. इतर सर्व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगती व मानसिकतेवर मात्र याचा विपरीत परिणाम होतो.

तीच गत 'नीट'मधून वैद्यकीय प्रवेशाची. ग्रामीण भागातले विद्यार्थी उत्तीर्ण होत नाहीत आणि जे उत्तीर्ण होतात त्यांना स्थानिक तालुका, जिल्ह्यांमधल्या परिस्थितीबद्दल जिव्हाळा नसतो. त्यामुळे राज्यात महाविद्यालये असूनसुद्धा ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र व जिल्हा रुग्णालयांमध्ये डॉक्टरांचा तुटवडा आहे. हे भीषण वास्तव करोनाच्या निमित्ताने उघड झाले.

थोडक्यात, स्थानिक समाजामधून आणि त्यांच्यासाठी अभियंता आणि डॉक्टर उपलब्ध करून देण्याची राज्याची उद्दिष्टे पूर्ण होत नाहीत.

शालेय शिक्षण व्यवस्थेवरसुद्धा स्पर्धा परीक्षांचे अनेक दुष्परिणाम होत आहेत. स्पर्धा परीक्षेमध्ये विचारतात तेच विज्ञान, असा गैरसमज झाला आहे. गावाची किंवा शहराची माहिती, शेती, स्थानिक व्यवसाय, पाणी व इतर व्यवस्था हे विषय सर्व स्तरांवर अभ्यासक्रमातून गायब झाले आहेत. यामुळे हुशार पाच-दहा टक्के सोडून उरलेल्या ९० टक्के मुलांमध्ये साधे व्यवहारज्ञानसुद्धा नसते. १९०५ साली इंग्रजांनी शालेय शिक्षणाचा आढावा घेतला तेव्हा त्यांची सूचना होती की, गावाच्या नकाशाचा वापर झाला पाहिजे. स्वातंत्र्य मिळून ७३ वर्षे होऊन गेली तरी हे नकाशे अजून उपलब्ध नाहीत. स्वच्छ भारत अभियानामध्ये पाण्याच्या निचऱ्यासाठीसुद्धा यांची गरज भासली नाही, हे आश्चर्यच!

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाप्रमाणे ''वैयक्तिक कामगिरी आणि ज्ञानप्राप्ती, विधायक सार्वजनिक सहभाग आणि समाजासाठी उत्पादनक्षम योगदान'' हे उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट आहे. पण विद्यार्थी, शिक्षण संस्था, राज्य आणि देश यांच्यासाठी ठोस निष्पत्ती काय? एखादा 'चांगला' विद्यार्थी स्थानिक प्रश्नाचा अभ्यास करून अहवाल सादर करू शकेल काय? सध्याचा अभ्यासक्रम त्याला सक्षम करतो का? आयआयटी-मुंबई किंवा शिवाजी विद्यापीठाने कोल्हापूरच्या पुराचे विश्लेषण किंवा त्यांच्या शहरांमध्ये करोना साथीचे मापन करावे का? पिण्याच्या पाण्याचा प्रश्न संशोधन करून सोडवण्याची अपेक्षा राज्य आपल्या महाविद्यालयांकडून ठेवू शकेल का? 'एलिट' शिक्षण संस्थांकडू रेल्वे वाहतूक सुधारण्यासाठी आणि श्रमिक सेवेसाठी वेळापत्रक निश्चित करण्याची अपेक्षा आपण करू शकतो का? या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे आतापर्यंत मिळालेली नाहीत.

थोडक्यात, भारतासारख्या आर्थिक, सामाजिक व भौगोलिक विविधता असलेल्या देशासाठी उच्च शिक्षणाचा दर्जा सांभाळणे हे मोठे जबाबदारीचे का आहे. त्यासाठी सामाजिक गरजा व समस्या, त्यावर संशोधन व उपाय, शेवट त्यातून प्रशिक्षण आणि व्यवसायनिर्मिती असे चक्र पाळावे लागते. देशव्यापी स्प परीक्षा किंवा एकच एक अभ्यासक्रम य ते साध्य होत नाही. ही महत्त्वाची जबाबदारी यूजीसी किंवा केंद्राच्या उच्च शिक्षण व वैज्ञानिक विभाग व संस्थांना उमगलेली नाही. त्याला लागणारा प्रामाणिक अभ्यास बहुदा त्यांच्या आवाक्याबाहेरचा आहे. याचा परिणाम आपली अर्थव्यवस्था आणि विकासाचे निर्देशांक यांमध्ये दिसून येतो. खेदाची गोष्ट ही की, नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानेसुद्धा याचा विचार केलेला दिस नाही.

विद्यार्थ्यांनी काय करावे? त्यांचे भविष्य हे प्रादेशिक प्रश्न, व्यवस्था आ उद्योग यांच्याशीच जोडलेले आहेत. त्यां हे समजून घेतले पाहिजे. राज्यांनीसुद्धा केंद्राकडून काही अपेक्षा न ठेवता, ''आमच्या नोकऱ्या, आमचा विकास, आमचा अभ्यासक्रम हा आमच्या हातात!'' या ब्रीदवाक्याप्रमाणे उच्च शिक्षण व्यवस्थेची फेररचना केली पाहिजे. याचा आराखडा बांधणे हा एक स्वतंत्र विषय आहे.

**(मिलिंद सोहोनी हे आयआयटी मुंबई येथे प्राध्यापक आहेत, अनिरुद्ध केतकर हे अभियंता व स्वत अभ्यासक आहेत**
milind.sohoni@gmail.co
aketkar65@gmail.co

लोकसत्ता Sun, 23 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54415751

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# शिक्षकांसाठी तयार केला 'इ-वर्ग'

## आयआयटी खड्गपूरमध्ये 'दीक्षक' सॉफ्टवेअरची निर्मिती

**कोलकता, ता. २२ (पीटीआय) :** कोरोनामुळे शाळा, महाविद्यालये बंद असल्याने अनेक शैक्षणिक संस्थांनी ऑनलाइन वर्ग सुरू केले आहेत. अशा प्रकारे अध्यापन करणे हे एक आव्हानच असल्याने शिक्षकांना उपयुक्त ठरले, असे सॉफ्टवेअर आयआयटी खडगपूरच्या संशोधकांनी विकसित केले आहे.

आयआयटी खड्गपूर येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड इलेक्ट्रिकल कम्युनिकेशन विभागाचे प्राध्यापक राजा दत्ता यांनी व त्यांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी 'दीक्षक' हे सॉफ्टवेअर तयार केले आहे, अशी माहिती 'आयआयटी'च्या प्रवक्त्याने दिली. 'दीक्षक' हे वेबवर आधारित कमी क्षमतेचे बँडविथ असून कोणताही संगणक आणि अगदी स्मार्टफोनवरही वापर करणे शक्य आहे. कोरोनामुळे सुरक्षित अंतराचे निर्बंध लागू झाल्याच्या काळात आयआयटी खड्गपूरमध्ये या सॉफ्टवेअरची चाचणी घेतली होती. ३०० विद्यार्थ्यांसह ४० तास सुरू असलेल्या वर्गात हे सॉफ्टवेअर वापरून त्याची उपयुक्तता तपासण्यात आली. आयआयटी खड्गपूरने 'दीक्षक'च्या स्वामित्व हक्कासाठी अर्ज केला आहे.



### 'दीक्षक'चे लाभ

- सध्याच्या ऑनलाइन शिक्षणात शिक्षकांसाठी सहाय्यक.
- शिक्षक एकाच वेळी शैक्षणिक सामग्रीसह स्क्रिनवर लक्ष केंद्रीत करून लाइव्ह चॅट बॉक्समध्ये विद्यार्थ्यांनी विचारले प्रश्न, शंकाही पाहू शकतील.
- वर्गात ज्याप्रमाणे शंका विचारण्यासाठी हात वर केला जातो त्याचप्रमाणे ऑनलाइन वर्गातही हात वर करण्यासाठी विद्यार्थी 'डाउट बॉक्स'वर क्लिक करू शकतील आणि शिक्षकांच्या उत्तरांची प्रतीक्षा करू शकतील.
- सॉफ्टवेअरच्या मदतीने शिक्षक विद्यार्थ्यांना काही लेखी कागदपत्रे पाठवू शकतील.

**ऑनलाइन व्यासपीठावर भारतीय शिक्षण पद्धतीनुसार शिकवण्यासाठी 'दीक्षक' तयार केले आहे. याच्या मदतीने शिक्षकांना विद्यार्थ्यांना वैयक्तिक पातळीवर परस्पर संवादातून शिकवणे शक्य होईल.**

**– प्रा. वीरेंद्र के. तिवारी,** संचालक, आयआयटी खड्गपूर

**Sakaal: 23.8.2020**

# विद्यार्थ्यांनी बनवला अनोखा ई-मास्क

## कोलकात्यातील जादवपूर विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे संशोधन

**कोलकाता, ता. २२ :** येथील जादवपूर विद्यापीठाच्या उपकरण विभागातील विद्यार्थ्यांनी अनोखा ई-मास्क बनविला आहे. तो घालणाऱ्या व्यक्तीच्या जवळपासच्या सर्व विषाणूंचा नामशेष होतात. या मास्कचे डिझाईन तयार असले तरी आवश्यक परवानग्यानंतरच त्याचे उत्पादन सुरू होईल. अमेरिकेतील ह्युस्टन विद्यापीठाने जादवपूर विद्यापीठाच्या (जेयु) या इलेक्ट्रॉनिक मास्कमध्ये रस दाखविला आहे. जादवपूर विद्यापीठाचे कुलगुरू सुरंजन दास यांनी ही माहिती दिली. विशेष म्हणजे कोरोनाशी झुंजणाऱ्या भारताने आपल्याच देशात बनविलेल्या या मास्कबद्दल फारशी उत्सुकता दाखविली नाही.

दास म्हणाले, की ह्युस्टन विद्यापीठातील प्रा यांनी स्टार्ट अप बनविण्यास तयारी दर्शविली आहे. त्यामुळे, संशोधनाचे निष्कर्ष अमेरिकेतही पोचू शकतील. याबाबत जादवपूर विद्यापीठ लवकरच ह्युस्टन विद्यापीठाशी सामंजस्य करार करणार आहे. जेयुने ई-मास्कच्या पेटंटसाठी विविध उद्योजक, व्यापारी संघटनांशी संपर्क साधला मात्र प्रतिसाद मिळाला नाही. विद्यापीठाव्यतिरिक्त उद्योजकांचीही विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण उत्पादनांचे उत्पादक होण्यासाठी प्रोत्साहन देण्याची जबाबदारी आहे. प.बंगालचे शिक्षण राज्यमंत्री पार्थो चट्टोपाध्याय यांनी शिक्षण आणि उद्योगांमध्ये पूल बांधण्याचे आवाहन उद्योजकांना केले आहे.

### ई-मास्क कसे काम करतो?

ई मास्कमुळे एक प्रकारचे विद्युतचुंबकीय क्षेत्र तयार होते. त्यामुळे सार्स २ सह कोणताही विषाणू नष्ट करू शकतो. हा मास्क सेल्फ चार्जेबल असून सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या सर्जिकल मास्कपेक्षा तो तिप्पट परिणामकारक आहे.

**ई-मास्कचे डिझाईन तयार असून त्याची प्रायोगिक तत्त्वावर निर्मिती करण्यासाठी भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेच्या परवानगीची गरज आहे. ई-मास्कचे पेटंट मिळविण्यासाठी आम्ही उद्योजकांशी संपर्क साधला. मात्र, त्यांची फारशी मदत झाली नाही. विद्यार्थ्यांना उत्पादक होण्यासाठी उद्योजकांनीही प्रोत्साहन द्यायला हवे.**

**– सुरंजन दास,**
कुलगुरू, जादवपूर विद्यापीठ, कोलकाता

**Sakaal: 23.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

### विद्यार्थी हक्क आयोग स्थापन करावा

**उच्च शिक्षणमंत्र्यांकडे खासदार चव्हाण यांची मागणी**

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २२** - करोनाच्या कालावधीत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या अडचणी सोडविण्यासाठी राज्यशासनाने विद्यार्थी हक्क आयोगाची स्थापना करावी, अशी मागणी खासदार वंदना चव्हाण राज्याचे उच्च शिक्षण व तंत्रज्ञानमंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

करोनाच्या काळात विद्यार्थ्यांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. आता, जवळपास सर्वच महाविद्यालयात ऑनलाइन शिक्षणास सुरुवात झाली आहे. यामुळे सोयींसोबत विद्यार्थ्यांना नविन अडचणी व आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. ऑनलाइन शिक्षण सुरु झाले असले तरी विशेष करून ग्रामीण भागात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना इंटरनेट, कॉम्प्युटर अथवा लॅपटॉपची उपलब्धता नसल्याने शिक्षणापासून वंचित राहावे लागणार आहे. यासाठी शासनाने आणि महाविद्यालयाने मार्ग काढणे गरजेचे आहे.

लॉकडाऊनमुळे आर्थिक चक्राला खीळ बसलेली आहे, अशा कठीण परिस्थितीत काही विद्यार्थ्यांना एक रकमी फी भरणे शक्य नाही यासाठी सुलभ हप्ते देण्यात येण्याची गरज आहे. तसेच, महाविद्यालयांमध्ये ज्या सेवा अगर योजना सद्यपरिस्थितीमुळे राबविण्यात येऊ शकत नाहीत, अशा अनेक शीर्षकाखाली आकारण्यात येणारे अतिरिक्त शुल्क कमी करण्याचा विचार होणे गरजेचे आहे. तसेच, विद्यार्थ्यांबरोबर अधिक विचार विनिमय होऊन निर्णय घेण्यात अधिक सुलभता वाढवणे गरजेचे आहे. त्यामुळे विद्यार्थीहितासाठी व कल्याणासाठी 'विद्यार्थी हक्क आयोग'ची स्थापना करण्याचा विचार व्हावा व विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी 'कमवा व शिका' योजनेचा विस्तार करून तिचे बळकटीकरण करण्याची गरज असल्याचे खासदार चव्हाण यांनी पत्रात नमूद केली आहे.

**Prabhat: 23.8.2020**

लोकमत

**महाविद्यालयात प्राध्यापकांचा तुडवडा : महिन्याभरापूर्वी शासनाकडे पाठविला प्रस्ताव**

### सीएचबी प्राध्यापक नियुक्ती प्रस्तावाला मान्यता मिळेना

राहुल शिंदे ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्यातील अनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांची हजारो पदे रिक्त आहेत. परिणामी महाविद्यालयात तासिका तत्त्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांची नियुक्ती करुन महाविद्यालयीन शैक्षणिक कामकाज चालविले जात आहे. परंतु, शासनाने सर्वच भरती प्रक्रियेवर बंदी घातली आहे. त्यामुळे सीएचबी प्राध्यापकांच्या नियुक्तीवरही परिणाम झाला असून उच्च शिक्षण संचालक कार्यालयाने सीएचबी प्राध्यापकांच्या नियुक्तीसंदर्भात शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव सुमारे महिन्याभरापासून शासनाकडे पडून आहे.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे विना अनुदानित**



महाविद्यालयांमधील सीएचबीवरील प्राध्यापकांच्या मान्यतेचे प्रस्ताव येत्या ३१ ऑगस्टपर्यंत ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार आहे. तर, अनुदानित महाविद्यालयांमधील सीएचबी प्राध्यापकांच्या मान्यतेचे प्रस्ताव वर्षभर स्वीकारले जातील, असे परिपत्रक विद्यापीठाच्या शिक्षक मान्यता कक्षातर्फे १३ जुलै रोजी प्रसिद्ध केले आहे. मात्र, मान्यता नसली तरी काही प्राध्यापक महाविद्यालयांमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे या प्राध्यापकांच्या मानधनाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

कोरोनामुळे अनेक महाविद्यालयांनी ऑनलाइन पद्धतीने शिक्षण देण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. मात्र, राज्य शासनाने सीएचबी प्राध्यापकांच्या नियुक्तीला मान्यता न दिल्या महाविद्यालयांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे शासनाने त्वरित सर्व सहसंचालक कार्यालयांमार्फत महाविद्यालयांना सीएचबी प्राध्यापक नियुक्तीचे आदेश द्यावेत.

**- प्रा. प्रकाश पवार,** अध्यक्ष, शिक्षक हितकारिणी संघटना

राज्यातील विद्यापीठातील व महाविद्यालयांमध्यील प्राध्यापकांची सुमारे ३० ते ४० हजार पदे रिक्त आहेत. राज्यात २०१२ पासून प्राध्यापकांची भरती प्रक्रिया सुरळीतपणे राबविली गेली नाही. गेल्या आठ-दहा वर्षात सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरल्या गेल्या नाहीत. त्यामुळे काही महाविद्यालयात विज्ञान, वाणिज्य, कला शाखेतील महत्त्वाच्या विषयांना एकही पूर्णवेळ प्राध्यापक नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे. परिणामी महाविद्यालयांना तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या मदतीने शैक्षणिक कामकाज पूर्ण करावे लागत आहे.

एम. फुक्टोचे सचिव प्रा. एस. पी. लवांडे म्हणाले, प्राध्यापकांची पूर्णवेळ नियुक्ती होत नसल्याने शिक्षण विभागाने तात्पुरती व्यवस्था म्हणून सीएचबीवरील प्राध्यापकांच्या नियुक्तीचा मार्ग स्वीकारला. आता सीएचबी प्राध्यापकांची भरतीही केली नाही, तर महाविद्यालयांचे कामकाज करणे शक्य होणार नाही. त्यामुळे शासनाने तत्काळ सीएचबी प्राध्यापकांच्या भरतीला परवानगी द्यावी.

Pune Main
Page No. 2 Aug 24, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# नवीन शैक्षणिक धोरणाबाबत केंद्रीय शिक्षणमंत्री देणार उत्तर

**पुणे, ता. २३ :** नवीन शैक्षणिक धोरणावर उलट-सुलट चर्चा सुरू असताना केंद्रीय शिक्षण मंत्री रमेश पोखरियाल निशंक यांनी मात्र या धोरणाबाबत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्याचे आव्हान स्वीकारले आहे.

केंद्रीय मंत्र्यांनी त्यांच्या अधिकृत ट्विटर अकाउंटवरून विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक धोरणाबाबत प्रश्न, शंका विचारण्याची संधी उपलब्ध करून देणारे ट्वीट केले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी, 'नवीन शैक्षणिक धोरणाबाबत तुमच्या काही शंका असतील, तर 'एनईपीट्रान्सफॉर्मिंगइंडिया' (#NEPTransformingIndia) हा हॅशटॅग वापरून मला प्रश्न विचारा. या प्रश्नांवर मी एक सप्टेंबरला ट्विटर पेजद्वारे उत्तर देईल', असे ट्वीट केले आहे. त्यांच्या या ट्वीटनंतर अनेकांनी हा हॅशटॅग वापरून विविध प्रश्न विचारले आहेत.

'देशातील सर्व राज्य आणि केंद्रीय विद्यापीठांमध्ये गुणवत्तापूर्ण पद भरतीमध्ये सुयोग्यता आणि पारदर्शकता आणण्यासाठी हे धोरण उपयुक्त ठरणार का?', 'शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या आरक्षणाबद्दल धोरणात उल्लेख नसल्याने नेमके आरक्षण कसे असेल,' 'ही शिक्षण पद्धती खरच विद्यार्थ्यांना सामावून घेणारी आहे का?', अशा असंख्य प्रश्नांचा भडिमार सध्या ट्विटरवर सुरू आहे. कोरोनाच्या काळात विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून जेईई, नीट परीक्षा रद्द कराव्यात, अशी मागणीही हॅशटॅगद्वारे केली जात आहे.

**Sakaal: 24.8.2020**

# ऑनलाइन शिक्षणासाठी प्लॅटफॉर्म

## पुणे विद्यापीठाचा उपक्रम; कंटेंट निर्मितीसाठी १२ महाविद्यालयांची निवड

**पुणे, ता. २३ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ऑनलाइन शिक्षणासाठी स्वतंत्र प्लॅटफॉर्म तयार करण्याचे काम सुरू असून, त्यामध्ये सर्व घटकांचा विचार केला आहे. ग्रामीण शहरींसह महिला, अल्पसंख्याक, रात्र महाविद्यालयांनाही यात स्थान दिले आहे.

कोरोनामुळे थेट शिक्षण घेण्यावर मर्यादा आल्या आहेत. यावर ऑनलाइन शिक्षण हा उपाय असल्याने त्यासाठी पुणे विद्यापीठाने 'ऑनलाइन लर्निंग सिस्टिम' विकसित केली आहे. यात विद्यापीठातील विभागांसह संलग्न महाविद्यालयांना जोडले आहे. प्रत्येक विद्यार्थी, शिक्षकास स्वतंत्र लॉग-इन, विद्यार्थ्यांना समजले आहे, की नाही हे कळण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर, कमीत कमी इंटरनेटवर चालणारे व्हिडिओ अशी अद्ययावत यंत्रणा उभारली आहे.

पहिल्या टप्प्यात विद्यापीठाशी संलग्न काही महाविद्यालयांमध्ये या प्लॅटफॉर्मवरुन ऑनलाइन शिक्षण सुरू केले जाणार आहे, असे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी स्पष्ट केले होते. त्यानुसार १२ महाविद्यालयांची निवड करण्यात आली आहे.

**"** आमचे महाविद्यालय मराठवाड्याच्या सीमेवर आहे. पुणे विद्यापीठाने ऑनलाइन शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिल्याने ग्रामीण भागातील मुलांची अडचण दूर होणार आहे.
-डॉ. अविनाश फलके,
प्राचार्य, जामखेड महाविद्यालय



**"** नाइट कॉलेजमधील विद्यार्थी दिवसभर काम करून रात्री शिक्षण घेतात. सध्या आम्ही दोन लेक्चर रोज घेत आहोत. पुणे विद्यापीठाच्या माध्यमातून प्राध्यापकांना व्हिडिओ तयार करणे यासह इतर गोष्टींचे प्रशिक्षण दिले जात आहे.
-डॉ. पी. एन. शेंडे,
प्राचार्य, सरस्वती मंदिर महाविद्यालय, पुणे

### या महाविद्यालयांत असेल यंत्रणा

- प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी
- लोकनेते रामदास पाटील धुमाळ महाविद्यालय, राहुरी
- एच. व्ही. देसाई महाविद्यालय, पुणे
- के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक
- अबेदा इनामदार महाविद्यालय, पुणे
- सरस्वती मंदिर रात्र महाविद्यालय, पुणे
- न्यू आर्ट, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नगर
- भोसला मिलिटरी महाविद्यालय, नाशिक
- सद्गुरू गगनगिरी महाराज महाविद्यालय, कोपरगाव
- जामखेड महाविद्यालय, जामखेड
- मनोहरराव नानासाहेब देशमुख, राजूर-अकोले
- श्री सिद्धिविनायक महिला महाविद्यालय, कर्वेनगर

### महाविद्यालयांना प्रशिक्षण

याबाबत 'इसीडीएलआयसी'च्या संचालक डॉ. अपूर्वा पालकर म्हणाल्या, ''पुणे विद्यापीठ महाविद्यालयांना प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देत आहे. त्यासाठी ज्या महाविद्यालयांची निवड झाली आहे, त्यांचे पहिले प्रशिक्षण झाले आहे.

**Sakaal: 24.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

### संशोधनाची माहिती ऑनलाइनद्वारे सादर करा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २३ -** एम.फिल. व पी.एचडी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी संशोधकबाबतचा प्रोग्रेस रिपोर्टपर्यंत अद्ययावत माहिती 'पी.एचडी. ट्रेकिंग सिस्टिम'वर ऑनलाइन पद्धतीने सादर करण्याच्या सूचना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिल्या. करोना पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना संशोधनाची अद्ययावत माहिती सादर करण्यासाठी ऑनलाइन प्रक्रियेबाबतची कार्यपद्धती निश्चित केली.

विद्यापीठ विभाग व मान्यताप्राप्त संशोधन केंद्र येथे पीएचडी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांना पी.एचडी. ट्रेकिंग सिस्टिमवर संशोधनाची माहिती अद्ययावत करणे आवश्यक आहे. याबाबत विद्यार्थ्यांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, काही विद्यार्थ्यांनी आपली माहिती अद्ययावत केली नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले.

दरम्यान, करोना प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांना विद्यापीठ कार्यालयात प्रत्यक्ष येऊन संशोधनाची माहिती, पुनर्नावनोंदणी अर्ज व प्रबंध सादर करणे शक्य झाले नाही. त्याचा विचार करून विद्यापीठाने पीएचडी अभ्यासक्रमासाठी निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार सादर करावयाची कागदपत्रे, अर्ज, गोषवारा, प्रबंध याची कार्यवाही ऑनलाइनद्वारे करण्यास मुभा दिली आहे.

त्यानुसार सर्व माहिती १ ऑगस्ट २०२० पासून विद्यार्थी सादर करण्याचे सूचना होत्या. मात्र, त्या कशा पद्धतीने सादर करायची, याविषयी विद्यार्थीच अनभिज्ञ होते. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने विद्यार्थ्यांना कोणत्या पद्धतीने माहिती सादर करावी, याची सविस्तर कार्यपद्धती प्रसिद्ध केली आहे.

त्यानुसार विद्यार्थ्यांनी अद्ययावत माहिती सादर करोवत, असेही विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. याची नोंद विद्यार्थ्यांनी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**Prabhat: 24.8.2020**

### विद्यार्थ्यांच्या ७५ टक्के उपस्थितीबाबतचा निर्णय पहिल्या सत्रासाठी शिथिल

पुणे, दि. २३ (प्रतिनिधी) – कोरोना संसर्गामुळे सध्या ऑनलाइन शिक्षण पद्धती सुरू असल्याने विद्यार्थ्यांच्या ७५ टक्के उपस्थितीबाबतचा निर्णय पहिल्या सत्रासाठी शिथिल करण्याबाबतचा अधिकार महाविद्यालय, विद्यापीठाच्या विभागप्रमुखांना देण्यात आला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्याबाबत निर्णय घेतला आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २५ टक्के अभ्यासक्रम ऑनलाइन पद्धतीने, तर ७५ टक्के अभ्यासक्रम प्रत्यक्ष वर्गात पूर्ण करणे अपेक्षित आहे. मात्र, कोरोना संसर्गामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत परस्पर अंतर, विद्यार्थी सुरक्षा, आरोग्य विचारात घेऊन अद्यापिही प्रत्यक्ष महाविद्यालये सुरु करण्यात आलेली नाहीत. तसेच, महाविद्यालये कधी सुरू करता येतील याबाबत अद्यापि काहीच स्पष्टता नाही. या परिस्थितीमुळे सध्या ऑनलाइन पद्धतीने अध्यापन-अध्ययन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. मात्र, विद्यार्थ्यांची भौगोलिक परिस्थिती, त्यांच्याकडील साधनांची उपलब्धता विचारात घेता विद्यार्थ्यांना सर्व तासिकांना उपस्थित राहण्यास मर्यादा आहेत. त्यामुळे त्यांची उपस्थिती भरण्यात अडचणी आहेत. शासनाने विद्यार्थ्यांच्या किमान उपस्थितीबाबतची टक्केवारी लक्षात घेऊन टाळेबंदीचा कालावधी विद्यार्थ्यांचा उपस्थिती कालावधी म्हणून ग्राह्य धरण्याच्या सूचना या पूर्वीच देण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या किमान ७५ टक्के उपस्थितीबाबतची अट शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पहिल्या सत्रात शिथिल करण्याबाबत विद्यापीठातील विभागांचे विभागप्रमुख, संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्था यांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा, असे आदेशामध्ये म्हटले आहे.

**Saamana: 24.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

# 'Citation hacking' new challenge to credibility of research: Journal

## JNU Rector, Ex-VC Of An Indian Univ Among Those Flagged

Chandrima.Banerjee
@timesgroup.com

**The study said that although citations are used as a objective metric of academic influence, cases have been documented whereby references were added to a paper solely to inflate the perceived influence of a body of research**

Being cited 2,008 times by other scientists is a definite sign of influence but not necessarily authenticity — not if the citations appear in 38 papers by just one author, 67 times in one journal and up to 17 times in just one paper. In what researchers have now flagged off as the phenomenon of "citation hacking", there are signs that a number of scientific papers may be rigging the academic system to stockpile citation, 'Nature' journal has reported.

On the list that the researchers shared with TOI are an Indian paediatrician based in the US who had been flagged two years ago for taking $500,000 from drug companies (who has the 2,008 citations to her work), a former Indian university vice-chancellor who faced a judicial inquiry for irregularity in appointments, a JNU rector and a University of Maryland molecular biologist from Odisha who has had at least four papers by him retracted for various inconsistencies. They are among at least 3,000 whose work seems to be cited in unusual ways — far too often and not always warranted.

The study, by Jonathan D Wren and Constantin Georgescu from the Oklahoma Medical Research Foundation, said, "Although citations are used as a quantifiable, objective metric of academic influence, cases have been documented whereby references were added to a paper solely to inflate the perceived influence of a body of research." The researchers identified five "red flags" in the pattern of citations to identify aberrations and used an algorithm to study 20,000 authors whose work was published in a medical journal in the last three years. 'Nature' wrote that the study's "method seems technically sound." Citations are added to a paper to support the points made in a paper and refer to relevant work done in the field. Manipulation, then, could create a false impression of credibility.

With Covid, public interest in scientific research has surged, as has research output. More than 1,15,000 articles on Covid-19 have been published worldwide, according to 'Nature Index', a database of scientific research collated by the 'Nature' journal. India is fifth on the list of most prolific countries in Covid-19 research, with 2,108 articles till July.

*Full report on www.toi.in*

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

# प्रवेश यादीवर १ हजार ६१२ विद्यार्थ्यांनी नोंदवला आक्षेप

**सर्वसाधारण गुणवत्ता यादी : २५ ऑगस्टपर्यंत तक्रारी स्वीकारणार**

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अकरावी प्रवेशासाठी जाहीर केलेल्या सर्वसाधारण गुणवत्ता यादीवरील आक्षेप स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे. पहिल्याच दिवशी १ हजार ६१२ विद्यार्थ्यांनी आक्षेप नोंदविले आहेत. त्यावर शिक्षण उपसंचालक कार्यालयाने सर्व विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे व आक्षेपांचे निराकरण केले आहे.

पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांतील १ लाख ६ हजार ९७२ जागांसाठी ऑनलाइन पद्धतीने




प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. दिलेल्या मुदतीमध्ये प्रवेश अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी शिक्षण उपसंचालक कार्यालय व इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेश समितीतर्फे रविवारी जाहीर केली. तसेच, येत्या २५ ऑगस्टपर्यंत सर्वसाधारण गुणवत्ता यादीवरील विद्यार्थ्यांचे आक्षेप स्वीकारून निकाली काढले जाणार आहेत. सोमवारी तांत्रिक आक्षेप, सवलतीच्या गुणांसंदर्भातील आक्षेप विद्यार्थ्यांनी नोंदवले.

येत्या ३० ऑगस्ट रोजी पहिल्य फेरीची गुणवत्ता यादी जाहीर केल जाणार असली, तरी विविध कोट्यातील प्रवेश प्रक्रिय सुरु आहे सोमवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत हजार ९४८ विद्यार्थ्यांना कोट्यातू प्रवेश दिले आहेत.

विद्यार्थ्यांसाठी खुली केलेल लिंक आता बंद केली आहे. पहिल गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाल्यानंत दुसऱ्या प्रवेश फेरीचे वेळापत्रक प्रसिद्ध केल्यानंतर पुन्हा लिंक सुरु केल जाईल. त्यानंतरच विद्यार्थ्यांन ऑनलाइन प्रवेश अर्ज भरता येईल.

Pune Main
Page No. 2 Aug 25, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

**३१ ऑगस्टपर्यंत मुदत : 'इनोव्हेट इंडिया' संकेतस्थळावर नोंदवायची मते**

# नव्या शैक्षणिक धोरणाबाबत केंद्राने मागविल्या सूचना

**अविनाश साबापुरे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**यवतमाळ** : केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केलेले नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रत्यक्ष राबवताना राज्य सरकारांच्या अखत्यारीतील शिक्षकच खरे सूत्रधार ठरणार आहेत. धोरणाच्या अंमलबजावणीची प्रक्रिया निश्चित करताना देशभरातील शिक्षकांकडून सूचना मागविण्यात आल्या आहेत. त्यातूनच नवा 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा' साकारणार आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या सचिव अनिता करवल यांनी राज्याच्या शिक्षण सचिवांना पत्र पाठविले आहे. त्यासोबतच सोमवारपासूनच शिक्षकांना केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर सूचना नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. येत्या ३१ ऑगस्टपर्यंत सूचना नोंदविता येणार आहेत. शिक्षकांचा सहभाग वाढविण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, ग्रामीण गट संसाधन केंद्रांवर व्हीडिओ कॉन्फरन्स व अन्य मार्ग अवलंबण्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

### सूचनांचे काय करणार ?

इनोव्हेट इंडिया या संकेतस्थळावर शिक्षकांनी सूचना नोंदवायच्या आहेत. त्यासाठी संकेतस्थळावर शिक्षण धोरणातील एक-एक घटक सुट्या स्वरुपात देऊन त्यावर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहे. ३१ ऑगस्टपर्यंत आलेल्या सर्व सूचनांचे राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील तज्ज्ञांच्या चमूमार्फत परिक्षण केले जाणार आहे. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा किंवा धोरणाच्या अमलबजावणीसाठी उपयुक्त ठरणाऱ्या सूचनांबाबत संबंधित शिक्षकाशी वैयक्तिक संपर्क साधला जाणार आहे.

" नव्या धोरणानुसार शिक्षण प्रशिक्षण विद्यालये बंद होणार नाही. तर ते समायोजित होतील. याबाबत प्रत्यक्ष अमलबजावणीला २०२८ पर्यंत वेळ लागणार आहे. सध्या सुरु असलेले शिक्षक प्रशिक्षण प्रोग्राम सुरुच राहणार आहेत. त्यादृष्टीने सूचना करण्यात येतील.

**- राजेश माळी**, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य अध्यापक विद्यालय कर्मचारी संघटना

" राज्य स्तरावरुन याबाबत निर्देश आलेले नसले तरी हे सर्वांसाठी खुले आहे. धोरणाचा आराखडा तयार आहे. त्याची प्रत्यक्ष अमलबजावणी कशी करावी, हे दररोज अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा अनुभव घेणारे शिक्षकच चांगल्या प्रकारे सांगू शकतील. त्यामुळे प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंतचे शिक्षकांनी जरूर सूचना नोंदवाव्यात.

**- मिलिंद कुबडे**, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, यवतमाळ

Pune Main
Page No. 5 Aug 25, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

**लोकमत**

# सर्व परीक्षा पुढे ढकला

## आदित्य ठाकरे यांचे पंतप्रधान मोदी यांना पत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर परीक्षा घ्याव्यात की रद्द कराव्यात, यावरुन राज्यात बराच राजकीय वादंग झाला. त्यातच सोमवारी, पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून परीक्षा पुढे ढकलण्याची मागणी केली आहे.

विद्यापीठांसह अनेक संस्थांकडून परीक्षा घेण्याची तयारी सुरु आहे. विद्यार्थी तसेच पालकांच्या हितासाठी पंतप्रधानांनी या प्रकरणी हस्तक्षेप करावा, अशी मागणी आदित्य ठाकरे यांनी केली आहे. त्यांनी स्वत: ट्विट



करुन या पत्राची माहिती दिली. एक पेपर घ्यायचा म्हटले तरी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचाऱ्यांसह राज्य शासनाची यंत्रणा त्यात जुंपावी लागते. शिवाय, जगभरात जिथे शाळा, महाविद्यालये उघडली तिथे कोरोनाचे संक्रमण वाढल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी यात तातडीने हस्तक्षेप करत प्रत्यक्ष अथवा ऑनलाइन परीक्षांसह सर्व शैक्षणिक कार्यक्रम पुढे ढकलावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

बहुतांश विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मूल्यांकन पूर्ण झालेले आहे. या मूल्यांकनात अंतिम परीक्षेला दहा टक्क्यांपेक्षा जास्त महत्त्व नाही. त्यामुळे विद्यापीठांनी ठरविलेल्या निकषानुसार परीक्षा न घेता या विद्यार्थ्यांना पास करता येईल. विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये यासाठी शैक्षणिक वर्षाची सुरुवात जून २०२० ऐवजी जानेवारी २०२१ पासून करण्याबाबत विचार करता येईल असेही त्यांनी पत्रात म्हटले आहे.

Pune Main
Page No. 5 Aug 25, 2020
Powered by: erelego.com

# शैक्षणिक कार्यक्रम पुढे ढकलावेत

## आदित्य ठाकरे यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून मागणी

**मुंबई, दि. २४ - देशासह राज्यात करोनाचा संसर्ग दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यातच राज्यात करोनाचा सर्वाधिक कहर असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक कार्यक्रम पुढे ढकलण्यात यावे, अशी विनंती पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. त्याचबरोबर आपले शैक्षणिक वर्ष जून-जुलै ऐवजी जानेवारीपासून सुरू करावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे.**

आदित्य ठाकरे म्हणाले, आपल्या नेतृत्वाखाली देश करोनाविरुद्ध लढा देत आहे. यात नागरिकही मोठ्या प्रामाणिकपणे आपले योगदान देत आहेत. याच काळात मी विद्यार्थ्यांकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. करोना रुग्णसंख्या वाढत असल्याने देशातील बहुतांश जण घरूनच काम करत आहेत. अनेक शैक्षणिक संस्था विद्यापीठ, व्यावसायिक व अव्यासायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्याचे ठरवत आहेत, पण जगभरात जिथे कुठे शाळा, महाविद्यालये सुरू करण्यात



आली, तिथे मोठ्या प्रमाणात करोना रुग्ण आढळून आले आहेत.

हा विषय केवळ विद्यार्थ्यांशी संबंधित नसून त्यांच्या कुटुंबीय आणि शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचाही आहे. त्यामुळे माझी नम्र विनंती आहे की, या विषयात हस्तक्षेप करून सर्व शैक्षणिक कार्यक्रम पुढे ढकलण्यात यावे.

त्याचबरोबर आपले शैक्षणिक वर्ष जून-जुलै ऐवजी जानेवारीपासून सुरू करावे. यामुळे कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही. विविध शाखांच्या परीक्षा आणि प्रवेश पूर्व परीक्षांमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका आहे. त्यामुळे या प्रकरणात पंतप्रधानांनी स्वतः हस्तक्षेप करावा, असेही पत्रात नमूद करण्यात आले आहे.

**Prabhat: 25.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात

### आदित्य ठाकरे यांची पंतप्रधानांकडे मागणी

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई



आदित्य ठाकरे

देशातील करोनाचे संकट पाहता व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या ऑनलाइन तसेच, प्रत्यक्ष होणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात, अशी मागणी राज्याचे पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे एका पत्राद्वारे केली आहे. आपण स्वतः यामध्ये लक्ष घालून विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घ्यावा, तसेच शैक्षणिक वर्षाची सुरुवात जूनपासून करण्याऐवजी हे वर्ष जानेवारी ते डिसेंबर असे करणे शक्य आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे.

'अनेक शैक्षणिक संस्था विद्यापीठ, व्यावसायिक व अव्यासायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्याचे ठरवत आहेत. परंतु जगभरात जिथे कुठे शाळा, महाविद्यालये सुरू करण्यात आली, तिथे मोठ्या प्रमाणात करोनारुग्ण आढळून आले आहेत. केवळ विद्यार्थ्यांशी संबंधित हा विषय नसून त्यांच्या कुटुंबीय आणि शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यावरही या निर्णयाचा परिणाम होईल,' असे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

सर्व शैक्षणिक कार्यक्रम पुढे ढकलण्यात यावेत. त्याचबरोबर शैक्षणिक वर्ष जानेवारी २०२१ पासून सुरू करावे. त्यामुळे कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही, अशी मागणीही आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

### मूल्यमापन पूर्ण

अव्यावसायिक अभ्यासक्रमाचे बरेचसे मूल्यमापन पूर्ण झाले असून, अंतिम परीक्षांचे मूल्यमापनातील महत्त्व १० टक्क्यांहून जास्त असणार नाही. त्यामुळे विद्यापीठांनी ठरवलेल्या गुणपद्धतीप्रमाणे त्यांचा निकाल लावता येईल, असेही त्यांनी या पत्रात सुचविले आहे.

**Maharashtra Times: 25.8.2020**

# अकरावी विज्ञान शाखेला पसंती

पुणे, ता. २४ : अकरावी प्रवेशासाठी यंदा विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेला पहिली पसंती दिली. तब्बल ३४,०७१ विद्यार्थ्यांनी या शाखेसाठी नोंदणी केली असून दुसरी पसंती वाणिज्य शाखेला दिली आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीने तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर केली आहे. त्यातून ही माहिती समोर आली. समितीच्या वतीने पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमधील प्रवेशासाठी ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यंदा दहावीच्या कल चाचणीत गेल्या काही वर्षात विद्यार्थ्यांचा कल हा कला आणि ललित कला शाखेकडे असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र विद्यार्थी अकरावी प्रवेशासाठी विज्ञान व वाणिज्य शाखेला अनुक्रमे प्राधान्य देत असल्याचे निदर्शनास आले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील महाविद्यालयांतील प्रवेश प्रक्रियेतील अर्जातील भाग दोन भरण्यासाठी बुधवारपर्यंत (ता. २५) मुदतवाढ दिल्याची माहिती माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक दिनकर पाटील यांनी दिली.

**तात्पुरत्या गुणवत्ता यादीनुसार नोंदणी**

| शाखा | उपलब्ध जागा | विद्यार्थ्यांची नोंदणी |
|---|---|---|
| कला | १५,६८१ | ६,७५२ |
| वाणिज्य | ४२,८१५ | ३०,७३२ |
| विज्ञान | ४३,९८१ | ३४,०७१ |
| एचएसव्हीसी | ४,४९५ | १,२६५ |

**Sakaal: 25.8.2020**

## आदित्य ठाकरे यांचे पंतप्रधान मोदींना पत्र

# परीक्षा पुढे ढकला



कोरोनाच्या या संकटात अनेक कोर्सेसच्या परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला जात आहे. आपल्या देशातील बहुतांश विद्यार्थी हे त्यांच्या पालकांसोबत आणि आजी-आजोबांसोबत राहतात. विद्यार्थ्यांमध्ये कोरोनाच्या विषाणूचे संक्रमण झाले तर गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. त्यामुळे देशातील कोरोनाची सध्याची परिस्थिती लक्षात घेता पंतप्रधानांनी यामध्ये लक्ष घालून देशातील विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घ्यावा.

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी)- देशातील कोरोनाची परिस्थिती पाहता व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष परीक्षा तसेच प्रवेश पात्रता अशा सर्व परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात, अशी विनंती युवासेना प्रमुख व राज्याचे पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे आज पत्राद्वारे केली आहे.

आदित्य ठाकरे यांनी ट्विट करून या पत्राची माहिती दिली आहे. या पत्रामध्ये त्यांनी देशातील व जगातील कोरोनाची परिस्थिती नमूद केली आहे. हिंदुस्थानात आपल्या नेतृत्वाखाली कोरोनाच्या विरोधात लढाई लढत आहोत. आपला देश आणि देशातील नागरिकही कोरोनाचा मुकाबला करीत आहेत. पण जगात ज्या देशांनी शाळा व महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला त्या देशात कोरोना रुग्णांची संख्या वाढली आहे. या परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या परीक्षांकडे मला आपले लक्ष वेधून घ्यायचे आहे, असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे.

देशात अभ्यासक्रमातील एखाद्या विषयाची परीक्षा घ्यायची म्हटली तरी विद्यार्थ्यांपुरता मर्यादित न राहता त्यामध्ये शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि परीक्षेशी संबंधित इतर कर्मचारी वर्गही सहभागी असतात. त्यातील बहुतांश कर्मचारी अतिजोखमीच्या वयातील आहेत. त्यामुळे आपण वैयक्तिकरीत्या लक्ष घालून सर्व शैक्षणिक कार्यक्रम पुढे ढकलावेत. त्यात व्यावसायिक अभ्यासक्रम व प्रवेश पात्रता परीक्षांचाही समावेश आहे.

अव्यावसायिक अभ्यासक्रमाचे बरेचसे मूल्यमापन पूर्ण झाले असून अंतिम परीक्षाचे मूल्यमापनातील महत्त्व दहा टक्क्यांहून अधिक असणार नाही. त्यामुळे विद्यापीठांनी ठरवलेल्या गुणपद्धतीप्रमाणे त्यांचा निकाल लावला जाऊ शकतो, असेही आदित्य ठाकरे यांनी या पत्रात नमूद केले आहे.

देशात शैक्षणिक वर्षाची सुरुवात जून-जुलै २०२० ऐवजी जानेवारी २०२१ पासून करण्याबाबतही विचार करू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाणार नाही. त्यामुळे आपण यामध्ये हस्तक्षेप करावा, अशी विनंतीही आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधानांना केली आहे.

**Saamana: 25.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

# शैक्षणिक वर्ष जानेवारीपासून सुरू करा!

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** परीक्षांमुळे विद्यार्थ्यांना करोना होण्याचा धोका असल्याचे लक्षात घेऊन सर्व परीक्षा, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या नीट, जेईई, सीईटीसारख्या प्रवेश परीक्षा पुढे ढकलाव्यात आणि देशातील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून सध्याचे जूनपासून सुरू झालेले नवे शैक्षणिक वर्ष जानेवारी २०२१ पासून सुरू करावे, अशी मागणी पर्यावरणमंत्री आणि युवासेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

देशभरात प्रत्यक्ष वा ऑनलाइन परीक्षांसाठी सुरू असलेली प्रक्रिया, विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया स्थगित करून ती पुढे ढकलावी. त्याचबरोबर जून २०२० पासून नवे शैक्षणिक वर्ष सुरू होऊन दोन महिने उलटले असले तरी करोनामुळे शाळा-महाविद्यालये सुरू करता आलेली नाहीत. त्यामुळे शैक्षणिक वर्ष वाया जात आहे. देशभरातील कोट्यवधी विद्यार्थ्यांचे हे नुकसान टाळण्यासाठी शैक्षणिक वर्ष जानेवारी २०२१ पासून सुरू करण्याबाबत विचार करावा, अशी विनंतीवजा मागणी आदित्य ठाकरे यांनी केली आहे.

देशात करोना रुग्णांची संख्या वाढत असताना काही विद्यापीठे, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था या अंतिम वर्ष परीक्षा, प्रवेश परीक्षा घेण्याची प्रक्रिया राबवत आहेत. करोनामुळे बहुतांश राज्यात सार्वजनिक वाहतुकीच्या सेवा पूर्ण क्षमतेने सुरू झालेल्या नसताना अशारितीने परीक्षा व प्रवेश परीक्षांचा घाट घालणे योग्य नाही, असे आदित्य ठाकरे यांनी या पत्रात नमूद केले आहे. जगात ज्या ज्या ठिकाणी शाळा-महाविद्यालये सुरू झाली तेथे करोनाचे रुग्ण झपाट्याने वाढल्याचे दिसून येते याकडेही ठाकरे यांनी मोदी यांचे लक्ष वेधले आहे. तुम्ही हस्तक्षेप करून हे निर्णय घेतल्यास करोनाची रुग्णसंख्या झपाट्याने वाढण्याचा एक मोठा धोका टळेल, अशी पुस्तीही आदित्य ठाकरे यांनी जोडली आहे.

### आदित्य ठाकरे यांचे पंतप्रधानांना पत्र

**ममतांची केंद्र सरकारला विनंती**

कोलकाता: करोनाच्या पार्श्वभूमीवर जेईई आणि 'नीट' परीक्षा पुढे ढकलण्याची विनंती पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सोमवारी केंद्र सरकारला केली. केंद्र सरकारने धोका कितपत आहे त्याचा आढावा घ्यावा आणि स्थिती पुन्हा योग्य होईपर्यंत परीक्षा पुढे ढकलाव्यात, अशी विनंती बॅनर्जी यांनी केली आहे.

लोकसत्ता Tue, 25 August 2020 https://epaper.loksatta.com/c/54460515

# परीक्षा नको, शैक्षणिक वर्ष जानेवारी ते डिसेंबर करावे

### आदित्य ठाकरेंचे पंतप्रधानांना पत्र

**मुंबई, (प्रतिनिधी) :** कोरोनाची देशातील परिस्थिती पाहता व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष अशा सर्वच परीक्षा पुढे ढकलण्यात याव्यात, अशी विनंती पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे. शैक्षणिक वर्ष जून ते मे ऐवजी जानेवारी ते डिसेंबर अशी करण्याची विनंतीही त्यांनी पत्रात केली आहे. आदित्य यांनी स्वतःच ट्विट करून या पत्राची माहिती दिली आहे. कोरोनाची देशातील परिस्थिती पाहता आपण स्वतः या विषयात लक्ष घालून देशातील विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घ्यावा. अव्यावसायिक अभ्यासक्रमांचे बरेचसे मूल्यमापन पूर्ण झाले असून अंतिम परीक्षांचे मूल्यमापनातील महत्व १० टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही. त्यामुळे विद्यापीठांनी ठरविलेल्या गुणपदधतींने त्यांचा निकाला लावता येऊ शकतो.

Kesari: 25.8.2020

# अकरावीचे ५,९४८ प्रवेश आतापर्यंत निश्चित

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २४ -** पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेत विविध कोट्यांतर्गत ५ हजार ९४८ विद्यार्थ्यांचे कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित झाले आहेत.

विभागात ३०४ कनिष्ठ महाविद्यालयात १ लाख ६ हजार ९७२ प्रवेशाच्या जागा उपलब्ध आहेत. यासाठी आतापर्यंत ९८ हजार ९४६ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केलेली आहे. त्यात प्रवेश अर्जाचा भाग-१ हा ८१,६९० विद्यार्थ्यांनी भरला आहे, त्यातील ८१,२६३ अर्जांची तपासणीही पूर्ण करण्यात आलेली आहे.

अर्जाचा भाग-२ भरण्यासाठी ७५,८२१ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती, त्यातील ७४,१६४ विद्यार्थ्यांनी प्रक्रिया पूर्ण केली आहे. एकूण ७३,३५३ विद्यार्थ्यांचे अर्ज लॉक करण्यात आलेले आहेत. ८११ अर्ज अद्यापही लॉक करण्यात आलेले नाहीत. इनहाऊस, व्यवस्थापन व अल्पसंख्याक या कोट्यांतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी १२ ते २२ ऑगस्टपर्यंत संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. यातही विद्यार्थ्यांनी इनहाऊस कोटा प्रवेशाला प्राधान्य दिले होते. कोट्यांतर्गत रिक्त प्रवेशाच्या जागाही महाविद्यालयांनी दर्शविणे आवश्यक आहे. कोट्यांतर्गत ५५ प्रवेश रद्द करण्यात आलेले आहेत. संभाव्य सर्वसाधारण गुणवत्ता जाहीर करण्यात आलेली आहे. यात ७२,८२० विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. आक्षेप नोंदविण्यासाठी २५ ऑगस्टपर्यंत मुदत आहे.

Prabhat: 25.8.2020

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

# Aaditya writes to PM, bats for academic year from Jan

**Sujit Mahamulkar & Yogita Rao** | TNN

**Mumbai:** Consider starting the new academic session from January 2021, Shiv Sena youth wing chief Aaditya Thackeray on Monday wrote to Prime Minister Narendra Modi, days after chief minister Uddhav Thackeray floated the idea of restructuring the academic calendar in a meeting.

Aaditya also requested Modi to postpone all physical or online exams across the country for all professional courses, including entrance exams.

Aaditya's letter comes at a time when students across the country are awaiting SC's verdict on the conduct of final semester/year exams. The UGC, on July 7, had made it mandatory for all universities to conduct final-year exams, online or offline, by September end. Higher and technical education minister Uday Samant then wrote to the HRD ministry saying it would not be possible to hold exams amid the Covid-19 crisis.

SC also dismissed pleas seeking postponement of national-level entrance exams like NEET and JEE, scheduled in September. In addition, Bombay HC has dismissed a plea seeking stay on post-graduate medical and dental exams in state. With many PG medical students already on campus treating Covid patients, it has been easy for Maharashtra University of Health Sciences to conduct exams.

**TIMES VIEW:** The Shiv Sena continues to harp on an issue that offers no purchase. Apart from the UGC and the courts refusing to defer exams, its own apex health science university is going ahead with the schedule for post-grad students. Students need to get on with their lives in whatever way possible in the present circumstances. Putting their future on hold for six months seems like an odd strategy to pursue.

Aaditya, who wrote to the PM in his capacity as Yuva Sena chief and not as a cabinet minister, said, "We may think of starting our academic year from January 2021, instead of June-July 2020, so that no student loses an academic year." He reiterated that results of non-professional courses be calculated on students' previous performances, based on a marking system devised by universities.

Sena youth wing secretary Varun Sardesai said the proposed new academic year change should be brought in permanently, considering the paradigm shift in education across the globe. Sardesai, who is Aaditya's maternal cousin, said, "The delay in exams now would cause further delays in admissions. So, rather than everyone losing a year or students losing opportunities for higher studies, it has been suggested that the academic year start from January...at the national level."

Former planning commission member and former Mumbai University vice-chancellor Bhalchandra Mungekar said that this year's academic calendar will inevitably be postponed to January because of delays. "But for changing it permanently, the pros and cons will have to be examined thoroughly. It will have an impact on other processes too," he added.

Meanwhile, a section of parents of medical aspirants are against postponement of NEET/JEE.

**The Times of India: 25.8.2020**

# कोरोनाच्या भीतीमुळे परीक्षा नकोच

## आदित्य ठाकरेंनी लिहिले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र

**सकाळ न्यूज नेटवर्क**

मुंबई, ता. २४ : कोरोना महामारीचे संकट लक्षात घेता प्रत्यक्ष किंवा ऑनलाइन परीक्षा घेणे सध्या टाळावे, असे विनंती पत्र पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिले आहे.

कोरोनाशी दोन हात करण्यासाठी आपल्या नेतृत्वाखाली संपूर्ण भारत लढत असल्याचा उल्लेख त्यांनी



आदित्य ठाकरे

या पत्रात सुरवातीलाच केला आहे. संपूर्ण देश आजही जवळपास घरातूनच काम करत असताना विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी बाहेर पडा म्हणणे हे संकटाला निमंत्रण देणारे असल्याची भीती व्यक्त केली आहे. अव्यावसायिक अभ्यासक्रमातील मुलामुलींचे मूल्यांकन ज्या प्रमाणे पूर्ण झाले आहे, त्याच धर्तीवर अन्य अभ्यासक्रमांचाही निर्णय घ्यावा. वर्षभरातील कामगिरी तसेच अन्य बाबी लक्षात घेत केवळ १० टक्के मूल्यमापन अंतिम परीक्षेसाठी ठेवावे, अशी विनंतीही पत्रात केली आहे. युवासेनेच्या लेटरहेडवर लिहिलेल्या या पत्रात शैक्षणिक वर्ष १ जानेवारी २०२१ पासून सुरु करता येईल काय ते पहावे असेही नमूद केले आहे.

**Sakaal: 25.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

# मराठीचा वापर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर होणार कारवाई; समिती स्थापन

विशेष प्रतिनिधी।
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शासकीय, निमशासकीय कार्यालयांबरोबरच सार्वजनिक उपक्रम आदींमध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य करण्याबरोबरच या मराठीचा वापर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची कायदेशीर तरतूद आता करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्य शासनाने एक समिती नेमली आहे.

मराठी भाषा विभागाच्या सचिव प्राजक्ता लवंगारे - वर्मा या समितीच्या अध्यक्ष असून कि. भि. पाटील, रमेश पानसे, सं. पु. सैंदाणे हे सदस्य आहेत. समिती दोन महिन्यांत अहवाल शासनाला सादर करेल. महाराष्ट्र राजभाषा अधिनियमात आवश्यक त्या सुधारणा ही समिती सुचवेल. शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर या अधिनियमाद्वारे अनिवार्य करण्यात आला असला तरी हा अधिनियम कोणाकोणाला लागू आहे याचा उल्लेख अधिनियमात नाही. तसेच मराठी भाषेचा वापर कामकाजात न करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची तरतूद अधिनियमात नाही. ती आता केली जाणार आहे.

**शासकीय,** निमशासकीय कार्यालयांबरोबरच अशासकीय कार्यालये, शासन अनुदानित संस्था, शैक्षणिक संस्था, शासन अंगीकृत व्यवसाय (मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे), सर्व आयोग, न्यायाधिकरणे, सर्व दुय्यम न्यायालये, खासगी क्षेत्रातही मराठी भाषेचा वापर अनिवार्य करावा, अशी मागणी विविध संस्था, मान्यवरांनी केली होती. त्या पार्श्वभूमीवर समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.




### सर्व शाळांमध्ये मराठी विषय अनिवार्य

- राज्यातील सर्व मंडळांशी संलग्न खासगी तसेच विनाअनुदानित आणि अनुदानित शाळांमध्ये मराठी विषय २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून अनिवार्य करण्याचा कायदा नुकताच करण्यात आला आहे. याचे पालन न करणाऱ्या संस्थाचालकाला किंवा व्यवस्थापकीय संचालकास एक लाख रुपये दंडाची तरतूद करण्यात आली आहे.
- यंदाच्या शैक्षणिक वर्षात पहिली तसेच सहावीसाठी मराठी विषय सक्तीचा असेल नंतर प्रत्येक वर्षी त्यापुढील इयत्तांसाठी हा विषय अनिवार्य होईल. २०२४-२५ मध्ये पाचवी तसेच दहावीसाठी मराठी विषय सक्तीचा होईल. अशा पद्धतीने टप्प्याटप्प्यानेसर्व शाळांमध्ये कार्यवाही करण्यात येणार आहे.

Pune Main
Page No. 3 Aug 25, 2020
Powered by: erelego.com

# मराठी भाषेचा वापर न केल्यास आता दंडात्मक कारवाईचा बडगा

## मराठी राजभाषा अधिनियम समिती स्थापन

■ शिफारशींसह दोन महिन्यांत अहवाल

मुंबई, दि. २४ (प्रतिनिधी)– राज्यात प्रशासकीय कामकाज, न्यायालयीन कामकाज तसेच सार्वजनिक क्षेत्रातील दैनंदिन व्यवहारातील कामकाजात मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र राजभाषा अधिनियम समिती स्थापन करण्याचा निर्णय राज्याच्या मराठी भाषा विभागाने घेतला आहे. आयटी क्षेत्रात मराठी भाषेचा वापर वाढवण्याच्या बरोबरच मराठी भाषेचा वापर न करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याची तरतदू करण्याच्या संदर्भात ही समिती शिफारस करणार आहे.

राज्यात शासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर अनिवार्य केला आहे. त्यामुळे प्रशासकीय कामकाजात मराठी भाषेचा वापर करणे आवश्यक आहे. पण तरीही सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्थामध्य मराठी भाषेचा फारसा वापर केला जात नाही. तसेच मराठी भाषेचा वापर प्रशासकीय कामकाजात न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची तरतूद अधिनियमात नाही. त्यामुळे अधिनियमात सुधारणा करून निमशासकीय कार्यालये, अशासकीय कार्यालये, सरकारी अनुदानित संस्था, शैक्षणिक संस्था, मंडळ, महामंडळ, प्राधिकरणे, सर्व आयोग, न्यायालय, दुय्यम न्यायालये, व खासगी क्षेत्रात लागू करावा अशी मागणी विविध संस्था व मान्यवरांकडून करण्यात येत होते. त्यामुळे महाराष्ट्र राजभाषा अधिनियम १९६४मध्ये सुधारणा करण्यासाठी समिती स्थापन करण्याची राज्य सरकारची योजना होते. या पार्श्वभूमीवर राज्याच्या मराठी भाषा विभागाने महाराष्ट्र राजभाषा अधिनियम समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी व राज्यातील राजभाषा अधिनियमामध्ये सुधारणा करण्याची शिफारस ही समिती करणार आहे. मराठी भाषा विभागाच्या सचिव प्राजक्ता लवंगारे वर्मा या समितीच्या अध्यक्ष असून विधी व न्याय विभागाचे उपसचिव कि. भि. पाटील, मराठी भाषा तज्ज्ञ रमेश पानसे, भाषा संचलनालयाचे प्रभारी सहाय्यक संचालक सं. पु. सैंदाणे हे समितीचे सदस्य तर मराठी भाषा विभागाचे अवर सचिव नंदा राऊत या समितीच्या सदस्य सचिव असतील. याबाबतचा शासन निर्णय आज प्रसिध्द करण्यात आला आहे.

### समिती सरकारला कोणत्या शिफारसी करणार

■ इतर राज्यांच्या व केंद्र सरकारच्या राजभाषा नियमांतील तरतुदींचा तुलनात्मक अभ्यास ■ सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, अशासकीय शैक्षणिक-वैद्यकीय संस्था खासगी क्षेत्रात मराठीचा वापर ■ माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात मराठीचा वापर वाढवण्याबाबत तरतूद ■ न्यायालय, प्राधिकरणे, आयोगाच्या निवाड्यांमध्ये मराठी भाषेचा वापर वाढवणे ■ मराठी भाषेचा वापर न करणाऱ्यांवर संबंधित विभागामार्फत दंडात्मक कारवाईची तरतूद ■ दोन महिन्यांत शिफारशींसह प्रस्तावित नियमांचा मसुदा सादर करणे अपेक्षित

**Saamana: 25.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education


# शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा पुण्याकडेच ओढा

## विद्यापीठे, महाविद्यालयांतील प्रवेशांना वाढता प्रतिसाद

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : करोना संसर्ग असतानाही विद्यार्थ्यांचा शिक्षणासाठी पुण्याकडेच ओढा असल्याचे दिसून येत आहे. यंदा प्रवेश प्रक्रियेला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत अर्ज वाढत असल्याचेही स्पष्ट होत आहे.

पुणे आणि परिसरात जवळपास १५ विद्यापीठे आहेत. या विद्यापीठांत पुण्यातील विद्यार्थ्यांसह देशभरातील आणि जगभरातील विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. मात्र करोना संसर्गामुळे विद्यार्थ्यांची संख्या २५ ते ३० टक्क्यांनी घटण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तसेच किमान एक सत्र विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीनेच शिकावे लागणार आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण संस्थांनी प्रवेश प्रक्रियेसाठी



विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासारखे विशेष प्रयत्न केले आहेत. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन केली आहे. त्याचाही सकारात्मक परिणाम अर्ज वाढण्यासाठी झाल्याचे शिक्षण तज्ज्ञांचे मत आहे. प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

### स्वायत्त महाविद्यालयांचा पर्याय

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांपैकी काही महाविद्यालये स्वायत्त आहेत. या स्वायत्त महाविद्यालयांतील प्रवेशांनाही वाढता प्रतिसाद आहे. मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव म्हणाले, 'महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या दोन हजार जागा आहेत. त्यासाठी १७ हजार विद्यार्थ्यांनी गुणवत्ता अर्ज (मेरिट फॉर्म) भरले. त्यात राज्यातील ३० जिल्ह्यांतील आणि दहा परराज्यांतील विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत. याचा अर्थ विद्यार्थ्यांना पुण्यात शिकण्याची इच्छा आहे. करोना संसर्ग कमी झाल्यावर विद्यार्थी पुण्यात येऊ शकतील. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन केल्याचा, विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधल्याचा चांगला परिणाम दिसून येत आहे.'

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील साडेपाच हजार जागांसाठी आतापर्यंत ३० हजारांहून अधिक अर्ज आले आहेत. त्यात पदवी पूर्व स्तरावरील प्रवेशासाठी पुणे वगळता उर्वरित महाराष्ट्रातून १ हजार २३८, महाराष्ट्राबाहेरील १७३ अर्ज आले आहेत. तर पदव्युत्तर पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातून २० हजार १४१, महाराष्ट्राबाहेरून ५ हजार ४२, पदविका स्तरावर महाराष्ट्रातून १ हजार ९४५, महाराष्ट्राबाहेरून १८१, प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी महाराष्ट्रातून १ हजार ५१४ आणि महाराष्ट्राबाहेरून ९३ अर्ज आले आहेत. प्रवेश अर्जाची मुदत संपेपर्यंत अर्ज संख्या किमान चाळीस हजार होईल, असे विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाचे कुलसचिव उत्तम चव्हाण यांनी सांगितले. गेल्या वर्षी अर्जांची संख्या २५ हजार ५०० होती. त्यामुळे यंदाच्या अर्जसंख्येत वाढ असल्याचेही चव्हाण यांनी नमूद केले.

भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे म्हणाले,'करोना संसर्गामुळे विद्यार्थ्यांची संख्या थोडी कमी होईल असे वाटते. प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी शिक्षण संस्थांनी, महाविद्यालयांनी खूप तयारी केली, विद्यार्थ्यांशी संवाद साधला. एक सत्र ऑनलाइन पद्धतीने शिकावे लागले, तरी पुढील सत्रापासून पुण्यात प्रत्यक्ष संस्थेत शिकता येईल अशी विद्यार्थ्यांना आशा आहे. संस्थांनी केलेल्या प्रयत्नांचा प्रवेश प्रक्रियेत सकारात्मक परिणाम दिसण्याची अपेक्षा आहे.'

लोकसत्ता Wed, 26 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54484768

लोकमत

# सीएचबी प्राध्यापकांच्या नियुक्ती अत्यावश्यक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : तासिका तत्त्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांच्या नियुक्तीसाठी राज्य शासनाने खासबाब म्हणून मान्यता द्यायला हवी. काही विभाग केवळ तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांमुळे सुरळीतपणे चालतात. त्यामुळे सीएचबी प्राध्यापकांच्या नियुक्त्या करणे अत्यावश्यक आहे, असे मत काही महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडून केले जात आहे.

राज्यातील विविध महाविद्यालयातील पूर्णवेळ प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. त्यामुळेच शासनाने तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्तीचा मार्ग स्वीकारला आहे. दर वर्षी तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्त्या केल्या जातात. मात्र, यंदा कोरोनामुळे तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्तीला मान्यता दिली गेली नाही. परंतु, सध्या महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया सुरु आहे.

> शासनाने प्राध्यापकांच्या नियमित जागा भरणे गरजेचे आहे. प्राध्यापकांच्या जागा रिक्त असल्यामुळे काही वेळा ताण येतो. त्यामुळे सीएचबी प्राध्यापकांची नियुक्ती झालीच पाहिजे.
>
> - डॉ. एस. एम. राठोड, अध्यक्ष, पुटा

पुढील महिनाभरात सर्वच महाविद्यालयांमध्ये ऑनलाइन शिक्षण सुरु होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्राध्यापकांची नियुक्ती करणे गरजेचे आहे. ऑल इंडिया प्रिन्सिपल फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. सुधाकर जाधवर म्हणाले की, महाविद्यालयामध्ये पूर्णवेळ प्राध्यापकांची हजारो पदे रिक्त आहेत. शासनाने सीएचबी प्राध्यापक नियुक्तीचा पर्यायी मार्ग स्वीकारला आहे. यांच्या नियुक्तीवरही बंदी घातली तर महाविद्यालय चालविणे शक्य होणार नाही. शासनाने तत्काळ या नियुक्तीला मान्यता द्यावी. स. प. चे प्राचार्य डॉ. दिलीप शेठ म्हणाले की, बहुतांश महाविद्यालायातील काही विभाग एक ते दोन पूर्णवेळ प्राध्यापकांवर चालवले जात आहेत. सीएचबी प्राध्यापक नसतील तर अनेक शैक्षणिक कामे रखडतील.

Pune Main
Page No. 2 Aug 26, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

### उदय सामंत यांच्या राजीनाम्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना होणाऱ्या मनस्तापाला राज्य सरकार कारणीभूत आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा ते शिक्षण शुल्क भरण्यापर्यंतचे प्रश्न सोडविण्यात सरकार अपयशी ठरले आहेत. अशा परिस्थितीत शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) केली आहे.

प्रदेश मंत्री स्वप्निल बेगडे, शहराध्यक्ष प्रा. शरद गोस्वामी, सहमंत्री शुभम भूतकर, प्रांतप्रमुख ऋतुजा जाधव आदींनी पत्रकार परिषदेत ही मागणी केली. मागणी मान्य न झाल्यास २७ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर दरम्यान जनजागृती करणार आहोत. शुल्क नियंत्रण समितीच्या संकेतस्थळावर ५० विद्यार्थी समस्या नोंदवणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बेगडे म्हणाले की, आदित्य ठाकरे हे बालिशपणे वक्तव्य करीत असून, त्यांना विद्यार्थ्यांच्या करिअरची काळजी नाही. आदित्य ठाकरे हे विद्यार्थ्यांचा वापर हा व्होट बँक म्हणून करीत आहेत. याचा आम्ही जाहीर निषेध करतो.

उच्च शिक्षणमंत्री हे विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहेत. त्यांच्या प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षाचे परीक्षा शुल्क परत करावे, महाविद्यालयीन शुल्क विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार ४ टप्प्यांमध्ये घ्यावे, महाविद्यालयाच्या एकूण शुल्काच्या ३० टक्के शुल्क यावर्षी कमी करावे.

खासगी विद्यापीठांवर शुल्क नियंत्रणासाठी कायदा करावा. या मागण्या पूर्ण कराव्यात.

Pune Main
Page No. 2 Aug 26, 2020
Powered by: erelego.com

### यू-ट्यूबवरही तासिका उपलब्ध करून देण्याची विद्यापीठाची सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** ऑनलाइन तासिकांना हजेरी लावू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी यू-ट्यूबवर तासिका उपलब्ध करून द्याव्यात, तासिकांचे ध्वनिचित्रमुद्रण करण्यात यावे, अशा सूचना मुंबई विद्यापीठाने महाविद्यालयांना दिल्या आहेत.

मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांच्या ऑनलाइन तासिका सुरू करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांकडे साधने, इंटरनेट नसल्यामुळे ऑनलाइन वर्ग सुरू करण्यात येऊ नयेत अशी भूमिका प्राध्यापकांनी घेतली होती. मुंबई विद्यापीठ आणि महाविद्यालय शिक्षक संघटनेने (बुक्टू) याबाबत विद्यापीठाला निवेदनही दिले होते. त्यावर ऑनलाइन तासिकांना हजेरी लावू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही अभ्यास साहित्य उपलब्ध करून देण्याची सूचना केली आहे. विद्यार्थ्यांना तासिकांच्या ध्वनिचित्रफिती यू-ट्यूबवर उपलब्ध करून द्याव्यात. ई-मेल, व्हॉट्सॲपच्या माध्यमातून टिपण, मुद्दे पाठवण्यात यावेत. पाच ते दहा विद्यार्थ्यांचे गट करून चर्चा घ्याव्यात, असे उपाय विद्यापीठाने सुचवले आहेत.

**प्राध्यापकांचा विरोधच**

'विद्यापीठ वस्तुस्थितीपासून दूर आहे. विद्यार्थ्यांची परिस्थिती त्यांना माहीत नाही,' असा आरोप बुक्टूने केला आहे. सद्यःस्थितीत अनेक विद्यार्थी याचा खर्च करू शकत नाहीत. साधने नाहीत अशावेळी या उपायांचा किती उपयोग होणार, असा प्रश्न प्राध्यापक संघटनेने उपस्थित केला आहे. विद्यापीठाने परिपत्रक मागे घ्यावे यासाठी बुक्टूने अभियान सुरू केले असून कुलसचिवांना सदस्य ई-मेल पाठवणार आहेत.

**Loksatta: 26.8.2020**

### अकरावीसाठी विद्यार्थ्यांची विज्ञान शाखेला पसंती

**पुणे** : अकरावी प्रवेशासाठी यंदा विद्यार्थ्यांनी विज्ञान शाखेला पहिली पसंती दिली. ३४ हजार ०७१ विद्यार्थ्यांनी या शाखेसाठी नोंदणी केली आहे, तर विद्यार्थ्यांची दुसरी पसंती वाणिज्य शाखेला आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीने तात्पुरती गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यातून ही माहिती समोर आली. विद्यार्थी अकरावी प्रवेशासाठी विज्ञान आणि वाणिज्य शाखेला प्राधान्य देत असल्याचे निदर्शनास आले आहे. कला शाखेतील १५ हजार ६८१ जागा उपलब्ध असून, ६ हजार ७५२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. वाणिज्य ४२ हजार ८१५ जागा उपलब्ध असून, ३० हजार ७३२ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विज्ञान शाखेसाठी ४३ हजार ९८१ जागा असून ३४ हजार ७१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. कोटा प्रवेश प्रक्रियेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी बुधवारपर्यंत मुदतवाढ दिली आहे, अशी माहिती माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक दिनकर पाटील यांनी दिली आहे.

**Kesari: 26.8.2020**

### पाच हजार विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी) – अकरावी प्रवेशप्रक्रियेत विविध कोट्यांतर्गत ५ हजार ९४८ विद्यार्थ्यांचे कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित झाले आहेत. या विभागात ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांत १ लाख ६ हजार ९७२ प्रवेशाच्या जागा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. यासाठी आतापर्यंत ९८ हजार ९४६ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केलेली आहे. इनहाऊस, व्यवस्थापन व अल्पसंख्याक या कोट्यांतर्गत विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी १२ ते २२ ऑगस्टपर्यंत संधी उपलब्ध करून देण्यात आलेली होती. यातही विद्यार्थ्यांनी इनहाऊस कोटा प्रवेशाला प्राधान्य दिले होते.

**Saamana: 26.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# प्रवेश परीक्षेच्याा मुदतीत वाढ

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या ऑनलाइन प्रवेश परीक्षेसाठी अर्ज भरण्याची मुदत वाढविण्यात आली असून, इच्छुक विद्यार्थ्यांना येत्या ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज व शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण करायची आहे. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा सप्टेंबर महिन्यात घेण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे. विद्यापीठाच्या या निर्णयामुळे विद्यापीठात शैक्षणिक विभागात प्रवेशासाठी इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

अर्ज करण्यासाठीची मुदतवाढ केवळ पदव्युत्तर अभ्यासक्रमांना देण्यात आली असून, पदवी, पदविका आणि इतर कोणत्याही प्रमाणपत्र अभ्यासक्रमांसाठी ही मुदतवाढ नसेल, असे विद्यापीठाचे उपकुलसचिव उत्तम चव्हाण यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे. अर्ज करण्यासाठी मुदतवाढ मिळण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात आली होती. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पदवी, पदविका, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी होणाऱ्या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करण्यासाठी १० ऑगस्ट ही अंतिम मुदत देण्यात आली होती. या मुदतीत २७ हजार ७८७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत.

दरम्यान, पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची प्रवेश परीक्षा १६ ऑगस्ट रोजी ऑनलाइन पद्धतीने 'प्रॉक्टर्ड मेथड'द्वारे यशस्वीपणे पार पडली. आता याच मेथडचा वापर करून विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागण्याची शक्यता आहे. 'मुदतवाढीबाबतचे परिपत्रक वेबसाइटवर उपलब्ध असून, अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी www. unipune.ac.in या वेबसाइटचा वापर करावा,' असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.



### परीक्षा सप्टेंबरमध्ये

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा सप्टेंबर महिन्यात घेण्याचे नियोजन केले आहे. परीक्षेसाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने नोंदणी करण्याची शक्यता आहे. मात्र, करोनाच्या परिस्थितीचा आढावा घेऊन, याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे.

**Maharashtra Times: 26.8.2020**

# अकरावीची पहिली गुणवत्ता यादी रविवारी

पुणे, ता. २५ : अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील नोंदणीचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण झाला असून विद्यार्थ्यांना आता नियमित पहिल्या प्रवेश फेरीच्या गुणवत्ता यादीची रविवारपर्यंत (ता.३०) प्रतीक्षा करावी लागणार आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांतील एक लाख सहा हजार ९७२ जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. दिलेल्या मुदतीमध्ये अर्ज केलेल्या ७२ हजार ८२० विद्यार्थ्यांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी शिक्षण विभागाने प्रसिद्ध केली होती. विद्यार्थ्यांना सर्वसाधारण गुणवत्ता यादीवर आक्षेप नोंदवण्यासाठी कालावधीही दिला होता. दरम्यान, प्रवेश प्रक्रियेत जवळपास सहा हजार १९० विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहे. तर, ६३ विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश रद्द केले आहेत.

शिक्षण विभागाने दिलेल्या वेळापत्रकानुसार रविवारी (ता. ३०) नियमित प्रवेश फेरी एक अंतर्गत प्रवेशासाठी गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यात विद्यार्थ्याला त्याच्या लॉग इनमध्ये प्रवेशासाठी मिळालेले महाविद्यालय दर्शविले जाईल. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रवेशाबाबत मोबाईल संदेश पाठविण्यात येणार आहे. तसेच, पहिल्या नियमित फेरीचे कट ऑफ संकेतस्थळावर प्रसिद्ध केले होणार असून संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाला प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी त्यांच्या लॉगइनमध्ये पाठवली जाईल, असे अकरावी ऑनलाइन प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी सांगितले.

### तात्पुरत्या यादीवर आक्षेप

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत सहभागी झालेल्या दोन हजार ११७ विद्यार्थ्यांनी तात्पुरत्या गुणवत्ता यादीवर आक्षेप नोंदविले आहेत. त्यातील एक हजार ६१३ आक्षेपांना उत्तर दिले असून ५०४ आक्षेप उत्तराविना पेंडिंग आहेत. येत्या दोन दिवसांमध्ये या आक्षेपांना उत्तर देण्यात येणार आहे.

**Sakaal: 26.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

# विद्यापीठाची परीक्षा घेण्याची तयारी

## न्यायालयाच्या निर्णयाकडे लक्ष : सव्वादोन लाख विद्यार्थ्यांची घ्यावी लागेल परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अंतिम वर्षाच्या परीक्षाबाबत पुढील आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाकडून निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने त्यादृष्टीने आवश्यक तयारीला सुरु केली असून, ऑनलाइन व ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने परीक्षा घेण्याचा विद्यापीठाचा विचार आहे.

गेल्या काही महिन्यांपासून अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार की नाही याबाबतचा गोंधळ सुरु होता. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने सर्व बाजू ऐकून परीक्षेबाबत यूजीसी, राज्य शासनासह विविध घटकांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली. त्यामुळे सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असून न्यायालय काय निर्णय देणार याबाबत सर्वानाच उत्सुकता आहे. त्यातच सर्वोच्च न्यायालयाने जेईई व नीट परीक्षा घेण्याचा निर्णय दिल्यामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षासुद्धा होतील, असा अंदाज बांधला जात आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार परीक्षेची तयारी सुरु ठेवली आहे.



" न्यायालयाच्या निर्णयानंतर परीक्षांबाबत स्पष्टता येईल.परंतु, न्यायालयाचा निर्णय व विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्देशानुसार परीक्षांचे आयोजन केले जाईल. तसेच राज्य शासनाने दिलेल्या आदेशाचे पालन करुन परीक्षा अत्यंत सुटसुटीत व पारदर्शक पद्धतीने घेण्यासाठी विद्यापीठाकडून प्रयत्न केले जातील.

**- डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यांमधील संलग्न महाविद्यालयांमधील सुमारे २ लाख २५ हजार विद्यार्थ्यांची अंतिम वर्षाची परीक्षा घ्यावी लागणार आहे. त्यात कला शाखेच्या ३५ हजार १६७, वाणिज्य शाखेच्या ६६ हजार ८६३, विज्ञान शाखेच्या ४० हजार ३५४ , शिक्षणशास्त्रच्या ६ हजार २३२, आर्किटेक्चरच्या १ हजार ३७२, अभियांत्रिकीच्या ४८ हजार १३६, विधीच्या ७ हजार २२५ , व्यवस्थापनशास्त्रच्या १४ हजार ९०६ तर फार्मसीच्या ५ हजार २०९ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा द्यायची आहे, त्यांच्या परीक्षांचे आयोजन जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने करता येईल, असे आदेश राज्य शासनाने दिले आहे. आता न्यायालयाकडून दिल्या जाणाऱ्या निर्णयानुसार परीक्षा होणार आहेत. विद्यापीठाकडून केवळ ४० ते ५० गुणांची आणि ६० ते ९० मिनिटे कालावधीमध्ये परीक्षा घेण्याचा विचार केला जात आहे. त्यासाठी आवश्यक प्रश्नपत्रिका तयार करुन घेतल्या जाणार आहेत. परीक्षा घेण्यापूर्वी सुमारे एक महिना आधी परीक्षेचे वेळापत्रक प्रसिद्ध केले जाईल, अशी चर्चा विद्यापीठाच्या परीक्षा विभागात चर्चा केली जात आहे. तसेच परीक्षेचे मूल्यमापन व पुनर्मूल्यांकन कसे केले जावे. या उत्तरपत्रिका कुठे ठेवाव्यात, याबाबतही विद्यापीठाने तयारी सुरु केली आहे.

Pune Main
Page No. 2 Aug 27, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# विद्यापीठाकडून गुणपत्रिका मिळणार १५ दिवसांत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अंतिम वर्ष वगळता प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विविध अभ्यासक्रमांचे निकाल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे ऑनलाइन पद्धतीने जाहीर केले आहे. आता विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकांच्या छपाईचे काम विद्यापीठाकडून केले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना १५ ते २० दिवसांमध्ये संबंधित महाविद्यालयामधून गुणपत्रिका प्राप्त करून घेता येऊ शकतात. बहुतांश विद्यार्थी निकालाबाबत समाधानी आहेत, तर केवळ ४ टक्के विद्यार्थ्यांनी श्रेणी सुधार परीक्षेसाठी अर्ज केला आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यूजीसी व राज्य शासनाच्या निर्देशानुसार अंतिम वर्ष वगळता इतर वर्षाच्या विद्यार्थ्यांचे विविध परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर केले आहे. अभियांत्रिकी अभ्यासक्रमासह इतर सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल सर्वप्रथम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रसिद्ध केले. विद्यापीठाने ४ लाखांहून अधिक निकाल जाहीर केले आहेत. त्यातील केवळ १६ हजार ७२० विद्यार्थ्यांनी श्रेणी सुधार (परफॉर्मन्ससाठी) परीक्षेसाठी विद्यापीठाकडे अर्ज केले आहेत. विद्यार्थ्यांना ३१ ऑगस्टपर्यंत श्रेणी सुधारसाठी अर्ज करता येणार आहे.

विद्यापीठाने यापूर्वी जाहीर केलेला निकाल बहुतांश सर्वच विद्यार्थ्यांनी मान्य केला आहे. त्यामुळे विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका छपाईचे काम सुरु केले आहे. पुढील १५ दिवसांत या गुणपत्रिका संबंधित महाविद्यालयांकडे पाठविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. त्यामुळे कोरोनाच्या परिस्थितीत सुधारणा झाल्यास विद्यार्थी या गुणपत्रिका महाविद्यालयातून प्राप्त करु शकतील, असे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 2 Aug 27, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

## विद्यार्थ्यांच्या लॉगइनमध्ये अंतिम गुणवत्ता यादी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावी प्रवेशासाठीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील अंतिम गुणवत्ता यादी ही विद्यार्थ्यांच्या लॉगइनमध्ये पाहायला मिळणार आहे. या गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थ्यांना येत्या ३० ऑगस्टला महाविद्यालय अ‍ॅलॉटमेंट जाहीर होणार आहेत, अशी माहिती केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत नोंदणी करून पूर्ण अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची तात्पुरती गुणवत्ता यादी २३ ऑगस्टला जाहीर करण्यात आली. या यादीवर दोन हजार ११७ विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतल्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी ही मंगळवारी २५ ऑगस्ट रोजी जाहीर होणार होती. त्यामुळे यादी जाहीर होण्याची विद्यार्थी आणि पालक वाट पाहत होते. मात्र, ही अंतिम गुणवत्ता यादी विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रोफाइलमध्ये लॉगइन आयडी आणि पासवर्ड टाकून पाहायला मिळणार आहे. या प्रक्रियेनुसार विद्यार्थ्यांना त्यांचे नाव यादीत पाहता येणार आहे. या यादीप्रमाणे महाविद्यालय अ‍ॅलॉटमेंट ३० ऑगस्टला जाहीर होणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागणार आहे, असे शेंडकर यांनी सांगितले.

### एटीकेटी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र फेरी

दहावीत एटीकेटी मिळालेले विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यानंतर, त्यांच्यासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील विशेष फेरीनंतर स्वतंत्र फेरी राबविण्यात येणार आहे. या फेरीत अर्ज भरण्यापासून ते प्रवेश घेण्यापर्यंतची स्वतंत्र प्रक्रिया राबवण्यात येणार आहे, अशी माहिती प्रवेश नियंत्रण समितीच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

लोकसत्ता Thu, 27 August 2020 https://epaper.loksatta.com/c/5

## '१५ सप्टेंबरपर्यंत परीक्षांचे हिशेब सादर करावेत'

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. २६** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालये, संस्थांना ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१९ पर्यंतच्या विद्यापीठ परीक्षांचे हिशेब सादर करण्यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदत दिली आहे.

विद्यापीठ परीक्षा आयोजनाच्या कामासाठी दिलेल्या अग्रिम रकमांचे हिशेब लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षा संपल्यानंतर विद्यापीठाला सादर करणे आवश्यक आहे. करोना प्रादुर्भावामुळे काही महाविद्यालयांना अद्यापही परीक्षांचे हिशेब सादर करता आले नाहीत. आता या महाविद्यालयांना हिशेब सादर करण्यास संधी उपलब्ध करून दिली. परीक्षा, वित्त विभागात प्रत्यक्ष अथवा पोस्टाने हिशेब पाठविण्यात यावेत, अशा सूचना विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी अतुल पाटणकर यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्य, संस्थांच्या संचालकांना दिल्या.

**Prabhat: 27.8.2020**

अभाविप आक्रमक; विद्यार्थ्यांच्या मनस्तापाला राज्य सरकार कारणीभूत

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा

**पुणे, दि. २६** - विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतरही विद्यार्थ्यांना होणाऱ्या मनस्तापाला राज्य सरकार कारणीभूत आहे. पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून आकारलेले परीक्षा शुल्क ते शैक्षणिक शुल्क भरण्यापर्यंतचे अनेक प्रश्न सोडविण्यात सरकार अपयशी ठरले आहेत. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रदेश मंत्री स्वप्निल बेगडे यांनी मंगळवारी केली.

सरकारला विद्यार्थ्यांच्या करिअरची काळजी नाही, हे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे हे व्यक्तव्यांवरून अनेकदा दिसून आले आहे, अशी टीकाही बेगडे यांनी पत्रकार परिषदेत केली.

दरम्यान, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद दि.२७ ऑगस्ट ते ५ सप्टेंबरदरम्यान विद्यार्थ्यांच्या समस्या घेऊन जनजागृती करणार आहे. यात सर्व लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार यांना मागणीचे पत्र देण्यात येणार आहे व त्यांच्याकडून समर्थन पत्र घेण्यात येणार आहे.

सर्व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांसमोर निदर्शने करण्यात येणार आहेत. विविध मागण्यांचे पोस्टकार्ड मंत्री उदय सामंत यांना पाठवणार आहे, असे बेगडे यांनी सांगितले. यावेळी महानगर अध्यक्ष प्रा.शरद गोस्वामी, शुभम भुतकर, ऋतुजा जाधव उपस्थित होते.

**Prabhat: 27.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# प्रवेश निवड यादी 30 ऑगस्टला

## गुणवत्ता यादी 'लॉग-इन'मध्ये

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अकरावी प्रवेशाची निवड यादी ३० ऑगस्ट रोजी जाहीर होणार आहे. विद्यार्थ्यांना कोणत्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश मिळाला, याची माहिती यादीत मिळेल. तत्पूर्वी, विद्यार्थ्यांना अंतिम गुणवत्ता यादी त्यांच्या 'लॉग-इन'मध्ये पाहता येईल. अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी ही माहिती दिली.

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत नोंदणी करून अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची तात्पुरती गुणवत्ता यादी २३ ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात आली. या यादीवर दोन हजार ११७ विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतले. ग्राह्य दुरुस्त्यांसह अंतिम गुणवत्ता यादी मंगळवारी, २५ ऑगस्ट रोजी जाहीर होणार होती. मात्र, सुरक्षेच्या कारणास्तव ही यादी सार्वजनिकरीत्या जाहीर होणार नाही. त्याऐवजी विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रोफाइलमध्ये लॉग-इन आयडी आणि पासवर्ड टाकून अंतिम गुणवत्ता यादी पाहायला मिळणार आहे. या यादीनुसार करण्यात आलेली कॉलेज अलॉटमेंट (प्रवेशाची निवड यादी) ३० ऑगस्ट रोजी जाहीर होणार आहे. या यादीत अलॉट झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावा लागणार आहे, असे शेंडकर यांनी सांगितले. दरम्यान, नामांकित कॉलेजांमधील विज्ञान, वाणिज्य आणि कला शाखांतील प्रवेशांसाठी मोठी चुरस असेल, असा अंदाज आहे.

**अकरावी प्रवेश**

### 'एटीकेटी'च्या विद्यार्थ्यांना स्वतंत्र फेरीद्वारे प्रवेश

'इयत्ता दहावीत एटीकेटी मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील विशेष फेरीनंतर स्वतंत्र फेरी राबविण्यात येणार आहे. या फेरीत अर्ज भरण्यापासून प्रवेशापर्यंत स्वतंत्र प्रक्रिया होईल,' अशी माहिती प्रवेश नियंत्रण समितीच्या वेबसाइटवर दिली आहे.

**Maharashtra Times: 27.8.2020**

# Balbharati creates app for Std XII geography students for surveys

Vinamrata.Borwankar@timesgroup.com

**Mumbai:** As students study from home this year, state textbook bureau, Balbharati, has created a mobile application for HSC students who need to carry out surveys as part of the geography syllabus.

The app will help students collate survey data for their final report.

As part of class XII Geography syllabus, students have to conduct surveys of 15 households. Until now, students would use pen and paper for the surveys. "Students are using mobile phones for entertainment and now for distance learning sessions. So, this is another good use students can put mobiles to. The app will help students conduct surveys remotely and collate data, which will be available on Excel. This is a more advanced way to do surveys and will help students understand findings better," said a Balbharati official.

**TECH FORWARD**

'Geosurvey' is available on Google Playstore and teachers have a version too. A week since it was launched, over 1,475 students and 557 teachers downloaded and are using it. While there is a preloaded questionnaire on the app based on practicals, as prescribed in the textbook, students can modify it to suit their needs.

**The Times of India: 27.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

### विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअर वापराचे प्रशिक्षण

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मुक्त आणि खुल्या स्त्रोतांमध्ये उपलब्ध सॉफ्टवेअरचे दृकश्राव्य चित्रफितींद्वारे प्रशिक्षण घेण्याची संधी 'स्पोकन ट्युटोरियल' उपक्रमाद्वारे मिळणार आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाने आयआयटी मुंबईशी करार केला आहे.

स्पोकन ट्युटोरियल प्रकल्पाअंतर्गत मुक्त आणि खुल्या स्त्रोतांमधील (एफओएसएस) सॉफ्टवेअर्स शिकवली जातात. त्यात लिनक्स, स्किलॅब, पीएचपी व मायएसक्यूएल, जाव्हा, सी, सी. प्लस प्लस आदीचा समावेश असतो. या उपक्रमासाठी प्रत्येक महाविद्यालयाला पंचवीस हजार रुपये शुल्क आकारले जाणार असून, त्यानंतर संबंधित महाविद्यालये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊ शकतील. कोणताही विद्यार्थी किंवा प्राध्यापकाला प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्र मिळवता येईल. पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, विज्ञान, माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वाणिज्य, व्यवस्थापन अशा शाखांचे विद्यार्थी-प्राध्यापक सॉफ्टवेअर शिकू शकतात. हे सर्व अभ्यासक्रम कौशल्य विकासासाठी आणि अभ्यासक्रमासाठीही पूरक आहेत.

Loksatta: 28.8.2020

### पदवी परीक्षांचा निर्णय आज?

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रासह इतर काही राज्यांतील विद्यार्थ्यांचे लक्ष लागलेल्या पदवी परीक्षांबाबतच्या याचिकांवरील निर्णय सर्वोच्च न्यायालय आज, शुक्रवारी देण्याची शक्यता आहे. मात्र, त्यास गुरुवारी रात्रीपर्यंत अधिकृत दुजोरा मिळालेला नव्हता. करोनाच्या पार्श्वभूमीवर पदवी परीक्षांना महाराष्ट्र व इतर काही राज्यांनी विरोध केला आहे. तर, 'यूजीसी' परीक्षा घेण्याच्या बाजूने आहे. या संदर्भात दाखल याचिकांवर गुरुवारी सुनावणी झाली नाही, मात्र शुक्रवारच्या कामकाजात या विषयाचा उल्लेख करण्यात आला आहे. आता तरी याबाबत काही अंतिम निर्णय होईल अशी अपेक्षा विद्यार्थी व्यक्त करीत आहेत.

Maharashtra Times: 28.8.2020

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education



# सायबर सायन्सचा कोर्स सुरू

## कुलगुरूंच्या हस्ते उद्घाटन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

संरक्षण, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण, बँकिंग, उद्योग अशा सर्वच क्षेत्रांत तंत्रज्ञानाचा वापर होत असून, त्याद्वारे माहितीची निर्मिती आणि साठवणूक होते. डेटाचे महत्त्व वाढले आहे. मात्र, सायबर हल्ले, हॅकर्सकडून होणारी माहितीची चोरी आदींमुळे मोठ्या नुकसानाला सामोरे जावे लागते. 'टेक्नॉलॉजिकल डिस्ट्रप्शन्स' रोखण्यासाठी सायबर तज्ज्ञांची आवश्यकता आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात हा अभ्यासक्रम सुरू होत आहे, ही चांगली बाब आहे,' असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केले.

सूर्यदत्ता एज्युकेशन फाउंडेशन संचालित सूर्यदत्ता इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायबर सिक्युरिटीअंतर्गत (एसआआयसीएस) चालणाऱ्या 'बीएस्सी इन सायबर अँड डिजिटल सायन्स प्रोग्राम'च्या पहिल्या तुकडीचा शुभारंभ डॉ. करमळकर यांच्या हस्ते व्हर्च्युअल कार्यक्रमाद्वारे करण्यात आला. या प्रसंगी एअर मार्शल भूषण गोखले (निवृत्त), नेसिया आयटी असोसिएशनचे सहसचिव अनुपम भटनागर, सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय चोरडिया, सल्लागार सचिन इटकर, कार्यकारी संचालक डॉ. शैलेश कासंडे, प्रा. एस. रामचंद्रन, प्रा. प्रतीक्षा वाबळे, प्रा. सुनील धाडिवाल आदी उपस्थित होते.

डॉ. नितीन करमळकर म्हणाले, 'शैक्षणिक धोरणातही तंत्रज्ञानाचा वापर करत असताना उद्भवणाऱ्या धोक्यांवर उपाय शोधणारे शिक्षण देण्यावर भर दिला आहे. पुण्यात सायबर सुरक्षेसंबंधी विशेष बीएस्सी अभ्यासक्रम सुरू होत आहे, हे महत्त्वाचे आहे.' 'सायबर सुरक्षा, डेटा सुरक्षा याबाबत नागरिक अजूनही अनभिज्ञ आहेत. सायबर हल्ले, ऑनलाइन फसवणूक होण्याचे प्रकार वाढले आहेत. परिणामी या क्षेत्रातील तज्ज्ञांची मोठी गरज आहे. या अभ्यासक्रमामुळे आगामी काळात चांगले सायबर तज्ज्ञ निर्माण होतील,' असेही ते म्हणाले. गोखले म्हणाले, 'सायबर हे अदृश्य स्वरूपातील शस्त्र आहे. या शस्त्राला, हल्ल्याला परतवून लावण्यासाठी सायबर सुरक्षा क्षेत्रात काम करणारे तज्ज्ञ उपलब्ध होणे गरजेचे आहे.' डॉ. चोरडिया यांनी प्रास्ताविक केले.

### प्रवेशाची पात्रता

'बीएस्सी सायबर अँड डिजिटल सायन्स' या अभ्यासक्रमासाठी उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा (बारावी), तीन वर्षांचा डिप्लोमा किंवा एमसीव्हीसी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. प्रवेशासंबंधी सर्व माहितीसाठी www.siics.org/www.suryadatta.org या वेबसाइटला भेट द्यावी, किंवा ९७६३२६६८२९ या क्रमांकावर किंवा admission@suryadatta.edu.in या ई-मेलवर संपर्क साधावा,' असे आवाहन प्रा. चोरडिया यांनी केले आहे.

## 'स्पोकन ट्यूटोरियल' उपलब्ध

**पुणे :** फ्री व ओपन सोर्समध्ये उपलब्ध सॉफ्टवेअरचे व्हिडिओच्या माध्यमातून सर्वंकष प्रशिक्षण घेण्याची संधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कम्प्युटर सायन्स विभागाने मुंबई येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अर्थात आयआयटीशी करार केला आहे. त्याअंतर्गत स्पोकन ट्यूटोरियल उपक्रम राबविण्यात येणार आहे.

विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांनी स्पोकन ट्यूटोरियल उपक्रमासाठी नोंदणी करून आपल्या महाविद्यालयांमध्ये हा उपक्रम राबवावा. त्यासाठी प्राचार्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या कम्प्युटर सायन्स विभागाने परिपत्रकाद्वारे केले आहे.

स्पोकन ट्यूटोरियल प्रकल्पाअंतर्गत फ्री व ओपन सोर्समधील (एफओएसएस) सॉफ्टवेअर शिकवली जातात. व्हिडिओच्या माध्यमातून ही सॉफ्टवेअर कशी वापरायची हे शिकवले जाते. त्यासाठी प्रत्येक कॉलेजला दर वर्षासाठी २५ हजार रुपये शुल्क भरावे लागेल. या उपक्रमाअंतर्गत संबंधित कॉलेज अथवा संस्था आपल्या कॅम्पसमध्येच विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करू शकणार आहे. त्यानंतर कोणताही विद्यार्थी अथवा प्राध्यापक 'फॉस'चे प्रशिक्षण घेऊन त्याचे प्रमाणपत्र मिळवू शकतो. पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, सायन्स, माहिती तंत्रज्ञान, इंजिनीअरिंग, कॉमर्स, मॅनेजमेंट, एमसीए या शाखांचे विद्यार्थी-प्राध्यापक यात उपलब्ध असलेली कोणतीही सॉफ्टवेअर शिकू शकतात.

साधारणतः पहिले प्रशिक्षण दोन तासांचे असते. पहिल्या टप्प्यांत एखाद्या प्राध्यापकाने स्पोकन ट्यूटोरियल साइटवर जाऊन त्यांच्या कॉलेजसाठी प्रशिक्षण घेण्यासाठीची नोंदणी करायची असते. संबंधित कॉलेजमध्ये साउंड सिस्टिमससह सुसज्ज कम्प्युटर लॅब असणे आवश्यक आहे. एका प्रशिक्षणासाठी किती विद्यार्थी अथवा प्राध्यापक असावेत, याचे बंधन नाही. हा आकडा संबंधित संस्थेकडे उपलब्ध असणाऱ्या सुविधांवर अवलंबून आहे. मुंबई आयआयटीकडून स्काइपद्वारे आवश्यक मदत केली जाते. एका महिन्याच्या प्रशिक्षणानंतर चाचणीची सुविधाही उपलब्ध आहे.

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

"ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देणारा स्पोकन ट्यूटोरियल हा उपक्रम कम्प्युटर सायन्सच्या विद्यार्थी-प्राध्यापकांसाठी उपयुक्त आहे. यात विद्यार्थ्यांना शिकण्याची, उदाहरणे सोडविण्याची तसेच कोडिंगचीही संधी मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल.

– प्रा. डॉ. संजय ढोले, विभागप्रमुख, कम्प्युटर सायन्स विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Maharashtra Times: 28.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# ठरलं! परीक्षा होणारच

## सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश, राज्यांची मागणी फेटाळली | राज्यांना तारखा बदलता येणार, 'यूजीसी'चे परीक्षाधिकार कायम

सकाळ न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली, ता.२८ : देशभरातील विद्यापीठांच्या अंतिम वर्षांच्या परीक्षांबाबत सर्वोच्च न्यायालयाने आज मोठा निकाल दिला आहे. कोरोनाच्या संसर्गामुळे या परीक्षा रद्द करण्यात याव्यात अशी मागणी करणारी महाराष्ट्रासह अन्य काही राज्यांची मागणी न्यायालयाने फेटाळून लावली. राज्ये या परीक्षांच्या तारखा बदलू शकतात वा त्या पुढे ढकलू शकतात. विद्यापीठ अनुदान आयोगाशी (यूजीसी) चर्चा करून त्यांनी याबाबत निर्णय घ्यावा व ज्यांना ३० सप्टेंबरपर्यंत या परीक्षा घेणे शक्य नाही त्यांनी 'यूजीसी'ला तशी माहिती द्यावी, असे सांगून न्यायालयाने या निर्देशात 'यूजीसी'चे परीक्षाधिकारही कायम ठेवले आहेत.**

महाराष्ट्रासह पश्चिम बंगाल, दिल्ली व ओडिशा ही राज्य सरकारे आणि युवासेनेतर्फेही 'यूजीसी'च्या निर्देशांविरोधात आव्हान याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. न्या. अशोक भूषण, न्या. आर सुभाष रेड्डी आणि न्या. एम आर शहा यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. परीक्षा घेतल्याशिवाय राज्ये विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देऊ शकत नाही असेही न्यायाल्याने म्हटले आहे. १८ ऑगस्टच्या सुनावणीनंतर न्यायालयाने यावरील निर्णय राखून ठेवला होता.

'यूजीसी'ने जुलैमध्ये अंतिम वर्षांच्या परीक्षा घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या होत्या. या परीक्षा ऑनलाइन, ऑफलाइन किंवा संमिश्र अशा पद्धतीने घेण्याची मुभाही आयोगाने राज्यांना दिली होती. मात्र परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण कराव्यात, अशा सूचना आयोगाने विद्यापीठांना दिल्या होत्या. न्यायालयाने 'यूजीसी'ची भूमिका मान्य केली आहे. आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत राज्ये परीक्षा पुढे ढकलू शकतात. मात्र यूजीसीबरोबर चर्चा केल्यानंतरच त्यांना नवीन तारीख निश्चित करावी लागेल असे ताज्या आदेशांत म्हटले आहे.

सीबीएसई, आयसीएसई मंडळांनी परीक्षा रद्द केल्याचा दाखला याचिकाकर्त्यांनी दिला होता. मात्र या शालेय परीक्षांची विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षांशी तुलना होऊच शकत नाही असेही 'यूजीसी'ने स्पष्ट केले होते. अंतिम वर्षांच्या परीक्षा या विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असतात.

**संबंधित बातम्या पान ५ वर »**

**व्यवस्थेचीही परीक्षा**

**अग्रलेख पान ४ वर »**



### एकत्रित सुनावणी

विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा घेण्याच्या आयोगाच्या निर्णयाला युवा सेनेसह काही विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. या याचिकांवर एकत्रित सुनावणी घेताना न्यायालयाने आयोगाला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आयोगाने आपली भूमिका मांडणारे प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल केले होते. 'यूजीसी'तर्फे विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा घ्यायलाच हव्यात, अशी ठाम भूमिका मांडताना त्याची कारणेही स्पष्ट केली होती. अंतिम वर्षांच्या परीक्षा रद्द करण्याची काही राज्य सरकारांची भूमिका ही देशातील उच्च शिक्षणाच्या दर्जासाठी अतिशय घातक असल्याची भूमिका 'यूजीसी'ने न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे मांडली होती.

### विद्यार्थ्यांना वेठीला धरू नये : पटवर्धन

**मंगेश वैशंपायन** : सकाळ न्यूज नेटवर्क



**भूषण पटवर्धन**

नवी दिल्ली, ता. २८ : विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने आज दिलेल्या आदेशाचे सर्वांनी पालन करावे व लवकरात लवकर त्याची अंमलबजावणीही करायला हवी, असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी सांगितले. परीक्षा न घेण्याच्या अशैक्षणिक निर्णयामुळे विद्यार्थ्यांना वेठीस धरले गेले होते. त्यांना आणखी वेठीला न धरता परीक्षेबाबतची त्यांच्या मनातील संभ्रमावस्था संपणे अत्यावश्यक आहे असे मत त्यांनी मांडले. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करण्याबाबत महाराष्ट्र सरकारने केलेल्या सूचनेचाही 'यूजीसी' निश्चितपणे विचार करेल असेही त्यांनी सांगितले. न्यायालयाने ३० सप्टेंबरनंतरही परीक्षा घेण्यास मुभा दिल्याचे सांगून पटवर्धन म्हणाले, ''अशी इच्छा असणाऱ्या विद्यापीठांनी यूजीसीकडे अर्ज करणे आवश्यक आहे.''

**आम्ही सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा आदर करतो. आता परीक्षा घेण्याबाबत राज्यांतील विविध विद्यापीठांच्या कुलगुरूंशी चर्चा करून तोडगा काढण्यात येईल. सध्या आम्ही न्यायालयाच्या निकालाचा अभ्यास करत आहोत. लवकरच याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.**

– **उदय सामंत**, उच्च तंत्रशिक्षण मंत्री

**परीक्षेशिवाय पदवी मिळणार नाही या यूजीसीच्या निर्णयावर न्यायालयाने आज शिक्कामोर्तब केले आहे.**

– **अमित खरे**, सचिव उच्च शिक्षण

**Sakaal: 29.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# परीक्षांबाबतच्या निकालाचा आदर

## उदय सामंत : पुढील निर्णयासाठी विद्यापीठांचा आढावा घेणार

सकाळ वृत्तसेवा

**मुंबई, ता. २८ : ''सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत दिलेल्या निर्णयाचा आदर करून राज्य सरकार परीक्षेबाबत पुढील निर्णय घेणार आहे. यासाठी प्रत्येक विद्यापीठात जाऊन आढावा घेण्यात येईल,'' असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी स्पष्ट केले.**

परीक्षेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर सामंत यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, परीक्षेबाबत आम्ही कोणतेही राजकारण करणार नाही. न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून पुढील निर्णय घेण्यात येणार आहे. आजपासूनच विद्यापीठांचा आढावा घेणे सुरू केले आहे. त्यानुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना प्रत्यक्ष भेट देऊन कुलगुरू, जिल्हाधिकारी आणि स्थानिक प्रशासन यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत परीक्षेचे नियोजन करण्यात येईल.''

### एका 'बबड्या'च्या हट्टापायी...

अंतिम परीक्षेबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावरून राज्य सरकारवर टीका करताना भाजपचे आमदार आशिष शेलार म्हणाले की, एका 'बबड्या'च्या हट्टापायी राज्यातील दहा लाख विद्यार्थ्यांना नाहक त्रास दिला. त्यांच्या शैक्षणिक वर्षाचा खेळखंडोबा केला. आम्ही या निर्णयाचे धोका वारंवार सांगत होतो. पण अहंकारापुढे ऐकतो कोण? विद्यार्थ्यांना सर्वोच्च न्यायालयाने न्याय दिला. विद्यार्थ्यांच्या मन:स्थितीशी खेळ करणाऱ्या राज्य सरकारची आता माफी मागण्याची वेळ आली आहे.

**'न्यायालयात योग्य बाजू मांडली'**

राज्यातील कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव, विद्यार्थी - पालक यांची मानसिकता, कुलगुरूंच्या सूचना आणि काही शैक्षणिक संघटनांचे निवेदन अशा सर्वांगीण परिस्थितीचा विचार करूनच परीक्षेसंदर्भात सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारने बाजू मांडली होती, सामंत यांनी सांगितले.

## आधी विद्यार्थ्यांची सुरक्षा नंतर परीक्षा : थोरात

सकाळ न्यूज नेटवर्क



थोरात

मुंबई, ता. २८ : ''देशभरात कोरोनाने थैमान घातले असतानाही मोदी सरकार त्याचा कसलाही विचार न करता 'जेईई' व 'नीट' परीक्षा घेण्यावर अडून बसले आहे. या परीक्षेसाठी देशभरातून तब्बल २४ लाख ५० हजार विद्यार्थी बसले आहेत. एवढ्या विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात घालून परीक्षा कसल्या घेता? विद्यार्थ्यांची सुरक्षा सर्वांत महत्त्वाची आहे. त्यामुळे या परीक्षा काही काळासाठी पुढे ढकला,'' अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

'जेईई' व 'नीट' परीक्षा ठरवलेल्या तारखेला घेण्यावर केंद्र सरकार ठाम असल्याच्या निषेधार्थ प्रदेशाध्यक्ष, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली आज मुंबई येथे आंदोलन करण्यात आले.

**Sakaal: 29.8.2020**

# 'प्रोग्रेस रिपोर्ट'वर संशोधकांची फुली

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील स्थिती, लॉकडाउन व तांत्रिक अडचणींचा परिणाम

**पुणे, ता. २८ : पीएचडी, एम.फिल करणाऱ्या संशोधकांना दर सहा महिन्यांनी त्यांनी केलेल्या कामाचा प्रोग्रेस रिपोर्ट विद्यापीठाकडे सादर करणे आवश्यक असते. मात्र, लॉकडाउनमध्ये ठप्प झालेले संशोधन आणि ऑनलाइन माहिती भरण्यात येणाऱ्या अडचणींमुळे संशोधकांनी त्याकडे पाठ फिरवली आहे.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून संशोधन करण्याची संधी मिळण्यासाठी मोठी स्पर्धा असते. विषय निवडण्यापासून ते शेवटी प्रबंध सादर करेपर्यंत अनेक कष्ट घ्यावे लागतात. पुणे विद्यापीठात सध्या पीएचडीसाठी सुमारे ६ हजार ५०० जणांची नोंदणी आहे, तर पदवी प्रदान समारंभासाठी साधारणपणे ४०० पीएचडी तर १०० एम. फिल केलेल्या संशोधकांची नोंदणी झालेली असते.

पाच वर्षाच्या पीएचडीच्या काळात दर सहा महिन्यांनी संशोधकास त्यांनी केलेल्या संशोधन कामाचा अहवाल सादर करणे बंधनकारक असते. त्यामुळे संशोधन योग्य पद्धतीने सुरू आहे की नाही, याची तपासणी होते. पुणे विद्यापीठाने यासाठी २०१७ पासून ऑनलाइन ट्रॅकिंग सिस्टिम सुरू केली आहे. तसेच प्रत्यक्ष कार्यालयात येऊनही माहिती सादर करता येत होती.

मात्र, लॉकडाउन काळात विद्यार्थ्यांना वसतिगृह सोडावे लागले, संदर्भ ग्रंथ वापरता आले नाहीत. संशोधनासाठी तज्ज्ञांच्या भेटी, मुलाखतीही घेऊ शकले नसल्याने काम ठप्प आहे. यासाठी विद्यापीठाने सहा महिन्यांची मुदतवाढ दिली आहे.

दरम्यान, संशोधक विद्यार्थी विद्यापीठात येऊ शकत नसले तरी त्यांनी ऑनलाइन प्रोग्रेस रिपोर्ट सादर करावा, असे परिपत्रक शैक्षणिक विभागाने काढले आहे. पण त्यात अडचणी येत नसल्याने संपूर्ण अहवाल सादर करता येत नाही. त्यामुळे अनेक संशोधकांनी माहिती अद्ययावत केलेली नाही.

**“ अनेक संशोधक विद्यार्थी सहा महिने गावाकडेच आहेत. संशोधनात विशेष प्रगती झालेली नाही, तसेच ऑनलाइन माहिती भरण्यात अडचणी येत आहेत. विद्यापीठाने सध्याच्या परिस्थितीचा विचार करता, माहिती सादर करण्यासाठी आणखी काही काळ मुदत दिली पाहिजे.**

**- किरण**, संशोधक विद्यार्थी

**“ ऑनलाइन माहिती भरताना विद्यार्थ्याने काय करायचे, मार्गदर्शकाने काय करायचे, याबाबत अडचणी येऊ नयेत म्हणून सविस्तर परिपत्रक काढले आहे. संशोधकांची माहिती अद्ययावत होणे गरजेचे आहे. त्यासाठी मुदत दिलेली नाही. तसेच लॉकडाउनमुळे यापूर्वीच संशोधनासाठी सहा महिने मुदतवाढ दिली आहे.**

**-उत्तम चव्हाण**, उपकुलसचिव, पुणे विद्यापीठ

**Sakaal: 29.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

लोकमत

३० सप्टेंबरपर्यंत पार पाडाव्या : परीक्षेविना पदवी मात्र देता येणार नाही

### अंतिम वर्षाच्या परीक्षा घ्याव्याच लागतील; सुप्रीम कोर्टाचा निर्वाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली** : देशभरातील सर्व विद्यापीठांनी त्यांच्या पदवी अभ्यासक्रमांच्या अंतिम परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण कराव्यात, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिल्यानंतरही राज्यातील कोरोना साथीचा वाढता प्रकोप लक्षात घेऊन या परीक्षा महाराष्ट्रात न घेण्याचा राज्य सरकारचा निर्णय कायदेशीर असल्याचा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला. मात्र अंतिम वर्षाची परीक्षा न घेताच विद्यार्थ्यांना आधीच्या वर्षातील कामगिरीच्या आधारे पदवी देण्याचा किंवा पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश देण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय कायद्याला धरून नाही. परिणामी अंतिम परीक्षेशिवाय विद्यार्थ्यांना पदवी देता येणार नाही, असेही न्यायालयाने तेवढ्याच ठामपणे नमूद केले.



'नीट, जेईई परीक्षांविरोधात महाराष्ट्रासह

#### सहा राज्यांचे मंत्री सुप्रीम कोर्टात

वैद्यकीय प्रवेशांसाठी घेतली जाणारी 'नीट' व 'आयआयटी'सह प्रमुख अभियांत्रिकी संस्थांमधील प्रवेशांसाठी घेतली जाणारी 'जेईई' या देशपातळीवरील प्रवेश परीक्षा सध्याच्या कोरोना महामारीचा जोर कमी होईपर्यंत घेतल्या जाऊ नयेत, यासाठी विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या सहा राज्यांमधील मंत्र्यांनी शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

शिक्षणाशी खेळू नका / संपादकीय
आपत्ती व्यवस्थापन कायदाच वरचढ /८

#### कुलगुरूंशी चर्चा करूनच निर्णय : सामंत

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी राज्यातील प्रत्येक विद्यापीठाचे कुलगुरु, प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालकांशी चर्चा करून परीक्षा घेण्याबाबत निर्णय घेतला जाईल.

सर्वोच्च न्यायालयाने परीक्षांबाबत दिलेल्या निर्णयाचा राज्य सरकार आदर करत असून निकालाचा तपशिलात अभ्यास करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी स्पष्ट केले.

सविस्तर वृत्त/३

**परीक्षा घेण्याची** 30 सप्टेंबरची शेवटची मुदत वाढवून घेण्यासाठी राज्य सरकार युजीसीकडे विनंतीअर्ज करू शकेल, अशी मुभा कोर्टाने दिली. राज्यात अंतिम पदवी परिक्षेसह कोणतीही परीक्षा न घेण्याचा व विद्यार्थ्यांना आधीच्या वर्षातील कामगिरी आधारे पुढील वर्षात प्रवेश वा पदवी देण्याचा निर्णय राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने १९ जूनला घेतला होता. नंतर अंतिम पदवी परीक्षा ३0 सप्टेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश 'युजीसी'ने ६ जुलैला दिले. १३ जुलैला आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने आढावा घेत विद्यापीठांच्या कोणत्याही परीक्षा न घेण्याचा आधीचा निर्णय कायम ठेवला.

Pune Main
Page No. 1 Aug 29, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे आदेश : शैक्षणिक संस्थांकडून निर्णयाचे स्वागत; ऑनलाइन पद्धतीने परीक्षेची तयारीही संस्थांनी दर्शविली

### सुरक्षेचा विचार करून परीक्षेचे नियोजन करावे लागेल

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा आदेशानंतर पुण्यातील शैक्षणिक संस्थांनी त्याचे स्वागत केले आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. त्यामुळे आता राज्य शासन, विद्यापीठ आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचनांनुसार विद्यार्थ्यांच्या ऑफलाइन तसेच ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्याची तयारीही संस्थांनी दर्शविली आहे.

काही शैक्षणिक संस्थांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याची भूमिका जाहीर केली होती. या निर्णयामुळे परीक्षा घेण्यासाठी आता बळ मिळाले आहे. 'कोविड बॅच'चा शिक्का पडला असता. अशैक्षणिक निर्णय रद्द झाल्याने भवितव्य सुरक्षित झाल्याची प्रतिक्रिया संस्थाचालकांकडून व्यक्त केली जात आहे.

परीक्षा व्हायलाच हव्यात, ही आमची भूमिका होती. परीक्षेला न बसता पदवी देणे हे अजिबात योग्य नव्हते. नवीन पिढीचे भवितव्य अंधारात जाण्यापासून वाचले आहे. या विद्यार्थ्यांवर कोविड बॅच म्हणून शिक्का बसला असता. आमची परीक्षा घेण्याची आधीपासूनच तयारी होती.

**- डॉ. शां. ब. मुजुमदार,** संस्थापक, सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ

सर्वोच्च न्यायालय, यूजीसी आणि महाराष्ट्र शासन व विद्यापीठाकडून ज्या सूचना येतील त्यानुसार परीक्षा घेतल्या जातील. आमची सुरुवातीपासूनच परीक्षा घेण्याची तयारी आहे. बाहेरगावी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जेमतेम १0 टक्के आहेत. त्याचा उगाच बाऊ केला जात आहे. त्यामुळे त्याची काही अडचण येणार नाही.

**- ॲड. एस. के. जैन,** अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळी

विद्यार्थ्यांच्या परीक्षेतील गुणवत्तेच्या आधारावर त्यांना पदवी देणे महत्त्वाचे आहे. आता शासनाने विद्यापीठांशी चर्चा करून परीक्षांबाबत निर्णय घ्यावा. आम्ही ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यास तयार आहोत. तसेच इतर संस्थांनाही आवश्यकता भासल्यास मदत करू.

**- डॉ. शरद कुंटे,** अध्यक्ष, डेक्कन एज्युकेशन सोसायटी

यूजीसीच्या सूचनांप्रमाणे अभियांत्रिकीसह अन्य काही अभ्यासक्रमांच्या परीक्षा आम्ही काही दिवसांपासून ऑनलाइन पद्धतीने घेत आहोत. कला, वाणिज्य, विज्ञान या अभ्यासक्रमांच्या परीक्षाही अशाच पध्दतीने होतील. ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी असतील त्यांना संस्थेमध्येही परीक्षेसाठी संधी देणार आहे.

**- डॉ. माणिकराव साळुंखे,** कुलगुरु, भारती विद्यापीठ

परीक्षेशिवाय पदवी देणे अशैक्षणिक ठरले असते, ही आमची भूमिका होती. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. परीक्षा घ्यायलाच हवी, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने अशैक्षणिक निर्णयाचा पराभव झाला. या निर्णयाने परीक्षांचे राजकारण करणाऱ्यांचाही पराभव झाला आहे.

**- धनंजय कुलकर्णी,** याचिकाकर्ते



आता अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार हे निश्चित आहे. पण हा निर्णय यापूर्वीच झाला असता तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता आले असते. परीक्षेला विलंब झाल्याचा परिणाम निकालावर होणार आहे. याला राज्य आणि केंद्र सरकार मधील श्रेय वादाची लढाई जबाबदार आहे.

**- कल्पेश चंद्रकांत यादव,** पुणे शहराध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना

आदित्य ठाकरे व राज्य सरकार यांच्या परीक्षा न घेण्याच्या आडमुठ्या धोरणामुळे विद्यार्थ्यांना मानसिक त्रास सहन करावा लागला आहे. आता विद्यापीठांनी सर्व नियम पाळत योग्य त्या वेळेत परीक्षा घ्याव्यात.

**- अनिल ठोंबरे,** महानगर मंत्री, अभाविप

विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यास विरोध नाही. मात्र, सध्याच्या कोरोना महामारीच्या काळात परीक्षा घेणे विद्यार्थ्यांच्या दृष्टीने धोक्याचे आहे. त्यामुळे या निकालावर फेरविचार याचिका दाखल करण्याचा विचार आहे. याबाबत वरिष्ठ नेत्यांशी बोलून याचिका दाखल केली जाईल.

**- अमिर शेख,** प्रदेशाध्यक्ष, एनएसयुआय

आमची भूमिका परीक्षांच्या विरोधात नाही. पण सध्याच्या काळात परीक्षा घेणे धोक्याचे ठरु शकते. परीक्षा नंतर घ्याव्या लागतील. पण यूजीसीने ज्या पद्धतीने यावर ठाम भूमिका घेतली त्याच पद्धतीने इतर मुद्यांबाबतही ठाम भूमिका घ्यायला हवी.

**- एस. पी. लवांडे,** सरचिटणीस, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी अँड कॉलेज टीचर्स ऑर्गनायझेशन (एमफुक्टो)

Pune Main
Page No. 2 Aug 29, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

लोकमत

# ऑनलाइन परीक्षेला प्राधान्य?

## विद्यापीठ कुलगुरुंचे संकेत : परीक्षेआधी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्षाच्या परीक्षांवर शिक्कामोर्तब केल्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने चाचपणी सुरु केली आहे. विद्यापीठाने प्रॉक्टर्ड पद्धतीचा वापर करून यशस्वीपणे ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेतल्या आहेत. याच पद्धतीचा वापर करून अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठाकडून पहिले प्राधान्य दिले जाऊ शकते. परीक्षांचे नियोजन करताना इतर पर्यायांचाही विचार केला जाईल, असे स्पष्ट विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांनी शुक्रवारी स्पष्ट केले.

अंतिम वर्षाच्या परीक्षा घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना पदवी देता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट केले. मात्र, यूजीसीने घालून दिलेले ३० सप्टेंबरचे बंधन न्यायालयाने ठेवलेले नाही. या निकालामुळे राज्यात परीक्षा घ्याव्या लागणार आहेत.

त्यादृष्टीने विद्यापीठाने यापूर्वीच तयारी केली आहे. पण सध्याच्या कोरोनाची स्थिती बिकट असल्याने विविध पर्यायांचा विचार करावा लागणार आहे.

### सव्वा दोन लाख विद्यार्थी

- पुणे, नाशिक व अहमदनगर जिल्ह्यात सुमारे सव्वादोन लाख विद्यार्थी अंतिम वर्षातील आहेत. एवढ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन विद्यापीठाला करावे लागणार आहे. यामध्ये सर्वाधिक ६६ हजार विद्यार्थी वाणिज्य शाखेतील, तर ४८ हजार अभियांत्रिकी शाखेचे आहेत. विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थ्यांची संख्या अनुक्रमे ४० हजार व ३५ हजार एवढी आहे.

### शाखानिहाय परीक्षार्थी

| |
|---|
| कला - ३५ हजार १६७ |
| शिक्षणशास्त्र - ६ हजार २३२ |
| विज्ञान -४० हजार ३५४ |
| विधी -७ हजार २२५ |
| वाणिज्य- ६६ हजार ८६३ |
| व्यवस्थापनशास्त्र -१४ हजार ९०६ |
| औषधनिर्माणशास्त्र - ५ हजार २०९ |
| अभियांत्रिकी - ४८ हजार १३६ |
| आर्किटेक्चर - १ हजार ३७२ |

Pune Main
Page No. 2 Aug 29, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# कुलगुरूंशी चर्चा करूनच परीक्षेबाबत निर्णय

## शिक्षणमंत्री उदय सामंत : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी राज्यातील प्रत्येक विद्यापीठाचे कुलगुरु, प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालकांशी चर्चा करून परीक्षा घेण्याबाबत निर्णय घेतला जाईल. सर्वोच्च न्यायालयाने परीक्षांबाबत दिलेल्या निर्णयाचा राज्य सरकार आदर करत असून निकालाचा तपशिलात अभ्यास करून योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी स्पष्ट केले.

अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत आजच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे राज्य सरकार तोंडघशी पडल्याची टीका विरोधकांनी केली. या पार्श्वभूमीवर निकालानंतर सामंत यांनी माध्यमांना सांगितले की, या विषयात राजकारण करून विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण करण्याची आमची भूमिका नाही. हा जिंकण्या-हरण्याचा विषय नाही. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि हित लक्षात घेत सरकारने परीक्षा ऐच्छिक ठेवण्याचा निर्णय घेतला होता. राज्य आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीनंतर तसा निर्णय घेण्यात आला. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने परीक्षा घेण्याचे आदेश दिल्याने त्याचे पालन केले जाईल.

न्यायालयाचा संपूर्ण निकाल अद्याप तपासला नाही. या निकालावर राज्याचे महाधिवक्ता, विधि व न्याय विभागाचे मत जाणून घेऊ तसेच विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून पुढील दिशा ठरवली जाईल, असे सामंत यांनी सांगितले.

### तारखांबाबत संभ्रम

- विद्यापीठ अनुदान आयोगाने ३० सप्टेंबरपूर्वी परीक्षा घेण्याचे निर्देश दिले होते. न्यायालयाने आपल्या निकालात अशी कालमर्यादा बंधनकारक नसल्याचे म्हटले आहे.
- तारखा पुढे ढकलायच्या असतील तर राज्य आपत्ती व्यवस्थापन समितीत चर्चा करून, परिस्थितीचा आढावा घेऊन निर्णय आयोगाला कळविणार असल्याचे सामंत यांनी सांगितले. त्यामुळे परीक्षांच्या तारखांबाबत अद्याप संभ्रमाची स्थिती कायम आहे.

Pune Main
Page No. 3 Aug 29, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

### आपत्ती व्यवस्थापन कायदा विद्यापीठ कायद्याहून वरचढ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** सर्व विद्यापीठांना त्यांच्या अंतिम परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण कराव्यात, असे निर्देश 'यूजीसी'ने दिले होते. याविरोधात सर्वोच्च न्यायालयात अनेक राज्यांतून याचिका केल्या गेल्या. न्यायालयाने आपत्ती व्यवस्थापन कायदा विद्यापीठ अनुदान कायद्याहून वरचढ असल्याचा निर्वाळा दिला. 'यूजीसी'च्या निर्देशांनंतरही परीक्षा न घेण्याचा राज्याचा निर्णय आपत्ती व्यवस्थापन कायद्यान्वये घेतलेला असल्याने तो योग्य ठरविला गेला. महाराष्ट्रासह दिल्ली व प. बंगाल सरकारनेही परीक्षा न घेण्याचे निर्णय घेतले होते. त्यांनी ते निर्णय आपत्ती व्यवस्थापन कायद्याचे अधिकार वापरुन घेतले नव्हते. ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा न घेण्याचा फक्त महाराष्ट्राचा निर्णयच कायद्याच्या कसोटीवर टिकू शकला.

#### न्यायालयाचे ठळक निष्कर्ष

1 'यूजीसी'चे निर्देश दिलेल्या अधिकारांच्या चौकटीत राहूनच काढले आहेत.

2 सुधारित निर्देशांमध्ये या परीक्षा ठराविक तारखेपर्यंत घेण्यास सांगण्यात आले. संपूर्ण देशात पदवी परिक्षांच्या बाबतीत वेळापत्रकात समानता असावी हा त्यामागचा उद्देश आहे.

Pune Main
Page No. 8 Aug 29, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

महाराष्ट्रासह सहा राज्यांच्या मंत्र्यांची सुप्रीम कोर्टात धाव; जेईई (मेन) ही परीक्षा १ ते ६ सप्टेंबर या कालावधीत, तर १३ सप्टेंबर रोजी 'नीट' परीक्षा

### विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात; 'नीट', 'जेईई' घेऊ नका

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** वैद्यकीय प्रवेशांसाठी घेतली जाणारी 'नीट' व 'आयआयटी'सह प्रमुख अभियांत्रिकी संस्थांमधील प्रवेशांसाठी घेतली जाणारी 'जेईई' या देशपातळीवरील प्रवेश परीक्षा सध्याच्या कोरोना महामारीचा जोर कमी होईपर्यंत घेतल्या जाऊ नयेत, यासाठी विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या सहा राज्यांमधील मंत्र्यांनी शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.

प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी काही दिवसांपूर्वी घेतलेल्या व्हर्च्युअल बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार पं. बंगाल, झारखंड, राजस्थान, छत्तीसगड, पंजाब आणि महाराष्ट्र या राज्यांमधील प्रत्येकी एक अशा मिळून एकूण सहा मंत्र्यांनी एक सामायिक याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री उदय सामंत हे त्यापैकी एक याचिकाकर्ते आहेत. विशेष म्हणजे एक सुजाण व जबाबदार नागरिक या नात्याने आम्ही ही याचिका व्यक्तिगत पातळीवर केली आहे, असे या मंत्र्यांनी आवर्जून नमूद केले आहे.

या प्रवेश परिक्षांना स्थगिती देण्याच्या १७ ऑगस्टच्या निकालाचा न्यायालयाने फेरविचार करावा यासाठी राज्यांनी ही याचिका केली आहे. साथीचे संकट असले तरी दैनंदिन व्यवहार थांबू शकत नाहीत व या प्रवेश परीक्षा वेळेवर न घेऊन विद्यार्थ्यांचे बहुमोल वर्षही वाया जाऊ दिले शकत नाही, असे म्हणत न्यायालयाने या परिक्षांना हिरवा कंदील दिला होता. त्यानंतर 'नीट' 'जेईई' व 'जेईई ॲडव्हान्स्ड' या सर्व परीक्षा आधी ठरल्याप्रमाणे सप्टेंबरमध्येच होतील, असे 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'ने (एनटीए) जाहीर केले होते.

न्यायालयाने आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी कळकळीची विनंती करताना ही राज्ये याचिकेत म्हणतात की, या परिक्षांना देशभरातून लाखो उमेदवार बसतात. त्यांचे आरोग्य जपण्यासाठी सध्या परीक्षा न घेणेच इष्ट ठरेल. शिवाय एवढ्या मोठ्या संख्येने उमेदवारांच्या प्रवासाची व निवासाची सुरक्षित व्यवस्था करणे हे फार कठीण काम आहे. या राज्यांचा असाही आरोप आहे की, जेव्हा कोरोना साथीचा जोर तुलनेने कमी होता तेव्हा या परीक्षा योग्य ती काळजी घेऊन सुरक्षितपणे घेता आल्या असत्या. आपल्या या नाकर्तेपणाने लाखो विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाईल याची आता जाणीव झाल्याने केंद्र सरकार घाईघाईने परीक्षा घेऊ पाहात आहे.




जेईई, नीट परीक्षा आयोजित करण्याच्या निर्णयाविरुद्ध नवी दिल्लीत प्रदेश काँग्रेस कमिटीच्या सदस्यांनी शुक्रवारी शास्त्री भवन परिसरात आंदोलन केले.

#### न्यायाधीशांच्या निवृत्तीने निकड

1 आधीचा निकाल ज्या खंडपीठाने दिला होता त्याचे प्रमुख न्यायाधीश न्या. अरुण मिश्रा येत्या बुधवारी २ सप्टेंबर रोजी निवृत्त होत आहेत. ज्यांनी मूळ निकाल दिला त्यांनीच फेरविचार याचिका ऐकण्याची प्रथा आहे. त्यामुळे या याचिकेवर तातडीने सुनावणी होणे अपेक्षित आहे.

2 ते शक्य न झाल्यास मूळच्या खंडपीठावरील बाकीचे दोन न्यायाधीश व तिसरा नवा न्यायाधीश यांना ही सुनावणी घ्यावी लागेल. परीक्षेच्या नियोजित तारखाही सप्टेंबरच्या मध्यात असल्याने त्यादृष्टीनेही लवकरात लवकर सुनावणी होणे गरजेचे आहे. मात्र फेरविचार याचिकेत सुनावणीची कक्षा खूपच मर्यादित असते, हेही लक्षात घ्यायला हवे.

3 आधीच्या तुलनेत साथीचा जोर वाढलेला असताना आता परीक्षा घेण्याने केवळ परीक्षा देणाऱ्यांच्याच आरोग्यास धोका संभवेल असे नाही, तर त्याने एकूणच सार्वजनिक आरोग्याची गंभीर समस्या निर्माण होईल, असेही राज्यांचे मत आहे.

### परीक्षार्थींसाठी दहा लाख मास्क

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कोरोनाची साथ असली तरी जेईई (मेन) व नीटची परीक्षा घेण्यावर केंद्र सरकार ठाम आहे. ही परीक्षा घेणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए)ने परीक्षार्थींच्या आरोग्य सुरक्षेसाठी दहा लाख मास्क, हातमोजांच्या १० लाख जोड्या, १३०० इन्फ्रारेड थर्मामीटर व ६६०० लिटर हँड सॅनिटायझर आदी गोष्टी सुमारे १३ कोटी रुपये खर्च करून घेतल्या आहेत.

अभियांत्रिकी शाखेला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी जेईई (मेन) ही ऑनलाईन परीक्षा १ ते ६ सप्टेंबर या ... १३ सप्टेंबर रोजी घेण्यात येणार आहे.

त्याशिवाय ६६०० स्पंज, ३,३०० स्प्रे बाटल्या विकत घेण्यात आल्या असून, परीक्षेच्या दिवसांत ३,३०० स्वच्छता कर्मचारी परीक्षा केंद्रांवर सज्ज असतील. जेईई (मेन) या परीक्षेला सुमारे ८.५८ लाख विद्यार्थी देणार असून तिथे १.१४ लाख जण ...

त्यासाठी एनटीएने जय्यत तयारी केली आहे. जेईई (मेन) व नीट परीक्षा कोरोनाच्या काळात घेण्यास काही राज्य सरकारांनी तीव्र विरोध दर्शविला होता.

जेईई (मेन) परीक्षेसाठी कोरोना साथीच्या आधी एनटीएने ५७० परीक्षा केंद्रे सज्ज ठेवली होती. मात्र त्यात ...

#### फैलाव रोखण्यासाठी उपाययोजना

- जेईई (मेन) व नीट परीक्षांच्या दर ३० परीक्षार्थींमागे २ पर्यवेक्षक ठेवण्यात आले होते. आता हेच प्रमाण १५ परीक्षार्थींपुरते मर्यादित ठेवण्यात आले आहे. आता पर्यवेक्षकांची संख्या वाढवून ती १.४ लाख करण्यात आली आहे. कोरोना पार्श्वभूमीवर गर्दी टाळण्यासाठी एकाच वेळी २० मिनिटांच्या कालावधीत किमान ४० विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश दिला जाईल.

Pune Main
Page No. 8 Aug 29, 2020
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

लोकमत

### शिक्षणाशी खेळू नका

महाविद्यालयीन व विद्यापीठ पातळीवरील अंतिम वर्षांच्या परीक्षा घ्याव्याच लागतील, असे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केल्यामुळे महाराष्ट्रातही त्या होतील, हे निश्चित झाले. त्यामुळे परीक्षा होणार की नाहीत, अशा संभ्रमात असलेल्या विद्यार्थ्यांना घाईघाईने तयारीला लागावे लागेल. विद्यापीठ अनुदान आयोगाने सांगितल्याप्रमाणे त्या ३० सप्टेंबरपर्यंत होणार की आणखी पुढे ढकलल्या जाणार, हे अद्याप गुलदस्त्यातच आहे. आधीच्या परीक्षांच्या मूल्यांकनाद्वारे विद्यार्थ्यांना उत्तीर्ण वा अनुत्तीर्ण करता येणार नाही, हेही कोर्टाने ठणकावून सांगितले आहे. कोरोना संकटकाळात परीक्षा न घेता आधीच्या मूल्यांकनाद्वारे विद्यार्थ्यांचा निकाल लावावा, असे महाराष्ट्र सरकारचे म्हणणे होते. ते कोर्टाने सपशेल अमान्य केले. याआधी जेईई व नीट परीक्षा घ्यायलाही सुप्रीम कोर्टाने हिरवा कंदील दाखविला होता. त्यामुळे अंतिम वर्षांच्या परीक्षांबाबतही कोर्टाची तीच भूमिका असेल, याचा अंदाज आला होता. महाराष्ट्रात कोरोनाचा सर्वाधिक संसर्ग असल्याने आता परीक्षा घेतल्यास रुग्ण वाढण्याची भीती महाराष्ट्र सरकारला वाटत आहे. तेच प्रतिपादन करताना संसर्गजन्य आजार कायद्यान्वये राज्यांना असलेल्या अधिकाराचा सरकारने कोर्टात उल्लेख केला होता. मात्र त्यावर सध्याच्या स्थितीत तुम्ही परीक्षा पुढे ढकलू शकता; पण त्या रद्द करता येणार नाहीत, असे कोर्टाने म्हटले आहे. सद्यस्थितीत परीक्षा कधी घ्यायच्या, हा अधिकार महाराष्ट्राला असल्याचे कोर्टाने मान्य केले आहे. त्यामुळे ठाकरे सरकारने विद्यापीठांशी बोलून त्या कधी होतील, हे लवकरात लवकर जाहीर करावे. त्या ३० सप्टेंबरपर्यंत घ्यायच्या असतील, तर घाईघाईने तयारीला लागावे लागेल. त्या ऑक्टोबर वा नोव्हेंबरमध्ये घ्यायच्या असतील, तर तसे विद्यापीठ अनुदान आयोगाला कळवून तशी संमती मिळवावी लागेल. त्यात राज्य सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांच्याकडून वेळखाऊपणा होऊ नये, इतकीच अपेक्षा. या गोंधळामुळे असंख्य विद्यार्थ्यांनी गेल्या दोन महिन्यांत पुस्तकांना हात लावलेला नाही. विविध निर्बंधांमुळे त्यांना अभ्यास करता आलेला नाही. त्यामुळे आता तरी पुरेसा वेळ मिळायला हवा. त्यांचे सहा महिने आधीच वाया गेले आहेत. शिवाय अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याची राज्य सरकारची भूमिकाच अयोग्य होती. सध्याच्या स्पर्धेत परीक्षा न घेता सरसकट पास वा नापास करणे अन्यायकारक ठरले असते. या परीक्षा लगेच झाल्या तरी निकाल लागायला जानेवारी तरी उजाडेल. त्यामुळे ज्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यायचा आहे, त्यांना तो मार्च वा त्यानंतर मिळेल. म्हणजे त्यांचे एक संपूर्ण वर्ष वाया गेले आहे. अर्थात त्याला राज्य सरकार जबाबदार नाही, कारण कोणत्याच राज्यांत या परीक्षा झालेल्या नाहीत आणि तसा निर्णय केंद्र सरकारनेच घेतला होता. आताही लाखो विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेताना महाराष्ट्रच नव्हे, तर सर्व राज्यांना प्रचंड काळजी घ्यावी लागणार आहे. या परीक्षा साधारणपणे महिनाभर तरी चालतील. अमेरिकेत शाळा सुरु होताच विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात कोरोनाची लागण झाल्याचे उघड झाले आहे. तसे झाल्यास संकट अधिक वाढेल. लॉकडाऊननंतर हजारो विद्यार्थी आपापल्या गावी निघून गेले आहेत. त्यांना परीक्षा देण्यासाठी पुन्हा दुसऱ्या गावी वा शहरात जावे लागू नये, ही अपेक्षा आहे. त्यांना जवळच्या महाविद्यालयात परीक्षा देण्याची मुभा मिळायला हवी. कर्नाटकने शालान्त परीक्षा घेताना विद्यार्थ्यांना ती सुविधा दिली होती. जेईई, नीट परीक्षांसाठी काही लाख हातमोजे, मास्क आणि लाखो लिटर सॅनिटायझर विकत घेतले आहे. तसेच या परीक्षांसाठी करावे लागेल. केंद्रांवर ऑक्झिमीटर व थर्मल स्क्रिनिंग मशीन ठेवाव्या लागतील. त्यासाठी नेहमीपेक्षा अधिक मनुष्यबळ लागेल. हे वाटते, तितके सोपे नाही. कोर्टात वेळ दवडण्यापेक्षा ही तयारी केली असती तर विद्यार्थी तरी निश्चिंत राहिले असते. अंतिम वर्ष परीक्षा घ्याव्याच लागणार, हे स्पष्ट झाल्यानंतरही महाराष्ट्रासह सहा राज्यांनी या परीक्षांना पुन्हा कोर्टात आव्हान देण्याची तयारी केली आहे. तसा मार्ग सर्वांनाच आहे. पण कोर्टाच्या निर्णयाची वाट न पाहता, या दोन्ही परीक्षा सुरळीत पार पडतील, यासाठीची तयारी पूर्ण केली असेल, अशी अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळणे थांबलेच पाहिजे.

> कोरोनाचे संकट कधी संपणार, लस कधी येणार, याची खात्री नाही. त्यामुळेच निर्बंध हळूहळू उठविले जात आहेत. असे असताना अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याचा महाराष्ट्राने धरलेला आग्रह अयोग्य व चुकीचाच होता आणि आहे.

Pune Main
Page No. 4 Aug 29, 2020
Powered by: erelego.com

पुढारी

# अंतिम वर्ष परीक्षा होणारच

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने अखेर अनिश्चितता संपली

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

देशातील पदवी आणि पदव्युत्तर अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार की नाही याबाबतच्या अनिश्चिततेवर शुक्रवारी अखेर पडदा पडला. परीक्षा पुढे ढकलल्या जाऊ शकतात; पण त्या रद्द होऊ शकत नाहीत, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. आपत्कालीन व्यवस्थापन कायद्यानुसार महाराष्ट्र सरकारने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. तथापि, सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे महाराष्ट्रातही अंतिम वर्षाच्या परीक्षा घ्याव्या लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### परीक्षेचा कालावधी चर्चा करून ठरविण्याची मुभा



अंतिम वर्षाच्या परीक्षा घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना पदवी देऊ शकत नाही, अशी टिप्पणी न्यायमूर्ती अशोक भूषण, न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी आणि न्यायमूर्ती एम. आर. शाह यांच्या खंडपीठाने केली. विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्णयाला अनेक विद्यार्थी व संघटनांनी न्यायालयात आव्हान दिले होते. गेल्या १८ ऑगस्ट रोजी सर्व पक्षकारांची बाजू ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला होता. अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय योग्य असल्याचा निर्वाळा खंडपीठाने दिला.

एखाद्या राज्याला परीक्षा घेणे शक्य नसेल तर त्यांना यूजीसीकडे दाद मागण्याचा पर्याय खुला आहे. ते तारीख पुढे ढकलण्याची मागणी करू शकतात, असे खंडपीठाने म्हटले आहे. ३० सप्टेंबरच्या आधी परीक्षा घेणे अनिवार्य नाही. चर्चेतून ते तारीख ठरवू शकतात, असे न्यायालयाने निकालपत्रात म्हटले आहे. पान २ वर »

### बोर्ड परीक्षांशी तुलना होऊ शकत नाही



सीबीएसई, आयसीएसईच्या परीक्षांची विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांशी तुलना होऊ शकत नाही, असेही विद्यापीठ अनुदान आयोगाने म्हटले होते. विविध बोर्डांनी परीक्षा रद्द केल्याचा दाखला याचिकाकर्त्यांनी दिला आहे. मात्र, अंतिम वर्षाच्या परीक्षा या विद्यार्थ्यांचे करिअर घडवण्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाच्या असतात. या परीक्षांच्या आधारेच ते विविध क्षेत्रांत विशेष ज्ञान प्राप्त करतात. या परीक्षा विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेत उतरण्यासाठी आत्मविश्वास देतात. त्यामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे गरजेचे असून सीबीएसई, आयसीएसई परीक्षांची तुलना त्यांच्याशी केली जाऊ शकत नाही, असा युक्तिवाद आयोगाने केला होता.

Pune Edition
Aug 29, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

### अंतिम वर्ष परीक्षा होणारच

**(पान १ वरून...)** अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने ६ जुलै रोजी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या होत्या. परीक्षा ऑनलाईन, ऑफलाईन किंवा संमिश्र पद्धतीने घेण्याची मुभा आयोगाने दिली होती. या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत पूर्ण कराव्यात, अशी सूचना आयोगाने विद्यापीठांना केली होती. मात्र न्यायालयाच्या निर्णयामुळे परीक्षा लांबणीवर टाकण्याचा पर्याय उपलब्ध झाला आहे. यूजीसीच्या निर्देशांना आव्हान देणाऱ्या याचिका महाराष्ट्र, प. बंगाल, दिल्ली, ओडिशा सरकारने दाखल केल्या होत्या. युवा सेनेसह काही विद्यार्थ्यांनीदेखील सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी करताना न्यायालयाने आयोगाला आपली बाजू मांडणारे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आयोगाने प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षा घ्यायलाच हव्यात, अशी ठाम भूमिका मांडताना त्याची कारणेही आयोगाने स्पष्ट केली होती. अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याची राज्य सरकारांची भूमिका ही उच्च शिक्षणाच्या दर्जाला घातक असल्याची भूमिका यूजीसीने सर्वोच्च न्यायालयात मांडली होती.

Pune Edition
Aug 29, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# 'सीईटी' घेण्याच्या हालचाली सुरू

### उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'राज्यात व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा (सीईटी) तालुकास्तरावर घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. तज्ज्ञ समितीचा अहवाल आला की, सीईटी घेण्याबाबत निर्णय जाहीर करण्यात येईल,' अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी दिली. शैक्षणिक कागदपत्रे उपलब्ध नसल्याच्या कारणावरून एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, असे आश्वासन सामंत यांनी दिले.

सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना परीक्षेशिवाय पदवी देता येणार नाही, असा निर्णय दिल्यानंतर राज्य सरकारने परीक्षा घेण्याच्या दृष्टीने सुरुवात केली आहे. त्यानुसार राज्यातील विद्यार्थी-पालकांमध्ये सीईटीबाबत उत्सुकता निर्माण झाली असून, सीईटी कधी होणार याकडे आता लक्ष लागले आहे. राज्यात इंजिनीअरिंग, फार्मसी, लॉ, हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, बीएड अशा अनेक अभ्यासक्रमांच्या सीईटी परीक्षा होणे बाकी असून, त्यासाठी सात लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी परीक्षेची वाट पाहत आहे.

### 'कागदपत्रांसाठी मुदतवाढ'

डिप्लोमाच्या प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना अर्ज करताना, शैक्षणिक कागदपत्रे आणि दाखले जमा करण्यात अडचणी येत असतील, तर त्यांना मुदतवाढ मिळेल. शैक्षणिक कागदपत्रे नाहीत म्हणून राज्यात विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात येणार नाही, याची काळजी उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून घेण्यात येईल, अशी माहिती सामंत यांनी दिली. दरम्यान, डिप्लोमा प्रवेश प्रक्रियेला; तसेच कागदपत्रे जमा करायला मुदतवाढ मिळण्याची शक्यता आहे.




याबाबत सामंत म्हणाले की, करोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता, जिल्हास्तरावर; तसेच तालुकास्तरावर सीईटी परीक्षा घेण्याबाबत उच्चशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. धनराज माने आणि तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. अभय वाघ यांची समिती पडताळणी करीत आहे. त्यांनी तालुकास्तरावर सीईटी घेण्याबाबत चाचपणी सुरू केली आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत, त्याचा अहवाल आल्यावर सीईटीबाबत घोषणा करता येईल, असेही सामंत यांनी स्पष्ट केले. अंतिम वर्षाच्या परीक्षा होत असतील, तर सीईटी परीक्षा घ्यायला काय हरकत आहे, अशी भूमिका काही पालकांनी मांडली आहे.

**Maharashtra Times:29.8.2020**

pune.mtonline.in

# प्रॉक्टर्ड मेथडने परीक्षेचा पर्याय

## 'यूजीसी'च्या मार्गदर्शनानुसार परीक्षा घेणार असल्याची कुलगुरूंची माहिती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने प्रॉक्टर्ड मेथडने घेण्याचा पहिला पर्याय विद्यापीठासमोर आहे. या पर्यायासोबतच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शनानुसार (यूजीसी) परीक्षा घेण्याच्या इतर पर्यायांचा विचार करण्यात येईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी शुक्रवारी दिली.

सर्वोच्च न्यायालयाने यूजीसी मार्गदर्शक सूचनांनुसार अंतिम वर्ष परीक्षा घेण्याचा निर्णय शुक्रवारी दिला. या पार्श्वभूमीवर, विद्यापीठाच्या नियोजनाची माहिती डॉ. करमळकर यांनी दिली.

विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासंदर्भातील ठराव परीक्षा मंडळाच्या बैठकीत या पूर्वीच झाला आहे. त्यामुळे आता स्वतंत्र ठराव करण्याची गरज नाही. केवळ परीक्षेचे माध्यम आणि वेळ ठरवावी लागेल. चार ते पाच महिने गेल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ दिला जाईल. त्यानंतर परीक्षा आयोजित केल्या जातील. प्रॉक्टर्ड पद्धतीने ऑनलाइन प्रवेश परीक्षा यशस्वीरीत्या घेण्यात आली. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. सुमारे १ हजार ३०० विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली; तसेच साधारण ३१ हजार विद्यार्थ्यांची पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षाही या पद्धतीने होणार आहे. त्यासाठी 'मॉक टेस्ट' घेण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ८७ टक्के महाविद्यालयांनी अशी पद्धतीने परीक्षा घेण्याला पाठिंबा दिला आहे.

### 'प्रॉक्टर्ड मेथड' म्हणजे काय?



प्रॉक्टर्ड मेथड टेस्टमध्ये मोबाइल, लॅपटॉप, कम्प्युटर, टॅब अशा गॅजेटच्या स्क्रीनसमोर परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हालचालींवर बारीक लक्ष देण्यात येते. एखादा विद्यार्थी परीक्षेदरम्यान गैरप्रकारांचा वापर करून किंवा संशयास्पद हालचाली करून परीक्षा देत असल्यास त्याला समज देण्यात येते; तरीही विद्यार्थ्याने न ऐकल्यास त्याला परीक्षेतून 'डीबार' करता येते. आयआयटी आणि केंद्रीय विद्यापीठांमध्ये या प्रणालीचा वापर करण्यात येत असून, आता खासगी विद्यापीठाकडूनही वापर होत आहे.

> सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आणि राज्य सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार परीक्षेचे नियोजन करण्यात येईल. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ दिला जाईल. विद्यापीठाने प्रॉक्टर्ड पद्धतीचा वापर करून प्रवेश परीक्षा ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरीत्या घेतल्या आहेत. त्यामुळे वेगवेगळे पर्याय विचारात घेऊन परीक्षेचे नियोजन केले जाईल. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा संपूर्ण विचार करून, सुरक्षित अंतराचे नियम पाळून परीक्षा होतील.
>
> \- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Maharashtra Times: 29.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# पदवी परीक्षा होणारच

## 'यूजीसी'च्या निर्णयावर सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब

**म. टा. विशेष प्रतिनिधी**, नवी दिल्ली

'राज्यांना परीक्षा रद्द करण्याचा अधिकार आहे; पण विद्यार्थ्यांना परीक्षेशिवाय उत्तीर्ण करता येणार नाही,' असे स्पष्ट करून 'महाविद्यालयांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत घेण्यात याव्यात,' असा निकाल शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने दिला. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) सहा जुलै रोजी काढलेले मार्गदर्शक सूचनांचे परिपत्रक न्यायालयाने रास्त ठरविले.

'हे विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रकरण आहे. पदवी परीक्षा रद्द करून विद्यार्थ्यांना उत्तीर्ण केल्याने देशाच्या उच्च शिक्षणाच्या दर्जावर परिणाम होईल,' असे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अशोक भूषण, न्या. आर. सुभाष रेड्डी आणि न्या. एम. आर. शहा यांच्या पीठाने हा निकाल देताना स्पष्ट केले.

महाराष्ट्र आणि दिल्लीसह काही राज्यांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावर, 'विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाची परीक्षा ३० सप्टेंबरपूर्वी द्यावी लागेल. आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत राज्यांना 'यूजीसी'शी चर्चा करून या परीक्षांची मुदत लांबणीवर टाकता येईल. करोना संकटामुळे परीक्षांचे आयोजन करता येत नसेल, तर राज्यांना आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत परीक्षांची अंतिम मुदत पुढे ढकलण्याविषयी निर्णय घेता येईल. पण परीक्षा घ्याव्याच लागतील. स्थानिक पातळीवर करोना संसर्गाची स्थिती विचारात घेऊन ३० सप्टेंबरपूर्वी परीक्षा घेणे शक्य नाही, हे राज्यांना 'यूजीसी'ला सांगावे लागेल,' असे न्यायालयाने निकालात नमूद केले आहे.

विद्यापीठ तसेच इतर उच्च शैक्षणिक संस्थांमधील अंतिम वर्ष किंवा सेमिस्टरच्या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत करण्याच्या 'यूजीसी'च्या मार्गदर्शक सूचनांना आव्हान देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तसेच महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, दिल्ली आणि ओडिशा सरकारांच्या याचिकांवर सुनावणी पूर्ण करून सर्वोच्च न्यायालयाने १८ ऑगस्ट रोजी निकाल राखून ठेवला होता. अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा राज्यांचा निर्णय कायद्याच्या विरोधात असल्याचा दावा विद्यापीठ अनुदान आयोगाने केला होता. तर, अंतर्गत मूल्यांकनाच्या आधारावर किंवा आदल्या वर्षातील कामगिरीच्या आधारे अंतिम वर्षात उत्तीर्ण करण्याची मागणी विद्यार्थ्यांनी याचिकेत केली होती.

### 'कुलगुरूंचेही हेच मत होते'

**मुंबई** : 'सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्षाच्या परीक्षांसंदर्भात निकाल दिला आहे, त्यात विनापरीक्षा पदवी देता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट सांगितले आहे. परीक्षांसंदर्भात देशभरातील कुलगुरूंचे तेच मत होते आणि महाराष्ट्रातील कुलगुरूंच्या समितीचेही तेच मत होते,' अशी प्रतिक्रिया विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

### 'विद्यार्थ्यांची काळजी घेऊन निर्णय घेऊ'

**मुंबई** : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आम्ही आदर करतो. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची पूर्णपणे काळजी घेऊन राज्य सरकार अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत निर्णय घेईल,' असे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी शुक्रवारी सांगितले. 'सर्व अकृषी विद्यापीठांना प्रत्यक्ष भेट देऊन कुलगुरू, जिल्हाधिकारी आणि स्थानिक प्रशासन यांच्याशी सविस्तर चर्चा करून परीक्षेचे नियोजन करण्यात येईल,' असे सामंत म्हणाले.

◂◂ संबंधित वृत्त...II

### न्यायालय म्हणाले...

- विद्यार्थ्यांना परीक्षेशिवाय उत्तीर्ण करता येणार नाही
- देशाच्या उच्च शिक्षणाच्या दर्जावर परिणाम होईल
- अंतिम वर्षाच्या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत घ्याव्यात



**Maharashtra Times: 29.8.2020**

# अंतिम वर्षाच्या परीक्षा घ्याव्याच लागणार

**पुणे** : सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घ्याव्याच लागणार आहेत. याबाबत राज्य शासनाकडून मार्गदर्शक सूचना येणे बाकी आहे. परंतु, विद्यापीठाकडून ऑनलाइन परीक्षा घेण्याचा पहिला पर्याय आहे. यासह अन्य पर्यायांचा विचार करून येत्या दीड ते दोन महिन्यांमध्ये विद्यार्थ्यांची अंतिम वर्षाची परीक्षा घेतली जाणार आहे, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी शुक्रवारी दिली.

डॉ. करमळकर म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान मंडाळाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंतिम वर्षाची परीक्षा घेण्याचा निर्णय शुक्रवारी दिला. या पार्श्वभूमीवर विविध पर्यायांचा विचार करणार आहे. परीक्षा घेण्यासंदर्भातील ठराव परीक्षा मंडळाच्या बैठकीत यापूर्वीच झालेला आहे. त्यामुळे आता स्वतंत्र ठराव करण्याची गरज नाही. केवळ परीक्षेचे माध्यम आणि वेळ ठरवावी लागेल. चार ते पाच महिने गेल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ दिला जाईल. त्यानंतर परीक्षा आयोजित केल्या जातील. विद्यापीठाने नुकताच प्रवेश परीक्षांसाठी प्रॉक्टर्ड पद्धतीचा यशस्वी वापर विद्यापीठाने केला आहे. प्रॉक्टर्ड पद्धतीने नुकतीच १ हजार ३०० विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली. तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षाही या पद्धतीने होणार आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा परीक्षेला चांगला प्रतिसाद लाभला. त्यामुळे अंतिम वर्ष परीक्षांसाठी ऑनलाइनचा पहिला पर्याय असू शकतो. परंतु, अन्य पर्यायही विचारात घेतले जातील, असे देखील डॉ. करमळकर यांनी स्पष्ट केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे मी स्वागत करतो. आम्ही या निर्णयाचा अभ्यास करू आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षा आणि शैक्षणिक बाबी लक्षात घेऊन त्याची अंमलबजावणी निश्चित केली जाईल, तसेच महाविद्यालयांना निर्देश दिले जातील.

– **डॉ. भूषण पटवर्धन**, उपाध्यक्ष, यूजीसी

------

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार परीक्षा घेतली जाईल. मार्चपासून बराच वेळ गेला असल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ दिला जाईल. विद्यापीठाने प्रॉक्टर्ड पद्धतीचा वापर करून प्रवेश परीक्षा ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरीत्या घेतल्या आहेत. त्याचा विचार या परीक्षेसाठी केला जाईल.

– **डॉ. नितीन करमळकर**, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांची माहिती

अंतिम वर्ष परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यानंतर पदव्युत्तर प्रवेशाला वेळ लागू शकतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भिती होती.परंतु यावर देखील कुलगुरु डॉ.करमळकर यांनी तोडगा सांगितला असून जे विद्यार्थी पदवीच्या अंतीम वर्षाला आहेत. त्यांना पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी संधी देवून त्यांचे शिक्षण सुरू ठेवायचे आणि अंतीम वर्षाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर त्यांची पदव्युत्तर पदवी प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करायची. त्यामुळे एकीकडे विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहण्याबरोबरच त्यांचे शैक्षणिक वर्ष देखील वाचवण्याचा तोडगा विद्यापीठाकडून काढण्यात आला आहे.

**Kesari: 29.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# '...राजकारण हरले'

**पुणे :** विद्यार्थ्यांना परीक्षेशिवाय पदवी देता येणार नाही, या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचे शिक्षणक्षेत्रातील अभ्यासकांनी आणि तज्ज्ञांनी स्वागत केले असून, न्यायालयाने खऱ्या अर्थाने विद्यार्थीहिताचा निर्णय घेतला आहे, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

**देशातील विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय असून, त्यानुसार कार्यवाही केली जाईल. परीक्षेशी निगडित विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांच्या आरोग्याची पूर्ण काळजी घेण्यात येईल. विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे आता पुढील अंमलबजावणी करायची आहे.**

– **भूषण पटवर्धन,** उपाध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे शिक्षण जिंकले, तर त्याचे सवंग राजकारण करणारे हरले आहेत. उच्चशिक्षण व्यवस्थेत परीक्षेशिवाय पदवी नाही, हा मुद्दा आम्ही मांडण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षणव्यवस्थेला सक्षम करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल न्यायालयाचे आभारी आहोत.**

– **धनंजय कुलकर्णी,** याचिकाकर्ते व माजी सिनेट सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे परीक्षेबाबत आपत्ती व्यवस्थापन कायदा हस्तक्षेप करू शकत नाही, हे स्पष्ट झाले. विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा होणे हे विद्यार्थीहिताचे आहे.**

– **डॉ. गजानन एकबोटे,** कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

**सर्वोच्च न्यायालयाचा विद्यार्थीहिताचा निर्णय अपेक्षित होता. लेखी परीक्षा घेतल्याने महाविद्यालयांवर ताण येणार आहे, त्यामुळे तोंडी परीक्षा घेण्यावर प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे.**

– **डॉ. अरुण अडसूळ,** शिक्षणतज्ज्ञ व माजी कुलगुरू

**यूजीसी, राज्य सरकार आणि विद्यापीठाने महाविद्यालयांना परीक्षा कशा घ्याव्यात, याबाबत सूचना द्याव्यात. आम्ही परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठाच्या सोबत आहोत.**

– **ॲड. एस. के. जैन,** अध्यक्ष, नियामक मंडळ, शिप्र मंडळी

**अनिश्चितता संपून आता परीक्षा होणार, हे स्पष्ट झाल्याने परीक्षार्थी तयारीला लागले आहेत.**

– **राजेश पांडे,** व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Maharashtra Times: 29.8.2020**

# विद्यार्थ्यांचा संभ्रम दूर होईल!

## 'यूजीसी'चे उपाध्यक्ष भूषण पटवर्धन यांचे मत

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने सर्व बाजू विचारात घेऊन अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा (यूजीसी) निर्णय कायम ठेवला आहे. या निकालामुळे परीक्षेसंदर्भातील विद्यार्थ्यांचा संभ्रम दूर होईल. न्यायालयाच्या आदेशाची प्रभावी अंमलबजवणी केली जाईल, असे यूजीसीचे उपाध्यक्ष भूषण पटवर्धन यांनी सांगितले.

३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेण्याच्या यूजीसीच्या आदेशानुसार अनेक विद्यापीठांनी परीक्षा घेतल्या आहेत किंवा त्याची तयारी केली आहे. ज्या विद्यापीठांनी परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या नाहीत, त्यांनी लवकरात लवकर त्याची घोषणा करावी.

परीक्षा कशा घ्यायच्या, याबद्दल यूजीसीने मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केलेली आहेत. त्या आधारे विद्यापीठांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्याची सुरक्षा जपून परीक्षा घ्याव्यात, असेही पटवर्धन म्हणाले.

ज्या विद्यापीठांना यूजीसीने दिलेल्या मुदतीत परीक्षा घेता येणार नाहीत, त्यांना यूजीसीकडे अर्ज करता येईल. परीक्षा घेण्यात कोणत्या अडचणी आहेत, किती मुदतवाढ पाहिजे अशी तपशीलवार कारणे विद्यापीठांनी देणे अपेक्षित आहे. विद्यापीठांच्या अर्जातील कारणांची योग्यायोग्यतेचा आढावा घेऊन परीक्षांना मुदतवाढ देण्याबाबत यूजीसी विचार करेल, असेही पटवर्धन यांनी सांगितले.

**Loksatta: 29.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

## परीक्षा घेण्याची राज्य सरकारची तयारी- उदय सामंत

### प्रत्यक्ष, ऑनलाईन किंवा 'ओपन बुक'चा पर्याय

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



**मुंबई:** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करून राज्यातील विद्यापीठस्तरावरील अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्याची राज्य सरकारची तयारी आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

करोनाची परिस्थिती लक्षात घेऊन व विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उपस्थीत राहून परीक्षा द्यायची की ऑनलाईन वा ओपन बुक पद्धतीचा वापर करायचा, याबाबत राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंशी व या क्षेत्रातील तज्ज्ञांशी विचारविनिमय करून अंतिम निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना सांगितले.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) परीक्षा घेण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदत दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाने ती वाढवून घेण्याची मुभा दिली आहे. त्यानुसार ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेता येणार नाही, असे यूजीसीला कळविले जाईल व सर्व कुलगुरूंशी चर्चा करून तसेच परिस्थिती पाहून परीक्षेची तारीख ठरविण्यात येईल, असे ते म्हणाले. येत्या चार दिवसांत आपण राज्याचा दौरा करून सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंशी परीक्षा कशा घ्यायच्या याबाबत चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाचा परीक्षा घेण्याबाबतचा निर्णय जाहीर होताच, उदय सामंत यांनी पत्रकार परिषद घेऊन न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करून परीक्षा घेण्यात येतील असे जाहीर केले.

परीक्षा घेणारच नाही, अशी महाराष्ट्र शासनाची भूमिका नव्हती. करोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न विचारात घेऊन परीक्षा ऐच्छिक असावी, अशी शासनाची भूमिका होती. विद्यार्थ्यांना गुणांमध्ये, श्रेणीमध्ये सुधारणा करायची असेल तर, नंतर आम्ही परीक्षा घेणार असा शासन आदेश काढला होता. त्यानंतर युवा सेनेने परीक्षा होऊ नये, अशी भूमिका मांडली होती.

**प्रवेश परीक्षा तालुकास्तरावर**

राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा, राज्यातील विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तूकला, विधि, शिक्षणशास्त्र, कृषी यांसह विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षांचे वेळापत्रक अद्यापही प्रवेश नियमन प्राधिकरणाने जाहीर केलेले नाही. त्यामुळे विद्यार्थी संभ्रमात आहेत. याबाबत 'परीक्षा जिल्हास्तराऐवजी तालुकास्तरावर घेण्याचे नियोजन केले जात असून वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येईल,' असे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यंदा सामायिक प्रवेश परीक्षेसाठी (सीईटी) पाच लाख ३२ हजार ३६९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

" मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राज्य आपती व्यवस्थापन समिती, मंत्रिमंडळातील सर्व सदस्य यांच्याशीसुद्धा यासंदर्भात सविस्तर चर्चा करून विद्यार्थ्यांची मानसिकता लक्षात घेऊन, त्यांचे खच्चीकरण होणार नाही आणि शैक्षणिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेऊन राज्य शासन निर्णय घेईल. जिल्हाधिकारी व स्थानिक प्रशासन, तसेच प्राचार्य, प्राध्यापक, पोलीस व इतर सर्व संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून, केंद्र शासनाने करोनासंदर्भात दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे आणि नियमांचे पालन करून परीक्षा कधी व कोणत्या पद्धतीने घ्यायच्या याबाबतचे नियोजन करण्यात येईल.

- उदय सामंत,
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री

**Loksatta 29.8.2020**

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निकाल

## अंतिम वर्षाच्या परीक्षा होणारच! परीक्षेशिवाय पदवी नकोच!!

नवी दिल्ली, दि. २८ (वृत्तसंस्था) – परीक्षेशिवाय पदवी नकोच, असे सांगतानाच, अंतिम वर्षाच्या परीक्षा होणारच, असा महत्त्वपूर्ण निकाल आज सर्वोच्च न्यायालयाने दिला. अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) ६ जुलै रोजी जारी केलेली मार्गदर्शक तत्त्वे योग्यच आहेत, असे न्यायालयाने सांगितले. त्यामुळे परीक्षा होणार की नाही, असा लाखो विद्यार्थी आणि पालकांच्या मनातील संभ्रम दूर झाला आहे.

न्यायमूर्ती अशोक भूषण यांच्या अध्यक्षतेखालील न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी आणि न्यायमूर्ती एम. आर. शहा यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. 'अंतिम परीक्षा न घेता पूर्वपरीक्षांमधील गुणांच्या आधारे पदवी देणे पुरेसे नाही. राज्यांना परीक्षा रद्द करण्याचा अधिकार आहे; परंतु परीक्षेविना विद्यार्थ्यांना पदवी देता येणार नाही. मात्र, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यांना आपत्कालीन व्यवस्थापन अधिनियमनांतर्गत परीक्षेची तारीख पुढे ढकलायची असेल, तर नव्या तारखांबाबत 'यूजीसी'बरोबर चर्चा करून निर्णय घेतला जाऊ शकतो. हा विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे आणि देशातील उच्च शिक्षणाचा दर्जा कायम राखणेही महत्त्वाचे आहे, असेही खंडपीठाने सांगितले.

- अंतिम वर्षाच्या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत घेण्याचे निर्देश 'यूजीसी'ने देशातील विद्यापीठांना दिले आहेत. विविध राज्य सरकारे, विद्यार्थी आणि संघटनांनी यूजीसीच्या या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. त्यात युवासेनेच्या याचिकेचाही समावेश होता.
- सर्व याचिकांवर १८ ऑगस्ट रोजी सुनावणी झाली होती. परीक्षा रद्द करण्याचा राज्य सरकारांचा निर्णय कायद्याविरुद्ध असून, परीक्षेसंदर्भात नियम बनविण्याचा अधिकार यूजीसीला आहे, असा युक्तिवाद सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी त्यावेळी केला होता. त्यावर न्यायालयाने अंतिम निर्णय राखून ठेवला होता.



" कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यांना परीक्षेची तारीख पुढे ढकलायची असेल, तर नव्या तारखांबाबत 'यूजीसी'बरोबर चर्चा करून निर्णय घेतला जाऊ शकतो.

### चर्चा करून निर्णय घेऊ



'सर्वोच्च न्यायालयाने परीक्षेसंदर्भात दिलेल्या निर्णयाचा आम्ही आदर करतो. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राज्य आपत्तिव्यवस्थापन समिती, मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांबरोबरच या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात येईल. तसेच विद्यार्थी, पालक, सर्व कुलगुरू, जिल्हाधिकारी आणि स्थानिक प्रशासनाशी प्रत्यक्ष चर्चा करूनच परीक्षा कधी, कशा व कोणत्या पद्धतीने घ्यायच्या, याबाबत मार्ग काढू. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची संपूर्ण काळजी घेऊन परीक्षेचे नियोजन करण्यात येईल,' असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. परीक्षेसंदर्भातील कार्यपद्धतीमध्ये समाविष्ट असलेले सर्व अधिकारी-कर्मचारी, प्राचार्य, प्राध्यापक, पोलीस यांच्याशीही चर्चा करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

### विद्यार्थीहितासाठी युवासेना ठाम



'युवासेना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करते. सर्वोच्च न्यायालयाने आमचा एक महत्त्वाचा मुद्दा मान्य केला. महाराष्ट्र आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरणाचा निर्णय कायम ठेवला. 'यूजीसी'ने ३० सप्टेंबरपर्यंत डेडलाइन दिली असली, तरी परीक्षा केव्हा आणि कशा घ्यायच्या, याचा निर्णय संबंधित राज्य घेऊ शकते, असेही न्यायालयाने सांगितले आहे. विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांचे हित आणि त्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी युवासेना ठाम आहे,' असे युवासेनाप्रमुख व राज्याचे पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांनी 'ट्विटर'वर म्हटले आहे.

**Saamana: 29.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# परीक्षा घेण्याचा निर्णय योग्य

## चर्चा न करता कशा पद्धतीने घेता येतील, यावर विचार व्हावा

**शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केली अपेक्षा**

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८ - विद्यापीठ अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अतिशय योग्य आहे. आता परीक्षेवरून अन्य चर्चा न करता त्या कशा पद्धतीने घेता येतील, यादृष्टीने विचार व्हायला हवा. शासन, विद्यापीठ, संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक या सर्व घटकांनी एकत्र येत परीक्षा लवकरात लवकर व्हावी, अशी अपेक्षा शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केली.**



विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन आणि विद्यापीठ यांच्या निर्देशानुसार परीक्षा घेण्याची तयारी आहे. सर्वोच्च न्यायालयाने विद्यार्थी हिताचा निर्णय घेतला आहे. आता जास्त कालावधी न घेता राज्य सरकारने परीक्षा कधी घ्यायचा, याचा निर्णय लवकरात लवकर घ्यावा, हीच अपेक्षा.

- ॲड. एस. के. जैन, अध्यक्ष 'शिप्रमं'च्या नियामक मंडळ



सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय विद्यार्थी हिताचा आहे. तो विद्यार्थ्यांना फायदेशीर ठरणार आहे. परीक्षा होणार असल्याने विद्यार्थ्यांच्या पदवीला आता किंमत राहील. पूर्वीपासून पदवी परीक्षा व्हायला हवी, ही मागणी होती. आता परीक्षा लवकरच घेणे आवश्यक आहे.

- डॉ. गजानन एकबोटे, कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी



परीक्षेशिवाय पदवी देणे अशैक्षणिक ठरले असते, ही आमची भूमिका होती. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. परीक्षा घ्यायलाच हवी, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने अशैक्षणिक निर्णयाचा पराभव झाला. या निर्णयाने परीक्षांचे राजकारण करणाऱ्यांचाही पराभव झाला आहे.

- धनंजय कुलकर्णी, याचिकाकर्ते



कोण जिंकल, कोण हरल याची चर्चा करण्यापेक्षा परीक्षांची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आता शासनाने विद्यापीठांशी चर्चा करून परीक्षांबाबत निर्णय घ्यावा. आम्ही ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यास तयार आहोत. एकमेकांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून परीक्षा घेता येतील.

- डॉ. शरद कुंटे, अध्यक्ष, डेक्कन एज्युकेशन सोसायटी



या निकालाचे स्वागत आहे. परीक्षेला न बसता पदवी देणे हे अजिबात योग्य नव्हते. नवीन पिढीचे भवितव्य अंधारात जाण्यापासून वाचले आहे. या विद्यार्थ्यांवर कोविड बॅच म्हणून शिक्का बसला असता. परीक्षा पुढे ढकलल्या तरी चालतील पण रद्द करू नयेत, हे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा विचार करून परीक्षा घेतल्या जातील.

- डॉ. शां. ब. मुजूमदार, संस्थापक, सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठ

**Prabhat: 29.8.2020**

# परीक्षा होणारच!

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

**नवी दिल्ली, दि. २८ - ३० सप्टेंबरपूर्वी अंतिम वर्षाच्या परीक्षा घेतल्याशिवाय राज्य आणि विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना पुढे ढकलू नये, असे सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट केले. विद्यापीठ अनुदान आयोगाचा परीक्षा घेण्याचा निर्णय योग्य ठरवत न्या. अशोक भूषण यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने कोणत्याही राज्याला आयोगाच्या मुदतीत परीक्षा घेणे शक्य नसल्यास नव्या तारखांसाठी आयोगाशी संपर्क साधावा, असे स्पष्ट केले.**



करोनाच्या साथीच्या काळात परीक्षा घेण्याच्या आयोगाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात आदित्य ठाकरे यांच्या युवा सेनेसह अनेकांनी याचिका दाखल केली होती. सहा जुलै रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने जारी केलेली आचारसंहिता तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार बनवली आहे. त्यामुळे परीक्षा घेणे शक्य नसल्याचे म्हणणे अयोग्य असल्याचे आयोगाने यापूर्वी स्पष्ट केले होते.

महाराष्ट्र आणि दिल्ली सरकारने परीक्षा घेण्यास विरोध दर्शवला होता. यामुळे उच्च शिक्षणाच्या दर्जावर परिणाम होईल, अशी भीती आयोगाने व्यक्त केली होती. तसेच हा उच्च शिक्षणाचा दर्जा ही बाब घटनेच्या सातव्या परिशिष्टानुसार पूर्णतः केंद्राच्या अखत्यारीतील बाब आहे. त्यावर राज्य सरकारांनी केलेले हे अतिक्रमण आहे, अशी भूमिका आयोगाने मांडली होती.

**मुलांना फायदाच...**

अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचा मुलांना फायदा होणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. देशभरातील कुलगुरूंनी परीक्षा घ्यावी, असेच मत व्यक्त केले होते.तसेच याप्रकरणी राज्यशासनाने नेमलेल्या समितीनेही परीक्षा घेण्याचा आग्रह धरला होता. मात्र, केवळ युवा सेनेच्या आग्रहाखातर सरकार एकतर्फी निर्णय घेत होते. या निर्णयाचा मुलांच्या भवितव्यावर परिणाम झाला असता तसेच भविष्यात मुलांची पदवी काहीच कामाची राहिली नसती त्यामुळे या निर्णयाचा मुलांना फायदाच होईल.

**Prabhat: 29.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# विद्यार्थ्यांनो, अभ्यास सुरू कराच!



प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८ - विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने अखेर दिला. आता विद्यापीठांना परीक्षा घ्याव्या लागतील. विद्यार्थ्यांना परीक्षेपासून सुटका मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले. सध्याची करोनाची परिस्थिती पाहता राज्यात अंतिम वर्षाची परीक्षा सप्टेंबरनंतर होतील, असे चिन्हे आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनो, आता मागील घटनेचा विचार न करता 'पॉझिटिव्ह'पणे पुन्हा परीक्षेची तयारी करावी लागणार आहे.**

अंतिम वर्षाच्या परीक्षेवरून महाराष्ट्रासह सात राज्यांनी न्यायालयात धाव घेतली. करोनामुळे तूर्तास परीक्षा घेणे शक्य नाही, असे सांगत ही परीक्षा रद्द करण्यासाठी याचिका दाखल केली. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी परीक्षा न घेता विद्यार्थ्यांना उत्तीर्ण करणे योग्य नसल्याचे सांगत परीक्षा घेण्याचे निर्देश दिले. राज्यातील करोना स्थितीचा विचार करून परीक्षेसाठी मुदत वाढवून देण्यासाठी 'यूजीसी'कडे मागणी करता येणार आहे. 'यूजीसी'ने दिलेल्या ३० सप्टेंबरपर्यंतच्या कालावधीत महाराष्ट्रात परीक्षा घेणे शक्य नाही. त्यामुळे सप्टेंबरनंतर केव्हाही परीक्षा होतील. त्याचा विचार करून विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी मानसिक तयारी करणे क्रमप्राप्त ठरणार आहे.

अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्यासंदर्भात दोन मतप्रवाह होते. परीक्षा न घेता विद्यार्थ्यांना 'प्रमोट' करणे ही योग्य बाब नसून, परीक्षा घेतलेच पाहिजे, असे काही शिक्षणतज्ज्ञांचे म्हणणे होते. याउलट काही अपवाद वगळता बहुतांश विद्यार्थी संघटनांनी परीक्षा रद्द झाली पाहिजे, अशी भूमिका

### अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार

मांडली होती. यात राजकारणाचा प्रवेश झाला. त्यामुळे हा विषय न्यायालयापर्यंत गेला. अखेर न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी करणे सर्वांना बंधनकारक आहे.

### कुणी विश्वासात घेतलं नाही...

गेल्या तीन-चार महिन्यांत परीक्षेच्या विषयावर होणाऱ्या राजकारणावरून विद्यार्थ्यांमध्ये नाराजी होती. या कालावधीत विद्यार्थ्यांची काय मानसिकता आहे, याचा कोणीच विचार केला नाही. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून काहीच निर्णय न घेता तो विषय प्रतिष्ठेचा बनला. गेल्या चार महिन्यांपासून विद्यार्थी संभ्रमावस्थेत आहे. कोणी जिंकला, हरला हा प्रश्न महत्त्वाचा नसून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक करिअरकडे किती गांभीर्याने पाहिले जाते, हेच यातून स्पष्ट होत आहे. या प्रश्नांत विद्यार्थ्यांना विश्वासात न घेतल्याची भावना विद्यार्थ्यांतून व्यक्त होत आहे.

**Prabhat: 29.8.2020**

# विद्यार्थ्यांना वेळ देत परीक्षांचे नियोजन : कुलगुरू

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २८** - सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा घेतल्या जातील.



यासाठी किमान दीड महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. विशेषतः ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेण्यास प्राधान्य राहील. मात्र, अन्य पर्याय विचारात घेऊन नियोजन केले जाणार आहे, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंतिम वर्ष परीक्षा घेण्याचा निर्णय शुक्रवारी दिला. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या नियोजनाची माहिती डॉ. करमळकर यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. न्यायालयाने निर्णय दिला असला तरी विद्यापीठाची परीक्षेची यापूर्वीच तयारी केली. कुलगुरू डॉ. करमळकर म्हणाले, परीक्षा घेण्यासंदर्भातील ठराव परीक्षा मंडळाच्या बैठकीत या पूर्वीच झाला आहे. त्यामुळे आता स्वतंत्र ठरावाची गरज नाही.

### तीन जिल्ह्यांत सव्वादोन लाख परीक्षार्थी

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. ती देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमध्ये एकूण २ लाख १४ हजार १३४ इतकी आहे. या सर्व विद्यार्थ्यांना आता परीक्षा द्यावी लागणार आहे.

केवळ परीक्षेचे माध्यम आणि वेळ ठरवावी लागेल. चार ते पाच महिने गेल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ दिला जाईल. त्यानंतर परीक्षा आयोजित केल्या जातील. पदवी व पदव्युत्तर प्रवेशासाठी प्रॉक्टर्ड पद्धतीने ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेण्यात आली. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षाही या पद्धतीने होणार आहे. प्रवेश परीक्षा दिलेल्यांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या मोठी होती. त्यामुळे अंतिम वर्ष परीक्षांसाठी ऑनलाइनचा पहिला पर्याय असू शकतो. पण अन्य पर्यायही विचारात घेतले जातील, असे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

**Prabhat: 29.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

# SPPU keen to go online as apex court okays final-year exams

**Varsity is convinced virtual mode can be deployed after choosing to use it for its entrance tests**

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

With Supreme Court ruling in favour of universities holding their final-year examinations on Friday, the state government's higher and technical education department has now initiated the process of figuring out the feasibility of conducting the exams, which will be taken by approximately eight lakh students. Savithribai Phule Pune Universtity (SPPU), however, has shown preference to holding the exams online.

On Friday, the state's higher and technical education minister, Uday Samant announced that he will be visiting all the public varsities in the state and talking to their vice chancellors on the modes in which the final exams can be held. "Accepting the Supreme Court's decision, we will take the process forward now and based on each university's need and available resources, we expect the vice chancellors to give us a detailed plan on how they can conduct the examinations," he said.

Speaking to *Mirror*, SPPU's vice chancellor, Nitin Karmalkar, pointed out, "As we've already planned to hold our entrance examinations online, the same mode would be preferred to be used for the final examinations too. As we did for the entrance exams, a survey can be conducted to understand students' access to online medium, given that online education is the way forward."

FILE PHOTO



**SPPU may hold survey to understand students' access to online medium and technology**

He added that over 30,000 students had enrolled for the entrance exams to the university's graduate and postgraduate courses. "Our survey found that 85 per cent of the students who had enrolled could access internet, with most of them from urban areas. It was, therefore, found that they could appear for online examinations, deploying multiple-choice questions and such mechanisms," he explained.

He also informed that work on conducting the final examinations had already begun by the university in keeping with the guidelines set by the University Grants Commission (UGC) and the matter was also discussed at length by the Board of Studies and the Board of Examination during their committee meetings.

It may be recalled that while UGC gave the go-ahead for holding final examinations using different modes such as open book, online, pen and paper and oral, Shiv Sena's youth wing, Yuva Sena, had challenged the order in Supreme Court, seeking it be quashed in the light of the COVID-19 situation in the country. With the apex court holding up the UGC order, the exams can be conducted until September 30, as per the guidelines. However, should the situation not permit meeting this deadline, universities can seek a postponement from UGC.

Samant assured that students will be given ample time to prepare and the decision on the scheduling and medium of examination will be decided after his discussion with the vice chancellors. "We will also explore if differed rules can be applied to different varsities," he added.

Clearly still trepidatious about attending the examinations while the pandemic is around, Kamalakar Shete, a final-year student from SPPU's commerce department observed, "While the verdict has been given for the examinations, we do not know the situation under which we will have to sit for them. Either way, students will have to suffer the consequences."

29 Aug 2020 Pune Mirror

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

29/8/2020

TIMES CITY | PUNE

# Final-year exam plan next week, ample study time: Edu minister

## Maha May Seek Extension Of September 30 Date From UGC

Swati Shinde Gole & Ardhra Nair | TNN

**Pune:** Higher and technical education minister Uday Samant on Friday said a plan of action to conduct final-year exams is being discussed by vice-chancellors and it will be announced early next week.

Samant said students will be given enough time for preparations as their careers were at stake. He also said the mode of examination will be decided once the VCs meet. "We will not waste much time on announcing the exam details and by next week, the students will get to know the plan," he added.

He was speaking at a news conference on Friday following the Supreme Court's order to conduct final year exams as per the guidelines set by the University Grants Commission (UGC).

"The state government respects the court's order. We began preparations to conduct the exams as soon as the order came. We will discuss with the vice-chancellors on the ways to conduct them and the other modalities. I will personally visit the universities in the state and discuss the action plan with the VCs," he said.

MISSION ADMISSION

The decision brings to a close several months of uncertainity for students in the final year.

Samant said the government was not going to announce the exam dates immediately or be in any hurry to conduct them.

"We may review the situation, and if required, request UGC to extend the date beyond September 30 for the exams," he said.

There are nearly eight to nine lakh students in the final year across Maharashtra.

On the common entrance test (CET) for professional courses, Samant said the department was finalising the exam centres at the taluka and division level.

"All education officials are working on the securing the exam centres and once they are clear about it, we will tell students the exact time-frame of the exams," he added.

## LOOKING AHEAD



"I welcome the Supreme Court's decision. We will study the judgment and ensure its implementation in view of the larger interests of students, health, safety and academic aspects" — **Bhushan Patwardhan** | UGC VICE CHAIRMAN

"We will conduct a meeting with the board of examination members to decide how to conduct the examination. We will check whether to go for online, offline or a blended mode. We have contacted the state government. There is a detailed plan to conduct the examination safely. It has been ratified by the university bodies such as the academic council" — **Nitin Karmalkar** | SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY VICE CHANCELLOR

"It is important to uphold the UGC guidelines for academic standards. Universities and colleges can work with parents and students seeking their suggestions to conduct the exams. We conducted the final year examinations at FLAME University via online mode and ensured timely graduation of our students" — **Dishan Kamdar** | FLAME UNIVERSITY VICE CHANCELLOR

"Since there is a common examination, there won't be discrimination among students who appeared for the examination and got a degree and others who got promoted. This will also ensure that when students go to foreign universities, they are treated at par with the others. With clarity on examination, the cycle of admissions will be on time and students will pay the fees on time to help the institute. Utmost care will be taken to ensure that all protocols are followed during the examination" — **Eknath Khedkar** | AJEENKYA DY PATIL UNIVERSITY VICE PRESIDENT



"I welcome the SC's order. We have about 7,000 students and will conduct the examinations in a phased, online proctored manner. Wherever the student has a problem with the internet or any other such problem, we will allow a pen-and-paper mode" —**Manikrao Salunkhe** | BHARATI VIDYAPEETH VICE CHANCELLOR

## Online, offline & blended modes for SPPU pupils

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Savitribai Phule Pune University is ready to conduct examinations for over 2 lakh students studying in various final year courses.

It is among the largest universities in the country with over 700 affiliated colleges, 234 recognised institutes and 71 research institutes under its wing.

The examination would be held in a blended mode, online examination for some professional courses and offline examination for the others.

Students need not come to the laboratory for all practicals, they may be told to conduct seminars or submit assignments instead, N S Umrani, pro-vice chancellor, Savitribai Phule Pune University, said.

The university had decided in May that for both professional and non-professional courses, each examination would be of 50 marks, and the exam duration would be for one and half hours.

"The university is prepared to conduct examinations. We would call students in a staggered way in multiple sessions. We have a detailed plan passed by the academic council. The exams will be conducted after approval from the collector, probably after October 15, or when the situation improves," Mahesh Kakade, director board of examination and evaluation, said.

## States can fix new schedule for tests after consulting UGC

▶Continued from Page 1

The SC said UGC guidelines had taken the pandemic situation into account and had given three options to universities for conducting final examinations — offline, online and a mix of both. There was nothing unreasonable about the guidelines as it also provided another opportunity to students, who, for some reason, may miss the final examinations, it said.

Maharashtra has decided to cancel final-year examinations, citing rising Covid-19 cases. It found support from West Bengal and Delhi, who termed the UGC guidelines an advisory and not mandatory. Shiv Sena's youth wing 'Yuva Sena' had moved the SC challenging UGC's guidelines.

Disagreeing with their stand, a bench of Justices Ashok Bhushan, R S Reddy and M R Shah said states and universities had no power to "promote students in the final year or terminal semester" without holding final examinations. It said UGC was the sole authority to take a decision.

"Decision of the state or State Disaster Management Authority (SDMA) to promote students in the final year/terminal semester on the basis of previous performance and internal assessment being beyond the jurisdiction of Disaster Management Act, 2005, has to give way to the UGC's July 6 guidelines directing to hold examination of final year/terminal semester," it said. However, the court said if the state or SDMA has decided that it cannot hold examinations by September 30, then the state shall approach UGC for fixing a new schedule for final examination for UG and PG courses. "We grant liberty to such state/Union Territory to make an application to the UGC for extending the September 30 deadline for that state/UT which shall be considered by UGC and rescheduled date be communicated to such state/UT at the earliest," the bench said. Writing the 160-page judgment, Justice Bhushan said, "UGC's July 6 guidelines have to be treated to have been issued in exercise of the statutory powers vested in the commission under Section 12 (of the UGC Act, 1956). As per the Statutory Regulations, 2003, it is the statutory duty of universities to adopt the guidelines issued by the UGC. The July 6 guidelines cannot be ignored by terming it as non-statutory or advisory."

Fear Of Pandemic Seems T

**The Times of India: 29.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

## अकरावी प्रवेशाची गुणवत्ता यादी आज

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी रविवारी (दि.३०) प्रसिद्ध होणार आहे. त्यामुळे गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या महाविद्यालयांच्या पसंतीक्रमानुसार त्यांना प्रवेश मिळणार आहे. परिणामी आपल्याला

कोणत्या महाविद्यालयात प्रवेश मिळणार याबाबत विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता आहे.

पुणे विभागीय शिक्षण उप संचालक कार्यालय आणि इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेश समितीतर्फे पुणे व पिंपरी चिंचवड पालिका परिसरातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयातील १ लाख ६ हजार ९७२ जागांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे.त्यातील ७२ हजार ८२० विद्यार्थ्यांनी नियोजित वेळेत प्रवेश अर्जातील दुसरा भाग भरला.अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांची सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिध्द करून त्यावरील तक्रारी स्वीकारल्या तसेच सर्व तक्रारी निकाली काढल्या.आता विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी प्रसिध्द होणार आहे.

गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा दहावीचा निकाल चांगलाच वाढला आहे.त्यामुळे यंदा अकरावी प्रवेशाचा कट ऑफ वाढणार आहे. परिणामी शहरातील नामांकित महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी अर्ज केल्या आणि कमी टक्के असणाऱ्या विद्यार्थ्यांना इतर महाविद्यालयांमधील प्रवेशावर समाधान मानावे लागेल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

Hello Pune
Page No. 1 Aug 30, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

## सप्टेंबरपासून नववी ते बारावीच्या शाळा सुरु होण्यावर प्रश्नचिन्ह

### शिक्षकांच्या मार्गदर्शनासाठी विद्यार्थी शाळेत येऊ शकतात

**मुंबई** : केंद्र सरकारकडून अनलॉक ४ च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये २१ सप्टेंबरपासून शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या ५० टक्के उपस्थितीला परवानगी आहे तसेच ९ वी ते १२ वीचे विद्यार्थी शिक्षकांकडे मार्गदर्शनासाठी येऊ शकतील. मात्र, शाळा सुरु होण्यावर शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांनी अनिश्चितता व्यक्त केली आहे. त्यामुळे सप्टेंबरमध्ये पहिली ते आठवीच्या शाळा सुरु होणार नाहीत. नववी ते बारावीचे वर्ग सुरु होणार का, यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याची सुरक्षा लक्षात घेऊन ऑनलाइन शिक्षणाचा पर्यायच सुरु राहील, असे सोळंकी यांनी स्पष्ट केले. केंद्राच्या सूचनांप्रमाणे कंटेनमेंट झोन वगळता इतर क्षेत्रात २१ सप्टेंबरपासून ५० टक्के शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शाळांमध्ये ऑनलाइन शिक्षण, समुपदेशन अशा कामांसाठी बोलावण्याची सोय असेल. सध्यस्थितीत राज्यातील शाळांच्या शिक्षकांना आवश्यकता असेल तरच, पर्यायी पद्धतीने शाळांमध्ये बोलाविले जावे अशाच सूचना देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांना पालकांची लिखित परवानगी असेल तरच शाळांमध्ये शिक्षकांच्या मार्गदर्शनासाठी येता येईल असे मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद आहे. त्यामुळे तुर्तास राज्यातील शाळा उघडणार नाहीत, असे स्पष्ट होत आहे.

#### छोटे प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरु करता येणार

उच्च शिक्षण संस्थांबाबतीत राज्यातील पीएचडी आणि पदव्युत्तर विद्यार्थ्यांना ज्यांना संशोधनाची प्रयोगशाळा वापरायची आवश्यकता आहे त्यांना राज्यातील उच्च शिक्षण संस्थांची परवानगी आवश्यक असेल. तसेच केंद्रीय कौशल्य विकास विभागाशी निगडित छोटे प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरु करता येतील.

Pune Main
Page No. 3 Aug 30, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

# अंतिम वर्षाच्या परीक्षेसंबंधी कुलगुरुंची समिती स्थापन

## उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती; अहवालानुसार निर्णय घेणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भात शनिवारी १३ अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंसोबत उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी बैठक घेतली. बैठकीत ६ कुलगुरुंची समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती ३० ऑगस्ट दुपारी ११ वाजेपर्यंत बैठक घेऊन त्यानंतर अहवाल सादर करणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

विद्यार्थ्यांना कोणत्याही मानसिक त्रासाला सामोरे जावे लागणार नाही, याची विशेष काळजी घेऊन सहज, आणि सुलभ पद्धतीने अंतिम वर्षाच्या परीक्षा कशा आणि कधी घेता येतील यासाठी ही समिती गठीत करण्यात आल्याचे सामंत यांनी सांगितले. विद्यार्थी हित लक्षात घेऊन एकाही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेऊन विद्यापीठांनी एका समान पद्धतीने परीक्षा कशा घेता येतील याचे नियोजन करावे तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक सूचनांनुसार दिनांक ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेणे शक्य आहे का? याबद्दलही विचार करावा, अशा सूचना शनिवारी झालेल्या या ऑनलाइन बैठकीत उदय सामंत यांनी दिल्या.

विद्यापीठ आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत पार पाडाव्या लागणार आहेत. ही मुदत पाळणे शक्य होणार नसेल तर ती मुदत वाढवून घेण्यासाठी सरकार यूजीसीकडे विनंतीअर्ज करु शकेल, अशी मुभा कोर्टाने दिली.

### राज्यपालांशीही चर्चा करणार



बैठकीत गोवा, दिल्ली, मध्य प्रदेश, बनारस विद्यापीठ यांनी कशा पद्धतीने तेथील परीक्षा घेतल्या आहेत, याचाही सविस्तर आढावा घेण्यात आला. समितीने अहवाल सादर केल्यानंतर त्याच्यावर निर्णय घेऊन राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली जाईल, आणि मगच निर्णय जाहीर केला जाणार असल्याचे सामंत यांनी स्पष्ट केले.

### राज्यातील विद्यापीठे होत आहेत सज्ज!

मुंबई : सुप्रीम कोर्टाने अंतिम वर्षाच्या परीक्षा होणारच, यावर शिक्कामोर्तब केले आहे. मात्र, अपुऱ्या सोयी-सुविधा, मनुष्यबळ, इंटरनेट कनेक्टिव्हिटी यामुळे विद्यापीठ प्रशासनाला कोविड काळात परीक्षा नियोजनात अडचणी येणार आहेत. मात्र आता परीक्षा घेण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी त्यादृष्टीने तयारी सुरु केली आहे. राज्यातील विविध विद्यापीठांच्या अधिकारी, कुलसचिव व समन्वयकांशी बोलून विद्यापीठांची परीक्षांसाठी काय तयारी आहे, याचा 'लोकमत'ने घेतलेला आढावा. - वृत्त/१०

Pune Main
Page No. 1 Aug 30, 2020
Powered by: erelego.com

# परीक्षांबाबत कुलगुरू समितीची आज बैठक

## अहवालानंतर राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून निर्णय - सामंत

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** विद्यार्थ्यांना मानसिक त्रास होणार नाही अशारीतीने सहज आणि सुलभ पद्धतीने अंतिम वर्षाच्या परीक्षा कशा आणि कधी घेता येतील यासाठी कुलगुरूंची समिती गठित करण्यात आली आहे. आज, रविवारी सकाळी ११ वाजता या समितीची बैठक होणार आहे. समितीने अहवाल सादर केल्यावर राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून परीक्षा कधी घ्यायच्या याचा निर्णय घेतला जाईल, असे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भात १३ अकृषी विद्यापींठाच्या कुलगुरूंसोबत ऑनलाइन बैठक झाली. उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजीव जलोटा, संचालक डॉ. धनराज माने, तंत्र शिक्षण संचालक अभय वाघ, सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरू आणि संबंधित अधिकारी सहभागी होते. सर्वोच्च न्यायालयाच्या परीक्षेसंदर्भातील निर्णयानुसार राज्यातील अंतिम वर्षाच्या परीक्षा कधी आणि कशा एका समान पद्धतीने घेता येतील याचे नियोजन करणे गरजेचे आहे. विद्यार्थी हित लक्षात घेऊन एकाही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्ष घेऊन विद्यापीठांनी एक सम पद्धतीने परीक्षा कशा घेता येतील या नियोजन करावे. तसेच विद्यापी अनुदान आयोगाच्या (यूजीसी मार्गदर्शक सूचनांनुसार ३ सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेणे शक्य आ का, याबद्दलही विचार करावा, अश सूचना सामंत यांनी दिल्या.

### झाले काय?

- विद्यार्थ्यांची परीक्षेसंदर्भातील मानसिकता लक्षात घेऊन कमीत कमी संसाधनांमध्ये आणि सहज आणि सोप्या पद्धतीने परीक्षा कशा घेता येतील यासाठीचा अभ्यास करण्यासाठी कुलगुरूंची एक समिती गठित करण्यात आली आहे.
- विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक सूचनांचा विचार करून परीक्षा कशा आणि कधी घेता येतील यावर उद्या समितीची बैठक होऊन अहवाल सादर होईल, असे उदय सामंत यांनी सांगितले.
- समितीच्या निर्णयानंतर कुलपती राज्यपाल आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून परीक्षेबाबतचा अंतिम निर्णय लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही सामंत यांनी सांगितले. बैठकीत गोवा, दिल्ली, मध्य प्रदेश, बनारस विद्यापीठ यांनी कशा पद्धतीने तेथील परीक्षा घेतल्या आहेत, याचाही सविस्तर आढावा घेण्यात आला.

लोकसत्ता Sun, 30 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54586651

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

लोकमत

# परीक्षांसाठी विद्यापीठे होत आहेत सज्ज!

## काहींचा आराखडा तयार। काहींना शासन आदेशाची प्रतीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाने पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा होणारच, या निर्णयावर शिक्कामोर्तब केले आहे. मात्र, अपुऱ्या सोयी-सुविधा, मनुष्यबळ, इंटरनेट कनेक्टिव्हिटी यामुळे विद्यापीठ प्रशासनाला कोविड काळात परीक्षा नियोजनात अडचणी येणार आहेत. मात्र आता परीक्षा घ्यायच्याच म्हटल्यावर राज्यातील विद्यापीठांनी त्यादृष्टीने तयारी सुरु केली आहे. राज्यातील विविध विद्यापीठांच्या अधिकारी, कुलसचिव व समन्वयकांशी बोलून विद्यापीठांची परीक्षांसाठी काय तयारी आहे, याचा 'लोकमत'ने घेतलेला थोडक्यात आढावा :

### विद्यापीठांची होणार दमछाक!

- राज्यातील १३ अकृषी विद्यापीठांपुढे अंतिम सत्राच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे आव्हान आहे. यूजीसीच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे राज्यातील विद्यापीठे ऑनलाइन, ऑफलाइन किंवा संमिश्र पद्धतीचा अवलंब परीक्षांसाठी करु शकतील. मात्र राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा पद्धतीमध्ये एकसमानता आणणे कठीण असून सध्या राज्यातील कोरोनाची परिस्थिती पाहता प्रत्येक विद्यापीठ आपापल्या स्तरावर निर्णय घेतील, या सर्व नियोजनाला वेळ लागेल, अशी शक्यता तज्ज्ञांनी वर्तवली आहे.
- जेथे ऑनलाइन परीक्षा घेणे अडचणीचे ठरेल त्या विद्यापीठांमध्ये साहजिकच फिजिकल डिस्टन्सिंग ठेवून त्यांची प्रत्यक्ष पेन व पेपर पद्धतीने परीक्षा घ्यावी लागेल. त्यामुळे साधारणत: २ सत्रांत होणाऱ्या परीक्षांची संख्या ३ सत्रांतही होऊ शकते. याशिवाय सद्य:परिस्थितीत जो कर्मचारी १0 टक्क्यांवर कार्यरत आहे त्याची क्षमता १00 टक्के करावी लागेल.

**मुंबई विद्यापीठ**

मुंबई विद्यापीठाकडून पदविका, पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या १५८ परीक्षांसाठी सुमारे २ लाख २२ हजार ५८१ विद्यार्थी बसणार आहेत. मुंबई विद्यापीठाकडून तयार करण्यात येणाऱ्या कृती आराखड्यानुसार ग्रेडिंग पॅटर्न, एटीकेटी, दूर व मुक्त अध्ययन संस्थेतील वार्षिक परीक्षा पद्धतीनुसार प्रविष्ट झालेले विद्यार्थी, महाविद्यालयांच्या शंकांचे निरसन करून, निर्णय घेतला जाणार आहे.

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

अंतिम सत्रातील २२५ परीक्षा होतील. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकूण ७५ हजार विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागेल.

**सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे**

ऑनलाइन परीक्षेला प्राधान्य दिले जाण्याची शक्यता आहे. ऑफलाइन परीक्षेचीही चाचपणी केली जाईल. किमान दीड महिन्याचा कालावधी लागेल. येथे परीक्षा देणाऱ्यांची संख्या सुमारे सव्वादोन लाख आहे.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर**

ऑफलाइन परीक्षेची तयारी ९० टक्के झाली आहे. शासनाचे दिशानिर्देश आले की वेळापत्रक तयार करण्यात येईल.

**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

परीक्षा घेण्याचे नियोजन पूर्ण झाले असून केवळ शासनाच्या आदेशाची प्रतीक्षा आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. ईश्वर मोहुर्ले यांनी दिली. या विद्यापीठांतर्गत एकूण १८० महाविद्यालये येतात. १५ हजार विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यायची आहे. मागील वर्षी ६५ परीक्षा केंद्रे होती. यंदा केंद्रांची संख्या दुप्पट केली जाणार आहे.

**डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

येथे ऑफलाइन परीक्षा घेण्यात येईल. याविषयीचा कृती आराखडा येत्या चार दिवसांत सादर केला जाईल. पदवीच्या अंतिम वर्षाला ७० हजार विद्यार्थी असून, परीक्षेचा कालावधी वाढवून मागण्यात येणार आहे.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ**

या विद्यापीठांतर्गत परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर या जिल्ह्यातील जवळपास २०० महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील साडेपंधरा हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षा देतील. कुलगुरु डॉ. उद्धव भोसले यांनी बैठक घेऊन परीक्षेसंदर्भात पूर्वनियोजन केले. ऑफलाइन परीक्षा घेण्यासंदर्भात नियोजन करण्यात आले आहे.

Pune Main
Page No. 10 Aug 30, 2020
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

लोकमत

## परीक्षा माहितीची विद्यापीठ पुस्तिका

पुणे : सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षांसंदर्भातील तिढा अखेर सुटला असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या सूचनेनुसार परीक्षा विभागाने तयारी सुरु केली आहे.लवकरच परीक्षांबाबतची कार्यपुस्तिका विद्यापीठातर्फे प्रसिध्द केली जाणार आहे.त्यामुळे परीक्षा कोणत्या पध्दतीने घेतली जाईल, याबाबत स्पष्टता येणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने व राज्य शासनाने घेतलेल्या परस्पर भूमिकेमुळे राज्यातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत गोंधळाची स्थिती निर्माण झाली. मात्र, न्यायालयाने याबाबत स्पष्ट निर्देश दिल्याने विद्यापीठांनी परीक्षेच्या तयारीला सुरुवात केली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला सुमारे सव्वा दोन लाख विद्यार्थ्यांची परीक्षा घ्यावी लागणार आहे. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंची व परीक्षा व मुल्यपामन मंडळ संचालकांची बैठक झाली. त्यात विद्यापीठांना परीक्षांच्या विविध पर्यायांचा विचार करण्याची सूचना आहे.

Pune Main
Page No. 2 Aug 30, 2020
Powered by: erelego.com

## पुणे विद्यापीठाचा पदवीप्रदान समारंभ ऑनलाइन होणार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २९ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ११७ वा पदवीप्रदान समारंभ गुरूवार, दि. ३ सप्टेंबर रोजी होत आहे. करोनाच्या पार्श्वभूमीवर हा समारंभ पहिल्यांदाच ऑनलाइनद्वारे होत असून, या कार्यक्रमास ऑनलाइन पद्धतीने उपस्थित राहण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले आहे.

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी या समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून फोर्ब्स मार्शल प्रा. लि.चे सह-अध्यक्ष नौशाद फोर्ब्स उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे थेट प्रसारण विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून करण्यात येणार आहे. तसेच विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात हा कार्यक्रम दुपारी साडेचार वाजता होणार आहे.

करोनामुळे मुंबई आयआयटी संस्थेनेही नुकतेच ऑनलाइन पद्धतीने पदवीप्रदान सोहळा घेतला होता. या उपक्रमाचे कौतुक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते.

**Prabhat: 30.8.2020**

## अंतिम वर्षांच्या परीक्षांबाबत उद्या निर्णय

### कुलगुरू पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन

मुंबई, दि. २९ - विद्यापीठ स्तरीय



अंतिम वर्षांच्या परीक्षांबाबत सोमवारी निर्णय जाहीर करण्यात येईल, अशी माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. याबाबत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. उद्याच्या उद्या ही समिती कुलगुरू आणि प्राचार्यांशी चर्चा करणार आहे. यानंतर माजी कुलगुरुंसोबतही संवाद साधला जाणार आहे, असे त्यांनी सांगितले.

उदय सामंत म्हणाले, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत अतिशय सोप्या पद्धतीने या परीक्षा घ्या अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना तयारीसाठी पुरेसा वेळ देण्याबाबतही विचार करण्यात येईल. विद्यापीठ परीक्षांबाबत विद्यार्थ्यांमधला संभ्रम वाढेल असे कुणीही राजकारण करू नये, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

दरम्यान, विद्यापीठाच्या अंतिम वर्गाच्या परीक्षा होणार की नाही याबाबत सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला आहे. परीक्षेची तारीख बदलू शकते मात्र परीक्षा रद्द होणार नाही, असा निर्णय न्यायालयाने दिला आहे. परीक्षांसंदर्भात यूजीसीच्या निर्णयावर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. यूजीसीच्या ६ जुलैच्या गाईडलाईन्सनुसार ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेण्यास सांगितले होते. ही तारीख राज्य सरकार पुढे ढकलू शकते, असे न्यायालयाने म्हटले आहे. ३० सप्टेबरपर्यंत परीक्षा घेऊ न शकणाऱ्या राज्यांनी परीक्षेची तारीख पुढं ढकलण्यासाठी यूजीसीशी संपर्क करावा, असं कोर्टानं म्हटलंय. एखाद्या राज्याला जर परीक्षा घ्यायची नसेल तर त्यांनी यूजीसीशी चर्चा करावी असंही कोर्टानं म्हटलं आहे.

**Prabhat: 30.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# उपस्थितांची मर्यादा शंभर

**अनलॉक 4**

## शाळा, महाविद्यालये बंदच; मेट्रो टप्प्याटप्प्याने धावणार

सकाळ न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली ता २९ : कोरोनाच्या संसर्गामुळे विविध सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि धार्मिक कार्यक्रमांवर घालण्यात आलेली बंधने केंद्र सरकारने आज काहीशी शिथिल केली. आता या कार्यक्रमांना २१ सप्टेंबरपासून शंभर लोकांना उपस्थित राहता येईल. दिल्लीसह देशाच्या अन्य महानगरांतील मेट्रोची सेवाही येत्या ७ सप्टेंबरपासून टप्प्याटप्प्याने पुन्हा सुरू करण्याचे निर्देश गृह मंत्रालयाने दिले आहेत.**

आज संध्याकाळी आठच्या सुमारास केंद्रीय गृहमंत्रालयाने 'अनलॉक -४' चे नवे दिशा-निर्देश जारी केले. १ ते ३० सप्टेंबर या काळात शाळा, महाविद्यालये आणि शैक्षणिक संस्था मात्र बंदच राहणार आहेत. इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी मात्र हे नियम काहीसे शिथिल करण्यात आले आहेत. आता केंद्राच्या परवानगीशिवाय राज्यांना कंटेन्मेंट झोनच्याबाहेर लॉकडाउन लावता येणार नाही. कोरोनाच्या संसर्गामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वप्रथम २५ मार्च रोजी लॉकडाउनची घोषणा केली होती त्यानंतर टप्प्याटप्प्याने तो ३१ मेपर्यंत वाढविण्यात आला. आता १ जूनपासून देशामध्ये टप्प्याटप्प्याने अनलॉकची प्रक्रिया सुरू झाली आहे. विविध सार्वजनिक कार्यक्रमांवरील बंधने सरकारने हळूहळू शिथिल करायला सुरुवात केली आहे. आता अनलॉकच्या चौथ्या टप्प्यामध्ये

पान १२ वर »

### यांना परवानगी

- शंभर लोकांसह सार्वजनिक कार्यक्रम
- शाळा, महाविद्यालयांत ५० टक्के स्टाफ
- सोशल डिस्टन्सिंगसह दुकाने
- ओपन एअर थिएटर (२१ सप्टेंबरपासून)
- कौशल्य विकास प्रशिक्षण
- उच्च शिक्षण संस्थांतील शोध कार्य

### हे बंदच

- शाळा
- महाविद्यालये
- कोचिंग क्लासेस
- जलतरण तलाव
- सिनेमागृहे

### ई-पासची गरज संपली

राज्यांतर्गत आणि राज्याराज्यांतील वस्तू आणि प्रवाशांच्या वाहतुकीवर यापुढे कोणतीही बंधने नसतील, यासाठी वेगळी परवानगी, मान्यता अथवा ई-परमिटची गरज भासणार नाही असे गृहमंत्रालयाने म्हटले आहे. सरकारने पुन्हा आरोग्य सेतू ॲपच्या वापरावर भर दिला आहे.

# उपस्थितांची मर्यादा शंभर

» पान १ वरून

सार्वजनिक कार्यक्रमांवरील बंधने आणखी शिथिल करण्यात आली आहेत. सार्वजनिक कार्यक्रमांना आता शंभर लोकांना उपस्थित राहता येईल. अर्थात अशा कार्यक्रमांना उपस्थित राहताना लोकांना फेस मास्क, सोशल डिस्टन्सिंगचे कटाक्षाने पालन करावे लागेल. या ठिकाणांवर थर्मल स्कॅनिंग, सॅनिटायझर यांचा वापर अनिवार्य असेल.

शाळा, महाविद्यालये आणि खासगी कोचिंग क्लास बंद राहणार असले तरीसुद्धा ऑनलाइन शिक्षणाला मात्र परवानगी असेल. २१ सप्टेंबरनंतर व एकूण कर्मचारी क्षमतेच्या ५०% किंवा १०० पेक्षा कमी संख्येने शिक्षक आणि शैक्षणिक कर्मचाऱ्यांना शाळांमध्ये बोलावता येईल, अशी अट गृहमंत्रालयाने घातली आहे.

**Sakaal: 30.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

# पुणे विद्यापीठाचे ऑनलाइनला प्राधान्य

## अंतिम वर्षाच्या परीक्षेबाबत कुलगुरूंची माहिती; विद्यार्थ्यांना तयारीसाठी वेळ देणार

**पुणे, ता. २९ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रवेश परीक्षांसाठी वापरलेले 'प्रॉक्टर्ड' या प्रणालीचा वापर करून अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन घेण्यास प्राधान्य असणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना घरबसल्या सुरक्षित वातावरणात परीक्षा देणे शक्य होणार आहे. दरम्यान, इतर पर्यायांचाही विचार केला जाणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक सूचनांनुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा निर्णय शुक्रवारी दिला. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी या निर्णयाचे स्वागत केले. परीक्षा घेण्याबाबत 'यूजीसी'ने निर्देश दिल्यानंतर पुणे विद्यापीठाने परीक्षेची तयारी सुरू केली होती. यामध्ये बहुपर्यायी परीक्षा घेण्याचा निर्णय करण्यात आला. विद्या परिषद, परीक्षा मंडळाच्या बैठकीत याला मंजुरी घेण्यात आली आहे. त्यामुळे परीक्षेच्या कामाला गती येणार आहे.

डॉ. करमळकर म्हणाले, "पुणे विद्यापीठाने परीक्षेचे सूत्र कसे असावे, याचा निर्णय पूर्वीच घेतला आहे. त्यासाठी आता स्वतंत्र ठराव करण्याची गरज नाही. केवळ परीक्षेसाठी कोणते माध्यम असावे, याचा निर्णय घेतला जाईल. चार ते पाच महिने गेल्याने विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा विचार करून अभ्यासासाठी दीड महिना वेळ दिला जाईल. त्या काळात परीक्षेची तयारीही केली जाईल. विद्यापीठाने पदवी प्रवेश परीक्षेसाठी 'प्रॉक्टर्ड' प्रणाली वापरली होती. त्यात सुमारे तेराशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात अडचण आली नव्हती. याच पद्धतीने पदव्युत्तर पदवीच्या परीक्षा घेतल्या जातील. त्यासाठी सुमारे ३१ हजार अर्ज आले आहेत."



**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे मी स्वागत करतो. आम्ही या निर्णयाचा अभ्यास करू आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षा आणि शैक्षणिक बाबी लक्षात घेऊन त्याची अंमलबजावणी करू.**
-**डॉ. भूषण पटवर्धन,** उपाध्यक्ष, यूजीसी

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार परीक्षा घेतली जाईल. मार्चपासून बराच वेळ गेला असल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ दिला जाईल. विद्यापीठाने प्रॉक्टर्ड पद्धत वापरून प्रवेश परीक्षा ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरीत्या घेतल्या आहेत. त्याचा विचार या परीक्षेसाठी केला जाईल.**
- **डॉ. नितीन करमळकर,**
कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Sakaal: 30.8.2020**

# पहिली गुणवत्ता यादी आज

## » अकरावी प्रवेश  महाविद्यालयाचे नाव लॉगिनमध्ये दिसणार

**पुणे, ता. २९ : अकरावी प्रवेशाच्या नियमित पहिल्या फेरीतील प्रवेशाची गुणवत्ता यादी रविवारी (ता. ३०) दुपारी तीन वाजता प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगिनमध्ये प्रवेशासाठी मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव दिसणार आहे. तसेच, नियमित प्रवेशाच्या पहिल्या फेरीतील महाविद्यालयांचा कट-ऑफही समजणार आहे.**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीतील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांमधील एक लाख सहा हजार ७७५ जागांसाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यातील जवळपास सहा हजार २२७ विद्यार्थ्यांचे प्रवेश कोट्याअंतर्गत निश्चित झाले आहेत. आता अकरावी प्रवेशासाठी एक लाख ५४८ जागा उपलब्ध आहे.या प्रवेश प्रक्रियेअंतर्गत आतापर्यंत ९८ हजार ९४६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातील ८१ हजार ६८७ विद्यार्थ्यांचे अर्ज लॉक झाले आहेत. तर ८१ हजार २५१ विद्यार्थ्यांचे अर्ज व्हेरिफाय केले आहेत.

### आजच्या वेळापत्रकातील महत्त्वाचे मुद्दे

- नियमित प्रवेश फेरी- एक अंतर्गत प्रवेशासाठी गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे.
- विद्यार्थी लॉगिनमध्ये त्याला प्रवेशासाठी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालय दर्शविणे.
- संबंधित उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालय यास प्रवेशासाठी मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी कॉलेज लॉगिनमध्ये दर्शविणे.
- विद्यार्थ्यांना याबाबत मोबाईल संदेश पाठविणे.
- पहिल्या नियमित प्रवेश फेरीचे कट-ऑफ संकेतस्थळावर दर्शविणे.
- अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : https://pune.११thadmission.org.in

**Sakaal: 30.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# परीक्षा घेण्याबाबत कुलगुरूंची समिती

## उपाययोजनांबाबत आज अहवाल

सकाळ वृत्तसेवा



उदय सामंत

मुंबई, ता. २९ : राज्यातील विद्यापीठांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा कधी आणि कोणत्या पद्धतीने घ्यायच्या, यावर उपाययोजना सुचविण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली सहा कुलगुरूंची समिती स्थापन करण्यात आली आहे. राज्यातील कुलगुरूंसोबत उच्च तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आज घेतलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ही समिती रविवारी (ता.३०) आपला अहवाल सरकारला सादर करणार आहे.

सामंत यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आज राज्यातील तेरा अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत बैठक घेत परीक्षा घेण्यासंदर्भातील अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांवर सविस्तर चर्चा केली. त्यानंतर कुलगुरूंचे मत जाणून घेण्यासाठी समिती गठीत करण्याचा निर्णय जाहीर केला. अंतिम वर्षाच्या परीक्षा आयोजित करताना राज्यातील एकाही विद्यार्थ्याला आरोग्याचा त्रास होणार नाही अथवा विद्यार्थ्यांना कोणत्याही

पान १२ वर »

# अंतिम वर्ष परीक्षांबाबत उद्या होणार निर्णय

## ऑनलाईन की ओपन बुक टेस्ट यावर विचार सुरू

**मुंबई :** सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षांच्या परीक्षांसंदर्भात विचार करण्यासाठी सरकारने मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची एक समिती नेमली आहे. ही समिती रविवारीच अन्य कुलगुरू आणि प्राचार्यांशी चर्चा करून आपला अहवाल सरकारला देणार आहे. त्याआधारे सोमवारी परीक्षांबाबतचा पहिला निर्णय घेतला जाईल, अशी माहिती उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

येत्या ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेणे शक्य आहे का, यावर विचार सुरू असून सहा सदस्यीय समिती प्राचार्यांशी तसेच माजी कुलगुरूंशी संवाद साधणार आहे. दरम्यान, कोर्टाच्या निकालानंतर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेऊन अतिशय सोप्या पद्धतीने या परीक्षा घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. विद्यार्थ्यांना तयारीसाठी पुरेसा वेळ दिला जाईल, असे सामंत म्हणाले आहेत. कोरोना संक्रमणाची परिस्थिती पाहता अंतिम वर्षांच्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर बोलावून फिजिकली परीक्षा द्यायला लागू नये, असा सरकारचा प्रयत्न आहे, मात्र याचा विपर्यास करून कुणी विद्यार्थ्यांच्या संभ्रमात भर घालू नये, असे आवाहन सामंत यांनी केले आहे. गडचिरोली आणि चंद्रपूर येथे ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेणे अशक्य असल्याचे तेथील यंत्रणांचे म्हणणे आहे.

**Pudhari: 30.8.2020**

# परीक्षा घेण्याबाबत कुलगुरूंची समिती

» पान १ वरून

मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागणार नाही, याची विशेष काळजी घेतली जाईल, अशी माहितीही सामंत यांनी दिली. या समितीने ३० ऑगस्टला सकाळी ११ वाजता बैठक घेऊन आपला अहवाल सादर करावा, असे निर्देश सामंत यांनी दिले आहेत. समितीच्या निर्णयानंतर राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून परीक्षेबाबतचा अंतिम निर्णय लवकरच जाहीर करण्यात येईल, असेही सामंत यांनी सांगितले.

विद्यापीठांना समान पद्धतीने परीक्षा कशा घेता येतील? याचे नियोजन ही समिती करणार आहे. तसेच, ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेता येतील का? याबाबतही निर्णय घेतला जाणार आहे. विद्यार्थ्यांची परीक्षेसंदर्भातील मानसिकता लक्षात घेऊन कमी संसाधनांमध्ये, सहज आणि सोप्या पद्धतीने परीक्षा घेण्यासंदर्भात अभ्यासासाठी कुलगुरूंची समिती नेमल्याचे सामंत यांनी सांगितले.

**Sakaal: 30.8.2020**

# परीक्षेच्या स्वरूपाबाबत उद्या निर्णय

## कुलगुरूंची समिती अहवाल देणार

**मुंबई, (प्रतिनिधी) :** सर्वोच्च न्यायालयाने विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घ्याव्याच लागतील, असा निर्णय दिल्याने या परीक्षा कशा घेता येतील, याबाबत शिफारस करण्यासाठी कुलगुरूंची समिती नेमण्यात आली आहे. ही समिती आज (रविवारी) आपला अहवाल सादर करणार असून, त्यानंतर मुख्यमंत्री, तसेच राज्यपालांशी चर्चा करून सोमवारपर्यंत परीक्षेबाबतचा निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली.

अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करता येणार नाहीत, ही परीक्षा घेतल्याशिवाय पदवी देता येणार नाही, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने आता सरकारपुढे परीक्षा घेण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षण



मंत्री उदय सामंत यांनी काल झूमच्या माध्यमातून १३ विद्यापीठाच्या कुलगुरूंची ऑनलाइन बैठक घेतली. विद्यार्थ्यांची सुरक्षा व त्यांना कोणत्याही मानसिक त्रासाला सामोरे जावे लागणार नाही, याची काळजी घेऊन परीक्षा कशी घेता येईल याबाबत बैठकीत चर्चा झाली.

केंद्रीय विद्यापीठ अनुदान मंडळाच्या निर्देशानुसार ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेणे शक्य आहे का? याबाबत निर्णय घ्यावा लागणार आहे. मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली सहा सदस्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती कुलगुरू आणि प्राचार्यांशी चर्चा करून सोमवारपर्यंत आपला प्राथमिक अहवाल देईल. यानंतर माजी कुलगुरूंसोबतही संवाद साधला जाणार आहे. सहज आणि सुलभ पद्धतीने अंतिम वर्षाच्या परीक्षा कशा आणि कधी घेता येतील, यासाठी कुलगुरूंची समिती आपला अहवाल देईल. ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेणे शक्य नसेल, तर त्या कधी व कशा घ्याव्यात याबाबतही विचारविनिमय करून निर्णय घेतला जाईल, असे सामंत यांनी सांगितले. या बैठकीत गोवा, दिल्ली, मध्य प्रदेश, बनारस विद्यापीठ यांनी कशा पद्धतीने तेथील परीक्षा घेतल्या आहेत, याचाही सविस्तर आढावा घेण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत अतिशय सोप्या पद्धतीने या परीक्षा घ्या, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. तसेच, विद्यार्थ्यांना तयारीसाठी पुरेसा वेळ द्यावा लागेल, असे सांगताना शिक्षणमंत्री सामंत यांनी ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा होणे अशक्य असल्याचेच सूचित केले. विद्यापीठ परीक्षांबाबत राजकारण करून विद्यार्थ्यांमधला संभ्रम वाढवण्याचे काम कोणीही करू नये, असे आवाहन सामंत यांनी यावेळी केले.

**Kesari: 30.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

**केंद्राचा अनलॉक ४ जाहीर : सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमांना परवानगी**

# नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना शाळा, कॉलेजात जाण्यास मुभा

## २१ सप्टेंबरपासून विद्यार्थ्यांची ऐच्छिक उपस्थिती

नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा

केंद्रसरकारनेशनिवारी 'अनलॉक ४' जाहीरकरीत बंद असलेल्या अनेक सेवा सुरू करण्यासाठीची परवानगी दिली आहे. देशभरातील शाळा, कॉलेजेस बंद राहणार आहेत. मात्र कंटेन्मेंट झोनबाहेरील शाळा, कॉलेजच्या इयत्ता नववीपासून बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यात आलेला आहे. पालकांच्या लेखी संमतीने हे विद्यार्थी २१ सप्टेंबरपासून शाळा, कॉलेजमध्ये शिक्षकांचे मार्गदर्शन घेण्यासाठी जाऊ शकतील. याशिवाय धार्मिक आणि राजकीय कार्यक्रमांना १०० लोकांच्या उपस्थितीसह परवानगी देण्यात आली आहे. काही अटींसह मेट्रोही आता धावणार आहे.

राज्यांतर्गत तसेच आंतरराज्य दळणवळणाबाबत कोणतेही निर्बंध आता असणार पान २ वर



- कंटेन्मेंट झोनमध्ये प्रतिबंध कायम
- शाळा, कॉलेजमध्ये जाण्यासाठी पालकांची परवानगी आवश्यक
- काही अटींसह ७ सप्टेंबरपासून मेट्रो सुरू
- लग्नकार्य, अंत्यसंस्कारास १०० जणांना परवानगी
- कंटेन्मेंट झोनमध्ये लॉकडाऊन कडक राहणार

**राज्य सरकारांना लॉकडाऊन करण्यास केंद्राचा मज्जाव**

केंद्र सरकारने आज जाहीर केलेल्या अनलॉक ४ च्या नियमावलीनुसार कोणतेही राज्य आता स्वत:हून लॉकडाऊन करू शकणार नाही. त्यामुळे राज्यांचा याबाबतीतला अधिकार संपुष्टात आला आहे. केवळ कंटेन्मेंट झोनपुरताच लॉकडाऊन करण्याचा अधिकार राज्यांच्या स्थानिक प्रशासनांना असेल. मात्र केंद्र सरकारच्या परवानगीने राज्यांना परिस्थितीनुसार लॉकडाऊन करण्याची परवानगी राहील.

**पान १ वरून...**

### नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांना शाळा...

नाहीत. त्यामुळे राज्यातील राज्यात तसेच एका राज्यातून दुसऱ्या राज्यात प्रवास करण्यासाठी परवानगीची आवश्यकता असणार नाही. तसेच मालवाहतुकीसाठीही कोणत्याही परवानगीची गरज असणार नाही. दि. ७ सप्टेंबरपासून काही अटी व शर्तीसह मेट्रो सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस मात्र सप्टेंबरअखेर पर्यंत बंदच राहणार आहेत. मात्र इयता नववीपासून ते बारावीपर्यंतचे ५० टक्के विद्यार्थी वर्गात उपस्थित राहू शकतील, असेही नियमावलीत नमूद केले आहे. मात्र त्यांना आवश्यक असेल आणि पालकांची लेखी परवानगी असेल तरच त्यांना शाळेत येण्यासाठी परवानगी असणार आहे. शाळा बंद असल्या तरी ऑनलाईन शिक्षणाच्या कामासाठी एकावेळी ५० टक्के शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शाळेत बोलविण्यास परवानगी असेल.

**कोरोना स्थिती पाहून विद्यार्थ्यांबाबत निर्णय घेणार**

उच्च शिक्षणातील तंत्र व व्यावसायिक विभागातील केवळ पीएचडी व पदव्युत्तर विद्यार्थी येऊ शकतील. त्यामध्ये ज्यांना प्रयोगशाळा व प्रयोगांची गरज आहे, त्यांनाच केवळ परवानगी देण्यात येणार आहे. कोरोनाची त्या त्या भागातील स्थिती पाहून याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.

**२१ सप्टेंबरपासून राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कार्यक्रम सुरू**

दि. २१ सप्टेंबरपासून सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, करमणूक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय कार्यक्रम करता येतील; पण केवळ १०० लोकांनाच परवानगी असेल. त्यासाठी सोशल डिस्टन्सिंगसह अन्य नियम पाळावे लागणार आहेत.

**Pudhari: 30.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# पदवी परीक्षांसाठी कुलगुरूंची समिती

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

## सरकारचा निर्णय; आजच अहवाल सादर होणार



न्यायालयाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा निर्णय दिल्यानंतर या परीक्षा कशा व कधी घेता येतील, यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी राज्यातील कुलगुरूंच्या बैठकीचे आयोजन केले होते. काही कुलगुरूंनी परीक्षा कशी घ्यायची, याबाबत विद्यापीठातील प्राधिकरणांना निर्णय घेऊ द्यावा, अशी सूचना केली. अखेर चर्चेअंती परीक्षेबाबत कुलगुरूंची समिती स्थापन करून या समितीनेच निर्णय घ्यावा, असे या बैठकीत ठरले. ही समिती रविवारीच अहवाल सरकारला देणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षणमंत्री सामंत यांनी शनिवारी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे राज्यातील कुलगुरूंची बैठक घेतली. या बैठकीत सामंत यांनी राज्यातील विद्यापीठांच्या सर्व कुलगुरूंशी परीक्षा संदर्भातील अडचणी व तोडग्याबाबत सविस्तर चर्चा केली. त्यानंतर कुलगुरूंचे मत जाणून घेऊन यासाठीची समिती स्थापन करण्याचा निर्णय त्यांनी जाहीर केला. अंतिम वर्षाच्या परीक्षा आयोजित करताना राज्यातील एकाही विद्यार्थ्याला आरोग्यविषयक त्रास होणार नाही, अथवा विद्यार्थ्यांना कोणत्याही मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागणार नाही, याची विशेष काळजी घेतली जाईल, अशी माहितीही सामंत यांनी या वेळी दिली.

### समितीमध्ये करमळकर, पेडणेकर, वंजारी

**पुणे :** महाविद्यालयांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन करण्यासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या कुलगुरूंच्या समितीत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे डॉ. नितीन करमळकर, एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शशिकला वंजारी यांच्यासह आजी व माजी कुलगुरूंचा समावेश आहे.

**Maharashtra Times: 30.8.2020**

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education



# 'परीक्षां'च्या निकालाचे फलित काय?

**रसिका मुळ्ये**

**शिक्षणातील अवाजवी** राजकीय हस्तक्षेप आणि संघटनांची झुंडशाही दर्जावर घाला घालणारी असते, याची जाणीव आता तरी आपल्याला व्हायला हवी. कधी परीक्षांना विरोध, कधी उत्तीर्ण होण्यासाठी लागणारे किमान गुण कमी करण्याची मागणी आणि प्रश्नपत्रिका कठीण होती म्हणून होणारी आंदोलने याचे लोण गेल्या काही वर्षांत वाढले आहे. गेले चार महिने परीक्षांभोवती सुरू असलेले नाट्यही त्यातीलच एक. मात्र त्यातून नेमके काय साधले, याचा किमान विचार सर्व सहभागी कलाकारांनी आता करणे आवश्यक आहे.

भारतात पसरू लागलेला करोनाचा संसर्ग, लागू झालेली टाळेबंदी यामुळे लगोलग 'परीक्षांचे काय?' हा प्रश्न उपस्थित झाला. एप्रिलमध्ये-टाळेबंदीच्या निकषांचे पालन करून परीक्षा कशा घेणार, हा प्रश्न काहीच विद्यापीठांच्या क्षेत्रापुरता रास्त वाटावा असा होता. अनेक विद्यापीठांमध्ये परीक्षा होऊ शकतील अशी स्थिती होती. परंतु भीती, संभ्रम अशा आदर्श राजकीय वातावरणात काही आजी आणि भावी मतदारांना सहानुभूती दाखवण्याची भुरळ कुणाही राजकीय पक्षाला पडली नसती तरच नवल. त्यामुळे परीक्षा हा मुद्दा शैक्षणिक कमी आणि राजकीय अधिक झाला. या सगळ्यात ज्यांनी गुणवत्तेची, शिक्षणाची जबाबदारी घ्यायची त्या विद्यापीठांच्या यंत्रणा, कुलगुरू यांची भूमिका 'हाताची घडी, तोंडावर बोट' अशी होती. तर आपण विद्यार्थ्यांवर घेतलेली मेहनत किती फळाला आली याची उत्सुकता असणे अपेक्षित असणारे प्राध्यापक हे राजकीय संघटनांच्या खांद्याला खांदा लावून 'परीक्षा नको'चा नारा देत होते. अचानक आपली शिक्षणव्यवस्था परीक्षाकेंद्री असल्याच्या सत्याची जाणीव काहींना झाली आणि फक्त परीक्षा रद्द करून एका रात्रीत ही व्यवस्था बदलण्याची स्वप्नेही पडली. परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला नसता तर काही विद्यापीठांच्या परीक्षा पूर्ण होऊन निकाल जाहीर करणे, पुढील वर्षाची कार्यवाही सुरू करणे अशी प्रक्रिया होऊ शकली असती. साथीच्या काळात परीक्षा देण्याचा विद्यार्थ्यांना ताण येईल, असे म्हणताना; चार महिने- नेमक्या परीक्षा होणार का, पुढील शिक्षणाचे काय, नोकरी कशी मिळणार, काढलेल्या शैक्षणिक कर्जाची परतफेड कशी करणार, अशा प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांवर आलेल्या ताणाची जबाबदारी नेमकी कुणाची? राजकीय हस्तक्षेप, गुणवत्तेशी फारकत यांबरोबरच सहानुभूतीप्रिय मानसिकता हादेखील या सर्व गदारोळातील महत्त्वाचा मुद्दा. दर दोन वर्षांनी इंगा दाखवणारा दुष्काळ, पूर, वादळे अशा परिस्थितीत यंदा अपवाद म्हणून निघालेला सरासरी मूल्यांकनाचा उपाय प्रचलित होण्यास वेळ लागला नसता.

**राज्यांच्या मर्यादा स्पष्ट**

गुणवत्तेसाठी अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणे आवश्यक असल्याची भूमिका मांडणाऱ्या यूजीसी अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बाजूने सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला. चार महिने सुरू असलेल्या गदारोळामुळे अस्पष्ट झालेले राज्यातील उच्च शिक्षणाच्या

देण्याचे नेमके अधिकार कुणाचे, हादेखील या खडाजंगीचा एक भाग होता. विद्यापीठांनी आम्ही दिलेल्या सूचना ऐकाव्यात, असे उच्च शिक्षण विभाग आणि यूजीसी यांचे म्हणणे होते. अपवादात्मक परिस्थितीतच लागू करण्यात येणारा आपत्ती व्यवस्थापन कायदा राज्याने लागू केला. हा कायदा म्हणजे जादूची छडी असून इतर सर्व कायदे, यंत्रणा, नियम हे सर्व निष्क्रिय ठरतात, अशा भ्रमात यूजीसीच्या सूचना अव्हेरून परीक्षा रद्द करण्याचा निर्णय राज्य शासनाने लागू केला. मात्र, 'परीक्षा रद्द करण्याचा निर्णय आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या कक्षेत येत नाही, यूजीसीचे नियम आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या आधारे बाजूला सारता येणार नाहीत,' असे न्यायालयाने स्पष्ट केले. राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा, गुणवत्ता यांबाबतच्या घटकांमध्ये हस्तक्षेप करण्याची राज्याची मर्यादा या निर्णयाने पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे.

**न्यायालयाने काय म्हटले?**

'गुणवत्ता राखली जावी आणि देशभरातील सर्व विद्यापीठांचे वेळापत्रक, प्रक्रिया यांमध्ये एकसूत्रता असावी यासाठी यूजीसीने सूचना दिल्या आहेत. या सूचना यूजीसीचे अधिकार आणि कार्यकक्षेनुसार आहेत. यूजीसीच्या सूचनांचे पालन करणे हे विद्यापीठांचे कर्तव्य आहे. या सूचना मार्गदर्शनासाठी आहेत, त्या बंधनकारक नाहीत असे समजून विद्यापीठांना त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही,' असे न्यायालयाने नमूद केले आहे. 'अंतिम सत्र वगळता इतर परीक्षा न घेण्याचा निर्णय हा तार्किक आहे,' असे नमूद करून अंतिम वर्ष वगळता इतर वर्षांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेतून सूट दिल्यानंतर अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेणे हे त्यांच्यासाठी अन्यायकारक असल्याचा आक्षेपही न्यायालयाने फेटाळला.

शिक्षण हा राज्यघटनेतील समवर्ती सूचीतील विषय आहे. पूर्वी राज्यांच्या सूचीत असलेला हा विषय १९७६ मध्ये समवर्ती सूचीत समाविष्ट करण्यात आला. उच्च शिक्षणाची गुणवत्ता आणि दर्जा राखणे, त्यासाठी निर्णय घेणे, उपाययोजना करणे हे केंद्राच्या अखत्यारीत येते. राज्यांच्या यादीत उच्च शिक्षण हा मुद्दा व्यवस्थापनावर अधिक भर देणारा आहे. गुणवत्तेच्या दृष्टीने केंद्रीय मंडळे, शिखर संस्थांनी घेतलेल्या निर्णयांच्या अधीन राहूनच राज्यांनी निर्णय घेणे अपेक्षित आहे. उच्च शिक्षणाची गुणवत्ता राखणे हा विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्थापनेमागील उद्देश आहे. राज्यातील विद्यापीठेही स्वायत्त आहेत. कायद्यानुसार राज्यपाल म्हणजेच कुलपती या विद्यापीठांचे प्रमुख आहेत. विद्यापीठांच्या कार्याची जबाबदारी कुलगुरूंवर आहे. असे असतानाही सातत्याने विद्यापीठांच्या कारभारात शासनाची ढवळाढवळ होत असते. विविध संघटनांच्या कचाट्यात सापडलेल्या विद्यापीठांची यंत्रणाही या हस्तक्षेपाला कळत-नकळत वाव देते. सद्यःस्थितीत विद्यापीठांसमोर असलेल्या अनेक अडचणींपैकी प्रमुख अडचण ही शासन आणि केंद्रीय यंत्रणांशी जुळवून घेणे ही आहे. मात्र, आता न्यायालयाच्या या निकालानंतर उच्च शिक्षणाचे पालकत्व


लोकसत्ता Sun, 30 August 2020 https://epaper.loksatta.com/c/54582594

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

आनंद मापुस्कर

विद्यापीठीय अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवल्यामुळे चार महिने परीक्षांवरून सुरू असलेला गोंधळ शमला. न्यायालयाने बोट ठेवले नसले, तरी चार महिन्यांतील घडामोडींतून विद्यापीठांच्या कारभारातील अवाजवी राजकीय हस्तक्षेप दिसून आला. त्या पार्श्वभूमीवर, सर्वोच्च न्यायालयाच्या या ताज्या निर्णयाचा अन्वयार्थ लावणारे विशेष लेख...




# मार्गदर्शक निकालपत्र...

**अंतिम वर्षाच्या** परीक्षा होणार की नाही, याबाबतचा संभ्रम सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर संपुष्टात आला आहे. सर्वोच्च न्यायालयातील याबाबतच्या खटल्याच्या निमित्ताने विद्यापीठ अनुदान आयोगाचे अधिकार, राज्य सरकार व केंद्र सरकारचे उच्च शिक्षणातील अधिकार आणि आपत्ती व्यवस्थापन कायद्याची कार्यकक्षा, आदी मुद्द्यांवर खल झाला.

सर्वोच्च न्यायालयामध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबतच्या याचिका घटनेच्या ३२ व्या कलमाच्या अनुषंगाने दाखल केल्या गेल्या. या याचिका दोन भागांत विभागलेल्या दिसतात.

पहिल्या समूहातील याचिकांद्वारे विद्यार्थी, युवक संघटना (युवा सेना), प्राध्यापक संघटना यांनी ६ जुलै २०२० रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने जाहीर केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांना व मनुष्यबळ विकास मंत्रालयाचे पत्र व केंद्रीय गृहमंत्रालयाकडून प्रसिद्ध केलेल्या पत्रांना आव्हान दिले होते. यामध्ये आयोगाकडून ३० सप्टेंबर २०२० पर्यंत मार्गदर्शक तत्त्वांनुसार सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांना अंतिम वर्षाच्या/ सत्राच्या परीक्षा घेण्यास सांगण्यात आले होते. देशभरातील अंतिम वर्षाच्या/ सत्राच्या विद्यार्थ्यांची परीक्षा न घेता त्यांना मागील वर्षाच्या शैक्षणिक कामगिरीवर किंवा अंतर्गत मूल्यमापनावर पदवी प्रदान करावी, ही या याचिकाकर्त्यांची मागणी होती.

दुसऱ्या समूहातील याचिकाकर्त्यांनी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि राज्य सरकार (महाराष्ट्र व पश्चिम बंगाल) यांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा न घेण्याच्या भूमिकेला आव्हान दिले होते. आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणे राज्यांमध्ये परीक्षा झाल्या पाहिजेत, अशी या याचिकाकर्त्यांची मागणी होती.

आयोगाच्या विरोधातील याचिकाकर्त्या विद्यार्थ्यांनी- आयोगाने कोविड-१९ या साथरोग काळात परीक्षा घेण्यास बाध्य करणारी मार्गदर्शक तत्त्वे ही मनमानी व लहरी स्वरूपाची असून लाखो विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षाविषयक मूलभूत हक्कांची पायमल्ली करणारी आहेत, हा युक्तिवाद केला. तसेच जर सीबीएसई व आयसीएसईच्या दहावी-बारावीच्या परीक्षा कोविड-१९ मुळे रद्द होऊन विद्यार्थ्यांचा निकाल त्यांच्या मागील शैक्षणिक कामगिरी/ अंतर्गत मूल्यमापनावर लावला जात असेल, तर मग केवळ पदवीच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा घेणे हे भेदभावजनक व मनमानी करणारे आहे, असे निवेदन याचिकाकर्त्यांनी केले.

२९ एप्रिल रोजी आयोगाने जाहीर केलेली परीक्षाविषयक मार्गदर्शक तत्त्वे बंधनकारक नव्हती. विद्यापीठांनी आपापल्या परिक्षेत्रातील कोविड-१९ साथरोगाची स्थिती पाहून परीक्षा व मूल्यमापनाचे नियोजन केले होते. ६ मे रोजी राज्य सरकारला सादर करण्यात आलेल्या कुलगुरू समितीच्या अहवालामध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा १ जुलै ते ३१ जुलैदरम्यान घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. या शिफारशींविरोधात युवा सेनेने निवेदन दिल्याचे त्यांच्या याचिकेत नमूद केले आहे. काही महाविद्यालये ही कोविड रुग्णांच्या अलगीकरणासाठी वापरण्यात आली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षेचा विचार करून युवा सेनेने- अशा परिस्थितीत परीक्षा घेण्याऐवजी मागील कामगिरीच्या आधारे पदवी द्यावी, अशी विनंती राज्य सरकारला केली होती. १९ जून रोजी महाराष्ट्र सरकारने या मागणीचा विचार करून परीक्षा हवी की नको हे निवडण्याचा पर्याय देणारा शासननिर्णय प्रकाशित केला. यश दुबे यांनी दाखल केलेल्या याचिकेमध्ये मध्य प्रदेश, राजस्थान, पंजाब, महाराष्ट्र या राज्यांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचे निदर्शनास आणून दिले. पश्चिम बंगाल महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षक संघटना, कृष्णा वाघमारे, सार्थक मेहता यांनीदेखील अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबतच्या आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांना विरोध करणाऱ्या याचिका केल्या.

जळगाव येथील रितेश महाजन व अन्य विद्यार्थी तसेच दीपक पाटील, अधिसभा सदस्य यांनी स्वतंत्र याचिका दाखल केली. या याचिकेमध्ये राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने १८ जून रोजी घेतलेल्या निर्णयाला, तसेच १९ जून रोजी महाराष्ट्र सरकारकडून काढण्यात आलेल्या शासननिर्णयाला आव्हान देण्यात आले. हे दोन्ही निर्णय रद्द करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली. पश्चिम बंगालमधील सोविक पाल व महाराष्ट्रातील कालिचरण गजभिये यांनीदेखील याचिका करून परीक्षा रद्द करण्याच्या आपापल्या राज्याच्या निर्णयाला आव्हान दिले.

विविध याचिकाकर्त्यांच्या मान्यवर वकिलांनी न्यायालयात आपापली बाजू मांडल्यानंतर न्यायालयाने त्यातील खालील मुद्द्यांवर विश्लेषण केले...

*(१) आयोगाने ६ जुलै २०२० रोजी जाहीर केलेली सुधारित मार्गदर्शक तत्त्वे- ज्यात अंतिम वर्षाच्या परीक्षा ३० सप्टेंबरपर्यंत घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले होते- हे आयोगाच्या कार्यकक्षेत येते काय?*

उच्च शिक्षणासंबंधात केंद्र आणि राज्य शासनाला असणाऱ्या घटनादत्त अधिकारांचे विवेचन सर्वोच्च न्यायालयाने केले आहे. केंद्र सूचीमधील क्रमांक-६६ आणि १९७६ पूर्वी राज्य सूचीत क्रमांक-११, तर नंतर समवर्ती सूचीत क्रमांक-२५ वर असलेल्या शिक्षणविषयक तरतुदींचा ऊहापोह सर्वोच्च न्यायालयाने केला आहे. राधाकृष्णन आयोग तसेच 'केस लॉ'चा संदर्भ घेत न्यायालयाने- विद्यापीठ शिक्षणाची गुणवत्ता टिकवण्याची आवश्यकता व त्याअनुषंगाने आयोगाला केंद्रीय कायद्यानुरूप बनवलेली संस्था म्हणून असलेले अधिकार राज्याच्या अधिकारापेक्षा श्रेष्ठ असल्याचे मत व्यक्त करत आयोगाच्या ६ जुलैच्या मार्गदर्शक तत्त्वांची वैधता अधोरेखित केली आहे.

*(२) ६ जुलैची मार्गदर्शक तत्त्वे ही असंवैधानिक व सल्लागारीय स्वरूपाची आहेत काय? तसेच सुधारित मार्गदर्शक तत्त्वे २९ एप्रिल २०२० रोजी प्रकाशित झालेल्या मार्गदर्शक तत्त्वांना छेद देणारी आहेत काय?*

न्यायालयाने या मुद्द्याचे पहिल्यांदा विश्लेषण केले आहे. दोन्ही वेळेस आयोगाने तज्ज्ञ समितीचे गठन केले होते. २९ एप्रिलच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्येही आयोगाने परीक्षेचे गांभीर्य व पावित्र्य राखण्याविषयी भाष्य केले आहे. परीक्षा कशी घ्यावी हे ठरवण्याची मुभा विद्यापीठांना दिली आहे, याचा अर्थ परीक्षा घ्यावी की नाही हे ठरवण्याचा अधिकार दिला नाही. मार्गदर्शक तत्त्वांच्या कलमांकडे बारकाईने बघितल्यावर लक्षात येते की, कलम ४ मध्ये शारीरिक अंतर पाळून अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यास सांगितल्या आहेत. तर कलम ५ मध्ये मधल्या वर्षांच्या परीक्षाबाबत जर परीक्षा घेणे शक्य झाले नाही तर विद्यार्थ्यांचे मूल्यमापन ५० टक्के मागील कामगिरीवर आणि ५० टक्के अंतर्गत मूल्यमापनावर करावे, अशी मुभा दिली आहे. ही मुभा अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत नाही, हे न्यायालयाने लक्षात आणून दिले. तसेच २९ एप्रिलच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये ३१ जुलैपर्यंत परीक्षा घेण्यास सांगितल्या होत्या, तर सुधारित मार्गदर्शक तत्त्वांमध्ये ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा घेण्यास सांगितल्या आहेत. यावरून नवीन तत्त्वे ही मागील तत्त्वांना धरूनच आहेत हे लक्षात येते.

पहिल्या मुद्द्याचा विचार करता परीक्षाविषयक मार्गदर्शक तत्त्वे ही आयोगाच्या कार्यकक्षेत येतात. कारण विद्यापीठ अनुदान आयोग कायदा, १९५६ च्या कलम १२ अन्वये विद्यापीठांतील शिक्षण, परीक्षा व संशोधन यांतील दर्जा/गुणवत्ता राखण्याचे अधिकार आयोगाला आहेत. आयोगाच्या २०१३ च्या विनियमाने (रेग्युलेशन) हा अधिकार आयोगाला प्राप्त झाला आहे.

*(३) आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे घटनेच्या १४ व्या व २१ व्या कलमाचे उल्लंघन करणारी आहेत काय?*

आयोगाच्या सूचनांमुळे कलम १४ म्हणजेच कायद्यापुढील समानता या तरतुदीचा भंग झाल्याचा दावा न्यायालयाने फेटाळला. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना एक नियम व अंतिम वर्षासाठी वेगळा नियम असे करणे अयोग्य आहे, तसेच ३० सप्टेंबर ही परीक्षा घेण्याची अंतिम तारीख जाहीर केल्याने देशात असमान परिस्थितीत असणाऱ्या विद्यार्थ्यांना समान वागणूक अशी अन्याय्य गोष्ट आयोगाने केल्याचा दावाही न्यायालयाने फेटाळला. यासंदर्भात न्यायालयाने अंतिम सत्र/ वर्षाच्या परीक्षांचे महत्त्व अधोरेखित करत त्यामधील कामगिरीच्या आधारावर भविष्यातील करिअरचा मार्ग सुकर होतो असे म्हटले. तसेच आयोगाने परीक्षा घेण्यात दिलेल्या लवचीकतेचाही उल्लेख न्यायालयाने केला.

कोविडचा वाढता संसर्ग लक्षात न घेता आयोगाने परीक्षा घेण्यासंदर्भात दिलेल्या सूचना घटनेच्या कलम २१ ने दिलेल्या जीविताच्या हक्काचा भंग करतात, हा याचिकाकर्त्यांचा दावाही न्यायालयाने फेटाळला. उलट, या सूचनांमधील सहाव्या परिच्छेदात कोविडचा वाढता संसर्ग लक्षात घेऊन विद्यापीठांनी केंद्र, राज्य शासन तसेच मनुष्यबळ विकास मंत्रालय आणि आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे, असे स्पष्ट केले आहे. तसेच ८ जुलैला परीक्षा घेण्याची प्रमाणित पद्धतही जाहीर केली आहे.

*(४) आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे यूजीसी कायदा, १९५६ च्या कलम १२ चे अनुपालन न करणारी आहेत काय?*

न्यायालयाने त्या कायद्यातील कलम १२ मधील 'विद्यापीठे व अन्य संस्था यांच्याशी विचारविनिमय' या संज्ञेचे खूप खोलवर विश्लेषण केले आहे. यामध्ये न्यायालयाने- 'अन्य संस्था' म्हणजे राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण होऊ शकत नाही, हे स्पष्ट केले आहे. त्यामुळे विविध राज्यांच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांशी आयोगाने बोलणे अपेक्षित नाही. तसेच तज्ज्ञ समितीच्या अहवालामध्ये त्यांनी विविध शैक्षणिक संस्था व विविध तज्ज्ञांशी चर्चा केली आहे. त्यामुळे मार्गदर्शक तत्त्वे विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या कलम १२ चे अनुपालन करणारीच आहेत, हे न्यायालयाने स्पष्ट केले.

*(५) राज्य सरकार व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अन्वये आयोगाच्या ३० सप्टेंबरपर्यंत अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या सूचनेला डावलून परीक्षा न घेण्याचा निर्णय घेऊ शकतात काय?*

सर्वोच्च न्यायालयाने या मुद्द्यावरही अनेक दाखले देऊन स्पष्ट केले की, कोविड साथरोगाच्या काळात एखाद्या राज्यात जर ठरावीक काळात परीक्षा घेणे शक्य नसेल तर राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तशी सूचना आयोगाला करू शकते. तसेच परीक्षेचे नवीन वेळापत्रक आखण्याची परवानगी आयोग देऊ शकेल.

*(६) राज्य सरकार व राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अन्वये अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना मागील वर्षांच्या/ सत्रांच्या/ अंतर्गत मूल्यमापनाच्या आधारे पदवी प्रदान करण्याचा निर्णय आयोगाची सुधारित मार्गदर्शक तत्त्वे डावलून घेऊ शकतात काय?*

विद्यार्थ्यांची परीक्षा कशी घ्यायची, हे ठरवण्याचा अधिकार राज्य आपत्ती व्यवस्थापन आयोगाला नाही. तसे करणे आयोगाच्या अधिकारावर अतिक्रमण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मागील शैक्षणिक कामगिरीच्या आधारे अथवा अंतर्गत गुणांवर 'प्रमोट' करण्याचा निर्णय राज्य सरकार घेऊ शकत नाही, हे न्यायालयाने स्पष्ट केले.

एकूणच सर्वोच्च न्यायालयाचे हे १६० पानी निकालपत्र हे उच्च शिक्षण क्षेत्रासाठी मार्गदर्शक आहे.

**(लेखक करिअर मार्गदर्शक आणि शिक्षण क्षेत्राचे जाणकार आहेत.)**
anandmapuskar@gmail.com

लोकसत्ता Sun, 30 August 2020
https://epaper.loksatta.com/c/54585937

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# विद्यापीठांत ऑनलाइन परीक्षा अशक्य

## केवळ मुंबई, पुणेच अपवाद; कुलगुरूंच्या समितीचा अहवाल

**मुंबई, ता. ३०:** अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नेमलेल्या समितीने अहवाल सादर केला असून मुंबई, पुणे विद्यापीठ वगळता इतर विद्यापीठांत ऑनलाइन परीक्षा घेणे अशक्य असल्याचे नमूद केले आहे. समिती हा अहवाल सोमवारी (ता. ३१) राज्य सरकारकडे सादर करणार असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सांगितले. तसेच राज्यपालांसोबतही याविषयी तातडीने चर्चा करणार असल्याचे सामंत म्हणाले.

परीक्षेच्या आयोजनाबाबत मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (ता.२९) समिती गठीत करण्यात आली होती. समितीने तयार केलेल्या अहवालावर रविवारी (ता. ३०) सामंत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. राज्यातील कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन सर्वच विद्यापीठांनी ऑफलाईन परीक्षा घेणे कठीण असल्याचे मत या अहवालात नोंदविण्यात आले आहे. मुंबई आणि पुणे या दोन विद्यापीठांचा अपवाद वगळता राज्यातील इतर विद्यापीठांमध्ये ऑनलाइन परीक्षा घेणे शक्य नाही. त्यासाठीची यंत्रणा विद्यापीठांमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे सर्व विद्यापीठांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागेल, अशी भीती कुलगुरूंनी या अहवालाच्या माध्यमातून व्यक्त केल्याचे सूत्रांनी सांगितले.

**Sakaal: 31.8.2020**

# गुरुवारपर्यंत मुदत; १९ हजार ५७५ जणांना महाविद्यालये निश्चित

## » अकरावी प्रवेश

**पुणे, ता. ३० : पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयांमधील ऑनलाइन अकरावी प्रवेश प्रक्रियेतील पहिली नियमित गुणवत्ता यादी रविवारी जाहीर करण्यात आली. यात कला, वाणिज्य, विज्ञान आणि एचएसव्हीसी या शाखेतील अभ्यासक्रमासाठी ४० हजार १३ विद्यार्थ्यांना पहिल्या फेरीतून प्रवेश देण्यात आला आहे. सुमारे १९ हजार ५७५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले आहे.**



अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी यावर्षी ७३ हजार ६८५ विद्यार्थ्यांनी अर्ज केला आहे. त्यातील ६८ हजार ७२ अर्ज पात्र ठरले आहेत. पहिल्या फेरीत २८ हजार ५९ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकलेला नाही. पहिल्या फेरीत जवळपास सहा हजार ७०२ विद्यार्थ्यांना त्यांच्या दुसऱ्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले आहे. इयत्ता अकरावीच्या केंद्रीय प्रवेशाच्या पहिल्या गुणवत्ता यादीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना सोमवारी (ता. ३१) सकाळी दहा वाजल्यापासून गुरुवारी (ता. ३) सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत प्रवेश घेता येणार आहेत. विद्यार्थी, पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रोसिड फॉर ॲडमिशन या सुविधेचा काळजीपूर्वक वापर करावा. याबाबत अधिक माहिती 'www.dydepune.com' आणि 'https://pune११thadmission.org.in/' या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

### पहिल्या फेरीत शाखानिहाय प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या

| शाखा | प्रवेश क्षमता | पात्र झालेल्या अर्ज | प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| कला | १२,६१४ | ६,३५३ | ४,३३२ |
| वाणिज्य | ३३,३३६ | २८,७९८ | १६,२२३ |
| विज्ञान | ३४,१७९ | ३१,७९२ | १८,६४३ |
| एचएसव्हीसी | ३,९७६ | १,१२९ | ८१५ |
| एकूण | ८४,१०५ | ६८,०७२ | ४०,०१३ |

### विद्यार्थी व पालकांसाठी सूचना

- पहिल्या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यासाठी आपल्या लॉगिनमध्ये जाऊन प्रोसिड फॉर ॲडमिशन करणे आवश्यक आहे.
- पहिल्या फेरीत अलॉटमेंट झालेल्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा नाही, त्यांनी ॲडमिशन करण्याची आवश्यकता नाही.
- ज्यांना अलॉटमेंट झालेली नाही त्याचा अर्थ विद्यार्थ्यांचा पसंतीक्रम योग्य नसणे अथवा कटऑफ त्या विद्यार्थ्यांच्या गुणासोबत मॅच करत नसेल
- पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाल्यास प्रवेश घेणे आवश्यक.
- प्रथम पसंतीक्रम मिळूनही विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही अथवा प्रवेश नाकारला तर अशा विद्यार्थ्यांना पुढील नियमित फेऱ्यांमध्ये संधी दिला जाणार नाही. त्यांना विशेष फेरीपर्यंत थांबावे लागेल.
- प्रवेश रद्द करायचा असल्यास तशी विनंती विद्यार्थ्यांनी संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयास करावी आणि आपला प्रवेश रद्द करून घ्यावा.
- घेतलेला प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील नियमित फेऱ्यांसाठी प्रतिबंधित करण्यात येतील. अशा विद्यार्थ्यांना विशेष फेरीपर्यंत थांबावेलागेल.

### प्राधान्यक्रमानुसार मिळालेले ॲलॉटमेंट

| प्राधान्यक्रम | कला | वाणिज्य | विज्ञान | एचएसव्हीसी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २,४०८ | ७,६२६ | ८,७८९ | ७५२ | १९,५७५ |
| २ | ६५२ | २,८८१ | ३,१२८ | ४१ | ६,७०२ |
| ३ | ३७४ | १,७४५ | २,०३८ | १७ | ४,१७४ |
| ४ | २९६ | १,१५७ | १,३८५ | २ | २,८४० |
| ५ | २४० | ८८२ | १,०१५ | १ | २,१३८ |

### पहिल्या फेरीत बोर्डनिहाय मिळालेले प्रवेशाची संख्या

| बोर्ड | पात्र अर्जाची संख्या | पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| एसएससी | ५८,५६४ | ३४,७०० |
| सीबीएसई | ६,६६१ | ३,७५१ |
| आयसीएसई | २,२७४ | १,३०६ |
| आयबी | १८ | ७ |
| आयजीसीएसई | ७० | ३६ |
| एनआयओएस | ३८० | १६६ |
| अन्य बोर्ड | १०५ | ४७ |



**Sakaal: 31.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education



# 'कट-ऑफ'मध्ये पाच टक्के वाढ

अकरावी प्रवेशाच्या पहिल्या गुणवत्ता यादीत शहरातील नामांकित महाविद्यालयांचा कट-ऑफ गेल्या वर्षीच्या तुलनेत तब्बल चार ते दहा टक्क्यांनी वाढला.

बहुतांश महाविद्यालयांचा कट-ऑफ नव्वदीपार आहे. एका महाविद्यालयाचा कला विनाअनुदानित अभ्यासक्रमाचा कट-ऑफ मागील वर्षीच्या तुलनेत २२ टक्क्यांनी वाढला आहे. अकरावी प्रवेशाचा कट-ऑफ या प्रमाणात वाढण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. महाविद्यालयात यंदा विनाअनुदानित कला शाखेचा (इंग्रजी माध्यम) कट-ऑफ हा विज्ञान शाखेच्या तुलनेत अधिक आहे.

**दहावीच्या एकूण निकालाची टक्केवारी यंदा वाढली असल्याने अकरावी प्रवेशाचा कट-ऑफ पाच ते सात टक्क्यांनी वाढली आहे.**
**डॉ. राजेंद्र झुंजारराव,**
प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

| पहिल्या फेरीतील स्थिती | | |
|---|---|---|
| महाविद्यालयाचे नाव | शाखा | कट-ऑफ (टक्केवारीत) |
| फर्ग्युसन महाविद्यालय | कला (मराठी) | ९२ |
| फर्ग्युसन महाविद्यालय | कला (इंग्रजी) | ९७.४ |
| फर्ग्युसन महाविद्यालय | विज्ञान | ९७ |
| बीएमसीसी | वाणिज्य | ९६.४ |
| सिंबायोसिस महाविद्यालय | कला | ९६.६ |
| सिंबायोसिस महाविद्यालय | वाणिज्य | ९४.२ |
| विमलाबाई गरवारे कनिष्ठ महाविद्यालय | वाणिज्य | ९१.२ |
| विमलाबाई गरवारे कनिष्ठ महाविद्यालय | विज्ञान | ९३ |
| सर परशुरामभाऊ महाविद्यालय | कला (मराठी) | ८४. ६ |
| सर परशुरामभाऊ महाविद्यालय | कला (इंग्रजी) | ९५.८ |
| सर परशुरामभाऊ महाविद्यालय | वाणिज्य | ९२.६ |
| सर परशुरामभाऊ महाविद्यालय | विज्ञान | ९५.२ |
| आबासाहेब गरवारे कॉलेज | कला | ७४.६ |
| आबासाहेब गरवारे कॉलेज | विज्ञान | ९४.८ |
| विद्याभवन ज्युनिअर कॉलेज | विज्ञान | ९०.२ |
| महाराष्ट्र विद्यालय | विज्ञान | ९५.२ |
| एमआयटी ज्युनिअर कॉलेज | वाणिज्य | ९२.८ |
| एमआयटी ज्युनिअर कॉलेज | विज्ञान | ९४.२ |
| मुक्तांगण ज्युनिअर कॉलेज | विज्ञान | ९०.८ |
| लक्ष्मणराव आपटे ज्युनिअर कॉलेज | वाणिज्य | ९०.४ |
| लक्ष्मणराव आपटे ज्युनिअर कॉलेज | विज्ञान | ९६.६ |
| एमएमसीसी | वाणिज्य | ९० |
| एमएमसीसी | विज्ञान | ९३.८ |
| मॉर्डन कॉलेज, शिवाजीनगर | कला (मराठी) | ७५.८ |
| मॉर्डन कॉलेज, शिवाजीनगर | वाणिज्य | ९२ |
| मॉर्डन कॉलेज, शिवाजीनगर | विज्ञान | ९४.८ |
| रेणुका स्वरूप ज्युनिअर कॉलेज फॉर गर्ल्स | वाणिज्य | ८४.८ |
| एमईएस गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स | वाणिज्य | ९३.८ |
| नुमवि हायस्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज | वाणिज्य | ८६.८ |
| नुमवि हायस्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज | विज्ञान | ९२ |
| नेस वाडिया महाविद्यालय | वाणिज्य | ८९.४ |
| नौरोसजी वाडिया महाविद्यालय | कला (इंग्रजी) | ९३.४ |

**Sakaal: 31.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education



म. टा. प्रतिनिधी, पुणे

**कॉलेजांच्या कटऑफमध्ये वाढ ; कला शाखेकडेही ओढा**

**पहिल्या निवड यादीत ४० हजार १३ जणांना प्रवेश**

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या प्रवेशाच्या निवड यादीत ४० हजार १३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला असून, दहावी निकालाच्या वाढलेल्या टक्केवारीमुळे नामांकित कॉलेजांमध्ये सरासरी कटऑफ गुण ४ ते ५ टक्क्यांनी वाढले आहेत. काही कॉलेजांमध्ये यंदा प्रवेशासाठी सायन्सपेक्षा आर्ट शाखेचे कटऑफ गुण वाढल्याने कला शाखेला अधिक पसंती मिळाल्याचे दिसून येत आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीद्वारे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ३०४ ज्युनिअर कॉलेजांमध्ये राबविण्यात येणाऱ्या अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची निवड यादी (अलॉटमेंट) जाहीर झाली. विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगइनमध्ये प्रवेश मिळालेले कॉलेज पाहता येईल. यादीमध्ये ४० हजार १३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले असून, त्यातील ११ हजार ५७५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे कॉलेज मिळाले आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे अनिवार्य आहे. प्रवेश न घेतल्यास हे विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेच्या बाहेर जाणार आहेत. प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना आज ३१ ऑगस्टपासून ते ३ सप्टेंबर सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत आपला प्रवेश निश्चित करायचा असून, अनेक महाविद्यालयांनी प्रवेशासाठी ऑनलाइन लिंक सुरू केली आहे. दरम्यान, प्रवेश प्रक्रियेत २८ हजार ५९ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला नाही.

फर्ग्युसन कॉलेजमध्ये आर्टस् (इंग्लिश) माध्यमाचा कट ऑफ ९७.४० टक्के आहे; तर सायन्सचा ९७ टक्के आहे. एसपी कॉलेजमध्ये सायन्स शाखेचे कट ऑफ गुण ९५.२० टक्के असतांना, आर्टस् (इंग्लिश) शाखेचे कट ऑफ गुण ९५.८० टक्के आहेत. त्याचप्रमाणे मॉडर्न ज्युनिअर कॉलेजमध्ये सायन्स शाखेचे कट ऑफ गुण ९४.८० टक्के असताना, आर्टस् (इंग्लिश अनएडेड) शाखेसाठी ९५ टक्के आहेत. त्यामुळे शहरातील नामांकित कॉलेजांमध्ये यंदा आर्टस् इंग्लिश शाखेचे कट ऑफ गुण वाढल्याचे चित्र आहे.

» अकरावी ऑनलाइन प्रवेशाची पहिली फेरी (मटा गाइड)...२

"आर्टस् शाखेतून शिक्षण घेणाऱ्यांना कमी कालावधीत करिअरच्या संधी उपलब्ध असल्याने त्याला अधिक पसंती मिळाली आहे. यंदा निकाल चांगला लागल्याने कट ऑफ गुण वाढले आहेत. सायन्स, आर्टस्, कॉमर्स शाखेतील प्रवेशाच्या कटऑफ गुणांमध्ये सरासरी ५ टक्क्यांची वाढ झाली आहे.

- डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स

इंजिनीअरिंग आणि मेडिकलच्या शिक्षणाच्या तुलनेत कॉमर्समध्ये शिक्षणाचा कालावधी कमी असून, नोकरीची हमी आहे. त्यामुळे कॉमर्स शाखेला प्रवेश घेण्यासाठी नेहमीप्रमाणे विद्यार्थ्यांचा ओढा वाढतच आहे.

- डॉ. सी. एन. रावळ, प्राचार्य, बीएमसीसी

मेडिकलचे उच्च शिक्षण पूर्ण होण्यासाठी साधारण १० वर्षे लागतात. तर, इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतल्यावर नोकरी मिळेल, याची शाश्वती नाही. याउलट आर्टमध्ये नव्या करिअरच्या वाटा आहेत. कॉमर्सकडे ओढा कायम आहे.

- डॉ. दिलीप शेठ, प्राचार्य, एसपी कॉलेज

**Maharashtra Times: 31.8.2020**



**महाविद्यालयांकडूनच 'शिष्यवृत्ती' प्रलंबित**

उच्च शिक्षण विभागाच्या शिष्यवृत्तीसाठी 'महाडीबीटी' पोर्टलवरून विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांच्या पडताळणीस महाविद्यालयांकडून विलंब केला जात आहे. अद्यापही ६४२ जणांची पडताळणी प्रलंबित आहे, त्यासाठी शिक्षण विभागाने महाविद्यालयांना १० सप्टेंबरपर्यंत अंतिम मुदतवाढ दिली आहे.

राज्य सरकारच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाइन पद्धतीने अंमलबजावणी करण्यासाठी 'महाडीबीटी' पोर्टल विकसित केले आहे. विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करण्यासाठी वेळोवेळी संस्थांना सूचना दिल्या आहेत. तरीही अद्याप ६४२ विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज महाविद्यालयांच्या स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहेत. पडताळणीसाठी १० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यापुढे मुदतवाढ मिळणार नसल्याचे पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. मोहन खताळ यांनी स्पष्ट केले.

**प्राचार्य, कुलसचिव जबाबदार**

महाविद्यालय व विद्यापीठस्तरावर शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित आहेत, त्या सर्व महाविद्यालये अथवा विद्यापीठांनी मुदतपूर्व प्रलंबित अर्ज निकाली काढावेत. मुदतीनंतर प्रलंबित अर्जांच्या बाबतीत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य अथवा विद्यापीठाच्या बाबतीत संबंधित कुलसचिव जबाबदार राहतील, असेही परिपत्रकात नमूद केले आहे.

**Sakaal: 31.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# अकरावीच्या पात्रता गुणांत सरासरी पाच टक्के वाढ

### दहावीच्या वाढलेल्या निकालाचा परिणाम

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : यंदा दहावीचा निकाल अभूतपूर्व वाढल्याने अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत नामांकित महाविद्यालयांच्या पात्रता गुणांमध्ये मोठी वाढ झाली आहे. पात्रता गुणांमध्ये सरासरी पाच टक्क्यांनी वाढ झाली असून, काही महाविद्यालयांत विज्ञान शाखेपेक्षा कला शाखेचे पात्रता गुण वाढल्याचे दिसून येत आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीतर्फे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ३०४ ज्युनिअर कॉलेजेसमध्ये राबवण्यात येणाऱ्या अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची निवड यादी (अलॉटमेंट) रविवारी जाहीर झाली. त्यात नामांकित महाविद्यालयांतील पात्रता गुणांचा आढावा घेतला असता गेल्या वर्षीच्या तुलनेत पात्रता गुणांमध्ये वाढ झाली आहे. दरवर्षी साधारणपणे दोन ते तीन टक्क्यांनी वाढ होते. मात्र यंदा दहावीचा निकाल भरघोस लागल्याने अकरावीचे पात्रता गुणही वाढल्याचे काही महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सांगितले.

नामांकित महाविद्यालयांपैकी फर्ग्युसन महाविद्यालयात कला शाखेत (इंग्रजी) माध्यमाचे पात्रता गुण ९७.४० टक्के, तर विज्ञान शाखेसाठी ९७ टक्के पात्रता गुण आहेत. स. प. महाविद्यालयात विज्ञान शाखेचे पात्रता गुण ९५.२० टक्के असून, कला (इंग्रजी) शाखेचे कट ऑफ गुण ९५.८० टक्के आहेत. तसेच मॉडर्न महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी शाखेचे गुण ९४.८० टक्के, तर कला (इंग्रजी विनाअनुदानित) शाखेसाठी ९५ टक्के पात्रता गुण आहेत. तसेच आबासाहेब गरवारे कला आणि विज्ञान, गरवारे वाणिज्य महाविद्यालय, बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयातील (बीएमसीसी) पात्रता गुणही वाढले आहेत.

> “यंदा विद्यार्थ्यांनी कला शाखेत प्रवेशासाठी उत्सुकता दाखवणे अनपेक्षित आहे. यंदा दहावीचा निकाल वाढल्याने पात्रता गुण सरासरी पाच टक्क्यांनी वाढले आहेत. कला शाखेतून शिक्षण घेणाऱ्यांना कमी कालावधीत करिअरच्या संधी उपलब्ध असल्याने हा बदल जाणवत आहे.
>
> – डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

> “पात्रता गुण अपेक्षेप्रमाणे चार ते पाच टक्क्यांनी वाढले आहेत. अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शिक्षणाच्या तुलनेत वाणिज्य शाखेतील शिक्षणाचा कालावधी कमी असल्याने, रोजगारसंधी जास्त असल्याने विद्यार्थ्यांचा वाणिज्य शाखेकडील कल वाढत आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे अकरावी प्रवेशाची उत्सुकता कमी होण्याची शक्यता आहे.
>
> – डॉ. सी. एन. रावळ, प्राचार्य, बीएमसीसी

**Loksatta: 31.8.2020**

# अकरावी प्रवेशाच्या कटऑफमध्ये वाढ

### मॉडर्न महाविद्यालय कला शाखेचा २२ टक्क्यांनी वाढला

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : अकरावी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी जाहीर झाली असून शहरातील नामांकित महाविद्यालयांचा कट ऑफ चांगलाच वाढल्याचे दिसून येत आहे. त्यात एका महाविद्यालयाचा कला विना अनुदानित अभ्यासक्रमाच्या कट ऑफ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत २२ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. सर्व साधारणपणे कटऑफमध्ये ८ ते १० टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. अकरावी प्रवेशाचा कटऑफ एवढ्या मोठ्या प्रमाणावर वाढण्याची ही पहिलीच वेळ आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या निकालात वाढ झाली. त्यामुळे यंदा अकरावी प्रवेशाचा कट ऑफ वाढणार असल्याचे स्पष्ट होते.

मॉडर्न महाविद्यालयातील अकरावी प्रवेशाच्या मराठी माध्यमाच्या कला शाखेच्या कटऑफ मध्ये तब्बल २२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मागील वर्षी मॉडर्न महाविद्यालयात कला मराठी माध्यमाचा अनुदानित तुकडीचा कटऑफ ५३.८० टक्के होता.यंदा हा कट ऑफ ७५.८० टक्के आहे.तसेच विज्ञान शाखेच्या विना अनुदानित तुकडीचा कटऑफ ८१ टक्के होता. यंदा तो ९४.२० टक्के असून कटऑफ १२.४० टक्क्यांनी वाढला आहे इतरही महाविद्यालयांच्या कटऑफमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

**प्रमुख महाविद्यालय : पहिल्या फेरीचे कट-ऑफ (टक्केवारी)**

| |
|---|
| फर्ग्युसन : कला (मराठी) ९२ टक्के, कला (इंग्रजी) : ९७.४टक्के, विज्ञान : ९७ |
| बीएमसीसी : वाणिज्य : ९६.४ टक्के |
| स. प. महाविद्यालय : कला (मराठी) : ८४. ६ टक्के, कला (इंग्रजी) : ९५.८ टक्के, वाणिज्य : ९२.६ टक्के, विज्ञान : ९५.२ टक्के |
| मॉडर्न कॉलेज, शिवाजीनगर : कला (मराठी) : ७५.८ टक्के, वाणिज्य : ९२ टक्के, विज्ञान : ९४.८ टक्के |
| लक्ष्मणराव आपटे ज्युनिअर कॉलेज : वाणिज्य : ९०.४ टक्के, विज्ञान : ९४.६ |
| एमएमसीसी : वाणिज्य : ९० टक्के, विज्ञान : ९३.८ टक्के |
| आबासाहेब गरवारे : कला : ७४.६ टक्के, विज्ञान : ९४.८ टक्के |
| सिंबायोसिस महाविद्यालय : कला : ९६.६ टक्के, वाणिज्य : ९४.२ टक्के |
| महाराष्ट्र विद्यालय : विज्ञान : ९५.२ टक्के |
| विमलाबाई गरवारे: वाणिज्य : ९१.२ टक्के, विज्ञान : ९३ टक्के |
| एमईएस गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स : वाणिज्य : ९३.८ टक्के |

**Lokmat: 31.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

# अकरावी प्रवेशाचा कट ऑफ वाढला

## नामांकित महाविद्यालयांमध्ये पाच ते सात टक्क्यांची वाढ

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अकरावी प्रवेशासाठी रविवारी जाहीर झालेल्या पहिल्या फेरीच्या निवड यादीत ४० हजार १३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला आहे. यंदा दहावीच्या वाढलेल्या निकालामुळे नामांकित महाविद्यालयांमध्ये सरासरी कट ऑफ ५ टक्क्यांनी वाढला आहे. त्यातच काही महाविद्यालयांमध्ये सायन्सपेक्षा आर्ट शाखेचे कट ऑफ गुण वाढल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे




केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीद्वारे पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणाऱ्या अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची निवड यादी (अलॉटमेंट) जाहीर झाली.

प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना उद्या, ३१ ऑगस्टपासून ते ३ सप्टेंबर सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत आपला प्रवेश निश्चित करायचा असून, अनेक महाविद्यालयांनी प्रवेशासाठी ऑनलाइन लिंक सुरू केली आहे. दहावीच्या निकालात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण टक्क्यांनी वाढल्याने आर्ट्स, सायन्स, कॉमर्स या शाखांमध्ये नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठीचा कट ऑफ सरासरी ४ ते ५ टक्क्यांनी वाढला आहे. काही कॉलेजांमध्ये तो ७ टक्क्यांपर्यंत गेल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

फर्ग्युसन कॉलेजमध्ये आर्ट्स (इंग्रजी) माध्यमाचा कट ऑफ ९७.४० टक्के आहे, तर सायन्सचा ९७ टक्के आहे. एसपी कॉलेजमध्ये सायन्स शाखेचे कट ऑफ गुण ९५.२० टक्के असतांना, आर्ट्स (इंग्रजी) शाखेचे कट ऑफ गुण ९५.८० टक्के आहे. त्याचप्रमाणे मॉडर्न ज्युनिअर कॉलेजमध्ये सायन्स शाखेचे कट ऑफ गुण ९४.८० टक्के असतांना, आर्ट्स (इंग्लिश अनएडेड) शाखेसाठी ९५ टक्के आहे. सायन्स शाखेत प्रवेश घेतल्यावर प्रामुख्याने इंजिनीअरिंग करावे लागत असून, शिक्षणानंतर नोकरीची शाश्वती नसल्याने हुशार विद्यार्थ्यांनी आर्ट (इंग्लिश माध्यम) शाखेकडे आपला मोर्चा वळवला आहे.

> “ यंदा विद्यार्थ्यांनी अनपेक्षितपणे आर्ट्स (इंग्लिश माध्यम) शाखेत प्रवेश घेण्यासाठी पसंती दाखवली आहे. पुण्यातील महाविद्यालयांमध्ये आर्ट्स (इंग्लिश माध्यम) अनुदानित तुकड्यांची संख्या कमी असल्याने; तसेच यंदा निकाल भरपूर चांगला जाहीर झाल्याने कट ऑफ गुण वाढले आहेत. एकूण विचार केला, तर सायन्स, आर्टस, कॉमर्स शाखेतील प्रवेशाच्या कट ऑफ गुणांमध्ये सरासरी ५ टक्क्यांची वाढ झाली आहे. आर्ट्स शाखेतून शिक्षण घेणाऱ्यांना कमी कालावधीत करिअरच्या संधी उपलब्ध असल्याने हा बदल जाणवत आहे.
>
> - **डॉ. राजेंद्र झुंजारराव**, प्राचार्य, मॉडर्न कॉलेज

**Pudhari: 31.8.2020**

# नामांकित महाविद्यालयांचा कटऑफ वाढला

पुणे, दि. ३० - इयत्ता अकरावी प्रवेशासाठी यंदा नामांकित कनिष्ठ महाविद्यालयांचा कटऑफ ३ ते ८ टक्क्याने वाढला. यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांना नियमित प्रवेशाच्या पहिल्या फेरीत नामांकित महाविद्यालयात प्रवेश मिळाला नाही.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी परीक्षेचा राज्याचा निकाल ९५.३० टक्के लागला. मागील वर्षी तोच ७७.१० टक्के होता. पुणे विभागाचा यंदाचा निकाल ९७.३४ टक्के लागला. मागील वर्षी ८२.४८ टक्के होता. पुणे जिल्ह्याचा निकाल ९७.९३ टक्के लागला. १५ हजार ४६६ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळाले. १२ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले. अकरावी प्रवेशासाठी बेस्ट ऑफ फाईव्हच्या गुणांचा विचार केला जातो.

नामांकित महाविद्यालयात प्रवेशासाठी स्पर्धा लागली. पसंतीक्रम नोंदवितानाही नामांकित महाविद्यालयात प्रवेश घेण्यालाच प्राधान्य दिले. मागील वर्षी निकाल कमी लागल्याने कट ऑफ घसरला. यंदा मात्र वाढला आहे. गुण व कट ऑफ यांची सांगड न बसल्याने अनेकांना पहिल्या फेरीत प्रवेश मिळाला नाही. सर्वच शाखांच्या कट ऑफ वाढला. पहिली गुणवत्ता यादी जाहीर करतानाच महाविद्यालयांचे कट ऑफही जाहीर केल्याची माहिती इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश समितीच्या सचिव मिना शेंडकर यांनी दिली.

| शाखा निहाय कटऑफ | |
|---|---|
| **मॉर्डन महाविद्यालय** | |
| कला (अनुदानित, इंग्रजी माध्यम) | ७५.८० टक्के |
| कला (विनाअनुदानित, इंग्रजी) | ९५ टक्के |
| वाणिज्य (अनुदानित) | ९२ टक्के |
| वाणिज्य (विनाअनुदानित) | ९०.२० टक्के |
| विज्ञान (अनुदानित) | ९४.८० टक्के |
| विज्ञान (विनाअनुदानित) | ९४.२० टक्के |
| **फर्गसन महाविद्यालय** | |
| कला (इंग्रजी माध्यम) | ९७.४० टक्के |
| कला (मराठी माध्यम) | ९२ टक्के |
| विज्ञान (अनुदानित) | ९७ टक्के |
| विज्ञान (विनाअनुदानित) | ९६.८० टक्के |
| **बीएमसीसी महाविद्यालय** | |
| वाणिज्य (अनुदानित) | ९६.४ टक्के |
| वाणिज्य (विनाअनुदानित) | ९५.४ टक्के |
| **गरवारे महाविद्यालय** | |
| विज्ञान | ९४.८ टक्के |
| कला | ७४.६ टक्के |
| वाणिज्य | ९३.८ टक्के |
| **सर परशुरामभाऊ महाविद्यालय** | |
| कला | ८४.६ टक्के |
| वाणिज्य | ९२.६ टक्के |
| विज्ञान | ९५.२ टक्के |
| **सिम्बॉयसिस महाविद्यालय** | |
| कला | ९६.६ टक्के |
| वाणिज्य | ९४ टक्के |

**Prabhat: 31.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

मटा गाइड

# अकरावी प्रवेशाची निवड यादी जाहीर

केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीद्वारे पुणे आणि पिंपरी-चिंचवड समितीतर्फे अकरावी प्रवेश प्रक्रियेची पहिली फेरी रविवारी जाहीर करण्यात आली. त्याचा घेतलेला आढावा.



- एकूण अर्ज ७३६८५
- पात्र अर्ज ६८०७२
- प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ४००१३
- प्रथम पसंतीक्रमांक विद्यार्थ्यांची संख्या १९५७५
- प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थी संख्या २८०५९



| विद्याशाखा | प्रवेशक्षमता | अर्ज संख्या | प्रवेश जाहीर |
|---|---|---|---|
| आर्ट्स | १२६१४ | ६३५३ | ४३३२ |
| कॉमर्स | ३३३३६ | २८७९८ | १६२२३ |
| सायन्स | ३४१७९ | ३१७९२ | १८६४३ |
| एचएसव्हीसी | ३९७६ | ११२९ | ८१५ |
| एकूण | ८४१०५ | ६८०७२ | ४००१३ |

### सध्याची प्रवेश प्रक्रियेची स्थिती

| कोटा | प्रवेशक्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
|---|---|---|
| इनहाउस | ८०८७ | ४११३ |
| अल्पसंख्याक | १०७२३ | १८४३ |
| व्यवस्थापन | ५१८९ | २५३ |
| कॅप | ८४१०५ | ० |
| एकूण | १०८१०४ | ६२२७ |

### कॉलेजांनी माहिती द्यावी

प्रवेश प्रक्रिया संपर्कात न येता (कॉन्टॅक्ट लेस) ऑनलाइन पद्धतीने राबवायची असल्याने ज्युनिअर कॉलेजांनी, ई-मेल, संपर्क क्रमांक आदी माहिती लॉगइनमध्ये भरावी. विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगइनमध्ये ही माहिती दिसणार आहे. त्यामुळे 'प्रोसीड फॉर ॲडमिशन' या सुविधेचा काळजीपूर्वक उपयोग करण्याची सूचना केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली आहे.

### पुण्यातील ९० टक्क्यांहून अधिक कट ऑफ असलेली निवडक कॉलेज

| कॉलेज | २०१९ | २०२० (५०० पैकी गुण) |
|---|---|---|
| **सायन्स** | | |
| फर्ग्युसन सायन्स (अनुदानित) | ४८० | ४८५ |
| फर्ग्युसन कॉलेज सायन्स (विनाअनुदानित) | ४७३ | ४८४ |
| लक्ष्मणराव आपटे प्रशाला सायन्स (अनुदानित) | ४७८ | ४८३ |
| सर परशुरामभाऊ ज्युनिअर कॉलेज (अनुदानित) | ४५६ | ४७३ |
| मॉडर्न ज्युनिअर (शिवाजीनगर) सायन्स (अनुदानित) | ४५३ | ४७४ |
| पी. बी. जोग ज्युनिअर कॉलेज सायन्स (विनाअनुदानित) | ४७१ | ४८५ |
| आबासाहेब गरवारे कॉलेज सायन्स (अनुदानित) | ४६८ | ४७४ |
| **आर्ट्स** | | |
| फर्ग्युसन कॉलेज आर्ट्स इंग्रजी | ४७८ | ४८७ |
| सिम्बायोसिस कॉलेज आर्ट्स (अनुदानित) | ४६९ | ४८३ |
| सर परशुरामभाऊ ज्युनिअर कॉलेज आर्ट्स इंग्रजी | ४६२ | ४७९ |
| मॉडर्न ज्युनिअर कॉलेज (शिवाजीनगर) आर्ट्स इंग्रजी (विअ.) | ४४७ | ४७५ |
| फर्ग्युसन कॉलेज आर्ट्स मराठी | ४०९ | ४६० |
| **कॉमर्स** | | |
| बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (अनुदानित) | ४७४ | ४८२ |
| बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (विनाअनुदानित) | ४६९ | ४७७ |
| एमईएस गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स (अनुदानित) | ४५६ | ४६९ |
| सिंबायोसिस कॉलेज ऑफ कॉमर्स (अनुदानित) | ४५० | ४७१ |
| लक्ष्मणराव आपटे प्रशाला | ४१३ | ४५२ |
| सर परशुरामभाऊ ज्युनिअर कॉलेज | ४४३ | ४६३ |
| मॉडर्न ज्युनिअर कॉलेज (शिवाजीनगर) कॉमर्स (अनुदानित) | ४३० | ४६० |



### प्रवेश यादीतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे वेळापत्रक

- ३१ ऑगस्ट ते ३ सप्टेंबर : सकाळी १० ते सायंकाळी ५.३०
- अधिक माहितीसाठी वेबसाइट : www.dydepune.com आणि https://pune.11thadmission.org.in

Maharashtra Times: 31.8.2020

# पदवी परीक्षा 'वस्तुनिष्ठ'?

## गर्दी टाळण्यासाठी कुलगुरू समितीची सूचना

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

अंतिम वर्षाची परीक्षा वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या आधारे घ्यावी तसेच विद्यार्थ्यांना ऑनलाइन आणि ऑफलाइन असे दोन्ही पर्याय द्यावेत, अशी सूचना अंतिम वर्षाची परीक्षा कशी घ्यायची यावर विचार करण्यासाठी सरकारने नेमलेल्या समितीने केल्याचे सूत्रांकडून समजते. याचबरोबर ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा पूर्ण होणे शक्य नसल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) एका महिन्याची मुदतवाढ मागावी, अशी सूचनाही समितीने केल्याचे सूत्रांनी सांगितले. कुलगुरूंच्या समितीने तयार केलेला हा अहवाल आज, सोमवारी दुपारी १२ वाजता सरकारकडे सादर केला जाणार असून यानंतर राज्यपालांची भेट घेऊन याबाबतचा अंतिम निर्णय जाहीर करण्यात येणार आहे.

> अंतिम वर्षांच्या परीक्षांसदर्भात कुलगुरूंनी तयार केलेला हा अहवाल सोमवारी सरकारकडे सादर केला जाणार आहे. हा अहवाल सादर झाल्यानंतर तातडीने राज्यपालांसोबत चर्चा करण्यात येणार आहे.
>
> - उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री



सर्वोच्च न्यायालयाने अंतिम वर्षांच्या परीक्षा घेण्यासाठी दिलेल्या निर्देशानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने परीक्षा नेमक्या कशा घ्यायच्या याबाबत निर्णय घेण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली सहा जणांची समिती नेमली होती. या समितीची बैठक रविवारी सकाळी ११ वाजता पार पडली. या बैठकीत मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. राजन वेळूकर आणि डॉ. विजय खोले यांनाही निमंत्रित करण्यात आले होते. यात झालेल्या चर्चेनंतर विद्यापीठ स्तरावर परीक्षांचे नियोजन करण्यात येईल असे ठरले. राज्यातील करोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन सर्वच विद्यापीठांनी ऑफलाइन परीक्षा घेणे कठीण असल्याचे मत या अहवालात नोंदविले आहे. परीक्षांचे नियोजन सोपे व्हावे व परीक्षा केंद्रांवर गर्दी होऊ नये यासाठी वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या आधारे परीक्षा घेण्यात यावी अशी सूचनाही समितीने केल्याचे सूत्रांकडून समजते. याचबरोबर परीक्षांचे नियोजन करण्यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता ३० सप्टेंबरपर्यंत परीक्षा पूर्ण होणे शक्य नसल्याने आयोगाला पत्र लिहून मुदतवाढ मागावी, अशी सूचनाही समितीने केल्याचे समजते.

### कुलगुरूंच्या समितीच्या सूचना

- राज्यातील करोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेऊन सर्वच विद्यापीठांनी ऑफलाइन परीक्षा घेणे कठीण
- मुंबई आणि पुणे या दोन विद्यापीठांचा अपवाद वगळता राज्यातील इतर विद्यापीठांमध्ये ऑनलाइन परीक्षा घेणे शक्य नाही. त्यामुळे ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही प्रकारे परीक्षा देण्याचा पर्याय देण्यात यावा.
- परीक्षांचे नियोजन सोपे व्हावे व परीक्षा केंद्रांवर गर्दी होऊ नये यासाठी वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या आधारे परीक्षा घेण्यात यावी.

### 'विद्यापीठांच्या स्वायत्ततेवर घाला'

शासनाने परीक्षेचे स्वरूप ठरवण्यासाठी समिती नेमली ती विद्यापीठ कायद्यानुसार अस्तित्वात असलेल्या अधिकार मंडळांचे अधिकार नाकारणारी आहे, असे मत राज्य सरकारच्या सरासरी गुणांच्या आधारे पदवी देण्याच्या निर्णयाला विरोध करणारी याचिका करणारे याचिकाकर्ते धनंजय कुलकर्णी यांनी व्यक्त केले. परीक्षेचे स्वरूप संबंधित अधिकार मंडळांनी ठरवणे आवश्यक असल्याने, हे शासनाचे विद्यापीठ शैक्षणिक स्वायत्ततेवर अतिक्रमण आहे. शासकीय अधिकारी या समितीत कशा करता, प्रत्येक विद्यापीठाची परिस्थिती भिन्न असल्याने एकच निर्णय ही समिती सगळ्यांना कशी लागू करणार, या समितीला कायदेशीर अस्तित्व काय, असे अनेक प्रश्न कुलकर्णी यांनी उपस्थित केले आहेत.

Maharashtra Times: 31.8.2020

# News Paper Clippings During August 2020

## Section: Education

अकरावी प्रवेश प्रक्रिया

## ४० हजार विद्यार्थ्यांना पहिल्या यादीत प्रवेश

### सरासरी कटऑफ गुण ५ टक्क्यांनी वाढले

पुणे, दि. ३० (प्रतिनिधी) – अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेची पहिल्या प्रवेशाच्या निवड यादीत ४० हजार १३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला आहे. नामांकित कॉलेजांमध्ये सरासरी कटऑफ गुण ५ टक्क्यांनी वाढले, तर काही कॉलेजांमध्ये सायन्सपेक्षा कला शाखेचे कटऑफ गुण वाढल्याचे दिसून आले.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीद्वारे पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ३०४ ज्युनियर कॉलेजांमध्ये अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेची निवड यादी ( अलॉटमेंट) जाहीर झाली. विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगइनमध्ये प्रवेश मिळालेले कॉलेज पाहता येईल. यादीमध्ये ४० हजार १३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले असून, त्यातील १९ हजार ५७५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे कॉलेज मिळाले आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे अनिवार्य आहे. प्रवेश न घेतल्यास हे विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेच्या बाहेर जाणार आहेत. प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना ३१ ऑगस्टपासून ते ३ सप्टेंबर सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत आपला प्रवेश निश्चित करायचा असून, अनेक महाविद्यालयांनी

● पान २

## ४० हजार विद्यार्थ्यांना पहिल्या यादीत प्रवेश

*(पान १ वरून)* प्रवेशासाठी ऑनलाइन लिंक सुरू केली आहे. दहावीच्या निकालात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढल्याने आर्ट्स, सायन्स, कॉमर्स या शाखांमध्ये नामांकित कॉलेजांत प्रवेश घेण्यासाठीचा कटऑफ सरासरी ४ ते ५ टक्क्यांनी वाढला आहे. काही कॉलेजांमध्ये तो ७ टक्क्यांपर्यंत गेल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

फर्ग्युसन कॉलेजमध्ये आर्ट्स (इंग्लिश) माध्यमाचा कटऑफ ९७.४० टक्के आहे, तर सायन्सचा ९७ टक्के आहे. एसपी कॉलेजमध्ये सायन्स शाखेचे कटऑफ गुण ९५.२० टक्के असतांना, आर्ट्स (इंग्लिश) शाखेचे कटऑफ गुण ९५.८० टक्के आहे. त्याचप्रमाणे मॉडर्न ज्युनिअर कॉलेजमध्ये सायन्स शाखेचे कटऑफ गुण ९४.८० टक्के असताना, आर्ट्स (इंग्लिश अनएडेड) शाखेसाठी ९५ टक्के आहे. त्यामुळे शहरातील नामांकित कॉलेजांमध्ये यंदा आर्ट्स इंग्लिश शाखेचे कटऑफ गुण वाढल्याचे चित्र आहे. सायन्स शाखेत प्रवेश घेतल्यावर प्रामुख्याने इंजिनीअरिंग करावे लागत असून, शिक्षणानंतर नोकरीची शाश्वती नसल्याने हुशार विद्यार्थ्यांनी आर्ट इंग्लिश शाखेकडे आपला मोर्चा वळवला आहे.

> “ अपेक्षेप्रमाणे कटऑफ गुण गेल्यावर्षीच्या तुलनेत साधारण ४ टक्क्यांनी वाढले आहे. इंजिनीअरिंग आणि मेडिकलच्या शिक्षणाच्या तुलनेत कॉमर्समध्ये शिक्षणाचा कालावधी कमी असून, नोकरीची हमी आहे. त्यामुळे कॉमर्स शाखेला प्रवेश घेण्यासाठी नेहमीप्रमाणे विद्यार्थ्यांचा ओढा वाढतच आहे. कमी शुल्कात शिक्षण आणि नोकरीची हमी, यामुळे कॉमर्सला पसंती कायम आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे अकरावी प्रवेशाची क्रेझ कमी होणार आहे. पालकांनी थोडा याबाबत विचार करून निर्णय घेतल्यास प्रवेशासाठी चढाओढ थांबेल.
>
> – डॉ. सी. एन. रावळ, प्राचार्य, बीएमसीसी

Saamana: 31.8.2020

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Education

**Times of India: 31.8.2020**

# FYJC list: Arts pips Science to top spot with record cut-off

**Swati Shinde Gole & Ardhra Nair | TNN**

**Pune:** In a historic change in trend observed in admissions to first year junior college (FYJC, Std XI), the Arts stream has recorded a higher cut-off than the Science stream in almost all top educational institutes in the city.

The city's most popular higher education destination, Fergusson College, recorded the highest cut-off of 97.4% for Arts (English) while its cut-off for Science was 97%.

The early trend could indicate an interest towards the Arts stream even by the 90s club achievers. Educationists have attributed the change to students' preference leaning towards preparation for competitive exams, careers in psychology, counselling and allied fields.

**97.4% VERSUS 97% AT FERGUSSON COLLEGE**

- Shift because of students opting for competitive exams, careers in psychology and allied fields, say educationists
- In most colleges, Science cut-off up by **5-10 marks** but Arts rises by minimum **10 marks to even 20-25 marks**
- Marathi-medium Arts courses too see significant rise. **Cut-off at Modern College jumps from 53.8% last year to 75.8% this time**

The cut-off has also increased by nearly 4-5% overall at all colleges owing to higher pass percentages for the Secondary School Certificate (SSC, Std X) examination this year.

Prakash Pawar, vice principal and HoD (Arts) at Fergusson College, said, "There is a big difference in the number of high schools in the city and the number of junior colleges offering Arts in English medium. This automatically leads to more competition. Then there is growing interest in subjects like Psychology and Economics, among students. Moreover, a number of students who want to appear for public service examinations from across the state come to Pune and take up Arts. All this has increased the competition."

College principal Ravindrasinh Pardeshi said he has not witnessed the Arts cut-off overriding that of Science in the past decade. He attributed the trend to the changing outlook of students in building a career.

► Eye on civil services, P 4

# With eye on future in civil services high scorers pick arts over science

## Early Trend Could Indicate An Interest Even By The 90s Club Achievers

**Swati Shinde Gole & Ardhra Nair | TNN**

**Pune:** More students are now opting for competitive exams.

"In fact, we have noticed that students are switching from the science stream to arts for the first year of graduation only to pursue a career in public administration, political science, language-specific courses, among others," Fergusson College principal Ravindrasinh Pardeshi said.

While the cut-off for Science increased by 5-10 marks at most colleges, that for Arts has gone up by a minimum 10 marks to even 20-25 marks at institutes like Modern College, SP College and Garware College, among others. Principal of Modern College of Arts, Science & Commerce R Zunjarrao said, "Nowadays, many meritorious students take up Arts to prepare for state and national civil services exams. Many want to pursue a career in Psychology to become counsellors or sports psychologists. Apart from this, the intake capacity for Arts (English) is lesser in Pune colleges although they are more in demand."

Even seats for Marathi-medium courses have seen a significant increase in cut-off. For instance, the cut-off has gone up to 75.8% at Modern College as against last year's 53.80%, a whopping 22% jump.

Principal of SP College Dilip Sheth said, "I think the rise in the overall cut-off was expected due to the high pass percentage. However, the Arts cut-off is definitely a surprise. It just reflects how students are thinking these days. They are highly inclined towards subjects like social science, public administration and government services. Hence, students prefer Arts as they can prepare for these careers simultaneously."

As far as the Commerce stream is concerned, there has been a gradual increase in cut-offs and Brihan Maharashtra College of Commerce ended with the highest cut-off for this stream with 96.4%, an improvement of nearly 2% over last year.

Admission-related data provided by the deputy director of education, Pune region, showed that quota seats for in-house students were filled just beyond the halfway mark. As for minority seats, 1,843 of the 10,723 seats available have been filled. Only 253 of 5,189 seats available under the management quota have been alloted as yet. Further, as expected, SSC topped the list in the board-wise allotment of seats with 34,700 students of 58,564 total applicants alloted seats. Next in line were CBSE and ICSE boards, which saw 6,661 and 2,274 applicants in total and 3,751 and 1,306 students allotted seats respectively.

### NUMBERS PAINT A PICTURE

**CUT-OFF MARKS FOR SOME COLLEGES** (● 2019 ● 2020)

**SCIENCE**

- Fergusson College, Science (aided) ● 480 ● 485
- Fergusson College, Science, (unaided) ● 473 ● 484
- Laxmanrao Apte Prashala, Science (aided) ● 478 ● 483
- Sir Parashurambhau Jr College, Science (aided) ● 456 ● 476
- Modern Jr College (Shivajinagar), Science (aided) ● 453 ● 474
- Late PB Jog Jr College, Science (aided) ● 471 ● 485
- Jk College Science, Commerce & Arts, Science (self-finance) ● 462 ● 476
- Dr Kalmadi Shamarao High School & Junior College, Science (self-finance) ● 459 ● 480
- Jai Hind High School & Junior College, Science (aided) ● 456 ● 469
- Jai Hind High School and Junior College Science (unaided) ● 432 ● 453
- Laxmanrao Apte Prashala, Science (unaided) ● 445 ● 464
- Sir Parashurambhau Jr College, Science (unaided) ● 449 ● 476
- Modern Junior College (Shivajinagar), Science (unaided) ● 409 ● 471
- Abasaheb Garware College, Science (aided) ● 448 ● 474
- St Mira's Junior College Science (unaided) ● 424 ● 459

**ARTS**

- Fergusson College, Arts, English ● 478 ● 487
- Symbiosis College, Arts (aided) ● 469 ● 483
- Sir Parashurambhau Jr College, Arts, English ● 462 ● 479
- Modern Junior College (Shivajinagar), Arts, English (unaided) ● 447 ● 475
- Fergusson College Arts Marathi ● 409 ● 460
- St Mira's Junior College Arts, English ● 400 ● 458

**COMMERCE**

- Brihan Maharashtra College Of Commerce Pune (aided) ● 474 ● 482
- Brihan Maharashtra College Of Commerce Pune (unaided) ● 469 ● 477
- Mes Garware College Of Commerce, Commerce (aided) ● 456 ● 469
- Symbiosis College, Commerce (aided) ● 450 ● 471
- Laxmanrao Apte Prashala, Commerce ● 413 ● 452
- Sir Parashurambhau Jr College, Commerce ● 443 ● 463
- Modern Junior College (Shivajinagar), Commerce (aided) ● 430 ● 460
- Modern Junior College (Shivajinagar), Commerce (unaided) ● 409 ● 451

*(Source: Deputy Director of Education, Pune region)*

**STREAM-WISE INTAKE AND ALLOTMENT**

| STREAM | Available Seats | Total Applicants | Total Allotted |
|---|---|---|---|
| Arts | 12,614 | 6,353 | 4,332 |
| Commerce | 33,336 | 28,798 | 16,223 |
| Science | 34,179 | 31,792 | 18,643 |
| MCVC | 3,976 | 1,129 | 815 |
| TOTAL | 84,105 | 68,072 | 40,013 |

**BOARD-WISE ALLOTMENT**

| Board | Total Applicants | Total Allotted |
|---|---|---|
| SSC | 58,564 | 34,700 |
| CBSE | 6,661 | 3,751 |
| ICSE | 2,274 | 1,306 |
| IB | 18 | 7 |
| IGCSE | 70 | 36 |
| NIOS | 380 | 166 |
| Other Board | 105 | 47 |
| TOTAL | 68,072 | 40,013 |

**QUOTA-WISE AVAILABLE SEATS & ADMITTED STUDENTS**

| Quota | Available seats | Total admission |
|---|---|---|
| In-House | 8,087 | 4,131 |
| Minority | 10,723 | 1,843 |
| Management | 5,189 | 253 |
| CAP | 84,105 | 0 |
| TOTAL | 1,08,104 | 6,227 |

# *News Paper Clippings During August 2020*

**Section: Achievement**

## मॉडर्न हायस्कूलचे विद्यार्थी ठरले अव्वल

**प्रभात वृत्तसेवा**

पुणे, दि. ७ - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर येथील मॉडर्न हायस्कूलचा इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

या शाळेतील एकूण २७० विद्यार्थी परीक्षेला बसले होते. ते सर्व उत्तीर्ण झाले आहेत. रोहित चौरे याने ९७ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. वैष्णव कोकाटे व अथर्व सुपेकर यांनी ९६.२० टक्के गुण प्राप्त करून द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. ज्ञानेश्वर संगनवार याने ९५.६० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. ११ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळाले. १५ विद्यार्थ्यांना ८५ टक्क्यांहून अधिक, २० विद्यार्थ्यांना ८० टक्क्यांहून अधिक, २७ विद्यार्थ्यांना ७५ टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत.



रोहिते चौरे



वैष्णव कोकाटे



अथर्व सुपेकर

शाळेचा शंभर टक्के निकाल लागल्यामुळे संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह शामकांत देशमुख, उपकार्यवाह व नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थी व शिक्षक, मुख्याध्यापक यांचे कौतुक केले. शाळा समिती अध्यक्ष चित्तरंजन कांबळे, शाळेचे व्हिजिटर उद्धव खरे, नियामक मंडळ सदस्या मृगजा कुलकर्णी, नियामक मंडळ सदस्य प्रमोद शिंदे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा सदस्य दादाभाऊ शिनलकर, मुख्याध्यापिका संगीता लकारे, उपमुख्याध्यापिका शारदा साबळे, पर्यवेक्षिका सीमा कुळधरण यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**Prabhat: 8.8.2020**




Image Courtesy: Google Images

# *News Paper Clippings During August 2020*

**Section: Achievement**

**लोकमत**

## मॉडर्न हायस्कूलचा १०० टक्के निकाल

लोकमत न्यूज नेटवर्क



**औंध : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे गणेशखिंड येथील मॉडर्न हायस्कूल इयत्ता १० वी चा निकाल १०० टक्के लागला. समृद्धी घनवट ९७.२० टक्क्यांनी प्रथम, सिद्धेश रानवडे ९६ टक्क्यांनी द्वितीय, प्रांजल कळमकर ९५. २० टक्के प्राप्त केले. समृद्धी घनवट व सिद्धेश रानवडे या विद्यार्थ्यांना संस्कृत विषयामधे पैकीच्या पैकी गुण मिळाले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष गजानन एकबोटे, सहकार्यवाह शामकांत देशमुख, शाळा समिती अध्यक्ष दीपक मराठे यांनी मुख्याध्यापिका छाया आंधळे, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.**

Hello Pune
Page No. 3 Aug 11, 2020
Powered by: erelego.com

## मॉडर्नच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिष्यवृत्ती जाहीर





**पिंपरी** : यमुनानगर निगडी येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न हायस्कूल मधील दोन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय दुर्बल घटक परीक्षेत शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे.

केंद्र शासनाच्या बाराव्या नियोजन आयोगानुसार समाजातील आर्थिक दुर्बल घटकात समावेश असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा घेतली जाते. डिसेंबर महिन्यात घेण्यात आलेल्या या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये सोनल कागे आणि तन्मय कोळी यांनी यश संपादन केले.

या शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्यांना केंद्र शासनाकडून सलग चार वर्षे प्रत्येकी बारा हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. सदर परीक्षेसाठी वर्षभर केलेला भरपूर सराव, शिक्षकांचे मार्गदर्शन हे यशाचे कारण असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना आशा कुंजीर, अमोल नवलपुरे, रामचंद्र घाडगे या शिक्षकांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल प्राचार्य सतीश गवळी, शाळा समिती अध्यक्ष शरद इनामदार, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह प्रा. जोत्स्ना एकबोटे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

**Kesari: 19.8.2020**




Image Courtesy: Google Images

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Achievement

# सीओईपी देशात अव्वल

## अटल रँकिंगमध्ये स्थान; दहा संस्थांची चमकदार कामगिरी

**पुणे, ता. १९ : केंद्र सरकारच्या अटल रँकिंग ऑफ इन्स्टिट्यूशन ऑन इनोव्हेशन अचिव्हमेंटच्या (एआरआयआयए) मानांकनात पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयाने (सीओईपी) देशात पहिला क्रमांक पटकावला आहे. तसेच पुण्यातील इतर १० पेक्षा जास्त संस्थांनी चमकदार कामगिरी दाखविली आहे.**

**शासकीय उच्च संस्थांच्या गटात 'सीओईपी'ने देशात पहिला क्रमांक मिळवला, याचे पूर्ण श्रेय विद्यार्थी व शिक्षकांचे आहे. गेल्या वर्षभरात 'सीओईपी'ने स्टार्टअप व इनोव्हेशनसाठी विविध प्रकारचे ५६ कार्यक्रम घेतले होते. तीन विद्यार्थ्यांच्या नवीन कल्पनांची दखल घेऊन त्यांना शासनातर्फे प्रोजेक्टसह दीड कोटी रुपये मिळाले होते. तसेच**
**डॉ. भारतकुमार आहुजा, संचालक, सीओईपी**

**भारती अभिमत विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालयाने उपलब्ध निधी आणि साधनांमधून नावीन्यपूर्ण कल्पना आणि स्टार्टअप उपक्रमांना प्रोत्साहन दिले. उद्योजकता आणि नावीन्यपूर्ण संकल्पनांना पुढे नेणारे ५५ राष्ट्रीय पातळीवरील उपक्रम आयोजित केले. पेटंट मिळवली, तसे त्यांचे प्रकाशनही केले.**
**- डॉ आनंद भालेराव, प्राचार्य**

शिक्षण मंत्रालय आणि 'एआरआयआयए'तर्फे शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन करण्यात आले होते. उपराष्ट्रपती व्येंकय्या नायडू यांच्या हस्ते 'अटल मानांकन'ची यादी जाहीर करण्यात आली. शैक्षणिक संस्था गटात पहिल्या पाच संस्थांमध्ये 'सीओईपी'ने पहिली रँक मिळवली. शासकीय व अनुदानित महाविद्यालय गटात बारामती येथील विद्याप्रतिष्ठान कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाने देशात पहिल्या ६ते २५ संस्थांमध्ये मानांकन मिळवले आहे. खासगी विद्यापीठ गटातून बँड ए गटामध्ये सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिर्व्हसिटीचा समावेश आहे, तर बँड बीमध्ये भारती विद्यापीठ अभियांत्रिकी महाविद्यालय, एमआयटी आर्ट डिझाइन अँड टेक्नॉलॉजी युनिर्व्हसिटी, सिंबायोसिस स्कील डेव्हलपमेंट अँड ओपन युनिर्व्हसिटीचा समावेश आहे.

खासगी संस्थांच्या गटात बँड ए मध्ये पहिल्या ६ ते २५ संस्थांमध्ये जेएसपीएम राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांना स्थान मिळाले आहे. बँड बीमध्ये २६ ते ५० संस्थांमध्ये एमआयटी ॲकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग, पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, मॉडर्न अभियांत्रिकी महाविद्यालय, सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीज कॉलेज ऑफ फार्मसी या संस्थांना स्थान मिळाले.

'जेएसपीएम'चे संस्थापक डॉ. तानाजी सावंत यांनी राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाला मिळालेल्या यशाबद्दल आनंद व्यक्त करत संचालक डॉ. रवी जोशी, अनिल भोसले, प्राचार्य डॉ. राकेशकुमार ज्यै, डॉ. शैलजा पाटील यांचे अभिनंदन केले.

**Sakaal: 20.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Achievement

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे स्वावलंबनाकडे आणखी एक पाऊल

### पदवी प्रमाणपत्रांची छपाई करून केली जाणार वार्षिक ५० लाखांची बचत

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) - ११७व्या पदवीप्रदान समारंभामध्ये दिल्या जाणाऱ्या पदवी प्रमाणपत्रांची छपाई यंदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात होणार आहे. याद्वारे पुणे विद्यापीठ स्वावलंबी होत असून, प्रमाणपत्रांची छपाई विद्यापीठामध्येच केली जाणार आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या अंतर्गत फेब्रुवारी २०२०मध्ये परीक्षा मुद्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाला व्यवस्थापन परिषद आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाची मान्यता मिळाली आहे. या कक्षातर्फे पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके, ट्रान्सक्रिप्ट आणि लेजर्स यांची छपाई केली जाणार आहे.

या परीक्षा मुद्रण कक्षाचे उद्‌घाटन कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अतुल पाटणकर, उपकुलसचिव डॉ. अनिल लोखंडे, विशेष कार्याधिकारी (परीक्षा मुद्रण कक्ष) डॉ. दत्तात्रय कुटे उपस्थित होते.

यंदाच्या ११७व्या पदवीप्रदान समारंभापासून पदवी प्रमाणपत्रांची छपाई ही या परीक्षा मुद्रण कक्षातर्फे केली जात आहे. विद्यापीठामार्फतच पदवी प्रमाणपत्रांची छपाई केल्यामुळे विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाकडे सुरक्षित राहणार असून, यामुळे खर्चात मोठ्या प्रमाणावर काटकसर होणार आहे. पूर्वी केवळ पदवी प्रमाणपत्रांची छपाई करण्याकरिता वार्षिक ५० लाख रुपये इतका खर्च विद्यापीठांला होत होता. आता ही छपाई विद्यापीठामार्फत केली जाणार असल्यामुळे वार्षिक तब्बल ५० लाख रुपयांची यामुळे बचत होणार आहे.

याशिवाय संचालक 'परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी परीक्षा प्रमाणपत्र व परीक्षा मुद्रण कक्ष यांच्या समन्वयातून पदवी प्रमाणपत्रांच्या डेटा प्रक्रिया व छपाईकरिता 'एसपीपीयू एज्युटेक फाऊंडेशन' यांच्या माध्यमातून वेबबेस्ड अत्यंत सुरक्षित संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे.

या कक्षातर्फे भविष्यात पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके, लेजर्स यांची छपाई केली जाणार आहे, अशी माहिती विशेष कार्याधिकारी डॉ. दत्तात्रय कुटे यांनी दिली.

**Saamana: 29.8.2020**

# विद्यापीठाची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

### पदवी प्रमाणपत्रांची छपाई करून ५० लाखांची बचत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

येत्या काही दिवसांत होणाऱ्या ११७व्या पदवीप्रदान समारंभामध्ये दिल्या जाणाऱ्या पदवी प्रमाणपत्रांची छपाई यंदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात होणार आहे. याद्वारे विद्यापीठ स्वावलंबी होत असून, वार्षिक ५० लाखांची बचत होणार आहे. त्यामुळे विद्यापीठाची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल होत असल्याचे दिसून येत आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या अंतर्गत फेब्रुवारी २०२० मध्ये परीक्षा मुद्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाला व्यवस्थापन परिषद आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाची मान्यता मिळाली आहे. या कक्षातर्फे पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके, ट्रान्सक्रिप्ट आणि लेटर्स यांची छपाई केली जाणार आहे. या परीक्षा मुद्रण कक्षाचे उद्‌घाटन शुक्रवारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. एन.एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ महेश काकडे, परीक्षा मुद्रण कक्षाचे विशेष कार्याधिकारी डॉ. दत्तात्रय कुटे आदी उपस्थित होते. यापुढे पदवी प्रमाणपत्रांची छपाई ही या परीक्षा मुद्रण कक्षातर्फे केली जाणार आहे. यामुळे खर्चात मोठ्या प्रमाणावर काटकसर होणार आहे.



**परीक्षा मुद्रण कक्षाचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. करमळकर यांच्यासह अन्य मान्यवर.**

> "विद्यापीठातील उपलब्ध मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांचा वापर करून परीक्षा मुद्रण कक्षातर्फे पदवी प्रमाणपत्रांची छपाई केली जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठाची मोठ्या प्रमाणावर बचत होणार आहे. या कक्षातर्फे भविष्यात पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके यांची छपाई केली जाणार आहे.
>
> **- डॉ. दत्तात्रय कुटे,**
> विशेष कार्याधिकारी (परीक्षा मुद्रण कक्ष),
> सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**Pudhari: 30.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Achievement

लोकमत

# पदवी प्रमाणपत्र छपाईत विद्यापीठ आत्मनिर्भर

लोकमत न्युज नेटवर्क

**पुणे :** पदवी प्रमाणपत्र छपाईत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आत्मनिर्भर होणार आहे. प्रमाणपत्रांच्या छपाईची यंत्रणा विद्यापीठातच उभारण्यात आली असून ११७ व्या पदवीप्रदान समारंभामध्ये दिल्या जाणाऱ्या प्रमाणपत्रांची छपाई इथेच होणार आहे. त्यामुळे विद्यापीठाचे ५० लाख रुपये वाचणार आहेत.

विद्यापीठाकडून दरवर्षी सुमारे १ लाख ३० हजार पदवी प्रमाणपत्रांची अन्य यंत्रणेमार्फत छपाई करून घेतली जात होती. ही प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना जुन-जुलै व डिसेंबर-जानेवारीमध्ये होणारे पदवीदान समारंभ व वर्षभर स्वतंत्रपणे दिली जातात. या प्रमाणपत्रांच्या छपाईसाठी सुमारे ५० लाख रुपये खर्च येत होता. हा खर्च टाळण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाअंतर्गत स्वतंत्र मुद्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते शुक्रवारी या कक्षाचे उदघाटन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. एन.एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अतुल पाटणकर, उपकुलसचिव डॉ. अनिल लोखंडे, विशेष कार्याधिकारी (परीक्षा मुद्रण कक्ष) डॉ. दत्तात्रय कुटे आदी उपस्थित होते.

- डिसेंबरमध्ये होणाऱ्या ११७ व्या पदवीदान प्रमाणपत्राची छपाई मुद्रण कक्षामध्येच केली जाणार आहे. त्याचप्रमाण गुणपत्रके, ट्रान्सक्रिप्ट आणि लेजर्सची छपाईही या कक्षातच केली जाणार आहे.
- या छपाईसाठीही विद्यापीठाला दरवर्षी लाखो रुपये खर्च करावे लागत होते. त्याचा खर्चही वाचणार आहे. पदवी प्रमाणपत्रांच्या डेटा प्रक्रिया व छपाई करिता एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन यांच्या माध्यमातून वेबबेस्ड अत्यंत सुरक्षित संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे.



Pune Main
Page No. 2 Aug 30, 2020
Powered by: erelego.com

## 'आऊटसोर्स' बंद करीत वार्षिक ५० लाखांची आर्थिक बचत

# विद्यापीठच छापणार पदवी प्रमाणपत्र

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २९ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना दिली जाणारी पदवी प्रमाणपत्राची छपाई आता 'आऊटसोर्स' न करता विद्यापीठात केली जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठाची वार्षिक ५० लाखांची आर्थिक बचत होणार आहे. विद्यापीठाने स्वत:च छपाई करीत आत्मनिर्भरकडे पाऊल उचलले आहे.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या अंतर्गत फेब्रुवारी २०२० मध्ये परीक्षा मुद्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षातर्फे पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके, ट्रान्सक्रिप्ट आणि लेजर्स यांची छपाई केली जाणार आहे. या परीक्षा मुद्रण कक्षाचे उद्‌घाटन शुक्रवारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. एन.एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अतुल पाटणकर, उपकुलसचिव डॉ. अनिल लोखंडे, विशेष कार्याधिकारी डॉ. दत्तात्रय कुटे आदी उपस्थित होते.

विद्यापीठाच्या मुद्रण कक्षामार्फत यंदाच्या ११७व्या पदवीप्रदान समारंभापासून पदवी प्रमाणपत्रांची छपाई केली जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांची माहिती सुरक्षित राहणार आहे. पदवी प्रमाणपत्रांच्या डेटा प्रक्रिया व छपाई करिता 'एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन' यांच्या माध्यमातून वेबबेस्ड अत्यंत सुरक्षित संगणक प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे.

> “ विद्यापीठातील उपलब्ध मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांचा वापर करून परीक्षा मुद्रण कक्षातर्फे पदवी प्रमाणपत्रांची छपाई केली जाणार आहे. यामाध्यमातून पुणे विद्यापीठ स्वावलंबी होत आहे. या कक्षातर्फे भविष्यात पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके, लेजर्स यांची छपाई केली जाणार आहे.
>
> **- डॉ. दत्तात्रय कुटे,** विशेष कार्याधिकारी, परीक्षा मुद्रण कक्ष

**Prabhat: 30.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Achievement



# गोष्ट विद्यापीठातील बचतीची
# ३४ रुपये ६० पैशांची

## पदवी प्रमाणपत्राच्या छपाईत वाचला लाखोंचा खर्च

**पुणे, ता. २९ : पदवी प्रमाणपत्राच्या छपाईवर लाखो रुपये मोजणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ही गोष्ट आहे बचतीची. या एका प्रमाणपत्रासाठी आजवर तब्बल ३५ रुपये खर्च येत होता; पण आता त्याची छपाई विद्यापीठातच अन् तीही केवळ ४० पैशांत होणार आहे. त्यामुळे एका प्रमाणपत्रामागे ३४ रुपये ६० पैशांची बचत होणार आहे.**

पुणे विद्यापीठातर्फे दरवर्षी जानेवारी आणि जुलै-ऑगस्ट महिन्यात पदवी प्रदान समारंभ आयोजित केला जातो. यंदा कोरोनामुळे ११७ वा पदवी प्रदान समारंभ ३ सप्टेंबर रोजी ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. या वेळी ७ हजार ३५ जणांना पदवी प्रदान केली जाणार आहे.

विद्यापीठाकडून आतापर्यंत खासगी एजन्सीमार्फत प्रमाणपत्र छपाई करून घेतले जात होते. मात्र, विद्यापीठातील मुद्रणालयाचा सक्षमपणे वापर करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. परीक्षा व मूल्यमापन मंडळात फेब्रुवारीत 'परीक्षा मुद्रण कक्ष' स्थापन करण्यात आला आहे. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी याचे उद्‌घाटन केले.

**पदवी प्रमाणपत्रासाठी झालेली नोंदणी** (सप्टेंबर २०२०)

| अभ्यासक्रम | नोंदणी |
| --- | --- |
| वाणिज्य | २०७९ |
| अभियांत्रिकी | १०५० |
| विज्ञान | १४६८ |
| कला | ३९७ |
| शिक्षणशास्त्र | १२५ |
| औषधनिर्माण | ७४ |
| व्यवस्थापन | १६ |
| शारीरिक शिक्षण | ०७ |

### खास सॉफ्टवेअर विकसित

परीक्षा मंडळ आणि परीक्षा मुद्रण कक्ष यांच्या समन्वयातून पदवी प्रमाणपत्रांची डेटा प्रक्रिया व छपाईसाठी 'एसपीपीयू एज्यूटेक फाउंडेशन'च्या माध्यमातून 'डिग्री डेटा प्रोसेसिंग अँड प्रिंटिंग' हे सॉफ्टवेअर विकसित केले आहे. यामध्ये पदवी प्रदान समारंभासाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची सर्व माहिती ऑनलाइन दिसणार आहे. तसेच चुका टाळण्यासाठी 'क्रॉस चेक' करण्याची सुविधाही त्यात उपलब्ध आहे.

### खर्च ३५ रुपयांवरून ४० पैशांवर

प्रमाणपत्र छपाईसाठी वर्षाला किमान ५० लाख रुपये खर्च येत होता. विद्यापीठाने आता दोन लेजर प्रिंटिंग मशीन घेतल्याने एका प्रमाणपत्रासाठी केवळ ४० पैसे खर्च येणार आहे. पूर्वी एका प्रमाणपत्रासाठी किमान ३५ रुपये खर्च येत होता, असे परीक्षा संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

**“ विद्यापीठातील उपलब्ध मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांचा वापर करून परीक्षा मुद्रण कक्षातर्फे पदवी प्रमाणपत्रांची छपाई केली जाणार आहे. या कक्षातर्फे भविष्यात पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके, लेजर्स यांची छपाई केली जाणार आहे.**

**-डॉ. दत्तात्रय कुटे,** विशेष कार्याधिकारी, परीक्षा मुद्रण कक्ष

Sakaal: 30.8.2020



# विद्यापीठातच प्रमाणपत्र छपाई

## एका प्रमाणपत्राचे ४० पैशांत मुद्रण; विद्यापीठातर्फे ५० लाखांची बचत

महाराष्ट्र टाइम्स PLANET CAMPUS उज्ज्वल भविष्यासाठी

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

“ विद्यापीठातील उपलब्ध मनुष्यबळ आणि पायाभूत सुविधांचा वापर करून परीक्षा मुद्रण कक्षातर्फे पदवी प्रमाणपत्रांची छपाई केली जाणार आहे. त्यामुळे डेटा तयार करणे आणि प्रमाणपत्र छपाईचा खर्च ३० ते ४५ रुपयांहून साधारण ४० पैशांवर आला आहे. विद्यापीठाची मोठ्या प्रमाणावर बचत होणार आहे.

- डॉ. दत्तात्रय कुटे, विशेष कार्याधिकारी, परीक्षा मुद्रण कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

परीक्षा व मूल्यमापन मंडळाने एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा डेटा एकत्र करण्यात केला. त्यासाठी एक विशेष सॉफ्टवेअर तयार केले. या डेटाच्या आधारे परीक्षा मुद्रण कक्षामध्ये प्रमाणपत्रांची छपाई करण्यात येत आहे. या सर्व प्रक्रियेमुळे प्रमाणपत्र छपाईचा खर्च एका प्रमाणपत्रासाठी ४० पैसे आला आहे. या कामामुळे ५० लाख रुपयांची बचत होणार आहे.

- डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने येत्या ३ सप्टेंबरला होणाऱ्या पदवी प्रदान समारंभासाठी प्रमाणपत्रांची छपाई विद्यापीठातच केली आहे. विद्यापीठाने एक प्रमाणपत्र केवळ ४० पैशात तयार करून, सुमारे ५० लाख रुपयांची बचत केली आहे. त्यामुळे प्रमाणपत्र तयार करण्यापासून ते छपाईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया विद्यापीठातच होणार आहे.

विद्यापीठाच्या ११७व्या पदवीप्रदान समारंभामध्ये दिल्या जाणाऱ्या पदवी प्रमाणपत्रांची छपाई यंदा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झाली आहे. याद्वारे पुणे विद्यापीठ स्वावलंबी होत असल्याचे चित्र आहे. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या अंतर्गत फेब्रुवारी २०२०मध्ये परीक्षा मुद्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाला व्यवस्थापन परिषद आणि परीक्षा व मूल्यमापन मंडळाची मान्यता मिळाली आहे. या कक्षातर्फे पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके, ट्रान्सक्रिप्ट आणि लेजर्स यांची छपाई केली जाणार आहे. या परीक्षा मुद्रण कक्षाचे उद्‌घाटन शुक्रवारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते झाले. या वेळी उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अतुल पाटणकर, उपकुलसचिव डॉ. अनिल लोखंडे, परीक्षा मुद्रण कक्षाचे विशेष कार्याधिकारी डॉ. दत्तात्रय कुटे आदी उपस्थित होते.

विद्यापीठामार्फतच पदवी प्रमाणपत्रांची छपाई केल्यामुळे विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाकडे सुरक्षित राहणार असून, यामुळे खर्चात मोठ्या प्रमाणावर काटकसर होणार आहे. पूर्वी केवळ पदवी प्रमाणपत्रांची छपाई बाहेरून करण्यासाठी वार्षिक ५० लाख रुपये इतका खर्च विद्यापीठाला होत होता. आता ही छपाई विद्यापीठामार्फत केली जाणार असल्यामुळे वार्षिक तब्बल ५० लाख रुपयांची यामुळे बचत होणार आहे. डॉ. महेश काकडे यांनी परीक्षा प्रमाणपत्र व परीक्षा मुद्रण कक्ष यांच्या समन्वयातून पदवी प्रमाणपत्रांच्या डेटा प्रक्रिया व छपाई करिता एसपीपीयू एज्युटेक फाउंडेशन यांच्या माध्यमातून वेबबेस्ड अत्यंत सुरक्षित संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

दरम्यान, विद्यापीठाचा पदवीप्रमाण समारंभ ३ सप्टेंबरला कुलपती भगतसिंह कोश्यारी, उद्योजक नौशाद फोर्ब्ज यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑनलाइन पद्धतीने होईल.

Maharashtra Times: 31.8.2020

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Contribution of Institutions towards the Society

### प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे स्वसंरक्षण साहित्याची देणगी

**पुणे** : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीकडून बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून रुग्णालयाला पाचशे स्वसंरक्षण साहित्याची (पीपीई किट) देणगी देण्यात आली. तसेच करोना बाधित रुग्णांवर उपचार होत असलेल्या विभागाला बेडशीट्सही देण्यात आली.

करोना संसर्गाच्या काळात पीपीई किटची असलेली गरज लक्षात घेऊन संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजान एकबोटे आणि संस्थेच्या कार्यवाह, महापालिकेच्या महिला-बालकल्याण समितीच्या अध्यक्षा प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी हे साहित्य बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. मुरलीधर तांबे यांच्याकडे सुपुर्द केले. तसेच करोनाबाधित रुग्णांना आवश्यक असलेले साहित्य प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीतर्फे देण्याची ग्वाही डॉ. एकबोटे यांनी दिली. या वेळी संस्थेचे उपकार्यवाह चित्तरंजन कांबळे, डॉ. निवेदिता एकबोटे, नियामक मंडळ सदस्य मोनिका वैद्य, दत्तात्रय पाटोळे, राजन देवकाते, विलास लाड आदी उपस्थित होते.

लोकसत्ता Fri, http:

### मानसिक स्वास्थ्यासाठी विद्यापीठाची हेल्पलाइन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोनाच्या प्रादुर्भावामुळे सध्या लोकांचे मानसिक स्वास्थ्य हरवले आहे; तसेच करोनातून बरे झाल्यानंतरही काही प्रमाणात लक्षणे जाणवल्यासारखे वाटते. सभोवतालची परिस्थिती पाहूनही काहींचे मानसिक स्वास्थ बिघडत आहे. या सर्वांच्या मदतीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने हेल्पलाइन सुरू केली असून, नागरिकांना विनामूल्य मार्गदर्शन करण्यात येईल.

सध्या लोकांना करोनाच्या चिंतेने ग्रासले आहे. करोना झालेल्या लोकांना यातून बाहेर यायला साधारणतः दोन आठवडे लागतात. त्यातच काही रुग्णांना हा आजार होऊन गेला, तरी बरे वाटत नाही. यालाच 'लाँग कोव्हिड' असे नाव देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांनादेखील मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. या लोकांच्या शंकांचे निरसन झाले, तर त्यांचे मानसिक स्वास्थ्य चांगले राहण्यास मदत होणार आहे. यासाठी विद्यापीठातील आरोग्य केंद्र, मानसशास्त्र विभाग आणि पाली विभागाच्या सहकार्याने 'करोना आजार व मानसिक स्वास्थ्य' या विषयावर एक हेल्पलाइन सुरू करण्यात येत आहे. इच्छुकांनी सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ०२०-७१५३१२५३ या क्रमांकावर आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

**करोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाकडून अनेक समाजाभिमुख उपक्रम राबविण्यात आले आहेत. यामध्ये संशोधनापासून सामाजिक कार्यापर्यंतच्या उपक्रमांचा समावेश आहे. त्यातील एक पुढचे पाऊल म्हणजे विद्यापीठातर्फे हेल्पलाइन सुरू केली आहे. करोनातून बरे झालेले किंवा ज्यांना करोनामुळे मानसिक नैराश्य आले आहे, अशा लोकांच्या समस्या सोडवून त्यांना मानसिक आधार देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.**

– **डॉ. प्रफुल्ल पवार**, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Maharashtra Times: 10.8.2020

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Contribution of Institutions towards the Society

### मानसिक आधारासाठी विद्यापीठाचे ॲप

**पुणे :** कोरोना प्रादुर्भावामुळे सध्या लोकांचे मानसिक स्वास्थ्य हरवत चालले आहे. कोरोनातून बरे झाल्यानंतरही काही प्रमाणात लक्षणे जाणवतात. तर ज्यांना झालेला नाही त्यांना सभोवतालची परिस्थिती पाहून मानसिक स्वास्थ्य बिघडत चालले आहे. अशा लोकांच्या मदतीसाठी आता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने एक हेल्पलाइन सुरू केली आहे. सध्या लोकांना कोरोना होईल या चिंतेने ग्रासले आहे. कोरोना झालेल्या लोकांना कोरोनातून बाहेर यायला साधारणतः दोन आठवडे लागतात. त्यातच काही रुग्णांना हा आजार होऊन गेला तरी त्यांना बरे वाटत नाही. यालाच 'लाँग कोविड' असे नाव देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांनादेखील मानसिक त्रासासा सामोरे जावे लागत आहे. अशा लोकांच्या शंकांचे निरसन झाले तर त्यांचे मानसिक स्वास्थ्य चांगले राहण्यास मदत होणार आहे. यासाठी विद्यापीठातील आरोग्य केंद्र, मानसशास्त्र विभाग व पाली विभागाच्या सहकार्याने 'कोरोना आजार व मानसिक स्वास्थ्य' या विषयावर एक हेल्पलाइन सुरू करत आहे. इच्छुकांनी सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ०२०-७१५३१२५३ या क्रमांकावर आपल्या समस्या मांडाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

**Pudhari: 12.8.2020**

### पुणे विद्यापीठ निर्माण करणार २ लाख गुळवेल रोपे

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २९ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अमृता समान मानलेल्या 'गुळवेल' या औषधी वनस्पतीच्या संशोधन प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रकल्पात 'गुळवेल' वनस्पतींची दोन लाख रोपे तयार करून दिली जाणार असून, या वनस्पतीविषयी जनजागृती करण्यात येणार आहे.

गुळवेल या वनस्पतीची देश विदेशात मागणी वाढत असून, ते उपयुक्त आहे. या वनस्पतीची लागवड व त्याबाबत जनजागृती होणे आवश्यक आहे. यासाठी 'जीवनासाठी अमृता' मिशन अंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वनस्पतीशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. दिगंबर मोकाट यांना राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, आयुष मंत्रालय भारत सरकारकडून या प्रकल्पासाठी निधी प्राप्त झाला आहे.

त्याचे उद्घाटन कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांचे हस्ते झाले. यावेळी गुळवेल रोपे लागवड, रोपे निर्मिती कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. विद्यापीठाचे वित्त व लेखा विभाग प्रमुख अतुल पाटणकर, प्रकल्प प्रमुख डॉ. दिगंबर मोकाट, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अविनाश आडे, स्थावर विभागाचे आर. व्ही. पाटील, आरोग्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. टिल्लू, वनस्पतीशास्त्र विभागाचे माजी प्राध्यापक डॉ. के. एन. धुमाळ व इतर मान्यवर आणि विद्यार्थी उपस्थित होते.



**Prabhat: 30.8.2020**

### गुळवेल संशोधन प्रकल्पाचा विद्यापीठात शुभारंभ

**पुणे :** अमृतासमान मानल्या जाणाऱ्या गुळवेल या वनस्पतीची लागवड सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या औषधी वनस्पती उद्यानात करण्यात येणार आहे. या प्रकल्पात गुळवेल या बहुमूल्य औषधी वनस्पतींची दोन लाख रोपे तयार करून दिली जाणार आहेत. या कामाचा शुभारंभ विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांच्या हस्ते शनिवारी झाला. या वनस्पतीचे खोड व पाने जीर्णज्वर, मधुमेह, काविळीतील ताप, अंगदुःखी, मूत्रविकार, विषाणूजन्य रोग, स्वाईन फ्लू, कोरोना विकारात मोठ्या प्रमाणात वापरले जाते. 'जीवनासाठी अमृता' या मिशन अंतर्गत विद्यापीठ वनस्पतीशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. दिगंबर मोकाट यांना राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ व आयुष मंत्रालय भारत सरकारने निधी दिला आहे.

**Pudhari: 30.8.2020**



विद्यापीठातील ओपन जिमच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित कुलगुरू डॉ. नितीन करमळकर व प्रशासनातील अधिकारी.

### विद्यापीठात ओपन जिम

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांसह नागरिकांना आता ओपन जिमचा लाभ घेता येणार आहे. शनिवारी राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने परराष्ट्र व्यवहार आणि संसदीय व्यवहार राज्यमंत्री व्ही. मुरलीधरन यांच्या स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत निधीतून उभारण्यात आलेल्या ओपन जिमचे त्यांच्या हस्ते ऑनलाइन उद्घाटन झाले. यावेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्रकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, संचालक क्रीडा विभाग डॉ. दीपक माने आदी उपस्थित होते.

मुरलीधरन म्हणाले, विद्यार्थ्यांसाठी ही ओपन जिमची सुविधा सुरू करताना मला खूप आनंद होतोय. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'फिट इंडिया' मोहिमेला एक वर्ष पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने विद्यापीठात ओपन जिम सुरू होतेय हा एक चांगला योगायोग आहे. मेजर ध्यानचंद यांच्या नेतृत्वाखाली भारताने ऑलिम्पिकमध्ये मिळवलेल्या सुवर्ण यशाच्या आठवणींना मुरलीधरन यांनी यावेळी उजाळा दिला. भारताचा राष्ट्रीय खेळ हॉकीमधील आतापर्यंतच्या देदीप्यमान यशाबद्दलही त्यांनी सांगितले.

करमळकर म्हणाले, विद्यापीठात मॉर्निंग वॉककरिता येणाऱ्या नागरिकांसाठी ही ओपन जिमची सुविधा अत्यंत उपयुक्त आहे. सूत्रसंचालन कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार केले. आभार डॉ. दीपक माने यांनी मानले.

**Pudhari: 31.8.2020**

# *News Paper Clippings During August 2020*

## Section: Miscellaneous

लोकमत

# भारतीय संगणक व दूरसंचार क्रांतीचे जनक : राजीव गांधी



राजीव गांधी

**भारतातील संगणक, दूरसंचार क्रांती घडविणारे दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीस अभिवादन. त्यांचे स्मरण करताना या तरुण नेत्याने साऱ्या भारतीयांच्या आशाआकांक्षा फुलवत देशाला विज्ञान व तंत्रज्ञानाच्या मदतीने महासत्ता बनविण्याचा पाया रचला आणि जागतिक राजकारणातदेखील भारताला महत्त्वाचे स्थान मिळवून दिले याची जाणीव होते.**

पंतप्रधान पदाची जबाबदारी घेतल्यानंतर काही महत्त्वाच्या प्रश्नांमध्ये लक्ष घातले. मिजोनॅशनल फ्रंटचे प्रमुख लालडेंगा यांना त्यांनी मुख्य प्रवाहात आणले. आसाम त्यावेळेस जळत होता मोठ्या प्रमाणावर तरुण वर्ग आंदोलन करीत होता. त्यांनी आसू या संघटनेशी आसाम करार केला. संत लोंगोवाल यांच्याबरोबर पंजाब करार केला. पंजाबमध्ये शांतता लाभावी हा एकमेव दृष्टिकोन त्यांच्या समोर होता. १९८५ मध्ये पंजाबमध्ये निवडणुका काँग्रेस पक्ष हरेल अकाली दल जिंकेल हे माहिती असूनही तातडीने पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या. तरुणांचा सहभाग राजकारणात वाढावा व त्यांना जास्त जबाबदारी मिळावी यासाठी त्यांनी मतदानाचे २१ वर्षांचे वय १८ वर्षे केले. त्याचप्रमाणे महिलांचाही सहभाग वाढावा म्हणून ३३% आरक्षण दिले. त्यामुळे लाखोंच्या संख्येने महिला प्रतिनिधी आज देशामध्ये दिसत आहेत. त्यांची भारताच्या प्रगतीकडे पाहण्याची दृष्टी ही २१ व्या शतकातील होती. त्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले. त्याची परिणती आज आपल्याला पाहायला मिळते. आज इन्फोसिस, विप्रो, सी. एस. या आय. टी. क्षेत्रातील कंपन्या या शेकडो लोकांना रोजगार देत आहेत. त्यांनी नफाच कमविला नाही तर आंतरराष्ट्रीय आय. टी. क्षेत्रामध्ये सन्मान देखील मिळविला आहे. त्यासाठी १९८५ मध्ये टेक्सास इंस्ट्रूमेंट सॅटलाईट

प्रा|सं|गि|क

### राजीव गांधी जयंती

अर्थस्टेशनद्वारे सॉफ्टवेअर फॅसिलिटी उपलब्ध करुन दिली. शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये ऑपरेशन ब्लॅक बोर्ड नवोदय विद्यालय व सर्व शिक्षण अभियान यासारख्या महत्त्वाच्या धोरणात्मक उपक्रमांना त्यांनी मान्यता देऊन समर्थपणे व प्रामाणिकपणे अमंलजावणी केली. आर्थिक उदारीकरणाची सुरुवात १९८५-८६ व १९८६-८७ च्या अंदाजपत्रकात पाहायला मिळते. इम्पोर्ट ड्युटीचे दर कमी करणे, लायन्सस राज हटविणे यामुळे त्या काळात एक्स्पोर्ट मोठ्या प्रमाणावर वाढला होता. संगणक व दूरसंचार क्रांती हे राजीवजींचे फार मोठे योगदान आहे. देशात संगणक युग सुरु झाले. लाखो लोक बेकार होतील, असे सांगत विरोधी पक्षांनी यास मोठा विरोध केला होता. आज मात्र संगणकाशिवाय जगणे अशक्य आहे, याची अनुभूती पदोपदी येते आणि त्यातून राजीवजींची थोरवीदेखील लक्षात येते. आज मोबाइल, टेलिफोन प्रत्येकाच्या हातामध्ये दिसतो ते केवळ दूरसंचार क्रांतीमुळेच झाले. १०० कोटींच्या जवळपास मोबाईल टेलिफोन आपल्याजवळ आहेत व इंटरनेटचा वापर देखील खूप मोठ्या प्रमाणावर आता व्हायला लागला आहे. मोबाइलला इंटरनेची गरज किती मोठ्या प्रमाणावर लागते हे सांगण्याची गरज नाही.

**- ॲड. अभय छाजेड**
सरचिटणीस, महाराष्ट्र
प्रदेश काँग्रेस कमिटी

Hello Pune
Page No. 3 Aug 20, 2020
Powered by: erelego.com

# Upcoming Events

## September 2020

| Su | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | **7** Raje Umaji Naik Jayanti  | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | **25** Pandit Dindayal Upadhyay Jayanti  | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | | | |




*Other than the College Photos, Event Photos, Newspaper clipping images, all other mages in this Bulletin Issue are downloaded from Google Images., PInterest, Freepik.Com.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.*